म. ग्र. म. टोपे
विषय Miraj
सं. नं. 1210.

मिरज संस्थान

सांरावाढ

आणि

रयतांचा सत्याग्रह

'स्पष्टवक्ता'

REFBK-0003840

किंमत एक रुपया

2-9-30

मिरज संस्थानांतील सारावाढ

आणि

रयतेचा सत्याग्रह

स्वं. वि.

लेखक

'स्पष्टवक्ता'

REFBK-003840

प्रस्तावना—लेखक

श्रीयुत **गणेश रघुनाथ अभ्यंकर**

बी. ए., एल्एल् बी., **सांगली**

उपोद्घात—लेखक

श्रीयुत **गजानन विश्वनाथ केलकर**

बी. ए., एल्एल् बी., सहसंपादक **'केसरी', पुणे.**

१९२९

किंमत एक रुपया

प्रकाशक
अनंत विनायक पटवर्धन
आर्यभूषण प्रेस, बुधवार, पुणें.



मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.



मी प्रभुपाशीं रात्रंदिवस एवढीच मागणी करीत असतों की देशबंधूंची सेवा करीत असतां माझा देह पडावा.

—वल्लभभाई पटेल

अर्पण-पत्रिका

देशबांधवांविषयीं कळकळ, तेजस्वी वृत्तीचें व्यवहारज्ञान,
वीराचा कणखरपणा आणि लोकांचा विश्वास संपादन
करण्याइतकें सेवेचें भांडवल असलें म्हणजे
सत्याग्रहाचा प्रभाव काय आहे, हें मोठमोठ्या
उन्मत्त साम्राज्याला देखील पटाविणें
शक्य आहे, असें ज्यांनीं हिंदुस्थानच्या
भांबावलेल्यां जनतेस बार्डोलींत
सिद्ध करून दिलें
त्या

श्रीं० सरदार वल्लभभाई पटेल

यांना महाराष्ट्रांतील एका लहानशा समकालीन
सत्याग्रहाचा हा इतिहास भक्तिपूर्वक
अर्पण केला असे.

लेखक

अनुक्रमणिका

		पृष्ठांक
१	विषयप्रवेश	१
२	रयतीमधील जागृति	१९
३	रयतीमधील जागृतीचा जिवंत देखावा	३२
४	पहिला सत्याग्रह व श्रीमंतांचे शुद्ध विचार ...	४९
५	वकीलांचा बळी अर्थात् श्रीमंतांच्या वचनभंगाची तयारी !	६५
६	चौकशी-कमिटीची सिद्धता आणि श्रीमंतांचा वचनभंग	७७
७	सत्याग्रहाचा आठवडा	९०
८	श्रीमंत स्वतः चळवळीत उतरले !	१२७
९	यदनेन तरुर्न पातितः क्षपिता तद्विटपाश्रिता लता । ...	१३८
१०	करबंदीची सिद्धता	१५१
११	अखेर रयतेचाच तात्त्विक जय	१६९
१२	तडजोडीस जागण्याची रयतीची धडपड... ...	२०६
१३	प्रजेसमोर अधिकारी फिके पडले	२२२
१४	पूर्णाहुती	२३७

प्रकाशकांचें दोन शब्द

'मिरज संस्थानांतील सारावाढ आणि रयतांचा सत्याग्रह' या विषयावरील प्रस्तुतचें पुस्तक सदर पुस्तकाच्या लेखकांनीं दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभेमार्फत प्रसिद्ध करण्याची संधि सभेस देऊन तें एक तिचें कार्य म्हणून असें जगापुढें येऊं दिल्यानें सभेवर त्यांनीं मोठे उपकार केले आहेत. सदर पुस्तक तयार करण्याचे श्रम जसे दुसऱ्याचे, तोच प्रकार त्याच्या छपाईच्या खर्चाचाही आहे. हा बोजा सभेवर पैचाही पडला नाहीं, ही दुसरी गोष्ट तितक्याच महत्त्वाची आहे. संस्थानी चळवळ जी हल्लीं चालू आहे ती 'दसकी लकडी एकका बोजा' अशीच आहे व दाक्षिणेंत जी संस्थानविषयक चळवळ गेलीं आठ दहा वर्षें चालू आहे ती झाली तरी याच स्वरूपाची आहे. या पुस्तकांतील सर्व विधानें व सर्व मार्ग 'दाक्षिणी संस्थान हितवर्धक सभे'स सर्वस्वीं मान्य होण्यासारखे नसले तरी, प्रजेवरील आपत्ति अन्य मार्गांनीं टळणें अशक्य झाल्यावर प्रजेस आपल्या 'माबाप'स्वरूपी अधिपतीच्या दारीं 'धरणें' धरून बसण्याचा एकच मार्ग शिल्लक राहातो व तोच मार्ग मिरजेच्या प्रजेनें स्वीकारला हें यथाक्रमच झालें. प्रसंगीं प्रेमळ मातासुद्धां मुलाचें धरणीवरील लोळण मनांत घेत नाहीं हा प्रकार रोजच्या व्यवहारांत नजरेस पडतो व तोच प्रकार मिरजेस झाला असें सदर बाबतींत समाधान मानावें लागतें. परंतु मिरजेच्या सत्याग्रहाचे वेळीं संस्थानाधिपति व त्यांचे अधिकारी यांनीं प्रजेच्या पुढाऱ्यांस दिलेलीं अभिवचनें पाळलीं नाहींत, हा त्यांच्याकडून एक मोठा प्रमाद झाला असें बाहेरच्या लोकांनाही वाटत आहे. श्री० सर बाळासाहेब यांनीं हा वाद तडजोडीनें मिटाविण्याचे बाबतींत बाहेरच्या स्नेह्यांच्या सूचनांचा आदर केला ही गोष्ट जरी खरी आहे, तरी समेटाच्या बाबतींतील श्रेयाचा मोठा वांटा प्रजेच्या पुढाऱ्यांचे पदरीं पडत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. समेटाच्या अटी ठरल्यावर पुढें त्यांपैकीं कांहीं मोडल्या गेल्या ही गोष्ट दरबाराकडून फारच दूषणास्पद झाली. या पुस्तकास जोडलेल्या प्रो० गणपतराव अभ्यंकर व रा० ग. वि. केतकर यांचे प्रस्तावांत या लढ्यासंबंधानें सविस्तर लिंहिण्यांत आलें असल्यामुळें या ठिकाणीं त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. या पुस्तकाचे लेखक रा० 'स्पष्टवक्ते' व या पुस्तकाच्या छपाईच्या खर्चाचें ओझें शिरावर घेणारे रा० ल. ब. भोपटकर पुणें, रा० पांडुआण्णा शिराळकर

कऱ्हाड, रा० भाऊसाहेब सोमण सातारा यांनीं अर्थिक व इतर सर्व प्रकारचें साहाय्य केल्याबद्दल त्यांचे व इतर 'गुप्तदाते' यांचे, हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें श्रेय 'द. सं. हि. सभे'स त्यांनीं दिल्याबद्दल आम्ही सादर आभार मानतों. 'विजय' छापखान्याचे मालक रा० अनंत सखाराम गोखले यांनीं सदरचें पुस्तक शक्य तितकें लवकर छापून दिलें याबद्दल त्यांचे सप्रेम आभार मानणें अगत्याचें आहे. वाचकांनीं हें पुस्तक सादंत वाचलें म्हणजे संस्थानी चळवळीचें काम किती बिकट आहे तें त्यांचे ध्यानीं येईल व त्यांना या कार्यास मदत करण्याची स्फूर्ति होईल अशी खात्री वाटत असल्यानें लोकांनीं सदर पुस्तक अवश्य एकवार तरी वाचावें अशी विनंति करून आम्ही हे दोन शब्द पुरे करतों.

दक्षिणी संस्थान हितवर्धक सभा कचेरी,
C/o आर्यभूषण छापखाना कचेरी,
बुधवार पेठ, पुणें शहर.
ता. ३०।११।२९.

नरसिंह चिंतामण केळकर,
अनंत विनायक पटवर्धन,
सेक्रेटरी, द. सं. हि. सभा, पुणें.



उपोद्घात

मिरज संस्थानांतील सारावाढीचे बाबतींत रयतेनें केलेल्या चळवळी, त्यांतील सत्याग्रह व अखेरची तडजोड इ० संबंधीं थोडीबहुत माहिती वर्तमानपत्रांच्या वाचकांना झालेली आहेच. पण गुजराथेंतील मोठ्या बाडोंलीप्रमाणें महाराष्ट्रांतील या छोट्या बाडोंलीचा लढा नमुनेदार असाच आहे. बाडोंलीच्या सेटलमेंटप्रमाणेंच मिरजेच्या सेटल्मेंटमध्येंही कशा भरमसाट चुक्या झाल्या, सारावाढ करण्यासाठीं गैरलागू व सर्वस्वी खोटे असे मुद्दे कसे पुढें करण्यांत आले, रयतेमध्यें याबद्दल जागृति कार्यकर्त्यांनीं कशी केली आणि या जागृतीचें स्वरूप प्रत्यक्ष श्रीमंतांच्या वाड्यापुढें सत्याग्रहाच्या रूपाने कसें प्रगट झालें, इत्यादि गोष्टींची सविस्तर हकीगत एकत्र मांडल्यास ती अनेक दृष्टीनें उपयुक्त होईल या हेतूनें हें पुस्तक अत्यंत काळजीपूर्वक व सांगोपांग असें तयार करण्यांत आलें आहे.

संस्थानांतील बिकट परिस्थितीसंबंधानें वर्तमानपत्रांतून आलेली माहिती व कर्णोपकर्णी आलेल्या वार्ता यावरून तेथील वातावरणासंबंधानें कांहींशी कल्पना बाहेरच्या लोकांना होते. संस्थानांतील अधिकाऱ्यांची नोकरशाही, तिच्या तंत्रानें वागणारे संस्थानिक आणि या दोघांच्या भोंवतीं लाभाकरतां अगर लोभाकरतां घोटाळणारे प्रतिष्ठित लोक हे सर्व एका बाजूला व अज्ञान, दारिद्र्य, भीति इत्यादिकांच्या योगानें असहाय झालेली संस्थानी प्रजा दुसऱ्या बाजूला असा हा लढा चालविणें आणि तो सत्याग्रहाच्या मर्यादेपर्यंत नेऊन बऱ्याच अंशानें यशस्वीकरणें हें कार्य लहानसान नाहीं. उलट बाडोंलीच्या मोठ्या लढ्याकडे बाहेरच्या लोकांचें जितके लक्ष लागलें तितकें या लहानशा संस्थानांतील लढ्याकडे लागणें शक्य नसल्यानें बाडोंलीच्या कार्यकर्त्यांना सार्वत्रिक लोकमताचा जसा फायदा मिळाला तसा तो मिरजेच्या कार्यकर्त्यांस मिळाला नाहीं हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. अशाही परिस्थितींत मिरजेच्या कार्यकर्त्यांनीं या चळवळीचे बाबतींत जें धैर्य, चिकाटी व संघटना दाखविली त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होईल.

मिरजेच्या सत्याग्रहांतील ज्या अनेक घटना या पुस्तकांत दिल्या आहेत त्यांपैकीं, कित्येक संस्थानी राजकारणाचे अनेकरंगी स्वरूप दाखवणाऱ्या आहेत. ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतील खऱ्या उपयुक्त प्रगतिपर व चांगल्या गोष्टींचें अनुकरण करण्यापेक्षां त्यांतील देखावा, दिमाख व इतर वाईट गोष्टी यांचेंच अनुकरण संस्थानां-

मधून पुष्कळदां अधिक लवकर होत असतें. अघळपघळ वचनें देणें व कालहरणानें किंवा कांहीं तरी सबबी सांगून तीं वचनें मोडणें, त्यांना बगल देणें अगर त्यांतून पळवाट काढणें या गोष्टी ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या व अधिकाऱ्यांच्या आंगवळणीं पडलेल्या आहेत. तशाचसारखा प्रकार मिरज संस्थानामध्यें झाला, असें या पुस्तकांतील हकीगतीवरून कोणाही त्रयस्थ माणसाला वाटल्यावांचून राहणार नाहीं, मग हा प्रकार जाणूनबुजून स्वेच्छेनें घडलेला असो किंवा अधिकाऱ्यांच्या अगर दरबारी कारस्थानी लोकांच्या कारवाईनें घडून आलेला असो. सत्याग्रहाचे वेळीं स्वतः चौकशी करूं असें आश्वासन दिलें गेलें असतां ती चौकशी ताबडतोब सुरू व्हावयास पाहिजे होती; म्हणजे निदान बाडोलीच्या बाबतींत ब्रिटिश सरकारनें अखेरीस लोकांचें म्हणणें ऐकण्याची तयारी दाखविल्यानें जो एक भलेपणा कांहीं अंशीं ब्रिटिश सरकारला मिळाला, तेवढा तरी या संस्थानी सरकारला मिळविता आला असता; पण हा ब्रिटिश सरकारचा भलेपणाही मिरजेच्या संस्थानी सरकाराला या बाबतींत देतां येणार नाहीं असें त्यांचें वर्तन घडलें आहे, मग कारणें कांहींही असोत.

मिरजेच्या अधिपतीनीं संस्थानी परिषदेच्या शिष्टमंडळाला भेटण्याचें नाकारलें व परिषद वगैरे आपण कांहीं ओळखीत नाहीं अशाप्रकारची वृत्ति दाखविली ही तर परकी नोकरशाहीवरही कडी किंवा ताण झाली असें म्हटलें पाहिजे. कारण बाडोलीच्या बाबतींत येथील नोकरशाहीनें सुरत जिल्ह्याच्या कौन्सिलांतील प्रतिनिधींचें प्रतिनिधित्व तर मानलेंच; पण वल्लभभाईंशींही सामोपचाराचें बोलणें करण्यांत कमीपणा मानला नाहीं. पण मांडलिकांची किंवा दुय्यम दोस्तांची मानीव इभ्रत 'इससे जादा' आहे. लोकांच्या प्रतिनिधींना अशा रीतीनें झिडकारणारे राजे हे आपले जातभाई अगर देशबंधू असले तरी हा आपलेपणाचा ओलावा सर्वस्वी नाहींसा करण्यासारखी ही त्यांची कृति आहे. अशा परिस्थितींत कोणीही लोकसेवक व कार्यकर्ता " मय्यप्यास्थान चेत्ते त्वयि मम सुतराम् " असेंच म्हणेल.

हें पुस्तक संस्थानी वातावरणांत असलेल्या माणसांनींच लिहिलें आहे. असें असूनही तें बरेंच स्पष्टपणें व निर्भिडपणें लिहिलें आहे याबद्दल कोणासही आनंद वाटेल. संस्थानी वातावरणांत वावरणाऱ्या लोकांच्या भाषेंत तेथील परंपरागत दडपणामुळें एक प्रकारचा दरबारी अंगचोरपणा उत्पन्न झालेला असतो. संस्थानांच्या बाबतींत आतां हीं बोलण्याचीं जुनीं वळणें किंवा पर्याय सोडले पाहिजेत व सरळ सडेतोड शब्दांत संस्थानी प्रजेच्या हकांसंबंधीं व दुःखासंबंधीं बोलावयास

शिकलें पाहिजे. या पुस्तकांतही कांहीं विशेष अवघड प्रसंग वर्णन करतांना लेखकाची लेखणी किंचित् अडखळलेली आहे, किंवा तिनें टक्कर होण्याच्या भीतीनें थोडींशीं आडवळणें घेतलेलीं आहेत; तरीही आज सामान्यतः संस्थानासंबंधीं जें लिखाण संस्थानी माणसांकडून प्रसिद्ध होतें त्यांत मिरजेच्या ह्या पुस्तकान स्पष्टपणाच्या गुणांत बरेंच पुढें पाऊल टाकलें आहे असें दिसून आल्याशिवाय राहाणार नाहीं. संस्थानी स्वराज्याच्या चळवळींत उत्पन्न झालेला हा निर्भीडपणा या चळवळीच्या कोणाही हितचिंतकास अभिनंदनीयच वाटेल यांत शंका नाहीं.

संस्थानांतील चळवळ व ब्रिटिश मुलुखांतील चळवळ यांमध्यें कित्येक लोक फरक मानतात. पण तत्त्वतः या दोन्ही चळवळींत कांहींएक फरक नाहीं. गोऱ्या नौकरांच्या ऐवजीं काळे नौकर व अधिकारी आले व ते गोऱ्यांप्रमाणेंच जुलूम करूं लागले, तर ते आपले देशबांधव म्हणून त्यांची कोणी गय केल्यास अगर त्यांचा जुलूम सहन करावा असें म्हटल्यास तें जितके चुकीचें होईल, तितकेंच संस्थानिक हे हिंदी म्हणून त्यांच्या जुलुमाची गय करणें चुकीचें ठरेल. साधनांचे व ध्येयांचे बाबतींतही संस्थानी स्वराज्याची चळवळ व ब्रिटिश मुलुखांतील स्वराज्याची चळवळ यांच्यामध्यें फरक करतां येणार नाहीं. ब्रिटिश मुलुखाच्या बाबतींत शक्य तर साम्राज्याच्या आंत व जरूर तर साम्राज्याच्या बाहेर असें म्हणणारा एक पक्ष असा आहे. तसाच संस्थानांच्या बाबतींतही पक्ष आहे. आजच्या लोकसत्तेच्या काळाला अनुरूप असा संस्थानिकांनीं आपल्या राज्यपद्धतींत फरक केला तरच तीं टिकवावींत, नाहींतर राष्ट्रीय दृष्टीनें संस्थानिकांना बाजूला सारून त्यांचा मुलूख खालसांत सामील करावा असेंच पुष्कळांचें मत बनत चाललें आहे संस्थानिक हे बादशहांशीं आपला साक्षात् संबंध आहे असें प्रतिपादन अलीकडे करूं लागले आहेत; मग ते स्वयंप्रेरणेनें बोलत असोत अगर परप्रेरणेनें त्यांना तसें बोलणें प्राप्त झालेलें असो. बादशहांशीं जोडला जाणारा हा आगंतुकीचा संबंध खरा मानला व गृहीत धरला, तरी त्यावरून काय निष्पन्न होतें ! इंग्लंडांतील राजसत्ता ही आज केवळ नाममात्र शिल्लक आहे आणि तेवढ्या स्वरूपांत तरी ती टिकावी यासाठीं अनेक तऱ्हेनें लोकांचा अनुनय करून व हरतऱ्हेनें त्यांच्या उपयोगी पडून आपलें अस्तित्व राखावें असा त्या राजसत्तेचा व राजघराण्यांतील मंडळींचा प्रयत्न सारखा चालूं असतो. आजच्या लोकसत्तेंत जुन्या राजसत्तेला जगावयाचें असेल तर तिनें आपली उपयुक्तता लोकांना पटवून देऊनच जगलें

पाहिजे. रयत हीच राजा असून राजा हा त्या रयतांच्या सत्तेचा एक मोठ्या दर्जाचा पण सेवक आहे, अशी केवळ भाषाचं नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारही सुरू झाला, तरच राजसत्तेला नवीन युगांत स्थान आहे आणि जगण्याचा अधिकार आहे; नाहींतर बिलकुल नाहीं. राजसत्तेमध्यें अशा तऱ्हेचें परिवर्तन झालें नाहीं तोंपर्यंत ती कोणत्यांना कोणत्या तरी रीतीनें समाजांतील एक अनवश्यक व जाचक भाग म्हणून जनतेला शल्यासारखी वोचत व तिचें मन व्यग्र करीत राहणार हें उघड आहे.

हल्लींचे देशी राजे नवीन काळ ओळखून आपल्या राज्यपद्धतींत सुधारणा करीत आहेत काय ? व आज ज्या स्वल्प उपक्रमानें कांहीं थोडे संस्थानिक हळुहळू अशी सुधारणा करीत आहेत, त्याच क्रममार्गानें जावयाचें म्हटल्यास राजांना लोकसत्तेच्या कोष्टकांत बसण्यास किती काळ लागणार ? या क्रममार्गाकडे आशावादी दृष्टीनें पाहाण्याइतका शांतपणा व दिम्मेपणा ज्यांच्या अंगांत नाहीं, त्यांना असें वाटूं लागलें आहे कीं, संस्थानें सुधारणें हें अशक्य, अर्थात् तीं मोडून खालसांत सामील करणें हेंच राष्ट्रीय दृष्ट्या अधिक हितकर व आजच्या काळाला अधिक अनुरूप असें होईल, आणि या दृष्टीनें विचार करूं गेल्यास असेंही वाटूं लागतें कीं, लार्ड डलहौसी यांनीं संस्थानें खाण्याचें जें धोरण सुरू केलें होतें तें तसेंच पुढें चाललें असतें तर फार चांगलें झालें असतें. सत्तावन सालाचें बंड होऊन आपल्याच लोकांनीं या संस्थानिकांना जगवलें आणि आज ते कुऱ्हाडीच्या दांड्याप्रमाणे हिंदी स्वराज्यास विघात करण्यास सरकारला उपयोगी पडत आहेत. बटलर कमिटीच्या रिपोर्टापूर्वी व नंतर संस्थानिकांनीं काय काय कारवाई केली, हें समजल्यानंतरही ज्या लोकांना संस्थानें हीं कायम राहावीं असें वाटतें, ते बऱ्याच थंड डोक्याचे होत असें म्हटले पाहिजे. इतका थंडपणा ज्यांच्यांत नाहीं ते लोक असेंच म्हणूं लागले आहेत कीं, आजच्या लोकसत्तेच्या काळांत जुन्या राजसत्तेचें खरें स्थान एकच आहे आणि तें म्हणजे जीर्ण वस्तुसंग्रहांतील जुन्या नमुन्यांचें दालन अगर कपाट हेंच होय.

सारांश, ब्रिटिश हद्दींत " शक्य त्या सर्व साधनांनीं संपूर्ण स्वातंत्र्य मिळविणें " हा जसा एक आत्यंतिक वाद डोकावूं लागला आहे, तसाच संस्थानी चळवळीचे बाबतींतही संस्थानी राजसत्ता समूळ नाहींशी करावी व तिच्या जागीं पूर्ण लोकसत्ता प्रस्थापित करावी असा वाद उपस्थित झाला आहे. आणि ज्याप्रमाणे

स्वातंत्र्यवाद नाहींसा करावयाचा असेल, तर ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं वेळींच डोमीनियन स्टेटस्ची मागणी मान्य करावी असें आपण म्हणतों त्याप्रमाणें संस्थानिकांना जर नव्या युगांत टिकावयाचें असेल, तर ब्रिटिश राजसत्तेप्रमाणें त्यांनीं आपल्या सत्तेला मर्यादा घालून सर्व कारभार लोकतंत्र केला पाहिजे असें त्यांनाही सांगणें भाग आहे. तत्त्व व ध्येय या बाबतींत खालसांतील स्वराज्याची चळवळ व संस्थानांतील स्वराज्याची चळवळ ही अशी एकरूप असल्यानें साधनांचा क्रमही दोन्हा बाबतींत एकच राहाणार हें उघडच आहे. खालसांत ज्याप्रमाणें अर्ज–विनंत्यांपासून व निषेधांपासून स्वावलंबी सत्याग्रहाच्या व सक्रिय प्रतिकाराच्या भूमिकेपर्यंत स्वराज्याची चळवळ येऊन पोंचली आहे, तशीच संस्थानी चळवळही आज ना उद्यां तो पल्ला सर्वांशानें गांठणार हें निश्चित आहे; कारण सत्तेच्या, लोभाच्या व स्वार्थाच्या बाबतींत ब्रिटिश नोकरशाही जितकी निगरगट्ट, खुनशी व चिकट आहे, तितकीच संस्थानी राजसत्ताही आहे. आणि शुद्ध लोकसत्तेच्या दृष्टीनें विचार केल्यास एक सत्ता चालविणारे परके व दुसरे सत्ता चालवणारे जातभाई, हा विचार सर्वस्वी अप्रस्तुत होय. संस्थानी चळवळीचे बाबतींतील साधनांमध्यें एक पाऊल पुढें टाकून मिरजेच्या चळवळ्यांनीं इतरांना अनुकरणीय मार्ग दाखवून दिलेला आहे. या दृष्टीनें या सत्याग्रहाची हकीगत केवळ संस्थानी प्रजेसच नव्हे तर स्वराज्यवादी अशा प्रत्येक हिंदी मनुष्यास ती वाचनीय व उद्बोधक अशीच वाटेल यांत शंका नाहीं. ज्याप्रमाणें खालसांतील अर्जे–विनंत्यांचे रुळलेले मार्ग चालविणारे बुट्टे मुत्सद्दी नवीन सत्याग्रहासारख्या मार्गाकडे उपेक्षेनें पाहतात व त्यांना अविचारी ठरवितात. तसेंच संस्थानांचे बाबतींतही खेळीमेळीनें व दरबारी नाजूक शिष्टाईनें कार्यभाग साधेल असें म्हणणारे वृद्ध मुत्सद्दी थोडेथोडके नाहींत व त्यांना या सत्याग्रहाच्या मार्गासंबंधीं विशेष अनुकूल असें बोलावेंसें वाटत नाहीं. पण अर्ज–विनंत्यांचा मार्ग जसा ब्रिटिश मुलुखांत मागें पडला व स्वावलंबनाचा मार्ग पुढें आला, आणि तसाच तो संस्थानांतही पुढें येणार आणि या काल–परिवर्तनाचें निश्चित गमक म्हणून रस्त्यावरील मैलांच्या दगडांप्रमाणें हा मिरजेचा सत्याग्रह भावी कालांत मार्गदर्शक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

पुणें,
ता. १९।९।२९.

ग. वि. केतकर

प्रस्तावना

मिरज येथील सारोवाढीचे वाबुतींत तेथील [illegible] जो सत्याग्रह केला त्या संबंधाची सविस्तर हकीगत या पुस्तकांत प्रसिद्ध झाली आहे आणि ती संस्थानिक प्रजेला अत्यंत बोधप्रद आहे. संस्थानांतील परिस्थिति आज फार मागासलेली आहे. ब्रिटिश रियासतीपेक्षां आधुनिक सर्व चळवळींच्या बाबतींत संस्थानें सुमारें पन्नास वर्षें मागें आहेत. शिक्षणाचा प्रसार संस्थानांत फारसा झालेला नाहीं. मुद्रणस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व संमेलनस्वातंत्र्य या गोष्टींचा बहुतेक ठिकाणीं मागमूस नाहीं ! लोकशिक्षणाचीं साधनें अतिशय मर्यादित आहेत. संस्थानांत समतेच्या राज्याचा—ज्याला इंग्रजींत Rule of law म्हणतात, याचा संपूर्ण अभाव असल्यामुळें कोणतीही राजकीय चळवळ किंवा हक्काबद्दलचें मागणें जोरानें करतां येत नाहीं. संस्थानांतील लोकमताची छाप किंवा वजन संस्थानिकांवर मुळींच पडत नाहीं ! ब्रिटिश सरकारच्या संरक्षणानें संस्थानिकांचें आसन स्थिर झाल्यामुळें प्रजेच्या नाखुषींची त्यांना यत्किंचितही पर्वा वाटत नाहीं. स्वार्थपरायणतेनें सार्वभौम सरकारनें बुद्धिपुरःसर उदासीनता स्वीकारलेली आहे. स्वतःच्या हितसंबंधाच्या बाबतींत तहनामे बाजूस गुंडाळून ठेवून संस्थानच्या अंतर्गत बाबतींत सार्वभौम सरकार बिनधोकपणें हात घालतें व प्रजेच्या हिताची बाब असली तर तहनाम्याचें सोंग पुढे करून कोणतीही गोष्ट करण्यास तेंच सार्वभौम सरकार तयार असत नाहीं ही अत्यंत शोचनीय स्थिति आहे व अशा विकट परिस्थितींत संस्थानांतील प्रजेला आपला पुढील मार्ग आक्रमण करावयाचा आहे. सबब मिरजेची सारावाढीच्या बाबतींतील कायदेशीर, सनदशीर व सात्त्विक चळवळ इतक्या धैर्यानें, चिकाटीनें व शिस्तीनें चालविलेली पाहून प्रत्येक संस्थानी प्रजेला अभिमान वाटला पाहिजे व ही चळवळ करणारांचें त्यांनीं कौतुक केलें पाहिजे. अशा तऱ्हेची चळवळ केल्याचा मान बाडोलीमुळें ज्याप्रमाणे सर्व हिंदुस्थानांत मुंबई इलाख्यास प्रथम प्राप्त झाला आहे, तोच मान हिंदुस्थानांतील सातशें संस्थानांमध्यें मिरजेच्या प्रजाजनांना प्राप्त झाला आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत पन्नास वर्षें चाललेल्या राजकीय चळवळीच्या पाठिंबा बाडोलीस मिळाल्यामुळें तेथील सत्याग्रहाची चळवळ यशस्वी झाली. परंतु बाहेरील संस्थानांतील लोकमत प्रखर तेजाचें नसल्यामुळे व त्याचें नैतिक पाठबळ मूर्तपणें न मिळाल्यामुळें या चळवळीस यावें तसें यश आलें नाहीं, हें नमूद करणें

भाग आहे; तथापि 'यत्ने कृते यदि न सिध्यति कोत्र दोषः ?' झालेली यशःप्राप्ति मंगलदायक अ'हे असें मानून स्वयंनिर्णयाची ही चळवळ आत्मविश्वासानें, सात्त्विक प्रेरणेनें व निःसीम तळमळीनें मिरजेच्या लोकांनीं चालवावी, अशी त्यांस प्रेमाची व आग्रहाची विनंति आहे.

सत्याग्रहाच्या चळवळीच्या बाबतींत जी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं. सत्याग्रहाची चळवळ करणारे लोक व ज्यांच्याविरुद्ध ही चळवळ केली जाते ते लोक या दोघांमध्येंही सात्त्विकवृत्तीचें वास्तव्य असावें लागतेंच. आत्मीयपणाची भावना उभयपक्षाची एकाच स्वरूपाची असावी लागते. मुलाच्या सत्याग्रहानें आईच्या अंतःकरणास पाझर फुटतो; सत्याग्रह करीत असलेल्या घराच्या दगडास तो खास फुटत नाहीं. परकीय सरकार व त्या सरकारापासून सर्व बाबतींत भिन्न असलेली प्रजा यांच्यांतील लढ्यामध्यें सत्याग्रहाचा विजय न झाल्यास त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, व यांचीच जाणीव देशभक्त जतींद्रदास यांच्या अन्नत्यागाच्या सत्याग्रहानें सर्व भारतवर्षांत उत्पन्न झाली आहे. तथापि ब्रिटिश राजसत्ता इंग्लंडांत तरी निदान समतेच्या राज्याच्या पायावर आजमितीला चिरंतन झाली असल्यामुळें त्याचें वजन ब्रिटिश हिंदुस्थानांतील नोकरशाहीचरही पडत आहे व या सात्त्विक प्रेरणेमुळेंच बार्डोलीमध्यें पुष्कळशी यशःप्राप्ति झाली. मिरजेची बार्डोलीशीं तुलना करतांना तेथील अनुभव मात्र अगदीं विस्मयजनक झाला आहे. जो आत्मीयपणा बार्डोलींतील प्रजाजन व तेथील नोकरशाही यांच्यांत असणें शक्य नाहीं व तो असेल अशी कोणाचीही भावना नव्हती तशीच स्थिति मिरजेंत असावी हा प्रकार मात्र विपरीत आहे ! 'प्रजा माझी व मी प्रजेचा' असें वेळीं अवेळीं हरदासाप्रमाणें पालुपद गाणाऱ्या मिरज संस्थानिकांच्या अंतःकरणास या चळवळीनें खरा पाझर फुटला नाहीं हेंच अत्यंत मोठें दुर्भाग्य होय ! चळवळ करणाऱ्यांच्या सात्त्विक वृत्तीच्या पुण्याईनें व शक्याशक्यतेच्या विचारामुळें थोडीशी फलप्राप्ति झाली हा भाग अगदीं वेगळा आहे व त्यापासून संस्थानी प्रजेनें अतिशय बोध घेण्यासारखा आहे. संस्थानिक आपले आहेत या समजुतीनें जर प्रजा त्यांच्या दाराशीं धरणें धरून बसेल व सत्याग्रहानें सायास सोसण्यास तयार होईल, तथापि आत्मीयपणाच्या प्रेमानें संस्थानिकाच्या अंतःकरणांत ओलावा उत्पन्न न होतां अनियंत्रित सत्तेच्या जोरावर तो फौजदारी कायद्याचें अवलंबन करून प्रजेस धुडकावून लावतो असा अत्यंत उद्वेगजनक

अकार मिरजेस दिसून आला ! व हीच जाणीव संस्थानी प्रजेनें उराशीं बाळगून ठेविली पाहिजे.

सत्याग्रहाच्या चळवळीसंबंधीं किंवा राजकीय चळवळीसंबंधीं जी दुसरी महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवणे जरूर आहे ती ही कीं, संस्थानी प्रजेवर दोन अरेरावी सत्ता आपला अंमल चालवीत आहेत. एक अनियंत्रित संस्थानिक व दुसरें उदासीन सार्वभौमसरकार. संस्थानांतील अन्यायाचे बाबतींत, जुलुमाचे बाबतींत कोणताही विचार करतांना संस्थानिक व संस्थानी प्रजा या दोघांचाच विचार करून भागत नाहीं. कोणत्याही राष्ट्राच्या इतिहासाकडे पाहिलें तर कोणतीही राज्यव्यवस्था दुःसह झाली, अन्यायाची दाद लागेनाशी झाली म्हणजे निर्वाणीचा प्रसंग प्राप्त होतो व सोक्षमोक्ष करून प्रजेला आपली मुक्तता करून घ्यावी लागते. एकतंत्री राज्यपद्धतीखालीं राज्यक्रान्ति करून, राजास पदच्युत करून, राजघराण्याचा नाश करून प्रजेनें स्वातंत्र्य मिळविल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत व अगदीं ताजें उदाहरण, रशियाच्या सम्राटाचे बाबतींत घडून आलें आहे. खुद्द इंग्लिश लोकांना जो करारनामा 'स्वातंत्र्याची सनद' असा वाटत आहे त्या 'मॅग्नाचार्टा'मध्येंही असें स्पष्टपणें नमूद केलें आहे कीं, जर राजा अन्यायानें वागूं लागेल तर त्याच्या विरुद्ध बंड करणें व त्यास पदच्युत करणे यांत कोणतेही गैरशिस्त नाहीं. तेव्हां अन्यायाचा प्रतिकार होणार नाहीं अशी परिस्थिति प्राप्त झाल्यानंतर जुलुमी राजाच्या विरुद्ध बड उभारणें व त्यांस अधिकारापासून दूर करणें हे सर्वथैव न्याय्य आहे. हेंच तत्त्व 'मॅग्नाचार्टा'मध्यें नमूद असून डायसी व ब्राईस यांसारख्या सर्वमान्य कायदेपंडितांनीं मान्य केलें आहे. तेव्हां या तत्त्वाप्रमाणें व प्रजेच्या जन्मसिद्ध हक्काप्रमाणें संस्थानी प्रजेस संस्थानिकापासून होत असलेला जुलूम सहज नाहींसा करतां येईल. तो पूर्वीच्या काळींही करतां येत असे व हल्लींही तो करण्यास फारशी अडचण नाहीं. पूर्वीच्या काळीं संस्थानिकांजवळ सैन्य असे, शस्त्रास्त्रें होतीं आणि प्रतिस्पर्ध्यांशीं झुंजण्याची त्यांची ताकद होती. आजमितीस ते हतबल आणि निर्वीय झाले आहेत ! सात्त्विक क्षोभानें प्रक्षुब्ध झालेल्या प्रजेपुढें त्यांचा यत्किंचित्ही टिकाव लागणार नाहीं हीही गोष्ट तितकीच उघड आहे. व असें असून संस्थानांत अद्याप अंधार आहे. संस्थानिकांच्या जुलुमानें प्रजेची पायमल्ली होत आहे याचें कारण काय ? असा कोणीही प्रश्न करील. याचें एकच उत्तर आहे व तें हें

कीं, संस्थानी प्रजा व संस्थानिक यांचा अन्योन्यसंबंध या दोघांपुरताच मर्यादित नसून तिसऱ्या एका जबरदस्त शक्तीच्या म्हणजे सावभौम सरकारच्या हुकमतीखालीं संस्थानी प्रजा व संस्थानिक हे दोघेही आहेत व यामुळेंच या तिसऱ्या शक्तीबद्दल संस्थानी प्रजेच्या गाऱ्हाण्यांच्या बाबतींत अवश्य विचार करावा लागतो आणि ही गोष्ट पुष्कळ विचारी लोकांच्या लक्षांत जितकी स्पष्टपणें यावयास पाहिजे तितकी येत नाहीं असा अनुभव आहे. संस्थानिकांनीं कोणत्याही प्रकारची दाद घेतली नाहीं तर प्रजेनें काय करावें ? प्रजेस असलेल्या नैसर्गिक, जन्मसिद्ध व कायदेशीर हक्कांचा त्यांस अवलंब करतां येईल काय ? म्हणजे स्पष्ट शब्दांत बोलावयाचें झाल्यास बलाबलाच्या जोरावर जुलुमी संस्थानिकांस पदच्युत करून दुसरा संस्थानिक गादीवर बसाविणें किंवा राज्यक्रान्ति करून निराळी राज्यघटना अस्तित्वांत आणणें हें प्रजेस करतां येईल काय, असा उघड सवाल आहे. प्रजेनें वर नमूद केलेल्या जन्मसिद्ध हक्काचा उपयोग करण्याचा उपक्रम केल्यास सार्वभौम सरकार उदासिनपणें ही गोष्ट चालूं देईल काय ? असा दुसरा प्रश्न आहे. अशा तऱ्हेचा संस्थानिक आपल्या हिंमतीनें, स्वावलंबनानें प्रजेचा प्रतिकार करून स्वस्थ राहील किंवा सार्वभौम सरकारचा धांवा या संकटकाळीं प्राप्त करून घेण्याचा तो प्रयत्न करील ? संस्थानिक सार्वभौम सरकाराकडे मदतीकरितां न गेला व स्वतःच्या जोरावर त्यास प्रजेला दडपून टाकतां आलें, तर त्याबद्दल कोणासही खेद वाटणार नाहीं. परस्पर बलाबलाचा हा प्रश्न आहे. 'बळी तो कान-पिळी' हा न्याय आहे व समवायानें जर प्रजेला दाद लावून घेतां येत नाहीं, तर स्वातंत्र्याच्या बाबतीत ती नालायक आहे असेंच म्हणणें भाग आहे. परंतु संस्थानिकांच्या हल्लीच्या हतबल स्थितीकडे लक्ष देतां केवळ आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनें ते सार्वभौम सरकारकडे धांवत जातात, तहनाम्याची ढाल पुढें करतात व संरक्षणाची जबाबदारी सार्वभौम सरकारवर आहे व आपल्या संरक्षणासाठीं त्यांनीं धांवून आलें पाहिजे असें ते हक्काने म्हणत आहेत व सार्वभौम सरकारही त्याप्रमाणें वागत आहे असा अनुभव आहे. अगदीं अलीकडे सुमारें दहा वर्षांपूर्वी, हीच स्थिति टोंक संस्थानांत घडून आली व यामुळेच संस्थानी प्रजा व संस्थानिक यांच्या झगड्यामध्यें दंडधारी सार्वभौम सत्ता संस्थानिकांच्या संरक्षणाकरितां धांवून येण्यास तयार आहे व बलाढ्य सार्वभौम सरकारच्या सत्तेपुढें निःशस्त्र अशा संस्थानी प्रजेचा यत्किंचित्ही टिकाव लागणार नाहीं ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी उघड

आहे व या आत्मविश्वासानेच संस्थानिक लोक निरंकुशपणें राज्यकारभार चालवीत आहेत. संस्थानांत जुलुमी राज्यव्यवस्था कां अस्तित्वांत आहे याची ही मीमांसा आहे.

यासंबंधीं खालील उतारे मननीय आहेत.

"Indian Princes are secured on their Gadis by the protection of the Paramount Power. Without such protection it is not possible that a Ruler can be secured on his Gadi or in the continuance of the same in his family unless he is protected by the mighty hand of the Paramount Power. If this is not so, the position of the Indian Rulers would become extremely helpless. They are not permitted by the Paramount Power to keep any efficient standing army. The army which they possess is more for show than for any active warfare. Besides it is one purely composed of inefficient mercenaries. In any quarrel between the Indian Ruler and his people he cannot hold his position even for a day unless supported by the strong hand of the Paramount Power. The British Government interferes on the strength of its position as a Paramount Power to reduce to obedience the subjects of any Indian Ruler whenever they rise in rebellion against him for misrule. If the British Government would not interfere in all the internal disputes, as it was once its policy, it would be impossible for any Indian Ruler to continue on his Gadi in the face of discontent amongst his subjects. In every country whenever there is discontent amongst the people it naturally leads to civil war and rebellion assassination and dethronement of the Ruler. These are the usual consequences which follow. Overthrow of misrule and oppressive Govern-

ment is the birth-right of all the citizens. The Magnacharta of the English people gave a legal sanction to the natural right of resisting a king who rebels against the law."

—*Page 11. Memcrandum of the Indian States People.*

याच मताचा अनुवाद प्रख्यात कायदे पंडित डायसी व ब्राईस यांनीं केलेला आहे.

" As regards, however, administration there is one important limitation namely that they are to conduct themselves in such a manner in the Government of their states that they do not provoke their people by their misrule to open rebellion and conflict. If they do so the security and peace of the state is in danger, the autonomy of the state is threatened and in the interest of the Princes themselves the British Government is bound to interfere, suppress rebellion and restore peace and order and thus secure the Ruler in his position. Now the price of this protection is this right of interference in the internal affairs of the states."

—*Page 15-16. Memorandum of the Indian States People.*

हें केवळ मराठी जाणणाऱ्या वाचकांकरितां वरील उताऱ्यांचा सारांश याखालीं देंदेला आहे.

" सार्वभौम सरकारचा पाठिंवा आहे, म्हणूनच संस्थानिकांचें आपल्या गादीवरील आसन स्थिर झालें आहे. व तो तसा नसता तर तें आसन डळमळीत झालें असतें किंवा ती गादी त्यांच्याच कुटुंबांत चालणें कठिण झालें असतें व संस्थानिकांची स्थिति फार केविलवाणी झाली असती. योग्य व कार्यक्षम सेना ठेवण्यास सार्वभौम सरकार संस्थानिकांना परवानगी देत नाहीं व त्यांच्या जवळ जी आहे तिचा उपयोग प्रत्यक्ष युद्धाकडे होण्यापेक्षां मिरवणुकीचे प्रसंगींच जास्त होतो. शिवाय ही सेना म्हणजे निव्वळ खोगीरभरतीच असते. अशा

परिस्थितींत संस्थानिक आणि त्यांची प्रजा यांच्यामध्यें तंटाबखेडा उत्पन्न झाल्यास सार्वभौम सरकारची मदत घेतल्याशिवाय संस्थानिकांना गत्यंतरच नाहीं. जुलुमी संस्थानिकांचे विरुद्ध त्यांची प्रजा बंड करण्यास तयार झाली म्हणजे हिंदुस्थानसरकार जें मध्यें पडतें, तें याच सार्वभौम सत्तेच्या जोरावर व अशा तऱ्हेनें तें जर मध्यें न पडेल तर संस्थानिकांना प्रजेच्या असंतोषांत टिकाव धरणे कठिण जाईल. प्रजेंत असंतोष माजला, कीं त्याचा परिणाम बंड, राज्यक्रान्ति, खून व राजाची उचलबांगडी यांत होतो. जुलुमी व अन्यायी राजसत्ता झुगारून देण्याचा हक्क प्रत्येक नागरिकास जन्मसिद्धच आहे व हाच हक्क 'मॅग्नाचार्टा'नें कायदेशीर रीत्या मान्य केला आहे."

"आपल्या राज्यकारभाराचे पद्धतीनें प्रजेंत असंतोष किंवा तंटा माजूं देऊं नये एवढा एकच निर्बंध, राज्यकारभाराचे बाबतींत, संस्थानिकांवर घालण्यांत आला आहे. या निर्बंधाचें त्यांनीं उल्लंघन केलें म्हणजे साहजिकच संस्थानचें स्वास्थ्य व स्थिरपणा नाहींसा होतो व असें झालें म्हणजे हिंदुस्थानसरकारास संस्थानिकांच्या हिताच्या दृष्टीनें मध्ये पडून सर्व असंतोष, तंटेबखेडे नाहींसे करून शांतता प्रस्थापित करणें व संस्थानिकांचें आसन स्थिर करणें भाग पडतें. अशा तऱ्हेनें आपलें रक्षण करण्याची जी जबाबदारी सार्वभौम सरकारवर आहे, तिचा मोबदला किंवा किंमत म्हणून संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारांत हात घालण्याचा सार्वभौम सरकारचा हक्क आहे.

सार्वभौम सरकारचें धोरण वस्तुतः आपल्या कर्तव्यास अनुसरून असावयास पाहिजे होतें. प्रजेनें बंड केलें असतां त्याचा नाश करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे व ती तहनाम्यानें आहे असें आजपर्यंत सार्वभौम सरकार म्हणत आलें आहे. परंतु या एका सिद्धान्तापासून क्रमशः प्राप्त होणाऱ्या दुसऱ्या आवश्यक गोष्टी करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असें स्पष्टपणें सार्वभौम सरकारनें जाहीर केलें नव्हतें. वस्तुतः संस्थानिकांच्या संरक्षणाची जबाबदारी जर सार्वभौम सरकारवर आहे, तर ज्या योगानें संस्थानांत अस्वस्थता उत्पन्न होणार नाहीं, बेदिली उत्पन्न होणार नाहीं, बंड करण्यापर्यंत प्रजेची मजल जाणार नाहीं अशी खबरदारी घेणें व तदनुसार संस्थानांत सुराज्यव्यवस्था आहे कीं नाहीं हें पहाणें व नसेल त्या ठिकाणीं ती स्थापन करणें, या गोष्टी सार्वभौम सरकारनें अवश्य केल्या पाहिजेत.

वरील विचारपरंपरा आजपर्यंत सार्वभौम सरकारास मानल्याचें दिसून आले नाहीं; परंतु आनंदाची गोष्ट ही कीं, बटलर कमिटीस वरील विचारसरणी पसत पडली आहे व आपल्या रिपोर्टांत त्यांनीं तिला ४९ व्या पॅरिग्राफमध्यें उघड-पणें मान्यता दिली आहे.

"The duty of the Paramount Power to protect the states against rebellion or insurrection is derived from the clauses of treaties and Sanads, from usage and from the promise of the King Emperor to maintain unimpaired the privileges, rights and dignities of the Princes. This duty imposes on the Paramount Power correlative obligations in cases where its intervention is asked for or has become necessary. The guarantee to protect a Prince against insurrection carries with it an obligation to enquire in-to the causes of the insurrection and to demand that the Prince shall remedy legitimate grievances and an obligation to prescribe the measures necessary to this result."

"बंड व राज्यक्रान्ति यांपासून संस्थानिकांचें रक्षण करणें हें सार्वभौम सरकारचें कर्तव्य आहे. तहनामे, सनदा व पूर्वापार चालीरीती यांपासून या कर्तव्याचा उगम झाला आहे. तसेंच संस्थानिकांचे हक्क व मानसन्मान कायम राखण्याचें वचन बादशहांनीं दिले आहे हेंही हेंच कर्तव्य डोळ्यापुढें ठेवून दिलें आहे. याच कर्तव्याचा दुसरा एक भाग आहे व तो म्हणजे जरूर लागेल तेव्हां व प्रसंग पडेल तेव्हां सार्वभौम सरकारनें मदतीकरितां धावून येणें हा होय. प्रजेनें बंड वगैरे केल्यास संस्थानिकांचें संरक्षण करण्याची हमी सार्वभौम सरकारनें घेतली आहे. अर्थात् त्याबरोबरच, बंड होण्याचीं कारणें काय आहेत याची चौकशी करणें, प्रजेचीं गाऱ्हाणीं दूर करण्याबद्दल संस्थानिकांस भाग पाडणें व त्याबद्दल योग्य तो उपाय सुचविणें, या सर्व जबाबदाऱ्या आपोआपच सार्वभौम सरकारवर पडतात."

बटलर कमिटीने संस्थानी प्रजेचे म्हणणें ऐकून घेतलें नाहीं; फक्त लेखी कैफियत देण्यास संस्थानी प्रजेच्या शिष्टमंडळास त्यांनीं परवानगी दिली होती. शिष्टमंडळाच्या लेखी कैफियतीचा या एका बाबतींत कमिटीवर खास परिणाम झाला आहे व संस्थानी राजकीय चळवळीचें हें दृश्यफल होय.

यासंबंधीं कमिटीनें केलेलें विधान असावें तितकें व्यापक व मुत्सद्दीपणाचें नसून फार संकुचित आहे ही खेदाची गोष्ट होय. संस्थानांतील चळवळीचा हेतु ज्या वेळीं जुलुमाच्या प्रतिकारासाठीं संस्थानिकांस दूर करण्याचा असेल किंवा राज्यक्रान्ति घडवून आणण्याचा असेल, त्या वेळीं सार्वभौम सरकार हात घालील व अशा परिस्थितीच्या कारणाचा विचार करील व तशी स्थिति पुन्हा उत्पन्न होणार नाहीं अशी हमी संस्थानिकांकडून घेईल व जो सल्ला संस्थानिकांस देण्यांत येईल तो त्यांजकडून पाळला जाईल, अशी खबरदारी पण घेण्यांत येईल. परंतु या विधानामुळें व यांत नमूद असलेल्या धोरणामुळें अतिशय अनर्थपरंपरा उत्पन्न होईल हें कमिटीच्या नजरेस आलेलें दिसत नाहीं. या धोरणाचा अर्थ एवढाच दिसतो कीं, अगदीं निर्वाणीच्या प्रसंगीं किंवा प्रजेनें बंडच पुकारलें तरच सार्वभौम सरकार अंतर्गत कारभारांत हात घालण्यास प्रवृत्त होईल. आमच्या मतें हें धोरण सर्वस्वीं गैर मुत्सद्दीपणाचें आहे व तेंच अखेर पर्यंत झाल्यास संस्थानी प्रजेनें प्रत्येक वेळीं संस्थानिकास पदच्युत करण्याचा किंवा राज्यक्रान्ति करण्याचा आंव आणला पाहिजे. तसें न झालें तर सार्वभौम सरकार संस्थानांतील जुलुमाकडे पाहणार नाहीं, असाच यापासून उघड अर्थ निघत आहे व यापासून संस्थानी प्रजेचेंही हित फारसें होईल असें वाटत नाहीं. सबब अदूरदर्शीपणाचें हें धोरण टाकून देऊन, जोंपर्यंत संस्थानिकांना संस्थानच्या गादीवर नांदवावयाचे आहे, तोंपर्यंत त्यांनीं सुराज्यव्यवस्था ठेवलीच पाहिजे व ज्या गोष्टीच्या योगानें आपली प्रजा असंतुष्ट होऊन बंड करण्यास प्रवृत्त होईल असें कोणतेंही कृत्य त्यांनीं करतां कामा नये असेंच तत्त्व सार्वभौम सरकारनें जाहीर केलें पाहिजे व यांतच शहाणपणा असून संस्थानिक व संस्थानी प्रजा या दोघांचें हित आहे.

कित्येक लोक असा आक्षेप घेतील कीं, आत्मोन्नतीच्या कामीं सार्वभौम सरकारकडे भिक्षांदेहीच्या वृत्तीनें जाणें अगदीं अयोग्य आहे. हा आक्षेप अगदीं अविचाराचा आहे. संस्थानिक व संस्थानी प्रजा यांच्या लढ्यामध्यें जर सार्वभौम सरकार केव्हांच पडणार नाहीं, तर सार्वभौम सरकारकडे धांव घेण्याचें प्रजेस मुळींच कारण नाहीं. सार्वभौम सरकार जर खरोखर तटस्थ राहील, तर हल्लींच्या स्वयंनिर्णयाच्या काळांत संस्थानांची उन्नति फार थोड्या काळांत होईल. परंतु अगदीं निकराच्या वेळीं तटस्थ असलेलें सार्वभौम सरकार तहनाम्याच्या सबबीवर लोकांचे जन्मसिद्ध हक्क दाबून टाकण्यास प्रवृत्त होतें व याचसाठीं प्रजेचें म्हणणें

सार्वभौम सरकारशीं असें आहे कीं, " आपण अगदीं तटस्थ रहा; यत्किंचित्ही अंतर्व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नका म्हणजे आमचें आम्ही पाहून घेऊं. जर तुम्ही या झगड्यांत पडणार असाल, तर संस्थानिकांचें संरक्षण करा व संस्थानी प्रजेच्या हक्कांचें संरक्षण करा एवढेंच आमचें म्हणणें आहे. साम्राज्याच्या प्रचंड शक्तीच्या जोरावर सस्थानी प्रजेचे हक्क पायाखालीं तुडवून संस्थानिकांचें संरक्षण करूं नका एवढेंच संस्थानी प्रजेचें म्हणणें आहे " आणि तें सर्वथैव न्याय्य असून त्यांत भिक्षां-देहीचा कोणताही प्रकार नाहीं.

येथपर्यंत आम्ही मिरज येथील चळवळीचा तात्त्विक दृष्टीनें विचार केला व हेच विचार, ही चळवळ सुरू झाल्याबद्दल प्रथमतः ज्या वेळीं मला कळून आले त्या वेळीं, सकृद्दर्शनीं मजपुढें उभे राहिले व तेच मीं येथें उघड रीतीनें प्रसिद्ध केले आहेत. मिरजेच्या सत्याग्रहाची बातमी प्रथम संस्थानी प्रजेच्या शिष्टमंडळाच्या कामगिरीवर मी इंग्लंडांत असतां मला कळली त्या वेळीं मी संस्थानी प्रजेची बाजू तेथील जनतेपुढें मांडीत होतों. आमचें असें म्हणणें होतें कीं, संस्थानी प्रजेला कोणतेही राजकीय हक्क नाहींत, संस्थानांतील लोकमताचें वजन संस्थानिकांवर पडत नाहीं, सार्वभौम सरकार तटस्थ रहातें व एकतंत्री राज्यपद्धतीखालीं प्रजेची स्थिति फार विपन्न झाली आहे. त्या वेळीं संस्थानिकांच्या वतीनें तेथें डॉ० रशब्रूक वुइलियम्स् हे हजर असून ते संस्थानिकांची बाजू लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न करीत होते. मिरज येथील सारावाढीच्या बाबतींत जी पहिली बातमी विलायतेस आली ती ही कीं, मिरजेच्या प्रजेनें संस्थानिकांच्या दाराजवळ धरणें धरलें व त्याचा परिणाम संस्थानिकांनीं प्रजेचें म्हणणें मान्य केले अशा आशयाची होती. मिरजे-च्या अधिपतींनी श्री० पुंडलिक यांस बरोबर घेऊन आपण सारावाढीच्या अन्याया-ची चौकशी करतों, असें जें आश्वासन उघडपणें ता. ४।११।२८ रोजीं दिलें होतें, त्यास अनुसरूनच ही इंग्लंडमधील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली तार होती व त्याचाच फायदा घेऊन डॉ० रशब्रूक वुइलियम्स् यांनीं, 'संस्थानांतील लोकमतास फार वजन असतें व संस्थानिकांवर त्याचा ताबडतोब परिणाम होतो' असें एका सभेमध्यें बोलून दाखविलें. 'रॉयल इन्स्टिटयूट ऑफ इंपीरियल अफेअर्स' या संस्थेपुढें संस्थानी प्रश्नाबद्दल माझें व्याख्यान झालें. या सभेस इंडिया ऑफिसमधील कांहीं प्रमुख गृहस्थ हजर होते व डॉ० वुइलि-यम्स् हेही हजर होते व मला उत्तर देतांना डॉ० वुइलियम्स् यांनीं मिरजेच्या या

लोकमताच्या विजयाचा उल्लेख केला होता. त्यांचा हेतु 'संस्थानांत लोकमतास जुमानीत नाहींत' असें जें मी प्रतिपादन करीत होतों तें निराधार आहे, हें दाखविण्याचा होता. मिरजेच्या अधिपतींनीं या बाबतींत जी माघार घेतली, "मी बोललों, परंतु वचन दिलें नाहीं"; असा जो भ्रामक व अत्यंत खोडसाळ कोटिक्रम त्यांनीं केला होता आणि प्रजेस दिलेल्या वचनाचा भंग करून त्यांनीं जी माघार खाल्ली होती, त्याबद्दलची माहिती तेथील पत्रांत आली नाहीं. परंतु ती मला इकडील पत्रावरून कळलेली होती व डॉ० वुइलियम्स् यांनीं दिलेलें मिरजेचें उदाहरण अगदीं फोल असून त्यावरून माझ्याच म्हणण्यास बळकटी येते असें मीं त्या सभेंत दाखविलें होतें. ही सभा ता. १० डिसेंबर रोजीं झाली होती व याच गोष्टीचा उल्लेख डा० वुइलियम्स् यांनीं फिरून 'मँचेस्टर गार्डियन' या नामांकित पत्रांतही केला होता व तो खालीलप्रमाणे होता.

"The people are not only associated but nothing vitally affecting them can be done unless they are agreed. They can, at any time, make the life of their Ruler intolerable. Look at the recent case of Miraj. What a perfect example of direct action?"

डॉ० वुइलियम्स् यांनीं असें स्पष्ट ध्वनित केलें आहे कीं, संस्थानांतील प्रजेला आपल्या स्वतःच्या हिमतीवर संस्थानिकास प्रजेच्या इच्छेप्रमाणें वागण्यास भाग पाडतां येतें. डॉ० वुइलियम्स् यांचें हें विधान वस्तुस्थितीस अगदीं सुटून होतें व ज्या वेळीं या उदाहरणाचा ते फिरून उपयोग करूं लागले, तेव्हां त्यास सडेतोड उत्तर देणें भाग पडलें व सदरहू माझें उत्तर 'मँचेस्टर गार्डियन'मध्यें ता. १३ डिसेंबर १९२८ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे व ते खालीलप्रमाणें आहे.

"Dr. Williams doubts the statement that the Indian Princes are secure in their autocratic rule by reason of the protection of the Paramount Power. We know, however, the eminent British Statesmen have recognised this fact. He has referred to the recent incident at Miraj. I come from that state and I have first-hand information about it. The facts are very interesting. The old ruler of the

state revised the assessment system and the burden on the soil was increased from 60 to 70 percent. The people complained against this ex-orbitant settlement. The leaders of the Ryots (peasants) requested permission to wait upon the ruler and to place their grievances before him. He declined to see them, even if they went to his place of residence. The agriculturists numbering some 2000, then approached the Ruler, sat outside his palace and begged for an interveiw. The chief declined to see them and sent word that they should disperse. They insisted, however, on seeing the ruler. Ultimately the ruler came out and promised the people that he would hold an inquiry with a representative of the people about the revised rates and then levy them. Satisfied with this, the poor cultivators went home. Within ten days' time the chief went back on his promise. After this became known some 4000, agriculturists came from distant places in the state and assembled outside the palace. For four days they sat day and night in heat & cold in the open space. The ruler was obdurate and did not give them any hearing. On the fifth day he issued notices on the leaders of people under the Criminal Procedure Code and asked the assembled people to disperse on pain of their being dealt with as an unlawful assembly under the criminal law. The helpless agriculturists dispersed. They did not commit any breach of the order or of the peace.

The chief will persist in his demand of this unjust levy. Non-payment of assessment would follow. Forfeiture would result. What then? What are the people to do? To whom should they appeal when the ruler is so obstinate and recalcitrant?

Should they resort to direct action? Would they be justified in asking the ruler to abdicate or to depose him and bring about a peaceful revolution? It is not very difficult for the people to accomplish this if the Paramount Power keeps quiet and does not interfere. The fact is the Paramount Power will never allow the people to exercise their natural right of removing misrule. It is not so much an autocratic ruler but the mighty Paramount Power behind him that will paralyse such efforts in no time. And it is solely for this reason that the people of the states appeal to the Paramount Power to come to their assistance and redress their grievances before it is too late."

"सार्वभौम सरकारचा पाठिंबा आहे म्हणूनच संस्थानिक निर्धास्तपणें प्रजेवर जुलूम करतात, हें विधान डॉ० वुइलियम्स् यांना पटत नाहींसे दिसतें; पण हें ब्रिटिश मुत्सद्द्यांना पूर्णपणें पटलें आहे. डॉक्टर साहेबांनीं नुकत्याच घडलेल्या मिरजेंतील गोष्टींचा उल्लेख केला आहे. मी तेथूनच आलों असल्यामुळें मला प्रत्यक्ष जास्त माहिती असणें साहाजिक आहे. ती सर्व हकीगत अशी आहे. "येथील वृद्ध संस्थानिकांनीं आपली सारापद्धति दुरुस्त करून तिची शेकडा ६० ते ७० पर्यंत वाढ केली. या बेसुमार वाढीविरुद्ध प्रजेने तक्रार केली. आपले सर्व गाऱ्हाणें मांडतां यावें या हेतूनें प्रजेच्या पुढाऱ्यांनीं संस्थानिकांना भेट देण्याची विनंति केली. सर्व पुढारी संस्थानिकांचे निवासाकडे गेले तरी त्यांना भेटण्याचें नाकारण्यांत आलें. मग सुमारें २००० शेतकरी भेटीच्या आशेनें राजप्रासादाबाहेर जाऊन बसले. मी भेटणार नाहीं, चालते व्हा. अशाप्रकारचा संस्थानिकांनीं निरोप पाठविला. शेतकरी आपलें म्हणणे सोडीनात. शेवटीं संस्थानाधिपति बाहेर आले व प्रजेच्या पुढाऱ्यांपैकीं एकाच्या साहाय्यानें या सारावाढीची सर्व चौकशी करून मग तरम आकारूं, असें त्यांनींच वचन दिलें. शेतकरी आनंदित होऊन घरोघर निघून गेले; पण दहा दिवसांतच संस्थानाधिपतींनीं आपलें वचन मोडलें. हें बाहेर फुटल्याबरोबर, निरनिराळ्या गांवचे मिळून ४००० शेतकरी पुन्हा राजप्रासादाबाहेर जमले व उन्हातान्हांत अहोरात्र चार दिवस ते तेथेंच बसून राहिले; तरी देखील संस्थानाधिपतींनीं

आपला हट्ट सोडला नाहीं. उलट पांचवे दिवशीं सर्व पुढाऱ्यांवर क्रि. प्रो कोड-प्रमाणें नोटिसा काढून येथून चालते व्हा; नाहींतर बेकायदेशीर जमाव म्हणून तुमच्यावर काम चालवूं; असें त्यांना कळविण्यांत आलें. अर्थात् सर्व शेतकरी परत फिरले; पण त्यांनीं कोणत्याही तऱ्हेने शांतताभंग केला नाहीं. संस्थानाधिपति या वाढीप्रमाणे कर वसूल करणार व प्रजा तो देणार नाहीं व तो अन्य मार्गांनीं वसूल करून घेण्यांत येईल. अशा परिस्थितींत प्रजेने काय करावें ? राजा आपला हट्ट सोडीत नाहीं म्हणून त्यांनीं कोणाकडे तक्रार करावयाची ? त्यांनीं राजाला आपली गादी सोडण्यास सांगितलें किंवा त्याला गादीवरून काढून शांततेनें राज्यक्रान्ति केली तर तें योग्य होईल काय ? सार्वभौम सरकार तटस्थ राहील व संस्थानिकांना मदत न करील तर प्रजेला हें सर्व करणे फारसें कठिण नाहीं. वास्तविक जुलुमी राज्यपद्धति नाहींशी करण्याचा प्रजेचा हक्क आहे; पण सार्वभौम सरकार प्रजेला तसे करूं देत नाहीं. जुलुमी राजापेक्षां सार्वभौम सरकारपुढेच प्रजेचे सर्व प्रयत्न क्षणांत निष्फळ होतात आणि म्हणूनच संस्थानी प्रजा आपणास मदत करून आपलीं गाऱ्हाणीं दूर करावीं म्हणून सार्वभौम सरकारकडे धांव घेते."

या उत्तरानंतर डॉ० वुइलियम्स् यांनीं त्यास प्रत्युत्तर देण्याचा कोणताही प्रयत्न केला नाहीं.

वरील उत्तरावरून जी तात्विक चर्चा प्रस्तावनेच्या प्रारंभीं केली आहे ती किती अन्वर्थक आहे हें प्रत्येकास दिसून येईल.

शेवटीं एवढेंच यासंबंधीं कळविणें आहे कीं, मिरजेच्या प्रजेने जी चळवळ चालू केली आहे ती अविश्रांत श्रमानें कायम ठेवली पाहिजे तरच त्याचा खरा उपयोग होईल. 'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचे ॥' या समर्थोच्या उक्तीचा प्रत्यय हल्लींच्या राजकारणांत पदोपदीं येत आहे व त्याबरोबरच या चळवळीचें अधिष्ठान समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें सात्त्विक भावने वरच अवलंबून असलें पाहिजे. सार्वभौम सरकारास आमची एवढीच विनंति आहे कीं, संस्थानांतील प्रजेचा असंतोष कडेलोट होईपर्यंत वाढवूं देणें अत्यंत गैरमुत्सद्दीपणाचें आहे व सार्वभौम सरकारनें आपली जबाबदारी ओळखून संस्थानी प्रजेच्या असंतोषाचीं कारणें नाहींशीं करण्याबाबत योग्य वेळीं संस्थानिकांस ताकीद दिली पाहिजे. मिरजेच्या संस्थानिकांस आमची एवढीच विनंति आहे कीं, भाषण आणि वचन असल्या सर्वथैव त्याज्य कोटिक्रम स्वीकारून त्यांनीं आजपर्यंतचा आपला लौकिक गमावला

आहे. तथापि कांहींशा तडजोडीस श्रीमंत कबूल झाले ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. पण याही बाबतींत श्रीमंतांनीं फिरून वचनभंगासारखेंच पातक आपल्या पदरीं बांधून घेतलें आहे असें दिसून येत आहे. तडजोडीमध्यें एक कलम असें होतें कीं, वैयक्तिक तक्रारीचा विचार होईपर्यंत वाढलेला सारा वसूल होणार नाहीं. हें आश्वासन जाहिरनाम्यांत दिलें होतें. वस्तुतः वैयक्तिक तक्रारी, श्रीमंतांनीं अधिकाऱ्यांमार्फत नीट बारकाईनें पाहून, त्याबद्दल रीतसर चौकशी करून तक्रारी दूर करणें हें श्रीमंतांचें कर्तव्य होतें. या कर्तव्याकडे श्रीमंतांनीं व त्यांच्या अधिकाऱ्यांनीं चुकूनसुद्धां पाहिलें नाहीं इतकेंच नव्हे पण तक्रारी-अर्ज शेतकऱ्यांकडून येण्याऱ्या मार्गांत शक्य त्या अडचणी उत्पन्न करून, तक्रारी दडपून ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचें कळतें ! आणि अशा प्रकारच्या दडपशाहीच्या चक्रांतून ज्या कांहीं वैयक्तिक तक्रारी आल्या, त्यापैकीं कांहीं वरच्यावर कायद्याच्या कक्षेत नाहींत म्हणून उडवल्या गेल्या व ज्या शिल्लक राहिल्या त्यांचा अद्याप यत्किंचित् विचार न करतां सारावसुलीचें काम बेमुर्वतखोरपणाने चालूं केले असे समजतें ! हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य आहे हें निराळे सांगण्याचें कारण नाहीं. आपण दिलेल्या वचनास जर पदोपदीं श्रीमंत व अधिकारी हरताळ फासूं लागले, तर प्रजेनें काय करावें हेंच ठरविणें दुरापास्त आहे. तथापि ज्या बार्डोलीच्या उदाहरणानें मिरजेतील प्रजेमध्यें इतकी जागृति उत्पन्न झाली त्या बाबतींत ब्रिटिश हिंदुस्थानांतील नोकरशाहीनें जे धोरण बार्डोलीच्या बाबतींत स्वीकारलें तेंच श्रीमंत व त्यांचे नोकर यांनीं यापुढें तरी अंगीकरावें असें आमचें त्यास नम्रपणें कळविणें आहे. ब्रूमफील्ड कमिटी-प्रमाणें न्यायी व स्वतंत्र माणसांची कमिटी नेमून या तडजोडींत कबूल केल्याप्रमाणें वैयक्तिक सर्व तक्रारींची अवश्य चौकशी प्रामाणिकपणानें करावी. त्याचप्रमाणें बार्डोलीच्या बाबतींत जमीनमहसुलाचें जें तत्त्व नमूद करण्यांत आलें आहे त्याचा सांगोपांग विचार करून जमीनमहसुलाच्या कायद्यांत व आकारणींत अवश्य तो फेरफार करावा. सभोंवार असलेल्या ब्रिटिश मुलुखांत जें जमीनधाऱ्याचें प्रमाण आहे त्याहून कितीतरी पट अधिक प्रमाण पूर्वीच्याच सरकारदेण्याचें होतें व हल्लींचा सारावाढ सर्वथैव अन्यायाची झाली असून या बाबतींत राजमान्य झालेल्या सर्व तत्त्वांच्या अगदीं विरुद्ध आहे. सबब यासंबंधीं मिरज प्रजेवर होत असलेला जुलूम मुंबई सरकारचें अनुकरण करून त्या सरकारपेक्षांही अधिक उदारपणाचें धोरण स्वीकारून नाहींसा करावा अशी श्रीमंतांस आमची विनंति आहे.

'मी प्रजेचा व माझी प्रजा' या शब्दप्रयोगांत कांहीं अर्थ असेल तर त्याचा प्रत्यय मिरजेच्या प्रजेस व मिरजेबाहेरील लोकांस येणें जरूर आहे.

सदरहू पुस्तक वर नमूद केलेल्या कारणाकरितां संस्थानच्या हिताची यत्किंचित्ही कळकळ असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें अवश्य संग्रहीं ठेवावें अशी आमची सविनय विनंति आहे. कारण सात्त्विक भावना उत्पन्न होण्यास या पुस्तकाच्या वाचनासारखें संस्थानी प्रजेस दुसरें क्वचितच साधन आहे असें नमूद करणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

सांगली,
विजयादशमी, शके १८५१

गणेश रघुनाथ अभ्यंकर



मिरज संस्थानांतील सारावाढ

आणि

रयतांचा सत्याग्रह

प्रकरण पहिलें

विषयप्रवेश



दक्षिण महाराष्ट्रामध्यें मिरज संस्थानें हें एक लहानसें ब्राह्मणी संस्थान आहे. या संस्थानचे सोलापूर जिल्ह्यांतील पंढरपुराजवळचे मोडनिंब, धारवाड जिल्ह्यांतील लक्ष्मेश्वर असे दोन व मिरज एक, एकूण तीन तालुके आहेत. मिरज ही संस्थानची राजधानी आहे.

मिरज संस्थानची मूर्ति लहान असली तरी अलीकडे त्याची कीर्ति मात्र विशेष झालेली आहे! पिण्याच्या पाण्याचें दुर्भिक्ष्य हें त्या कीर्तीचें प्रथमकारण आहे. त्यांतल्यात्यांत मिरज संस्थानांत अलीकडे करण्यांत आलेल्या जबर व भयंकर सारावाढीमुळें तर, मिरज संस्थान अखिल महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालें आहे. हिंदुस्थानामध्यें स्वराज्याकांक्षा लोकांमध्यें जसजशी वाढूं लागली तसतशीं पूर्व-वैभवाचीं स्मृतिचिन्हें या नात्यानें आपल्या संस्थानिकांविषयींचा आदर लोकां-

मध्यें साहजिकच वाढूं लागला. परंतु 'ज्याचें करावयास जावें बरें, तो म्हणतो आपलेंच खरें' या न्यायानें हे संस्थानिक अधिकाधिक निष्काळजी बनूं लागले असें पुष्कळ संस्थानांतून अनुभवास येत आहे. संस्थानिक हे आपल्याच हाडा-मांसाचे असल्यामुळें त्यांच्या वेवंदशाही राज्यकारभाराकडे डोळेझांक करण्याची संवय संस्थानांबाहेरील लोकांना लागलेली आहे असा आक्षेप संस्थानांतील लोक घेत असतात आणि त्यांत बरेंच तथ्यही आहे यांत शंका नाहीं. परंतु अलीकडे ही स्थिति आस्ते आस्ते कां होईना, पालटत चाललेली आहे.

मिरज तालुक्याची–विशेषतः मिरज राजधानींतील हवा फारच उत्तम आहे. कित्येक मोठमोठे दुःसाध्य रोग बरे होण्यास या हवेचा चांगलाच उपयोग होतो असें तज्ज्ञांचें मत आहे. मिरजेच्या संस्थानाधिपतींनीं आजपर्यंत उघड्या डोळ्यांनीं व विचारपूर्वक राज्यशकट हांकला असता, लोकांच्या सुखसोयींकडे नीट लक्ष्य दिलें असतें, लोकांना शिक्षण देण्याची काळजी घेतली असती, तर श्री० मोडक–लँडरेकॉर्ड सुपरिन्टेन्डन्ट–यांनीं रिव्हिजन सर्व्हेच्या रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें—

"Just as Bombay is the gate-way of India, so Miraj is the gate-way of the Southern Maratha country" हें वर्णन निःसंशय सत्य ठरलें असतें. मिरज संस्थानांतील सारावाढीविरुद्ध चाललेल्या चळवळीस विशेष उग्र स्वरूप मिरज तालुक्यांतच आलें असल्यामुळें त्याच तालुक्याची माहिती व प्रसिद्धि महाराष्ट्रभर विशेष झाली. समुद्राच्या सपाटीपासून मिरज हें शहर सुमारें १८०० फूट उंचीवर आहे. चार–पांच ठिकाणचे रेल्वेचे फांटे मिरजेस येऊन मिळाल्यामुळें तें मोठेंच रेल्वे जंक्शन झालें आहे. कोंकण व देश यांच्या मध्यभागांत मिरज हें वसलेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मिरज तालुका कृष्णानदीनें पुनीत झाला आहे. मिरज तालुक्यामध्यें एकंदर ३५ खेडीं असून त्यांत ६ खेडीं इनामी आहेत व बाकीचीं २९ खेडीं दरबारी आहेत.

मिरज संस्थानची प्रथम सर्व्हे सन १८६७–६८ सालीं झाली होती. त्यानंतर आतांपर्यंत ६० वर्षांत सर्व्हे होऊन सारावाढ झाली नाहीं. वाटेल तशी व वाटेल तितकी सारावाढ करविण्यास संस्थानाधिपति श्रीमंत सरकार बाळासाहेब यांच्या मतें तें एक सबळ कारण म्हणून वारंवार पुढें करण्यांत येत असे. रिव्हिजन सर्व्हे

प्रत्येक तीस वर्षांनीं कां करतात याविषयींच्या अज्ञानाचें तें एक द्योतक आहे. प्रत्येक तीस वर्षांनंतर सारावाढ झालीच पाहिजे असा कांहीं सृष्टीचा किंवा लँड रे. कोडाचा सक्तीचा कायदा नाहीं. परंतु संस्थानाधिपति किंवा अधिकारी यांनीं आपली समजूतच अशी करून घेतलेली दिसते आणि लोकांचीही पण करून दिलेली आहे कीं, सारावाढ ही वारंवार झालीच पाहिजे ! वास्तविक सत्य-स्थिति याच्या अगदीं उलट आहे असेंच आम्हांस वाटतें. सारा म्हणजे जमिनी-च्या निव्वळ उत्पन्नाचें एक प्रकारें भाडें आहे. तें उत्पन्न-अर्थात् भाड्याचा मूळ आधार कमीअधिक होणें शक्य आहे. उत्पन्न कमी होऊनही शेतकऱ्यास व्यर्थ भाड्याचा भर आकार भरावा लागूं नये हा हेतु प्रत्येक तीस वर्षांनीं सर्व्हे करण्यामध्यें असावा. मात्र जमिनीचें उत्पन्न पुष्कळच वाढलें असल्यास व शेत-करी त्यायोगें सधन झाला असल्यास साऱ्यामध्यें थोडीशी वाढ करण्यासही सरकारास अधिकार आहे. आणि या एवढ्याशा सबलतीच्या आधारावर स्वार्थी सरकार शेतकऱ्यांच्या शेतांत फिरणारा नांगर त्यांच्या घरादारांवरून फिरूं लागला तरी, त्याचा विचार करीत नाहीं अशी अनवस्था प्राप्त झाली आहे !

मिरज संस्थानाधिपति यांची लहर आपल्या संस्थानांत सारावाढ करविण्याची लागतांच त्यांनीं श्री० मोडक लँ. रे. सु., सी. डी. पुणें-यांच्या मदतीनें सर्व काम उरकून घेतलें. खालसांतील लोक, आपल्या संस्थानचें काम किती काळजीनें करतील याचा अंदाज संस्थानाधिपतींना लागला नसावा. त्यांच्या मदतीला आपल्या दरबाराकडून ज्यांना देण्यांत आलें होतें त्यानीं रि. सर्व्हे रिपोर्टांत आपली बाहवा कशी येईल याची तेवढी काळजी चांगली वाहिलेली दिसते. खालसांतील अधिकारी बोलावून त्यांच्याकडून काम करवून घेतल्यास सारावाढीच्या समर्थ-नाचा पाया तितक्यापुरता अधिक खंबीर झाला असें श्रीमंतांना वाटत असल्यास हर्ल्लीच्या काळांत त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नाहीं. संस्थानिक व संस्थानी प्रजा यांच्यामध्यें वितुष्ट किंवा बेबनाव उत्पन्न झाल्यास ती ब्रिटिश सरकारास इष्टापत्तीच असते. श्री० मोडकांच्या रिपोर्टाबरोबर मि० अंडरसन-से कमिशनरसाहेबांनीं दरबारकडे एक पत्र पाठविलें असून त्यांतील खालील उतारा त्या दृष्टीनें वाचण्यासारखा आहे.

"I have the honour of forwarding herewith the Miraj settlement report received from the Superin-

tendent Land Record, C.D. and of observing that from the schedule of sales and rental statistics with the multiples deduced therefrom, it is quite certain that the whole of the assessments throughout the state, could be doubled without inflicting any serious hardship.....The low assessment has had a detrimental effect upon agriculture."

हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यास श्री० मोडकांचें नुकसान कांहीं नाहीं; मि० अंडरसनसाहेबांचें तर त्याहूनही नाहीं ! पण या गोष्टी रयतांच्या दुर्दैवानें श्रीमंतांच्या ध्यानांत येत नाहींत, आणि श्रीमंतांचे व अधिकाऱ्यांचे डोळे उघडविण्याइतकी रयतांमध्यें निर्भयता, एकी आणि ज्ञान नाहीं !

मिरज तालुक्यांतील रयतेचें दारिद्र्य !

सारावाढ करावी किंवा न करावी हें ठरविण्यास जमिनीचा निव्वळ नफा पहाण्याचा असतो तो क्षणभर एका बाजूला ठेवला, आणि रयतेच्या आर्थिक परिस्थितीकडे नजर फेंकली तरी अन्यायाची तीव्रता स्पष्ट दिसून येते. गेल्या साठ वर्षांत नवीन रस्ते संस्थाननें करविले असल्याचें, संस्थानास दाखवितां येईल असें नाहीं. मिरज तालुक्यांतील २९ दरबारी खेड्यांमध्यें नवीन चांगलीं घरें रयतांनीं बांधविलीं असल्याचीं उदाहरणें हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं देखील मिळणार नाहींत ! या बाबतींत मिरज-संस्थान-प्रजा-परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अधिकारी अध्यक्ष प्रो० ग. र. अभ्यंकर, बी. ए., एल्एल्. बी., वकील सांगली, यांनीं आपल्या अध्यक्ष या नात्याच्या भाषणांत जे उद्गार काढिले आहेत ते या ठिकाणीं उद्धृत करण्यासारखे आहेत. ते म्हणतात—

" मिकारी मिरज म्हणून चालत आलेला बदलौकिक अव्याहत कायम रहावा, आजूबाजूचा सर्व मुलूख शांतता व सुधारणा यांनीं गजबजून गेला असतांना मिरजेने मात्र हलाखींत दिवस काढावे याहून लाजिरवाणी गोष्ट कोणती ? याबद्दल आपणांस विषाद वाटत नाहीं काय ! मिरजेहून भाजीपाला सांगलीस जावा व आपल्या येथील माणसांना तो घेण्याची ताकद असूं नये याहून उद्वेगजनक स्थिति दुसरी काय असणार आहे ? आमच्या एका विनोदी मित्रानें आपल्या (मिरज) गांवच्या दुर्भिक्षाचें वर्णन करितांना असें सांगितलें कीं,

"बाजाराच्या दिवशीं चार आण्यांपेक्षां जास्ती लोणी घेणारा व दररोज पैशापेक्षां अधिक भाजी घेणारा मनुष्य खचित मिरजेचा नव्हे; तो परका-मिरजेबाहेरचा असावा अशी पक्की खूणगांठ आपल्या मनाशीं बांधावी'. यांतील उपरोधिक भाग सोडला तरी हें म्हणणें किती अर्थपूर्ण आहे हें आपल्यासारख्या चाणाक्ष माणसांस मी सांगावयास नको." असो. मिरजेंतील उद्योगधंदे उत्तेजनाच्या अभावीं बसत चालले असून अनेक चांगलीं घराणीं मिरज सोडून बाहेरगांवीं गेलीं आहेत. शेतकरी लोक अनेक तऱ्हेचे हलके धंदे करून व स्वतःची उपासमार करून घेऊन मूळचा सारा कसातरी भरत आहेत. पण या सर्व गोष्टी श्रीमंतांच्या नजरेस येतील तेव्हां ना ? दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पहावें लागतें, दुसऱ्याच्या कानांनीं ऐकावें लागतें ! त्यामुळें अधिकारीवर्ग जर दक्ष, प्रामाणिक व न्यायी नसेल तर, श्रीमंतांना कित्येक गोष्टी, तसेंच कांहीं कारण उद्भवल्याशिवाय कळणें कठिण होऊन बसतें. बहुतेक सर्व खेडीं कर्जाच्या बोजांनीं वांकलेलीं आहेत. सरकारी कर्जानें कित्येक रयत आकंठ बुडलेले आहेत. बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जामुळें व दुष्काळामुळें सावकारांच्या हातांत गेलेल्या आहेत. सावकारांच्या कचाट्यांतून रयतांना सोडविण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोणींही व केव्हांही केलेला दिसत नाहीं. अशा विषम परिस्थितींत श्रीमंतांच्या मनांत आपल्या संस्थानांत सारावाढ करण्याची बुद्धि उत्पन्न झाली आहे !

सारावाढीच्या बाबतींत झालेल्या अन्यायाचें किंचित् दिग्दर्शन

संस्थानामध्यें रिव्हिजन सर्व्हे सुरू झाल्यापासून कायद्यानें रयतांना ज्या ज्या सवलती व मुदती मिळावयास पाहिजे होत्या, त्या त्यांना संस्थानाकडून मिळालेल्या नाहींत. जमिनीचे गट बनावितांना व जमिनीच्या किंमती ठरवितांना किंवा प्रतवारी करण्यापूर्वी, रयतांना आपलें म्हणणें कळविण्यास तीन महिने मुदत द्यावी लागते. ती तशी दिली गेली नाहीं. लँड रे० सुपरिन्टेन्डन्टना माहिती पुरवितांना रयतांना कोणत्याही प्रकारें सल्ला विचारला नाहीं किंवा कळविलेलें नाहीं. लँड रे. कोडमध्यें तसा कायदा कोठें आहे ? असें खाजगी रीतीनें व पुढें सरकारी जाहीरनाम्यांतही विचारण्यास अधिकाऱ्यांना दिक्कत वाटली नाहीं ! लँड रे. कोडमधील सरकारी ठराव तर अधिकाऱ्यांनीं पूर्णपणें धाब्यावर बसविले आहेत ! सारा वाढवितांना श्री० मोडक यांनीं वाटेल तीं भलतीं विधानें ठोकून

दिलीं आहेत. श्री० मोडक यांनीं सेटलमेंटची मुदत तीस वर्षांची ठेवावी अशी शिफारस केली होती ती श्रीमंतांनीं दयाळू (?) होऊन वीस वर्षांची करण्याचें औदार्य व्यक्त केलें आहे! आपल्या सोयीकरितां दरवारनें एक साल दहा महिन्यांचें व दुसरें चौदा महिन्यांचें करून ब्रह्मदेवावरही ताण केली आहे! सुपरिन्टेन्डन्टचा रिपोर्ट इंग्रजींत आहे. मिरज संस्थानचें दप्तर मराठींत असून रयत अडाणी व अक्षरशत्रू असतांही, त्या रिपोर्टाचें मराठी भाषांतर करून रयतांना तें समजावून देण्याची व्यवस्था केलेली नाहीं. काल्पनिक गुन्हा देखील न सांगतांच शिक्षा ठोठावण्याचा हा एक मासला आहे असें म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे?.

सर्व कारभार असा अन्यायाचा व एकतर्फी झाला असला तरी निदान सारावाढ तरी कांहीं वेताची किंवा रीतीला धरून केली आहे म्हणावें, तर तसेंही नाहीं. मिरज संस्थानांतील तीन तालुक्यांची सरासरीनें वाढ मिरज ५६·४, लक्ष्मेश्वर ६०·०३ आणि मोडनिंब ५०·६६ या प्रमाणांत केली आहे. या तीन तालुक्यांतील गांवांचें मिळून वाढीचें स्थूल प्रमाण खालीलप्रमाणें आहे. १५ ते २० रुपये एक गांव; २० ते २५ रु. एक गांव; ३० ते ३५ एक गांव; ३५ ते ४० तीन गांवें; ४० ते ४५ चार गांवें; ४५ ते ५० सहा गांवें; ५० ते ५५ नऊ गांवें; ५५ ते ६० सात गांवें; ६० ते ६५ पंधरा गांवें; ६५ ते ७० तीन गांवें; ७० ते ७५ दोन गांवें आणि ७५ ते ७८ दोन गांवें.

दहा दिवसांत पांच-सात जाहीरनामे काढविलेले पाहिले म्हणजे पेशवाईंतील एका दंतकथेची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. एक सुभेदार आपल्या राजाच्या हुकुमाप्रमाणें आपल्या सुभेदारीच्या कामावर जातांना घोड्याच्या शेपटीकडे तोंड करून घोड्यावर बसलेला होता. त्याला त्याचें कारण विचारतां तो म्हणाला कीं, "कदाचित् पुन्हा लागलीच याच्या उलट हुकूम सुटण्याचा संभव आहे. तो ऐकण्याकरितां तोंड फिरवूनच बसलों आहें!" परस्परविरुद्ध असे जाहीरनामे ज्या ज्या तारखेला छापविले होते ते त्याच तारखेला गांवोगांव रवाना झाले असें चुकून सुद्धां झालेलें नाहीं. जाहीरनामे छापले एका तारखेला, त्यावर दुसरीच तारीख छापली, पुढें कधीं तरी ते सर्वच जाहिरनामे गांवोगांव रवाना झाले आणि गांवकामगारांच्या मर्जीला येईल त्या वेळीं ते सर्व जाहीरनामे एकदमच चावडीवर चिकटविले गेले असें चौकशीअंतीं विधान करण्यास आम्हांस कांहींच हरकत वाटत नाहीं.

मिरज संस्थानांतील अर्थात् मिरज तालुक्यांतील लोकसंख्या वरीच कमी झाली आहे. लोक सुखी आहेत असें दाखविल्याशिवाय सारावाढ करणें शोभणार नाहीं आणि लोक सुखी आहेत असें दाखविण्यास पुरावा म्हणून लोकसंख्या वाढलेली असल्याचें सिद्ध केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. म्हणून श्री० मोडक हे मिरज संस्थान व तालुक्याच्या लोकसंख्येकडे वळले आहेत. मिरजेची भरभराट झपाट्यानें चालू असल्याचें विधान करून त्याला पुरावा म्हणून पार्शी व युरोपियन लोकांची मिरजेतील वाढती वस्ती दाखविली आहे. सहाव्या रिव्हिजन सर्व्हेच्या वेळीं मिरजेंत युरोपियन लोक नव्हते व आतां त्यांचें व इंडियन ख्रिश्चनांचें पीक बरेंच माजलें आहे आणि ज्या ज्या ठिकाणीं हे पाय लागतील तेथील (Rapid growth) भरभराट झपाटयानें होते असा सिद्धान्त ठोकून दिला आहे ! परंतु अशा प्रकारें भरभराट दर्शविल्यास लोकसंख्येची वाढ सिद्ध करणें अधिकच आवश्यक होऊन बसलें.

मिरज मिशन हॉस्पिटलचा अगदीं बारशापासून वाराव्यापर्यंतचा सविस्तर इतिहास सांगितला तरी तेवढ्यानें लोकसंख्येचा मुद्दा थोडाच वुजूं शकणार आहे ? श्री० मोडक यांनीं केलेला आंकड्यांचा गोवळ व त्यावरून काढण्यांत आलेलें प्रमाण व बसविलेलें अनुमान पाहून श्री० बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांनीं 'संस्थानी स्वराज्य' वर्तमानपत्रांत 'मिरज संस्थानांतील सारावाढ' या मथळ्याखालीं लिहिलेल्या लेखमालेंत 'ही एक धूळ का खेळ ?' असा सवाल विचारला आहे तो अगदीं यथार्थ आहे. सन १८९४ सालची **मिरज गांवची** लोकसंख्या घेऊन हल्लींच्या **मिरज तालुक्याच्या** लोकसंख्येशीं तिची तुलना करून शेंकडा ८५नें वाढ झाली आहे असें दडपून दिलें आहे ! वास्तविक तालुक्याची लोकसंख्या ४११४ नें व खास मिरज-गांवची-लोकसंख्या ४६३६ नें कमी झालेली आहे ! याच बाबतींत मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे अध्यक्ष श्री० ग. र. अभ्यंकर आपल्या भाषणांत म्हणतात—

"नुसत्या लोकसंख्येचा विचार केला तर या ३६ वर्षांच्या काळांत शेंकडा ६$\frac{१}{२}$ प्रमाणें संस्थानची लोकसंख्या कमी झाली आहे."

कोणीकडे शेंकडा ८५ वाढ व कोणीकडे शेंकडा ६$\frac{१}{२}$ घट !

दळणवळणाच्या बाबतींत मिरज फारच सुधारली असल्याचें दाखविण्याचाही श्री० मोडक यांनीं आपल्या रिपोर्टांत प्रयत्न केला आहे. शेजारच्या तालुक्याशीं

तुलना करतां मिरज तालुक्यांतील रस्ते फार चांगल्या स्थितींत आहेत असें म्हणण्यांत सुपरिन्टेन्डन्टसाहेबांनीं आपल्या अंगचें धाडस व्यक्त केलें आहे ! ही तुलना करतांना दुसऱ्या एखाद्या प्रामाणिक व सज्जन माणसास लज्जेनें मानच खालीं घालावी लागली असती. वास्तविक मिरज तालुक्यांतील रस्ते व इतर संस्थानांतील किंवा ब्रिटिश हद्दींतील रस्ते ओळखणें अलीकडे सोपें झालें आहे. हल्लींच्या धोंडयांचीही आतां तितकी आवश्यकता भासत नाहीं. कारण बैल ठेंचकळूं लागले, तांगे किंवा गाडया एका बाजूस कलून पोलिसांच्या पगडी-सारख्या तिरप्या होऊं लागल्या किंवा मोटार उलटण्याच्या घाईला आली अथवा रस्ता व शेत यांतील फरक चर्मचक्षूंना दिसेनासा झाला कीं, खात्रीनें समजावें कीं, ही मिरज हद्द असली पाहिजे. मिरज हद्दींतून मोटार नेण्यास मोटारवाले भाडें अधिक मागत असतात. अशा रस्त्यांचें वर्णन श्री० मोडकसाहेबांनींच करावें व श्रीमंतांनीं कान भरून ऐकावें ! रस्त्याची दुरुस्ती झाल्याशिवाय व मोटारी वगैरेंसारख्या नवीन सुधारणांचा फायदा शेतकरी घेऊं लागल्याशिवाय त्या कारणांच्या व सुखसोयींच्या आधारानें शेतकरी लोकांवर सारा वाढविणें अन्याया-चें व अप्रामाणिकपणाचें आहे.

जी स्थिति दळणवळणाच्या बाबतींत तीच स्थिति बाजारांच्या बाबतींत आहे.

रिपोर्टींतिल या भागांवर टीका करतांना आपल्या लेखमालेंत श्री० बाळकृष्ण विठ्ठल शिखरे म्हणतात—

"मिरज तालुक्यांतील मिरज, मालगांव व ढालगांव या तीन गांवीं आठवड्याचे बाजार भरत असून मिरज हें सर्वांत या बाबतींत महत्त्वाचें गांव आहे. महाराष्ट्रांत कृष्णानदीकांठच्या खेडयांतील 'खिल्लारीं' जातीचीं ढोरेंही फार प्रसिद्ध असून त्यांची विक्री तालुक्याच्या बाहेर होत असते इ० वर्णन या प्रकरणांत देण्यांत आलेलें आहे. मालगांवला आठवडयाचा बाजार सुरू झाला त्या वेळच्या बाजाराची स्थिति आज राहिलेली नाहीं ! मिरज शहरांत पूर्वी केवढा मोठा बाजार भरत असे व आज केवढा भरतो ! पूर्वी या बाजारांत किती देवघेव होत असे व हल्लीं किती होत असते ! पूर्वी मिरजेस गुरांचा केवढा बाजार भरत असे व हल्लीं तो अजीबात बंद कां झाला आहे ! याची विचारपूस सुपरिन्टेन्डन्ट श्री० मोडक यांनीं केली असती, तर त्यांना खास आढळून आलें असतें कीं, मिरजेचा बाजार, व्यापार, देवघेव, दळणवळण हें वाढलें नसून तें मिरजेच्या दुर्दैवानें कमीच

झालें आहे ! मिरजेला सांगलीच्या मार्केटावर पुष्कळ अंशीं अवलंबून रहावें लागत आहे ही गोष्ट सिद्ध करण्यास विशेष पुराव्याचा आवश्यकताच नाहीं."

ज्या कारणांच्या आधाराने सारावाढ नक्की करावयाची तीं सर्व कारणें अशा प्रकारें भ्रामक फुगवून सांगितलीं गेलीं आहेत, एवढेंच नव्हे तर साधें मोजणीचें कामही मोजणीदारांनीं नीट केलेले नाहीं. आपल्या लेखमालेंत श्री० बा. वि. शिखरे म्हणतात—

" कित्येक गांवीं मोजणी करणाऱ्या नोकरांनीं मोजणीच्या कामांत नसते गोंधळ माजविल्याचा बोभाटा आमच्या कानीं आला आहे. कित्येक जमीनदारांमध्यें मोजणीसंबंधीं तंटे होते ते न मिटतां वाढत चालल्याचेंही ऐकण्यांत आलें आहे. व्यक्तिशः तक्रारींचा हा प्रश्न कदाचित् कोणी मानतील. तरी सुद्धां मोजणीचें काम एकंदरींत खर्चलेल्या पैशाच्या मानानें समाधानकारक झालें नाहीं इतका निष्कर्ष त्यापासून सहज निघतो; तिकडे दुर्लक्ष होतां उपयोगी नाहीं."

हा मुद्दादेखील क्षणभर बाजूला ठेविला तरी सारावाढ करतांना ज्या गोष्टी विचारांत घ्यावयाच्या असतात, त्यांचा विचार झालेला नाहीं असें पदोपदीं सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. बागाईत शेती करण्यास पाण्याची आवश्यकता असते हें लहान पोरासही कळण्यासारखें आहे; आणि गेल्या वीस वर्षांत मिरज तालुक्यांत पावसाच्या अभावीं पाण्याची इतकी टंचाई व दुष्काळ झाला आहे कीं, बहुतेक विहिरी कोरड्या पडल्या आहेत ! अशी वस्तुस्थिति असतां श्री० मोडकांच्या रिपोर्टांत बागाईत क्षेत्रफळहीं वाढलेलें आहे असें दाखविलें गेल्यानें खुद्द रिपोर्टावरच पाणी फिरल्यासारखें झालें आहे.

मिरज तालुक्यांतील उद्योगधंद्यांच्या मुद्द्याचा रिपोर्टांत उल्लेख केला नसता तर तेंही एकप्रकारें बर झालें असतें. निदान 'हात दाखवून अवलक्षण' तरी झालें नसतें. कारण उद्योगधंद्यांच्या बाबतींत अंडीं, घोंगड्या, विणकाम यांशिवाय नांव घेण्यासारखा धंदाच सांगतां आलेला नाहीं. त्यांतच विणकर विणकाम सोडून अंड्यांच्या व्यापारांत शिरत आहेत असें कबूल करून विणकरांचा धंदा बसत चालल्याचें सिद्ध केलें आहे. बार्शी लाईट रेल्वेचा फायदा लोक घेऊं लागण्यापूर्वीच त्याकरितां शेतकऱ्यांवर सारावाढ करण्यांस घिसाडघाई केली आहे एवढेंच नव्हे तर रेल्वे सुरू झाल्यापासून बरेच दिवसानंतर लोकांना त्यापासून फायदा मिळण्यास सुरुवात होते हा गोष्टही रिपोर्टांत कबूल केली आहे. श्री० बा. वि. शिखरे

यांनीं आपल्या लेखमालेंत पुराव्यानिशीं सिद्ध केलें आहे कीं, "गेल्या ६० वर्षांत व विशेषेंकरून गेल्या ३०।४० वर्षांत मिरज अगर मिरज तालुक्याची भरभराट न होतां ऱ्हासच झालेला आहे!" तालुक्याची भरभराट दाखवितांना तालुक्यांतील गुरेंढोरें वाढलीं आहेत असें दाखवावें लागतें. हा मुद्दाही उद्योगधंद्यांच्या मुद्द्या-इतकाच महत्त्वाचा आहे. पूर्वीच्या सर्व्हेच्या वेळची गुराढोरांची संख्या, त्यांची स्थिति, नांगरांची संख्या वगैरे शेतीच्या उपयुक्त अशा साधनांची चालू स्थितीशीं व संख्येशीं तुलना करावी लागते; परंतु विश्वसनीय आंकडे व माहिती मिळत नाहीं अशी श्री० मोडक व अधिकारी यांनीं तक्रार गाऊन वेळ मारून नेण्याचें धाडस केलें असलें तरी श्री० वा. वि. शिखरे यांनीं आपल्या लेखमालेंत ती सर्व माहिती त्यांच्या व जनतेच्या पुढें ठेविली आहे. ती खालीलप्रमाणें आहे—

सन	बैल	गाई	रेडे	म्हशी	घोडे	घोड्या	गाढवें
१८८९–९०	९६२०	६३०३	१४७४	३९११	३५४	२७२	२१३
१९२६–२७	३५७९	११६२	२७१	१७२७	४२	१५८	९६
	६०४१	५४११	१२०३::	२१८४	३१२	११४	११७

	बकरे व मेंढ्या,	दोन बैली नांगर,	चार बैली नांगर,	व.गाड्या,	मा.ने.गा.
१८८९–९०	१८९३७	२०१	५४०	९७	१०६६
१९२६–२७	१४८८६	४०३	२५४	६७	८९४
	४०५१ +	२०२	२८६	३० ·	१७२

दुभतीं व नांगरार्चीं जनावरें दुष्काळामुळें फारच कमी झालीं अशी कबुली श्री० मोडकसाहेबांनीं दिली आहे; परंतु त्यामुळें सारावाढ करण्याचा हात मात्र त्यांच्यानें थोडादेखील आंवरता घेणें झालें नाहीं हा त्यांतील विशेष आहे! हीं गुरेंढोरें जरी कमी झालीं असलीं तरी आपल्या रयतेला शिक्षणावांचून आंधळें ठेऊन त्यांना गुरेंढोरें बनवून ती संख्या वाढविण्याचें काम झपाट्यानें चालूच होतें असें म्हणण्यास फारशी हरकत येणार नाहीं. सारावाढ करण्यास लोकांची जी सुस्थिति दाखवावी लागते त्यांतच शिक्षण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या मुद्द्यावर लँड रे. सु. श्री० मोडक आपल्या रिपोर्टांत म्हणतात कीं—

"It will thus be seen that every attempt is made by the Darbar to promote the public interest in education."

"शिक्षणाच्या अभिवृद्धीकरितां दरबार आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत असल्याचें आढळून येणार आहे." या विधानाचा फोलपणा उघडा करून दाखविण्याकरितां Servant of India पत्राच्या ता. २१ फेब्रुवारी सन १९२६ च्या अंकांत "Adiministration of Miraj" या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेल्या लेखांतील उतारा उद्धृत केल्यास पुरे आहे. तो मजकूर असा—

"Here (in education) too, as noted above, there is stagnatio:n the percentage of scholars to total population being 4·1 in 1890 and 4·4 in 1925. But the figures of the state's expenditure on education merit close scrutiny. In 1890 Rs. 12,200 were spent out of the state's treasury on education and Rs. 10,733 out of Local Funds, the total educational expenditure being Rs. 22,394. For a quarter of a century, things were in this condition so far as education was concerned."

* * *

"In 1925 the state devoted Rs. 10,000 out of its total revenues of Rs. 4,36,963 to education; i. e. 2·5 percent, by no means an excessive proportion, one should think. But it is atleast a certain proportion, now it is reduced to an absolute zero."

याच बाबतींत श्री० ग. र. अभ्यंकर म्हणतात कीं, "प्रजेचा इतका पैसा घेऊन त्यापैकीं एक पैसुद्धां शिक्षणाकडे खर्च होऊं नये ही गोष्ट किती लांछनास्पद आहे हें सांगण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. संस्थानच्या उत्पन्नांतून सुमारें दोन-तृतीयांश उत्पन्न खाजगीकडे खर्च करणाऱ्या व विद्याव्यासंगी म्हणवून घेणाऱ्या अधिपतींना आपल्या प्रजेला विद्यादान देण्याच्या कामीं एक दमडीसुद्धां खर्च करण्याची वासना होऊं नये ही मोठ्या कष्टाची गोष्ट आहे! दुय्यम व प्राथमिक शिक्षणाचा सर्व खर्च लोकलफंडांतून करणें हें सर्वस्वीं बेकायदेशीर असून अडाणी रयतेपासून घेतलेल्या फंडाचा हा निवळ दुरुपयोग होय. एका दृष्टीनें निरक्षर प्रजेचीच

ज्या कृत्यानें फसवणूक होत आहे असें म्हणणें भाग आहे.” यापेक्षां या शिक्षणाच्या बाबतींतील अन्याय उघड करण्यास अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

‘मिरजेची सारावाढ’ या मथळ्याखालीं ता. १३ ऑगस्ट १९२८ च्या ‘संस्थानी स्वराज्य’ वर्तमानपत्रांत ‘एक रयत’ या टोपण नांवानें एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत लेखक म्हणतो कीं, “ मिरजेची नुकतीच सारावाढ झाली आहे ती बाडोंलीच्याच चुकीच्या पायावर झाली आहे. ... ...

सेंटलमेंट ऑफिसरची चौकशी

ता. ११।१।२८ ला सायंकाळीं ६ वाजतां लक्ष्मेश्वरला ते पोंचले. ता. १२ ला लक्ष्मेश्वर तालुक्यांतील सोळा गांवांपैकीं दोन बनें पाहिलीं. ता. १३ ला दोन गांवें पाहिलीं. ता. १४ ला सकाळीं एका गांवास भेट दिली व अकरा वाजतां धारवाडास निघून गेले.

मोडनिंब तालुका

जानेवारी १९२७ ला पंढरपुराहून मोडनिंबला आले व तेथून तीन मैलांवर असलेल्या अरणगांवांत गेले. दोन माणसांचें काम पाहिलें, मोडनिंब स्टेशनवर एकाचें दप्तर पाहिलें व तेथून कुर्डूवाडीस गेले. सप्टेंबरमध्यें आले व मामलेदार कचेरींत दोन तास होते. तेथून पंढरपुरास गेले. जानेवारी १९२८ मध्यें कुर्डूवाडीहून एका गांवीं गेले व मोजणीचें काम अर्धा तास पाहून गेले. दुसरे दिवशीं सकाळीं कुर्डूवाडीहून रोपळा गांवीं एका गाडीनें आले व दुसऱ्या गाडीनें पंढरपुरास गेले.... ... ...

खरेदी, विक्री, झालेला भरणा व खंड-चिठ्या यांच्यावरून सेटलमेंट ऑफिसरनें स्वतः खात्री करून घ्यावयाची त्यास ‘इकॉनॉमिक इन्क्वायरी’ म्हणतात; पण त्यांनीं ती करावी तशी केली नाहीं हें वरील मिळालेल्या माहितीवरून दिसून येईल. सारावाढ करतांना हें आद्य तत्त्व होय; पण सेटलमेंट-ऑफिसरनें ग्रामाधिकाऱ्यांनीं (Village Officers) जे आंकडे तयार करून दाखविले त्याच पायावर उभारणी केली. हें तत्त्वच मुळांत चूक आहे. सबब नवीन आकारणी बरोबर नाहीं. अर्थात् हें सर्व फेंटाळून लाविलें पाहिजे.....दहा–पांच पाटबंधारे तरी पहावयास पाहिजे होते; परंतु तें कांहींएक केलें नाहीं. निव्वळ खालच्या अधिकाऱ्यांवर अवलंबून राहिल्यामुळें रयतेचें नुकसान केलें. पाटाचा दर १०।१२

केला आहे; पण पाणी पुरेंसें आहे किंवा नाहीं पाहिलें नाहीं. हें आम्ही म्हणतों तसें नसल्यास त्यांनीं सिद्ध करावें नाहींतर ही बार्डोली होणार असा रंग दिसतो... .....गरीब रयतेचा दुवा संपादन करावा इतकीच विनंति. संस्थान करीत नसेल तर प्रजेनें ही अरेरावी चालूं देऊं नये. याउप्पर त्यांचें नशीब !!!"

वर उद्धृत केलेला 'एका रयता'च्या लेखांतील उतारा आम्हीं या ठिकाणीं मुद्दाम दिला आहे. खेडयांतील शेतकऱ्यांची मनःस्थिति कोणत्या प्रकारची झाली होती हें सहज त्यावरून कळून येण्यासारखें आहे.

आतां त्यांतल्यात्यांत विशेष अन्याय ज्या ज्या गांवांवर झाला आहे त्यांची माहिती या ठिकाणीं संक्षेपतः देत आहों—

१. **तानंग**—हें गांव मिरजेपासून मिरज–पंढरपूर रस्त्यावर सुमारें चार मैलांवर आहे. मोठ्या रस्त्यापासून पश्चिमेच्या बाजूस आंत मैल–दीडमैल जावें लागतें. गांवची लोकसंख्या ७७३ असून घरांची संख्या १७३ आहे असें समजतें. पूर्वी या गांवांत वीस–पंचवीस विहिरी चालू असल्यानें बागाईत बऱ्या प्रकारचें असे. अलीकडे ८–१० वर्षांत निम्म्या विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पानमळ्यांची संख्या अवघी दोन तीन आहे. अलीकडे शेती पिकत नसल्यानें शेतकरी कंगाल बनूं लागले आहेत! पुष्कळशी जमीन माळरान या सदराखालींच घालतां येण्यासारखी आहे. शेतीशिवाय दुसरा धंदा म्हणजे सोनारकामाचा आहे. सोनारांची संख्या अंदाजीं १५ आहे. येथें सोनारांकडून सोन्याच्या टिका करण्याचें काम होत असतें. दरसाल ३०–४० हजारांचा माल येथून तयार होऊन बाहेर जात असतो, असें कळतें. मुख्य रस्त्यापासून या गांवाकडे जो रस्ता जातो तो नेहमीं नादुरुस्त स्थितींत असतो. या एका गांवावर २,३११ रुपयांची वाढ करण्यांत आली आहे. ही वाढ शेंकडा ७८-३४ इतकी सरासरीनें येते.

या गांवाला कमीतकमी पन्नास हजार रुपये कर्ज आहे. साठ वर्षांत सारावाढ केली नाहीं म्हणून रिपोर्टांत तोंड भरून सारावाढीचें एक कारण नमूद केलें आहे. त्याचबरोबर या गांवाला सोनारी काम फार होतें, पानमळे पुष्कळ (!)आहेत, गांवची भरभराट बरीच झालेली आहे, इ० वर्णन करणाऱ्या पोटभरू नोकरांनीं गांवची रयत आर्थिक दृष्टीनें किती खालावली आहे, शिक्षणांत किती मागसली आहे, याचा कधीं विचार केला आहे काय? दरसाल या गांवांतून रु. २,६६१ वसूल केला जातो, त्यापैकीं या गांवांत किती वर्षांत सरकारनें किती पैसा खर्च केला

आहे ! केवळ एक देऊळ बांधण्याकरितां या गांवची रयत निदान निम्मे पैसे द्या म्हणत असतांना अधिकारी व अधिपति हिंदू असून त्याचा वर्षान्‌वर्ष विचार होत नाहीं ! श्रीमंतांनीं स्वतः एकवेळ या गांवीं जाऊन आपल्या रयतेची सर्व स्थिति निरीक्षण करावी म्हणजे आपले अधिकारी खरी स्थिति आपल्यापुढें न ठेवतां कशी फसवणूक करतात हें त्यांच्या लक्ष्यांत येईल.

२. शिरढोण—मिरजेपासून हें गांव सुमारें १७ मैल दूर आहे. रिव्हिजन सेटल्‌मेंटमध्यें या गांवचा आकार शेंकडा ७३·८ या प्रमाणांत वाढविण्यांत आला आहे. या गांवची लोकसंख्या ६८४ आहे व घरांची संख्या १४५ आहे. या गांवाला शेतकीशिवाय दुसरा धंदा नाहीं. पूर्वीं या गांवास ४०।४५ विहिरी चालू असत; परंतु हल्लीं १०।१५ च चालू आहेत असें म्हणतात. गांवाला २।३ पानमळे आहेत. जवळजवळ अर्ध्याअधिक विहिरी कोरड्या पडल्यानें पूर्वीच्या मानानें बागाईत फार कमी झालें आहे. हें एवढें भररस्त्यावरचें गांव; परंतु गांवाला शाळा नाहीं. बिचाऱ्या गांवच्या शेतकऱ्यांनीं खाजगी रीतीनें एक शिक्षक ठेवून कांहीं मुलांना शिक्षण देण्याची तजवीज मोठ्या कष्टानें केली आहे. गांवच्या लोकांनीं गांवाला शाळा सुरू करण्याबद्दल अर्जावर अर्ज व मामलेदारांच्या विनवण्या केल्या तरी दादच नाहीं !!

या गांवच्या रयतांस इतकी जबर सारावाढ झाल्याचें समजतांच अर्धेअधिक खातेदार मिरजेस वरिष्ठ अधिकारी व श्रीमंत सरकार बाळासाहेब यांस समक्ष भेटून, त्यांच्या पायांवर डोकें ठेवून आपल्या बाबतींत होत असलेला अन्याय दूर करा म्हणून विनवण्या करण्याकरतां गेले होते. रा० ब० ठाणेदार कारभारी-साहेब (त्यावेळीं त्यांच्या हातांतील अधिकार काढून घेतलेले नव्हते) यांनीं 'आपल्या गांवच्या पाटलामार्फत तुमच्या तक्रारी कळवा', असें जोरांत सांगून, आलेल्या मंडळींनीं हांकून लाविलें ! नंतर बिचाऱ्यांनीं श्रीमंत सरकारांची भेट घेण्याकरितां हिराबागेंत धांव घेतली. तेथें अगोदर पोलिसांच्या दंडुकेशाही-मुळें जवळपास जाण्यास सुद्धां पंचाईत पडूं लागली ! अखेर एकदां गेलेल्या मंडळींपैकीं ३।४ मंडळींची भेट श्रीमंत मोटारमधून जातां जातां झाली. खेडे-गांवचीं माणसें दारिद्र्यानें गांजलेलीं, शिक्षण कांहीं नाहीं, भीतीनें गांगरून गेलेलीं, तशांत ती पोलिसांची हडेलहप्पी, मोटारची धांवपळ, श्रीमंतांचा रागीट स्वभाव, यांमुळें त्यांना काय करावें हें सुचेना. अखेर ३।४ मंडळी धीट होऊन

थोडी पुढें झाली व श्रीमंतांना साष्टांग नमस्कार घालून म्हणाली, " महाराज, आमच्या गांवावर सारा फार वाढलेला आहे, आमच्यांत अगदीं त्राण नाहीं, आमच्यावर दया करा व सारा कमी करा." इ०. महाराज म्हणाले, " बाबानों, मीं जें केलें आहे तें बरोबर केलें आहे." इतकें म्हटल्यानंतर महाराज व मोटार दिसेनाशीच झाली ! बिचाऱ्यांच्या—दोन दिवस शिऱ्या भाकरी खाऊन कारभारीसाहेबांना व सरकारना भेटून—पदरांत कांहींच पडलें नाहीं ! हें पाहून निराशायुक्त अंतःकरणानें परत यावें लागलें.

३. बोलवाड—रिव्हिजन सेटल्मेंटमध्यें या गांवचा आकार शेंकडा ७७·८ या प्रमाणांत वाढविण्यांत आला आहे. अन्यायाच्या बाबतींत तानंग गांवचा पहिला नंबर तर बोलवाड गांवचा दुसरा नंबर लागला आहे. हें गांव मिरजेपासून सुमारें २।२॥ मैल आहे. गांवचीं लोकसंख्या ५१६ असून घरांची संख्या ८८ आहे. या गांवचा एकच एक धंदा म्हणजे शेतकीचा आहे. पूर्वीं या भागांत १०।१२ विहिरी चालू असल्यानें पानमळे व बागाईत अधिक असे. परंतु अलीकडे ४।५ विहिरीच चालू राहिल्यानें व बाकीच्या कोरड्या पडल्यानें पानमळे व बागाईत फारच कमी झालें आहे. हल्लीं पानमऱ्यांची संख्या ४।५ आहे, असें कळतें. गांवचा रस्ता नादुरुस्त आहे. गांवच्या लोकांनीं तालीम बांधविण्याकरितां सरकारकडे जागा मागितली; परंतु ती देण्यांत येत नाहीं ! या गांवास अंदाजी २५,००० रुपये कर्ज आहे. गेल्या सालींच बार्शी लाईट रेल्वे कंपनीनें मिरज-पंढरपूर रस्ता सुरू केला आहे व त्यांत बोलवाड गांवास स्टेशन झालें आहे.

या गांवीं वाढ करते वेळीं लं. रे. सु. मि० मोडक यांनीं कित्येक गोष्टी नमूद कल्या आहेत त्यांत, 'या गांवाला स्टेशन झालें आहे, तेथें पानमळे पुष्कळ (!) आहेत, मिरजेला हें गांव जवळ आहे' इ० मुद्दे प्रामुख्यानें पुढें मांडले आहेत. त्याच वेळीं गांवांत पूर्वीं घरें कोणत्या स्थितींत होतीं व आज कोणत्या स्थितींत आहेत; पूर्वीं त्या गांवांत पैसा किती होता व आज कर्ज किती आहे, पूर्वीच्या कारकीर्दीत गांवांत कोणकोणत्या सोयी होत्या व आज गैरसोयी किती वाढल्या आहेत, पूर्वीं पानमळे किती होते व आज किती आहेत, इ० माहिती न मिळवितां रिपोर्ट रंगविण्यास व त्याच्या आधारावर आकाराची बेसुमार वाढ वाढाविण्यास शिफारस करणें न्याय व नीतीला खास सोडून आहे. बाहेरच्या अधिकाऱ्यांनीं वाटेल ती जरी वाढ सुचविली तरी ज्या अधिकाऱ्यांना पुढें हें काम करावयाचें आहे

त्यांनीं आपल्या रयतेची वस्तुस्थिति व रिपोर्टींतील विसंगतपणा श्रीमंतांच्या नजरेसमोर आणण्याचें कर्तव्य करावयास नको होतें काय ?

४. **मालगांव**—या गांवची लोकसंख्या ५,१२२असून घरांची संख्या १,१४४ आहे. हें गांव मिरजेपासून ५ मैल दूर आहे. कित्येक वर्षांनंतर या गांवचा रस्ता सुधारण्याकडे अधिकाऱ्यांचें लक्ष गेलें आहे. रिव्हिजन सेटल्मेंटमध्यें या गांवाच्य आकारामध्यें शेंकडा ६३·३ इतकी वाढ झाली आहे. या गांवाला म्युनिसिपालिटी आहे. सुमारें १० वर्षांपूर्वी या म्युनिसिपालिटीचें उत्पन्न ७०० रुपयांच्या आंतबाहेर होतें तितकेंच आजही आहे. दवाखान्याकरितां दरसाल १०० रुपये बाजूला काढून ठेवून रकमेच्या व्याजांतून दवाखाना चालेल इतकी रक्कम वाढली म्हणजे नंतर दवाखाना सुरू करण्यांत येणार आहे असें म्हणतात.

लँड रे. सु. मि० मोडक यांनीं कोणत्या चष्म्यांतून पाहिलें कोणास ठाऊक ! १७२ एकर 'पाटस्थळ' त्यांनीं दाखविलें आहे. पाटाचें पाणी ज्या वेळीं १०–५ वर्षें मिळालें त्या वेळीं सुद्धां ५० एकराला तें मिळत असेल नसेल ! आतां पाटाचें पाणी जाऊन १०–२० वर्षें झालीं ! व इकडे पूर्वीच्या चौपट जमीन पाटस्थळ म्हणून नमूद झाली ! याला अन्याय म्हणावें कीं वेवंदशाहो म्हणावें ! या गांवांत रयतांची अलीकडे १०–१२ वर्षें अशी तक्रार आहे कीं, 'आमच्या गांवाला पाटाचें पाणी मुळींच नाहीं; परंतु पाटाचा आकार मात्र घेतला जातो तो कमी व्हावा'. या तक्रारीचा विचार तर बाजूलाच राहिला; पण पूर्वीपेक्षां अधिक जमीन पाटस्थळ दाखवून पूर्वीपेक्षां दर सुद्धां वाढवून ठेविला !

या गांवाला दहा–बारा वर्षांपूर्वी शें-दीडशें पानमळे होते व त्या मानानें अडीचशें–तीनशें विहिरीही चालू होत्या; परंतु त्यांपैकीं सुमारें दोनशें विहिरी कोरड्या पडल्या आहेत ! हल्लीं वीस–पंचवीस पानमळे हयातींत आहेत. या गांवाला अंदाजी अडीच-तीन लाख रुपये कर्ज आहे असें कळतें ! सोमवार, ता. २३ जुलै रोजीं सुमारें चार-पांचशें रयतांनीं मिरजेस जाऊन समक्ष श्रीमंत सरकार बाळासाहेब व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या भेटी घेतल्या. " सव्हें रिपोर्ट इंग्रजींत आहे तो मराठींत करतों, तो तुम्ही पहा व नंतर न्यायान्यायाचा विचार करूं. मी अगर श्रीमंत तात्यासाहेब तुमच्या गांवीं जरूर तर येऊं, तुम्हांला भेटूं, तुमचें म्हणणें ऐकून घेऊन नंतर काय तें ठरवूं." अशा अर्थाचें भाषण करून श्रीमंतांनीं लोकांच्या तोंडाला पानें पुसलीं !

५. वड्डी—हें गांव मिरजेपासून दोन मैल दूर आहे. या गांवाची लोकसंख्या ४३७ असून घरांची संख्या सुमारें ७९ आहे. या गांवाला रिव्हिजन सर्व्हेप्रमाणें शेंकडा ६२·६ इतकी वाढ झाली आहे. गांवाला जाण्याचा रस्ता अत्यंत नादुरुस्त आहे. या गांवास पूर्वी पंधरा-वीस विहिरी चालू असत; परंतु अलीकडे त्यांपैकीं आठ-दहा विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पानमळे दोन-तीनच आहेत. या गांवाला कर्ज कमींत कमी पंचवीस-तीस हजार रुपये असल्याचें समजतें.

६. ढवळी—मिरजेपासून चार-पांच मैलांवर श्रीकृष्णानदीच्या कांठीं हें गांव आहे. या गांवाची लोकसंख्या ८६८ असून घरांची संख्या अंदाजी १८४ आहे. या गांवाला रिव्हिजन सर्व्हेप्रमाणें शेंकडा ६३·०७ इतकी वाढ झाली आहे! या गांवाला जाण्यास सरळ रस्ताच नाहीं! पावसाळ्यांत तर गांवच्या लोकांचे फार हाल होतात. या गांवाला कमींत कमी तीस-चाळीस हजार रुपये कर्ज आहे. जमिनीचे कित्येक नंबर प्रतिवर्षी नदीच्या पाण्यानें खरवडून जात असतांही त्यांच्यावर भर आकार बसविला आहे.

७. बामणी—या गांवची लोकसंख्या ९२ व घरांची संख्या अवघी १७ आहे. हें गांव मिरजेपासून २-२॥ मैल दूर आहे. गांवाला जाण्याचा रस्ता यथायथाच आहे. शाळेचें नांव घेण्याचें कारणच नाहीं! शेतीशिवाय गांवाला दुसरा धंदा नाहीं. या गांवाला रि. सेटल्मेंटमध्यें वाढ मात्र शेंकडा ६३·६१ इतक्या प्रमाणांत झाली आहे. कर्जाच्या आंकड्याचा अंदाज नक्की लागला नसला तरी २१ हजारांच्या आंतबाहेर आहे.

८. रायेवाडी—रि. सेटल्मेंटमध्यें या गांवाचा आकार शेंकडा ६९·२५ या प्रमाणांत वाढविण्यांत आला आहे. हें गांव ढालगांव कर्यातींत आहे. या गांवाची लोकसंख्या २३८ असून घरांची संख्या अंदाजी ६३ आहे. या गांवालाही शेतीशिवाय अन्य धंदा नाहीं. इतर गांवांप्रमाणें या गांवचें बागाईतही दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. या गांवाला बैलगाडीनें मोठ्या कष्टानें जातां येतें. गांवाला शाळा नाहींच. सर्व्हेचें काम करणाऱ्या लोकांनीं यांत कितपत डोळसपणानें केलें आहे याचा हें गांव म्हणजे एक पुरावाच आहे. या गांवाला कर्ज सुमारें १०-१५ हजार रुपये आहे.

असो. अशा प्रकारें सर्व खेड्यांची माहिती देत गेल्यास ग्रंथविस्तार प्रमाणाबाहेर वाढण्याचा संभव आहे, म्हणून लेखणी थोडी आंवरती घेतों. सांवळी

पाठगांव, कवठेंपिराण, ढालगांव कर्यातींतील कित्येक गांवें यांच्यावरील अन्याय अशाच प्रकारें येथें पुराव्यानिशीं मांडतां येण्यासारखा आहे एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे.

व्यक्तिशः तरम (Individual assessment) रयतांना समजल्यानंतर त्यांतील जे अन्याय उजेडांत आले आहेत त्यांचें दिग्दर्शन या ठिकाणीं केल्यास ते अस्थानीं होणार नाहीं. जमिनीची प्रत मन मानेल त्याप्रमाणें लाविली आहे, गांवचे गट करतांना विवेक राखलेला नाहीं, मोजणीमध्यें ताळतंत्र राहिलेलें नाहीं, जमिनीचा केवळ खड्डा दिसला कीं, विहिरीचा आकार बसविला आहे, पाणी नसलेल्या विहिरीमध्यें भरपूर पाणी दाखविलें आहे, ठरलेल्या दरापेक्षां बागाईत व जिराइतचा आकार अधिक बसविलेला आहे, दोन रि० सर्व्हेच्या मध्यकालांत आपल्या खर्चानें रयतांनीं केलेल्या सुधारणांवर आकार बसवून लँड रे. कोडाला झुगारून दिलें आहे, एकदम सारा किती वाढवावा याचा विचार केलेला नाहीं, जमिनीचें क्षेत्र कमी अथवा अधिक दर्शाविलें आहे, भाऊबंदांच्या वांटण्या वाटेल तशा करून ठेवून पोटहिस्सेदारांमध्यें तंटे लावून कोर्टाचें उत्पन्न वाढण्यास साधन करून ठेविलें आहे. वहिवाटदार, खातेदार किंवा मालक म्हणून जमिनीस भलत्याच्याच नांवावर ढकललें आहे. इनामी व रयतावा जमिनींचा गोंधळ केला आहे, वाढावा नीरस जमिनींत काढावयाचा तो सरस जमिनींत काढल्याचींही उदाहरणें आहेत. आणि सर्वांत मौजेची गोष्ट अशी कीं, एका रयताची जमीनच तरम-पत्रकांत नमूद नव्हती म्हणून तो रयत आपली जमीन जाग्यावर आहे कां कोठें नाहींशी झाली हें पहाण्यास शेतांत गेला होता असें कळतें ! कोळसा उगाळावा तितका तो काळाच निघणार ! तसेंच या अन्यायाचे पापुद्रे उकलावेत तितके निघतच जाणार ! ! वरील दंतकथा जरी केवळ दंतकथा असली तरी असल्या दंतकथा लोकांमध्यें उत्पन्न होऊन त्या रयतांना खऱ्या वाटावयास लागण्याची परिस्थिति निर्माण होण्यास अन्यायाचें तसेंच भलतें पीक माजून लोक त्रस्त व्हावे लागतात. तशी स्थिति मिरज तालुक्यांत उत्पन्न झाली होती इतकें अनुमान त्या दंतकथेपासून काढण्यास मुळींच हरकत नाहीं.

मिरज संस्थानांतील रयत अज्ञान असून त्यांच्यामध्यें सार्वजनिक चळवळी विशेष कधीं झालेल्या नसल्यामुळे, हा सारावाढीचा अन्याय आपल्याला सहज पचवितां येईल असें अधिकाऱ्यांना वाटले असल्यास त्यांत नवल नाहीं; पण देशांतील काल पालटत चालला आहे याचें भान त्यांना राहिलें नाहीं एवढें खरें !

प्रकरण दुसरें

रयतांमधील जागृति

इतका भयंकर धडधडीत अन्याय व एक प्रकारची लूट होण्याचा प्रसंग आल्यावर रयत कितीही अशिक्षित व अज्ञानी असले तरी ते स्वस्थ कसे बसतील ? त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची कल्पना त्यांना पूर्णपणें आणून देणाऱ्या पुढाऱ्यांची व कार्यकर्त्यांचीच उणीव होती. चळवळीकरिनां चळवळ करणारे लोक मिळण्याइतकें सार्वजनिक जीवन या मिरज संस्थानांत अद्याप उत्पन्न झालेलें नाहीं. दरबारकडून जे जाहीरनामे छापविले जात होते, ते सर्व वेळेवर गांवोगांव पाठविण्याची काळजी अधिकाऱ्यांनीं घेतली नाहीं. त्याचप्रमाणें प्रसिद्ध होणाऱ्या जाहीरनाम्यांकडे लक्ष देण्याची कार्यकर्त्यांनीं किंवा प्रजासेवकांनीं इतकीशी चिंता वाहिली नाहीं. कारण या संस्थानांत इतका अन्याय केला जाईल ही कल्पना कोणासच नव्हती. जगामध्ये लोकांच्या डोक्यामध्यें जोंपर्यंत धर्माची कल्पना दृढ आहे तोंपर्यंत अनेक साधु-संत, अनेक ढोंगी आपलीं पोटें आनंदानें भरून घेत राहणार, नव्हे त्यांची चंगळ चालत राहाणार हा रोजचा सर्वांचा अनुभव आहे ! ही परिस्थिति एकदम बदलणें शक्य नाहीं व त्याबद्दल कोणास दोषही देण्यांत अर्थ नाहीं. तो काळाचा महिमा आहे. मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या चिटणिसांनीं आपल्या कार्याचा अहवाल जो सादर केला आहे, त्यांत ते म्हणतात कीं, " संस्थानांत रिव्हिजन सर्व्हेचें काम सुरू झालें; तथापि सुरवातीपासून अखेरपर्यंत ह्या कामांत आम्हांस पडावें लागेल ही कल्पनाच नसल्यामुळें आमचें या मुद्द्याकडे दुर्लक्ष होतें. श्रीमंतांनीं रि० सर्व्हेचें काम सुरू केलें तरी आपल्या अनेकवार दिलेल्या आश्वासनांस स्मरून ते सारावाढ आपल्या हयातींत करणार नाहींत अशी समजूत हें दुर्लक्ष असण्यास एक कारण होतें. दुसरें, जरी कदाचित् सारावाढ केली तरी ती फार माफक प्रमाणांत करतील ही खात्री. यामुळें या कामाकडे जावें किंवा द्यावे तितकें लक्ष दिलें गेलें नाहीं ! " नाहीं म्हणावयास मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनांत एक ठराव मात्र पास करविला होता. ठराव नंबर ११ मध्यें

परिषदेनें अशी मागणी मागितली होती कीं, "हल्लीं मिरज संस्थानची रि० सर्व्हे चालू आहे. त्यामुळें जमीनधाऱ्याचा बोजा वाढण्याचा संभव आहे. परंतु सध्यांच्या खालावलेल्या परिस्थितींत ही नवीन वाढ होऊं नये अशी मिरज संस्थानांतील अखिल प्रजाजनांची मागणी आहे. तिचा अव्हेर श्रीमंतांनीं करूं नये व ही वाढ न करण्याचें अभिवचन श्रीमंतांनीं वेळोवेळीं दिलें आहे तें खरें करून दाखवावें अशी या परिषदेची विनंति आहे." या ठरावावरूनही हेंच दिसून येतें कीं, संस्थानाधिपति सारावाढ करणार नाहींत व परिषदेच्या विनंतीला मान देतील असेंच त्यावेळीं लोकांना वाटत होतें. खुद्द राजधानींत राहणाऱ्या लोकांच्या डोळ्यांमध्येंही अशा प्रकारें धूळ उडालेली होती एवढेंच नव्हे तर बाहेरचे कांहीं चांगले चांगले लोकही मिरजेच्या श्रीमंतांविषयीं अशाच प्रकारचा विश्वास मानून होते. श्री० पुंडलिकजी यांना पाठविलेल्या पत्रांत एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें लिहिलें होतें कीं, "मिरजकर हे ब्रिटिश नोकरशाहीप्रमाणें कठोर असतील असें वाटत नाहीं. ते सदाचारी आहेत. आजपर्यंत त्यांनीं साऱ्यांत वाढ केली नाहीं. प्रजेला पिळून पैसा उकळावा व चैन करावी अशी त्यांची वृत्ति दिसत नाहीं. ते परमेश्वरावर श्रद्धा ठेवणारे आहेत. दुराग्रह असेल पण तो आहे किंवा नाहीं याची खात्री प्रथम झाली पाहिजे." बाहेरच्या किंवा दूरच्या प्रांतांत राहणाऱ्यांची अशी कल्पना असणें अगदीं साहाजिक आहे आणि आमच्या प्रभूविषयीं अखिल महाराष्ट्रभर असलेली ही सद्भावना त्यांच्या वृद्धापकाळीं खोटी ठरली किंवा नामशेष झाली याचें आम्हांस अत्यंत दुःख होत आहे. हें नुकसान केवळ श्रीमंतांचें नसून अखिल संस्थानचें आहे, असेंच आम्हांस वाटतें. पण ग्रहच तसे विपरीत आल्यावर कोण काय करणार ! असो.

बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांची कल्पना देखील अशीच प्रथम होती ! आणि ती त्यांनीं आपल्या सारावाढीवरील लेखमालेच्या सुरवातीसच व्यक्त केलेली आहे. ते म्हणतात कीं, "श्रीमंत बाळासाहेबसरकार मिरज यांच्या कारकीर्दीत तरी मिरज संस्थानांतील रयतेवर जमिनीचा सारा वाढण्याची आपत्ति कोसळेल अशी कोणासही कल्पना नव्हती. श्रीमंतांना खालसा मुलुखाप्रमाणें आपली रयत कराच्या बोजाखालीं पिळून निघावी हें प्रारंभापासूनच मान्य नसल्याचें कर्णोपकर्णीं ऐकण्यांत येत असे.....अशा स्थितींत श्रीमंतांच्या मनानें जमिनीचा सारा वाढविण्याचें घेतलें कसें यांचेंच आश्चर्य वाटतें !"

पण हें 'आश्चर्य' प्रत्यक्ष सारावाढीचा बडगा पाठींत बसून 'भला मारिला तोबा कंबर मोडली' असें म्हणण्याची पाळी आल्यावर कसें शिल्लक राहील ? महाराष्ट्रांतील आणि त्याचप्रमाणें संस्थानांतील सर्वांचेंच 'आश्चर्य' नष्ट झालें. हें संस्थान चांगलें व तें वाईट असें म्हणण्याचा सुप्रसंग आतां पुन्हा येणार नाहीं अशी भीति सर्वांनाच वाटूं लागली. पुण्याच्या 'संग्राम' पत्रानें तर " संस्थानिक ही एक निराळी जातच आहे " असें स्पष्टपणें लिहिलें होतें. संस्थानांतील रयत आस्ते आस्ते जागृत होऊं लागली. प्रजासेवक या सारावाढीकडे लक्ष देऊन त्याकरितां खेडोपाडीं हिंडूं लागले. सारावाढीची माहिती लोकांना जसजशी होत गेली तसतसे लोक खडबडून जागे झाले. बाळकृष्ण विठ्ठल शिखरे व डॉ० नारायण विष्णु जोशी यांनीं जिवापाड मेहनत घेऊन चार दिवसांत पंधरा गांवांमधून दौरा काढून लोकांमध्यें नवजीवन उत्पन्न करण्याची खटपट चालविली. मिरज संस्थान प्रजापरिषदेमार्फत एक तक्रारी अर्ज तयार करविला व तो अर्ज खेडोपाडीं लोकांना समजावून सांगून त्यावर शेतकऱ्यांच्या सह्या घेतल्या. शेतकऱ्यांची सही एखाद्या कागदावर घेणें किती प्रयासाचें असतें याची जाणीव तें काम करण्याचा ज्यांना अनुभव असेल त्यांनाच यथार्थपणें होऊं शकेल. एकंदर २९ गांवांपैकीं २३ गांवच्या सह्या झाल्या व अशा सह्यांची संख्या जवळ जवळ १८०० इतकी भरली. अर्जांतील मजकूर रयतांना वाचून व समजावून देऊन त्यांना पटवून दिल्याशिवाय त्यांनीं रयताची सही करून घेतलेली नाहीं, ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे. तो अर्ज तयार करण्यामध्यें ज्या ज्या लोकांच्या परिश्रमाचा व ज्ञानाचा फायदा घेतला गेला आहे त्यांना विसरणे म्हणजे आपल्या स्वतःच्याच आत्म्याला विसरण्यासारखें आहे. त्या मंडळींनीं या अर्जाचा मसुदा करण्याशिवाय इतर अनेक प्रकारची मदत केलेली असल्यामुळें त्यांच्या नामनिर्देशाचा उल्लेख पुढें करूं. तो अर्ज असा आहे:—

श्रीमंत राजश्री सर गंगाधरराव बाळासाहेब महाराज
सरकार मिरज, यांचे सेवेशीं.

आमच्या ह्या तक्रार अर्जाचा सत्वर विचार व्हावा अशी श्रीमंतांच्या चरणीं आमची प्रार्थना आहे.

मौजे ———— ता. मिरज येथील रयत लोकांच्या रिव्हिजन सर्व्हे सेटलमेंट करण्याबाबत तक्रारी आहेत त्या:—

१. श्रीमंत सरकार बाळासाहेब महाराज यांनीं उदार अतःकरणान आपण आपल्या संस्थानांत रिव्हिजन सर्व्हे केली नाहीं व पुढेंही करण्याची नाहीं अशी वेळोवेळीं प्रसंगोपात्त आश्वासनें आम्हां प्रजेस दिलेलीं आहेत व त्यामुळें रयतेस नापिकाचे सालीं सूट देण्यास आपण तयार नाहीं व रयतेनेंही मागूं नये असें स्पष्ट शब्दानें कळविलें आहे. सबब रिव्हिजन सर्व्हे सेटलमेंट लागू करणें वाजवी होणार नाहीं.

२. केवळ, हल्लीं प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याच्या दृष्टीनें विचार केला तरी, हल्लींचा जाहीरनामा देऊन सारावाढ करण्याबद्दल सुपरिंटेंडंट ऑफ लँड रेकार्डस् यांनीं जी शिफारस केली आहे त्याप्रमाणें सारावाढ करण्यापूर्वी 'क्लासिंग' काम सुरू करतेवेळीं व जमिनीच्या किंमती ठरविण्यापूर्वी रयतेस आपलें म्हणणें कळविण्यास तीन महिने मुदतीचा जाहीरनामा द्यावा लागतो. (पाहा- लँ. रे. कोड–अपेंडिक्स्) तसा दिला नाहीं असें समजतें. सबब पुढील सर्व काम रद्दबातल होण्यास पात्र झालें आहे.

३. सुपरिंटेंडंट ऑफ लँड रेकॉर्डस् यांस जी माहिती पुरविण्यांत आलेली दिसते ती एकतर्फी असून वस्तुस्थितीस सोडून आहे. त्यामुळें कमाल दर व ग्रूप ठरविण्यांत आले आहेत ते चुकीचे आहेत.

४. रिव्हिजन सर्व्हे सेटल्मेंट करतेसमयीं वाटेल तितकी सारा वाढ करण्याची प्रवृत्ति नसावी म्हणून वरिष्ठ सरकारांनीं मर्यादा घालून दिल्या आहेत. त्यांवरून पाहिले असतां सबंध तालुक्याची किंवा ग्रूपांतील गांवची वाढ जास्तींत-जास्त शेंकडा ३३ टक्क्यांपेक्षां जास्त करण्याची नाहीं असा स्पष्ट ठराव लँड रेव्हेन्यू कोड कलम (G. R. नंबर $\frac{५३३२}{२९-१०-७४}$ व $\frac{२६१९}{२६-३-८४}$) यांत आहे. जाहीरनाम्यालगतच्या पत्रकावरून वाढीचें प्रमाण पाहिलें तर ५६४ आहे. व नंबर १ व २ ग्रूपचें प्रमाण पाहिलें तर तें ५९·१ व ५८·७ आहे. यावरून किती जबर सारावाढ आहे व ती कायद्याप्रमाणें कशी चुकीची आहे हें समजून येणार आहे. सबब दुरुस्त होणें जरूर आहे.

५. सदरच्या ठरावांतच एखाद्या गांवास विशेष परिस्थितीमुळें सारावाढ जास्तींतजास्त आगाऊ सरकारची परवानगी घेऊन शेंकडा ६६ पर्यंत वाढ करण्याची सवड ठेविली आहे. परंतु तानंग, बोलवाड व सिरढोण या गांवांची वाढ

अनुक्रमें ७८.३४, ७७.८ व ७३.०८ इतकी करण्यांत आली आहे. ही वाढही कायद्यास सोडून आहे व असें करणें चुकीचें आहे. यांत रयतेवर जुलूम होणार आहे. सबब ती कमी करणें जरूर आहे.

६. मे० सुपरिंटेंडंटसाहेब यांनीं सारावाढीसंबंधानें जीं कारणें जमेस धरलीं तीं अगदीं लंगडीं व असमर्थनीय आहेत. या कामीं जरूर तितकी चौकशी केलेली दिसत नाहीं व तशी संधि रयतेसही दिलेली नाहीं. सबब सुचविलेली वाढ करणें चुकीचें होईल.

७. हल्लीं जो सारा वाढविण्यांत येणार आहे तो फारच जबर असून रयतेस असह्य होणार याची पूर्ण जाणीव सुपरिंटेंडंटसाहेब यांस होती, म्हणून त्यांनीं एकदम तरम लागू करूं नये व सेटल्मेंटची मुदत ३० वर्षांची असावी अशी शिफारस केलेली मान्य करण्यांत आलेली नाहीं. तरी हल्लींची सारावाढ भयंकर आहे हें उघड होत आहे; सबब ती बदलणें जरूर आहे. अशी खात्री होणार आहे.

८. कायद्याप्रमाणें सन्हें सेटल्मेंट लागू करण्यांत येईल त्या सालीं फाळेची वाढ होत नसून पुढील सालीं त्या वाढीचा अंमल होण्याचा असतो. परंतु १३३७ फसली साल संपत आलें व तरम या सालीं लागू करतां येत नाहीं म्हणून जुलै अखेरपर्यंत रोव्हिन्यूसाल एवढ्यासाठीं दोन महिन्यांनीं वाढविलें आहे, हें करणें कोणत्याही प्रकारें वाजवी होणार नाहीं. मुद्दाम जाणूनबुजून रयतेचा फायदा हरण केला असें होणार आहे. सबब तसें साल बदलूं नये व बदललें तरी तरम लागू करूं नये असें म्हणणें आहे.

९. मिरज संस्थानचें दप्तर सर्व मराठी, व रयतही अडाणी–, अक्षरशत्रु; इंग्रजी भाषेचें ज्ञान असणारे लोक फारच कमी ! अशा स्थितींत सुपरिंटेंडंटसाहेबांचा रिपोर्ट इंग्रजींत आहे, त्याचा तर्जुमा मराठींत केलेला नाहीं तेव्हां सर्व साधारण शेतकरी लोकांस त्याचा मुळींच उपयोग होणार नाहीं, इकडे लक्षच गेलेलें दिसत नाहीं. पुष्कळ लोकांस यांत काय आहे तें समजलें नाहीं यामुळें सर्व लोकांकडून तक्रारी आलेल्या नाहींत. त्यासाठीं सर्व लोकांस रिपोर्ट समजण्यासाठीं तो मराठी भाषेंत तयार करून अवलोकनास तालुक्यांत ठेवणेंत यावा व तशी प्रसिद्धि करून तेथून पुढें तक्रारी कळविणेची मुदत नेमून मग या कामाचा विचार व्हावा.

१०. लँड रे० कोडांतील कलम १०७ वर सरकारी ठराव नं. $\frac{७४४७}{२१-१०-८६}$ चा झालेला आहे. त्यांत रयतेस सेटल्मेंट लागू करण्यापूर्वी त्यांचें म्हणणें पूर्वी ऐकून

घेऊन नंतर तें कायम करणें, सदसद्विचार व न्याय या दृष्टीनें अगदीं जरूर आहे व त्यासाठीं दोन महिने मुदत देणें वाजवी आहे असें ठरविलें आहे. परंतु हल्लींचा जाहीरनामा पाहिला तर एकच महिन्याची मुदत त्यांत दिली आहे हें कायद्यास धरून नाहीं. व रयतेचें म्हणणें समजून घेण्यांत व त्यांस सवलत दाखविणेंत कांहीं गैर नसतां हल्लीं कमी मुदत कां दिली आहे तें समजत नाहीं; परंतु तसें करणें बरोबर नाहीं सबब मुदत वाढवून रयतेचें म्हणणें ऐकून घेऊन मग तरम ठराव व्हावा.

११. लगतच्या खालसा मुलुखांतील जमिनीचा तरम आकार आज तारखेचा जरी पाहिला तरी तो मिरज तालुक्यांतील रिव्हिजन सर्व्हेच्या आकारापेक्षां फारच कमी असल्याचे दाखवून देतां येण्यासारखें आहे. यामुळेंही ही सारावाढ भयंकर व असह्य असल्याचें आढळून येणार आहे.

वरील सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन सारावाढ करण्याच्या बाबतींत सरकारतर्फे व रयतेतर्फे म्हणणें समजून घेण्यासाठीं अधिकारी व बिन अधिकारी रयतेचे प्रतिनिधी घेऊन त्यांची चौकशी कमिटी नेमावी व त्या कमिटीनें उघड चौकशी करून रिपोर्ट करावा आणि त्याप्रमाणें सारा वाढविण्यांत यावा व असें होणें न्याय, सदसद्विचार व उपयुक्तता या दृष्टीनें जरूर आहे.

आमच्या वरील तक्रारी कायदेशीर आहेत. त्या तशा नाहींत असें घटकाभर मानलें तरी आपल्या रयतेची वास्तविक स्थिति लक्षांत घेऊन श्रीमंतांनीं थोर अंतःकरणानें रिव्हिजन सर्व्हे न करण्याचें जें वचन दिलें आहे तीही गोष्ट लक्षांत घेऊन प्रजेचें म्हणणें योग्य प्रकारें पुढें मांडविण्याची संधि देण्यासाठीं मराटी भाषेंत सुपरिंटेंडंटसाहेब यांचा रिपोर्ट अवलोकनार्थ ठेवून त्याप्रमाणें प्रसिद्धि करून या कामाचा निकाल कलम ११ यांत सुचविल्याप्रमाणें करणेंत यावा अशी जामची नम्र विनंति आहे.

मिरज,
ता. जून सन १९२८.

१. तक्रारी प्रत गांवकामगार पाटील यांजकडे.
२. तक्रारी प्रत मे० रा० व० कलेक्टर व कारभारी, सं. मिरज.
३. तक्रारी प्रत श्रीमंत सरकार सर बाळासाहेब महाराज सं. मिरज यांचे सेवेसीं.

श्रीमंत युवराज तात्यासाहेब महाराज यांचे मार्फत.
आपले रयत.

ह्या अर्जाचा कांहींही फारसा उपयोग होणार नाहीं ही गोष्ट प्रजासेवकांना समजून चुकलेली होती. कारण आतां, रयतांबरोबर तेही पूर्णपणें जागृत झालेले होते. ह्या अर्जावर सह्या घेतांना परिस्थितीचें ज्ञान रयतांना करून देण्याची सुसंधि लाभणार आहे इतकीच खूणगांठ पुढाऱ्यांनीं आपल्या मनाशीं बांधलेली होती व त्या दृष्टीनें उपयोग झालाही. तथापि चळवळीचे पुढारी अथवा प्रजासेवक स्वस्थ बसले नाहींत. सभांच्या द्वारां लोकमत व्यक्त करीत राहणें व त्यायोगें लोकांमध्यें जागृति करणे आणि झालेली कायम राखणें हेंही एक यापुढील काम असतें. लोकांना निर्वाणीचें शस्त्र हातीं घ्यावयास लावण्याचा उत्तम मार्ग म्हणजे इतर खालचे सर्व मार्ग निरुपयोगी आहेत असें त्यांना पटून ते निराश झाले पाहिजेत. आणि अशा मार्गामध्यें त्यांना यश आले व त्यांची दांद लागून अन्याय दूर झाले तर तें 'अयं विशेषः'च म्हणावयाचें! अर्जाला केराची टोपली मिळते अशी खात्री झाल्यावर सभा भरविण्याच्या नादाला लोक व लोकपुढारी लागले यांत नवल नाहीं; परंतु अधिकारी एखाद्या गोंधळ्याप्रमाणें गोंधळून अदूरदर्शी बनल्यामुळें सभा भरविण्यास बंदी करण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें! त्या बाबतींत 'संस्थानी स्वराज्य' (ता. २९ जून १९२८ च्या अंकांत) म्हणतें कीं, "ता. २२ जून रोजीं मिरज तालुक्यांतील लोकांची एक जाहीर सभा मिरज येथें साराबाढीच्या प्रश्नाबद्दल लोकमत जाहीर करण्याकरितां भरविण्यांत यावयाची होती; परंतु ही सभा भरविण्याच्या बाबतींत मिरज संस्थानच्या डि० मॅजिस्ट्रेटनीं परवानगी न दिल्यामुळें सभेकरितां आलेल्या लोकांना निराश होऊन आपल्या गांवोगांव परत जावें लागलें. संस्थानांतून लोकांच्या तक्रारी कळविण्यासुद्धां कशी बंदी होते याचा हा एक नमुना आहे. सभेकरितां आलेल्या लोकांना निरर्थक पायपीट करावी लागली." अशा प्रकारें सभा भरविण्यास सरसहा बंदी करण्याचें धोरण अधिकाऱ्यांनीं स्वीकारलें ते अगदीं उघड आहे. सभा बंद केल्या म्हणजे लोकजागृति बंद झाली आणि लोक जागृतच होऊं दिले नाहींत तर आपले चाळे बिनधोक चालतील अशी त्यांची विचारपरंपरा असते. परंतु सभा चालूं दिल्यापेक्षां त्या बंद केल्यानें खळबळ अधिक होऊन 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' या न्यायानें चळवळ वायुवेगानें पुढें सरते व झपाट्यानें फुलूं लागते हें साधे तत्त्व विनाशकालामध्यें श्रीमंतांना किंवा अधिकाऱ्यांना कां सुचावें!

सभा भरविण्यास अडथळा, विरोध व बंदी होत आहे हें पाहतांच मिरज

संस्थान–प्रजापरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष दे० भ० बाबूरावजी गोखले–संपादक मराठा यांनीं श्रीमंतांस लोकप्रतिनिधींच्या शिष्टमंडळाची मुलाखत घेण्याबद्दल तारेनें विनंति केली. या ठिकाणीं हें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं कीं, या सारावाढीच्या अथपासून इतिपर्यंतच्या चळवळीचा आत्मा जर कोणी असेल तर तो दे० भ० बाबूराव गोखले हेच होत. त्यांचा पाठिंबा नसता तर मिरजेचे रयत एका अर्थीं उघडे पडले असते. अशा आणीबाणीच्या वेळीं परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें ते मिरज संस्थानास लाभले हें संस्थानचें भाग्य होय. श्रीमंत किंवा अधिकारी यांना त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा घेतां आला नाहीं तें रयतांचें व संस्थानचें दुर्दैव होय. सरकारचें धोरण एकदां ठरल्यानंतर परिषदेच्या अध्यक्षांच्या तारेसही काय उत्तर मिळणार हें कोणासही कळण्यासारखें आहे.

इतक्या अवधींत रयतांच्या मनाची इतकी तयारी झाली होती कीं, ते स्वतंत्रपणें वर्तमानपत्रांतून श्रीमंतांच्या कर्तव्याविषयीं चर्चा करूं लागले. ता. १३ जुलै सन १९२८ च्या 'संस्थानी स्वराज्यां'त 'एक रयत' या नांवानें एक मननीय लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत श्रीमंतांच्या कर्तव्याविषयीं तो रयत म्हणतो'—

"श्रीमंत बाळासाहेबांसारख्या पवित्र आचरणाच्या संस्थानिकानें 'मी केवळ माझ्या प्रजेच्या कल्याणाकरितांच वचनभंग करतों आहें' असें एकदां फार तर जाहीर करावें म्हणजे वचनभंगाची ही टोंचणी वारंवार मागें लागणार नाहीं.... ..... अशा स्थितींत आतां आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस श्रीमंतांनीं एकदम जबर सारावाढ करून आपण आपल्या तेजस्वी व निग्रही वर्तनानें मिळविलेली कीर्ति कमी करून घेणें उचित नाहीं."

चोहोंकडून इतकी निराश व बेदाद प्रत्यक्ष दिसत असली तरी आपल्या यशाचीं बीजे अशा निराशेंतच असतात अशी पक्की श्रद्धा बाळगून श्री० बाळकृष्ण विठ्ठल शिखरे व डॉ० नारायण विष्णु जोशी यांनीं पुन्हा ता. २० जुलै सन १९२८ रोजीं रयतांना उद्देशून एक विनंति केली व ती 'संस्थानी स्वराज्य' व इतर कांहीं पत्रांतून जाहीर केली. त्यांत ते म्हणतात:-"आपल्या अर्जाला अद्यापि उत्तर नाहीं! मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री० दा. वि. गोखले यांनीं शिष्टमंडळाची मुलाखत घेण्याबद्दल श्रीमंत सर बाळासाहेब व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांना पत्रद्वारां विनंति करून पंधरा दिवस

होऊन गेले तरी उत्तर नसल्याचें समजतें. कदाचित् दे० भ० गोखले हे पुन्हा एक-दोन स्मरणार्थ पत्रें पाठविण्याची तसदी घेतील असें वाटतें. रिव्हिजन सेटलमेंटच्या रिपोर्टांतील महत्त्वाच्या भागाबद्दल हल्लीं वर्तमानपत्रांत लेखमाला चालू आहे. सारावाढीचे जे अनेक आधार त्यांत रिपोर्ट हा एक मुख्य आधार आहे. तो रिपोर्टच जर कांहीं अंशीं चुकीचा, असा प्रमाणानें ठरेल तर जाहीर केलेली सारा-वाढ हीसुद्धां कायद्याला व न्यायाला सुटून असल्याचें आढळून येणार आहे.

"सारावाढ कायद्यानें चुकीची व न्यायाच्या दृष्टीनें अन्यायाची अशी जरी ठरली तरी तसें श्रीमंतांचे अधिकारी कबूल करतात कीं नाहीं व श्रीमंतांना तसें सांगतील कीं नाहीं याबद्दल थोडा संशय वाटतो. कायदा व न्यायान्यायाची घासा-घीस करून सरकारचें या बाबतींतील वर्तन चुकीचें ठरलें व तें त्यांनीं सुधारलें नाहीं तर काय करावयाचें हा आपल्यापुढें सोठा चिंताजनक प्रश्न आहे."

अर्ज व विनंत्या निष्फळ ठरल्या, सभांतून लोकमत जाहीर करण्यास सरांस बंदी होऊं लागली, अध्यक्षांच्या पत्रांना व तारांना वाटाण्याच्या अक्षता मिळूं लागल्या ! नंतर वर निर्देशिलेल्या विनंतींत शिखरे–जोशी एक नवीन उपाय असा सुचवितात कीं, "अशा स्थितींत आम्हाला आज आपल्याला सुचविण्यास एकच सरळ मार्ग दिसतो व तो हाच कीं, प्रत्येक गांवच्या लोकांनीं एकत्रपणें जमून श्रीमंतांच्या पुढें पदर पसरून, हात जोडून प्रार्थना करून पहावी..... याप्रमाणें श्रीमंतांना भेटण्याचें काम या महिनाअखेर पुरें करणें भाग आहे. दिनावधि करूं नका इतकीच आपणां सर्वांस आमची अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे." या त्यांच्या विनंतीला अनुसरून कांहीं गांवचे लोक श्रीमंतांना भेटण्यास गेले होते; परंतु "सर्व रिपोर्ट इंग्रजींत आहे तो मराठींत करतों व काय तो विचार पाहातों" अशा अर्थाचें उत्तर दिल्याचें आम्हांस कळून आलें आहे.

टाइम्स, क्रॉनिकल, मराठा, सर्व्हेंट ऑफ इंडिया, केसरी, संस्थानी स्वराज्य, ज्ञानप्रकाश, समर्थ, मौज, चिकित्सक, कर्मवीर, महाराष्ट्र, कर्मयोगी, विद्याविलास, बलवंत, वैनतेय, नवाकाळ वगैरे सर्व प्रकारच्या इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रांतून या सारावाढीच्या चळवळीची व रयतांच्या जागृतीचीं स्थित्यंतरें वारंवार प्रसिद्ध करण्याचें काम कार्यकारी-मंडळी अगदीं काळजीपूर्वक करीत आली आहे. परंतु जागृत झालेल्या रयतांचें तेवढ्यानें आतां समाधान होणें शक्य नव्हतें. कार्य-कर्त्यांची जनताजनार्दनावर श्रद्धा होती. रयत लोक एकत्रित जमतील व आपा-

असांत वाटाघाट करतील तर इतक्या परिस्थितींतूनही कांहीं मार्ग निघूं शकेल असें पुढाऱ्यांना वाटत होतें. त्या दृष्टीनें लोकांची प्रवृत्ति कोणत्या दिशेला झुकत आहे याचा अंदाज पुढाऱ्यांनीं घेतला. इतक्या अवधीमध्यें स्यतांना व पुढाऱ्यांना दोघांनाही आपली दाद श्रीमंतांपर्यंत लवकर लागणें कठिण आहे आणि अधिकाऱ्यांच्या कचाटींतून श्रीमंतांची सुटका होणें दुरापास्त आहे ही कल्पना पूर्णपणें झालेली होती. अशा वेळीं बाहेरचे विद्वान् व कर्ते पुढारी आणि आपले सर्व रयत, यांच्यामध्यें वाटाघाट होईल तर त्यापासून देखील झाला तर फायदाच होईल, असें वाटून पुढारी त्या मार्गाला लागले. मिरज संस्थान-प्रजापरिषदेचें चौथें अधिवेशन भरवून लोकमत व्यक्त करण्याची शेवटची पायरी गांठावी आणि नंतर ईश्वरावर भरंवसा ठेवून, होईल ती रयतांची सेवा करीत रहावें असें सर्वानुमतें ठरलें. इकडे अधिकारी व श्रीमंतद्वय यांना आपली रयत अन्यायाखालीं कशी चिरडली जात आहे व त्यांच्यामध्यें असंतोष आपण आपल्या कृतीनें कसा उत्पन्न करीत आहो याचें भान देखील नव्हतें किंवा ते मुद्दाम डोळ्यावर कातडें ओढून घेत होते हें एक ईश्वर जाणे !

मिरज संस्थान-प्रजापरिषदेच्या कहाणीकडे वळण्यापूर्वी आणखी एका मौजेच्या गोष्टीचा उल्लेख येथेंच करून नंतर पुढील इतिहासाकडे दृष्टि देऊं. रयतांच्या १८०० सह्यांनिशीं जो अर्ज श्रीमंतद्वय, कारभारी, गांवकामगार यांच्याकडे पाठविला होता त्याला उत्तर वास्तविक ताबडतोब मिळावयास पाहिजे होतें. त्या अर्जाचा विचार चालू आहे इतकेंतरी जाहीर व्हावयास पाहिजे होतें. मिरज संस्थानचा राज्यकारभार किती ढिला व पोरकट झाला आहे हें पहावयाचें असल्यास रयतांच्या अर्जाला जें उत्तर मिळालें आहे त्याकडे आपल्याला पाहिलें पाहिजे. त्या अर्जाला सहा महिन्यांनंतर उत्तर मिळालें, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ते अर्ज छापील आहेत त्याअर्थीं त्यांचा विचार न करतां फेटाळून लावण्याचा प्रयत्न त्यावेळचे कारभारी रा० ब० ठाणेदार यांनीं केला होता ! कांहीं झालें तरी त्या छापील अर्जाला 'छापील' या मुद्द्यावर फेटाळतां येत नाहीं असें ठरल्यानंतर व रयत भीतीनें किंवा अन्य मार्गानें अधिकारी म्हणतील त्या कागदावर सही करण्यास तयार होत नाहींत अशी अधिकाऱ्यांची खात्री झाल्यानंतर त्या अर्जाला एकदांचें उत्तर देण्याचें धाडस किंवा सौजन्य अधिकाऱ्यांना नाइलाजानें दाखवावें लागलें. त्या अर्जाला उत्तर देणें म्हणजे अधिकारी आपला

अपमानच जणूं काय समजत होते ! आधिकाऱ्यांचें जाहीर झालेलें उत्तर खालीलप्रमाणें आहे:—

रिव्हिजन सर्व्हे सेटलमेंट लागू करण्याबाबत रयतांचे तक्रारी अर्ज छापील एकच मजकुराचे आले आहेत, त्यांस उत्तर.

१. कायदेशीर तक्रार नसल्यानें त्याचें उत्तर देण्याचें कारण नाहीं. श्रीमंतांनीं सारावाढ करणार नाहीं अशा बाबतींत दोन तीन वेळां उद्गार काढले होते हें खरें आहे. तथापि त्यावेळीं " जोंपर्यंत मला हल्लींचें उत्पन्न संस्थानचे खर्चास कमी पडणार नाहीं तोंपर्यंत वाढ करणार नाहीं " असें म्हटलें होतें. परंतु अलीकडे सर्वच गोष्टींच्या किंमती वाढल्यामुळें संस्थानचा खर्चही वाढला आहे. शिवाय लोकांनींही निरनिराळ्या मागण्या केल्या होत्या व मिरजेच्या लोकांनीं पाणी पुरवठ्याचे बाबतींत श्रीमंतांस फार त्रास दिला होता. सबब श्रीमंतांस सारावाढ करणें भाग झालें आहे.

२. लँड रेव्हिन्यू कोड मधील कलमांत 'असा जाहीरनामा काढला पाहिजे' असें कोठेंही नमूद नाहीं. सबब ही कायद्याची चूक झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. शिवाय क्लासिंग काम सुरू असतां प्रत्येक कबजेदार हजर होता असें मानतां येत आहे.

३. सुपरिंटेंडंट ऑफ लँड रेकार्डस यांनीं लोकांतर्फे माहिती घेण्याची असें कोठें कायद्यांत नाहीं. शिवाय त्यांनीं घेतलेली माहिती एकतर्फें आहे; म्हणजे फक्त सरकारास अनुकूल आहे, हें म्हणणें वाजवी नाहीं. सबब ग्रूप्स व दर ठरविण्यांत चूक झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. ग्रूप्स व दर ठरविणें हें काम सर्व्हे सुपरिंटेंडंटचें असल्याकारणानें व त्या बाबतींत ते निष्णात असल्याकारणानें त्यानीं तें केलें असून तें बरोबर आहे असें सकृत् दर्शनीं म्हणणेंच योग्य होईल. श्रीमंतांनीं या बाबतींत आपला फायदा व्हावा असें केव्हांही सांगितलें नाहीं व श्रीमंतांची तसें सांगण्याची इच्छाही नाहीं.

४. लँड रेव्हिन्यू कोडमध्यें अशा प्रकारच्या मर्यादा कोठेंही ठरविल्या नाहींत. ब्रिटिश इंडियांत एकंदर परिस्थितीचा विचार करून ज्या मर्यादा लागू केल्या असतील त्या मर्यादा संस्थान मजकुरीं गेल्या ६० साठ वर्षांत मोजणी केली नव्हती या गोष्टी लक्षांत घेतां लागू कराव्यात असें नाहीं. सबब या कलमांत नमूद केलेले दर लागू करण्यांत कायद्याची चूक बिलकूल झालेली नाहीं.

५. कलम ४ यांत नमूद केल्याप्रमाणेंच याही तक्रारीचा विचार करण्याचें कारण नाहीं.

६. या बाबतींतील म्हणणें मोघम व बिन आधारी असल्यानें त्याचा विचार करण्याचें कारण नाहीं. शिवाय सर्व्हे खात्यांतील लोक आपल्या कामांत वाकब व त्यांनीं केलेलें काम योग्य-निष्णात-असें समजणें गैर होणार नाहीं.

७. वाढविलेला सारा भारी आहे असें रिपोर्टांत कोठेंही सुपरिंटेंडंट यांनीं म्हटलेलें नाहीं. उलट सेटल्मेंट कमिशनर यांनीं ६० वर्षांची मुदत लक्षांत घेतां दुप्पट करावें असेंच म्हटलें आहे. री-रिव्हिजन करण्याची मुदत ठरविण्याचा अधिकार लॅंड रेव्हिन्यू कोड कलम १०२ प्रमाणें सर्वस्वीं संस्थानचा असल्यानें वीस वर्षांची मुदत ठरविण्यांत केव्हांही चूक झालेली नाहीं.

८. या बाबतींतील म्हणण्यास कांहीं कायद्याचा आधार वगैरे दाखविण्यांत आला नसल्यानें त्याचा कांहीं विचार करण्याचें कारण नाहीं.

९. रिपोर्टाचें मराठी भाषांतर करून तें तालुका कचेरींत ठेवण्याचें काम चालू झालेलें आहे.

१०. सदर कलमांत नमूद केल्याप्रमाणें जाहीरनामा काढण्यांत आलेला असून त्यांत एक महिन्याची मुदतही देण्यांत आलेली आहे. अमुकच मुदत दिली पाहिजे असा कायद्यांत निर्बंध नाहीं.

११. यांत नमूद केलेलीं कारणें कायदेशीर नाहींत. वादाकरितां आसपासचे तरम पाहण्याचें झाल्यास इतर संस्थानांतील तरम पाहिल्यास या संस्थानांतील तरम जास्त आहे असें बिलकुल म्हणतां यावयाचें नाहीं. म्हणून तरम सांगण्यास सुरवात केलेली आहे.

१२. तथापि संस्थानांतील प्रत्येक गांवचे २।३ जबाबदार व समंजस असे रयत येऊन गांवातर्फे म्हणणें मांडण्यास तयार असतील तर श्रीमंत हें ऐकण्यास केव्हांही तयार आहेत.

येणेप्रमाणें कलमवार तक्रारींचीं उत्तरें आहेत. ता. १८ डिसेंबर सन १९२८इ.

B. K. Joshi

जॉइंट स्टेट कारभारी, मिरज.

या उत्तरावर टीका करण्याची विशेष अवश्यकता आहे असें नाहीं 'व्यक्तिश:

तक्रारी अर्जांचा उठाव करण्यास ज्यावेळीं श्री० पुंडलीकजी गांवोगांव फिरत होते तेव्हां एका व्याख्यानांत त्यांनीं या उत्तराचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात:—

सहज आठवलें म्हणून येथें एक गंमत आपल्याला सांगतों म्हणजे त्यावरून संस्थानांत राज्यकारभार कसा चालतो याचें आपल्याला प्रत्यंतर येईल. सारा-वाढीच्या चळवळीच्या सुरुवातीला म्हणजे आज ६।७ महिन्यांपूर्वी आपण सर्वांनीं सह्या करून सरकारकडे एक छापील अर्ज पाठविला होता त्याला आज संस्थाननें उत्तर दिलें आहे. त्या उत्तराचा जाहीरनामा ता. १८।१२।२८ ला छापला असून तो १०।१।२९ दिवशीं खेड्यांतून मिळाला व ११।१।२९ दिवशीं तो चावडी-वर चिकटविला आहे. म्हणजे या अर्जाला उत्तर केव्हां दिलें याचा विचार करा. थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे सर्व प्रकरण निकालांत निघाल्यानंतर पहिल्या अर्जाला उत्तर देण्यास अधिकाऱ्यांना सवड झाली. एका कारभाऱ्याच्या कार-कीर्दीत अर्ज केला आणि दुसऱ्याच्या कारकीर्दीत कांहींतरी उत्तर मिळाले! असो.

हा मुद्दा वास्तविक या प्रकरणांत यावयाचा नसतांना वाचकांच्या सोयीकरितां म्हणून याचा आम्हीं येथेंच उल्लेख केला आहे. १८००, सह्यांचे अर्ज दरबारकडे गेलेले होते तरी त्याला दरबारकडून उत्तर देखील मिळालें नाहीं; अशा आक्षेपां-तून सुटण्याकरितां उत्तररूपी कुंकवाचे धनी होण्याच्या हेतूनेंच कीं काय अधि-काऱ्यांनीं हा शहाणपणा करून ठेविला होता. परंतु लोकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या सारावाढीचा उपयोग कोणत्या प्रकारें झाला पाहिजे याची जनतेला जाणीव होण्यास या सरकारी उत्तराचा उपयोग होण्यासारखा आहे.

प्रकरण तिसरें

मिरज-संस्थान प्रजापरिषदेचें चौथें अधिवेशन

अर्थात्

रयतांमधील जागृतीचा जिवंत देखावा

मिरज संस्थान-प्रजापरिषद् होऊं नये अशी श्रीमंतांची इच्छा मुळींच नव्हती. त्या अधिवेशनामुळें लोकांमध्यें जी जागृति व ज्ञान उत्पन्न होत असतें तें दरबारला वावडें होतें. लोकमान्य टिळकांच्या सूक्तिसंग्रहांत अशी एक सूक्ति आहे कीं, 'आमच्यांतील ज्ञान हाच सरकारचा शत्रु आहे'. त्याचें प्रत्यंतर या संस्थानांत पदोपदीं येत आहे. रयत लोकांनीं प्रजापरिषद भरवावयाची ती कांहीं एखादा समारंभ व मौज करावयाच्या हेतूनें नव्हती, ही गोष्ट ध्यानांत घेतल्यावर सरकारनें त्यांत कां व कसे अडथळे आणिले याची संगति व अर्थ बरोबर ध्यानांत येईल. रयतांनीं परिषद् मालगांवला भरविण्याचें ठरविलें आणि दरबारनें त्यांना परवानगी दिली नाहीं. मालगांवला परिषद् भरली असती तर मालगांवमध्यें पुष्कळच जागृति झाली असती. मालगांव हें मिरज तालुक्यांतील मोठ्या गांवांपैकीं एक गांव असून त्याचा वसूलही बराच आहे. मालगांव गांव व चळवळीचे पुढारी यांचा संबंध जितका कमी येईल तितका संस्थानास पथ्यकरच आहे. मालगांवच्या लोकांमध्यें आपल्या पुढाऱ्यांविषयीं जितका गैरसमज उत्पन्न करतां येईल तितकें सरकारास पाहिजेच असणार. श्री० बा. वि. शिखरे म्हणत असत कीं, 'मिरजकरांची राजधानी मिरज असली तर आपल्या चळवळीची राजधानी मालगांव आहे.' मालगांवचे लोक व तेथील पुढारी श्रीमंतांपाशीं गोंडा घोळणारे झाल्यास कोणत्याही चळवळीचा निम्मा जीव काढून घेतल्यासारखें होईल, असें अधिकाऱ्यांना वाटत असल्यास नवल नाहीं. असें दूरवर धोरण ठेवून मालगांवला अधिवेशन भरवूं देण्याचें अधिकाऱ्यांनीं होऊं दिलें नाहीं!

दुसरी गोष्ट, अधिवेशनाचे अध्यक्ष कोणीं व्हावें हा महत्त्वाचा प्रश्न होता. श्री० पंडित चिकोडीप्पा बी. ए., एम्. एल्. सी. यांना अध्यक्षस्थान द्यावें असें लोकांनीं

ठरविलें व त्याला श्री० पंडिताप्पांनीं संमतीही दिली. परंतु श्रीमंतांनीं त्यांना परवानगी दिली नाहीं. बाहेरचा मनुष्य आल्यास तो निर्भयपणें आपल्यावर टीका करील, त्याची शेंडी आपल्या हातांत कांहींच नाहीं. आपण त्याचें कांहींच वांकडें करूं शकत नाहीं अशा बुद्धीनें श्रीमंतांनीं नियम घातला कीं, अध्यक्ष आपल्या संस्थानांतीलच असावा. संस्थानाबाहेरील लोकांना श्रीमंतांचा व अधिकाऱ्यांचा हा पोरकटपणा वाटला व पुढें खरोखरच तो 'पोरकटपणा' होता, असें कर्णोपकर्णीं बाहेर आलें. या सर्व प्रकरणांत श्री० बाबाण्णा सातलिंगप्पा घुळी यांचें नांव वरेंच प्रामुख्यानें पुढें आलें. सदर गृहस्थ हे मालगांवचे एक धनाढ्य व्यापारी असून सरकारकडून तहकुबी मिळविण्याच्या बाबतींत मालगांवनें एकदां यश संपादन केलेलें असल्यामुळें त्यांत बाबाण्णा व त्यांच्या बरोबरीनें काम करणारे इतर लोक यांचा नेट मिरजदरबारला कळून आला होता. त्यांनीं दरबारच्या या दोन्ही अटींना सहज बगल दिली आणि परिषद् मिरजेस भरविण्याचें कबूल करून लागलीच थिएटर मागितलें व मिरज संस्थानच्या प्रजाजनांपैकीं दोघांचीं नांवें —श्री० ज. स. करंदीकर व श्री० वा. रा. कोठारी—सरकारकडे पाठविलीं. हीं नांवें स्वागत-मंडळाची सभा भरून कायमही करण्यांत आलीं. या दोन्ही नांवांना आक्षेप घेण्याचें अधिकाऱ्यांनीं ठरविलें होतेंच; परंतु उत्तर देण्याच्या मिषानें चार दिवस ढकलण्याची खटपट करून पाहिल्यानंतर बा. वि. शिखरे हे अधिकाऱ्यांच्या मागें हात धुवून लागल्यामुळें एकदांचें त्यांच्याकडून उत्तर मिळालें व तें या दोन्ही नांवांना नकारात्मक होतें! त्याच दिवशीं पुन्हा स्वागत-मंडळाची सभा तांतडीनें बोलावण्यांत आली व अध्यक्षपदाकरितां पुन्हा वेगळीं चार नांवें सुचविलीं. परंतु त्या चारीपैकीं फक्त डॉ० जोशी व श्री० गोविंदराव रानडे, वकील यांना अध्यक्ष होण्यास परवानगी असल्याचें नमूद केलें होतें. एवढेंच नव्हे तर उपवक्तेही मिरज प्रजाजनांपैकींच असावेत अशी अटही परिषदेच्या सेक्रेटरींकडून सहीनिशीं कबूल करवून घेण्याची खटपट अधिकाऱ्यांनीं चालविली होती. परंतु सर्व अटी पाळून त्यांतूनच आपला मार्ग काढावयाचा व प्रजापरिषद् यशस्वी करावयाची असा कार्यकारी-मंडळाचा निश्चय ठरला होता. अनेक अन्यायी, जुलमी आणि अव्यवहार्य हुकूम किंवा अटी निमूटपणें पालन करण्यानेंच कायदेभंग करण्याचें सामर्थ्य व हक्क लोकांमध्यें उत्पन्न होतो ही गोष्ट अधिकाऱ्यांना किंवा श्रीमंतांना कळावी कशी! अर्जाचे निकाल, निकालांत हुकूम, हुकुमाला अटींच्या पुरवणी आणि

प्रकरण तिसरें

मिरज-संस्थान प्रजापरिषदेचें चौथें अधिवेशन

अर्थात्

रयतांमधील जागृतीचा जिवंत देखावा

मिरज संस्थान-प्रजापरिषद् होऊं नये अशी श्रीमंतांची इच्छा मुळींच नव्हती. त्या अधिवेशनामुळें लोकांमध्यें जी जागृति व ज्ञान उत्पन्न होत असतें तें दरबारला वावडें होतें. लोकमान्य टिळकांच्या सूक्तिसंग्रहांत अशी एक सूक्ति आहे कीं, 'आमच्यांतील ज्ञान हाच सरकारचा शत्रु आहे'. त्याचें प्रत्यंतर या संस्थानांत पदोपदीं येत आहे. रयत लोकांनीं प्रजापरिषद भरवावयाची ती कांहीं एखादा समारंभ व मौज करावयाच्या हेतूनें नव्हती, ही गोष्ट ध्यानांत घेतल्यावर सरकारनें त्यांत कां व कसे अडथळे आणिले याची संगति व अर्थ बरोबर ध्यानांत येईल. रयतांनीं परिषद् मालगांवला भरविण्याचें ठरविलें आणि दरबारनें त्यांना परवानगी दिली नाहीं. मालगांवला परिषद् भरली असती तर मालगांवमध्यें पुष्कळच जागृति झाली असती. मालगांव हें मिरज तालुक्यांतील मोठ्या गांवांपैकीं एक गांव असून त्याचा वसूलही बराच आहे. मालगांव गांव व चळवळीचे पुढारी यांचा संबंध जितका कमी येईल तितका संस्थानास पथ्यकरच आहे. मालगांवच्या लोकांमध्यें आपल्या पुढाऱ्यांविषयीं जितका गैरसमज उत्पन्न करतां येईल तितकें सरकारास पाहिजेच असणार. श्री० बा. वि. शिखरे म्हणत असत कीं, 'मिरजकरांची राजधानी मिरज असली तर आपल्या चळवळीची राजधानी मालगांव आहे.' मालगांवचे लोक व तेथील पुढारी श्रीमंतांपाशीं गोंडा घोळणारे झाल्यास कोणत्याही चळवळीचा निम्मा जीव काढून घेतल्यासारखें होईल, असें अधिकाऱ्यांना वाटत असल्यास नवल नाहीं. असें दूरवर धोरण ठेवून मालगांवला अधिवेशन भरवूं देण्याचें अधिकाऱ्यांनीं होऊं दिलें नाहीं!

दुसरी गोष्ट, अधिवेशनाचे अध्यक्ष कोणीं व्हावें हा महत्त्वाचा प्रश्न होता. श्री० पंडित चिकोडीप्पा बी. ए., एम्. एल्. सी. यांना अध्यक्षस्थान द्यावें असें लोकांनीं

पुरवणीला फांटे असा खेळखंडोबा अधिकाऱ्यांनीं मांडलेला होता. बाहेरगांवच्या लोकांना हा सर्व प्रकार कळून आश्चर्य वाटलें आणि शेवटीं श्री० बाबूराव गोखले व इतर पाहुण्यांची भेट श्रीमंतांशीं झाल्यानंतर श्री० बाबूराव जोशी, वकील (आतां रा० ब० कारभारी) यांच्या मध्यस्तीनें त्या अटी पार विरघळून गेल्या. त्या अटी पाळल्या जातात किंवा नाहीं हे पाहण्याकरितां बंदुकी, हातकड्या, कांढण्या यांच्यासह पोलिसांचे ताफे थिएटर सभोंवतीं उभे केले होते. या प्रकारावर टीका करतांना बेळगांवचें 'तरुण भारत' पत्र म्हणतें,—

"असें म्हणतात कीं, परिषदेच्या बाहेरच्या बाजूस अधिकाऱ्यांनीं पोलिसांना बंदुका घेऊन उभें केलें होतें व हातकडी जय्यत तयार ठेविली होती. जणुं काय परिषदेंत क्रान्तीचा ठराव पास होणार होता; आणि क्रान्तीचा ठराव पास झाला असताच तर हातकडी तयार ठेवल्यानें तो थोडाच थांबणार होता! पण कायद्याचें ज्ञान नसले, अनुभव नसला, मन खंबीर नसलें आणि आपल्या हातीं संस्थाननें दिलेला अधिकार आपल्या कुवतीबाहेरचा आहे असें आपले मनच आपल्याला खात असलें तर कशी धांदल व घाई होते याची गंमत मिरजेस परवां परिषदेच्या प्रतिनिधींस पाहावयास मिळाली.....अधिकाऱ्यांनीं त्यांत आपल्या बुद्धिमत्तेचें प्रदर्शन तर केलेच; पण संस्थानाधिपतींना देखील पाहुणे मंडळींच्या देखत एकप्रकारें खालीं पाहावयास लाविलें. झाला हा प्रकार जर तंतोतंत खरा असेल तर संस्थाननें अधिकाऱ्यांना नीट समज दिली पाहिजे यांत शंका नाहीं. अधिकाऱ्यांनीं देखील यापुढें आपले हंसें करून घेऊं नये अशी आमची त्यांना विनंति आहे."

—तरुण भारत, ता. १८।९।२८.

सभेंतील कामकाज

परिषदेच्या बाबतींत अशी एकही बाब नव्हती कीं, ज्यांत आडकाठी किंवा आपत्ति आयत्या वेळीं उत्पन्न झालेली नाहीं. श्री० गोविंदराव रानडे वकील यांनीं अध्यक्ष होण्याच कबूल करून प्रजेची बाजू सांभाळून नेली यांत तिळमात्र शंका नाहीं. अध्यक्षस्थान मंडित करण्याला लायक असे लोक मिरजेंत नाहींत असें नाहीं; परंतु पाण्यांत राहून माशाशीं विरोध करण्याचें धाडस कोणीं करावें एवढाच प्रश्न होता. स्वतः कमकुवत असूनही जबरदस्त साम्राज्याच्या ढालीमागें बेजबाबदार झालेल्या लहानशा सत्तेला साम्राज्यसत्तेहूनही अधिक ताप आपल्या प्रजेला देतां येणें शक्य असतें. डोक्यावरचा सूर्य जितका होरपळून काढतो त्यापेक्षां पायां-

खालच्या वाळूची आगच भयंकर असते. अशा परिस्थितींत अध्यक्ष होण्याचें कबूल करणें एवढेंच नव्हे तर आपलीं मतें निर्भीडपणें पुढें मांडणें ही एक उच्च प्रकारची जनसेवा आहे, यांत बिलकुल शंका नाहीं ! असो. या परिषदेस मिरज संस्थानच्या तीनही तालुक्यांतून बरेच लोक आले होते. सभेस एकंदर संस्थानांतील १००० प्रतिनिधी आले होते. त्यांशिवाय जमखंडी, कुरुंदवाड, रामदुर्ग, बुडगांव, जयसिंगपूर, कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी वगैरे संस्थानांतून सुमारें ५०।७५ पाहुणे मंडळी आली होती. त्यांशिवाय बऱ्याच स्त्रियाही परिषदेस हजर होत्या. थिएटर अगदीं गच्च भरून गेलें होतें. श्रोतृसमाज १५०० वर होता. 'लोकसेवा हाच प्रभूचा श्रेष्ठतर पूजाविधि होय' ही भावना सुरुवातीच्या पदांमधून जी गाइली गेली होती ती शेवटपर्यंत तशीच दुमदुमून राहिली होती. परिषदेचे स्वागताध्यक्ष व अध्यक्ष या दोघांच्या भाषणांतून सारावाढीच्या अन्यायावर बरीच खरमरीत व मुद्देसूद टीका आली होती. परिषदेच्या कामाची सविस्तर माहिती एकत्रित करून स्वतंत्र रिपोर्ट छापविला असल्यामुळें त्याची पुनरावृत्ति या ठिकाणीं करीत नाहीं. सारावाढीचा प्रश्न सभेपुढें प्रामुख्यानें होता. प्रतिनिधींचें लक्ष त्याकडेच लागून राहिलें होतें. मिरजेचे एक डॉक्टर, नारायणराव जोशी यांनीं तो सारावाढीचा ठराव सभेपुढें मांडला. त्यांचे भाषण म्हणजे श्री० मोडकांच्या रिपोर्टावरील एक मुद्देसूद व निर्भीड टीकाच होय. या ठरावावर एकंदर सात वक्त्यांचीं भाषणें झालीं होतीं. श्री० माधवराव आठवले, वकील–सांगली व दे० भ० बाबूराव गोखले, पुणें यांचीं भाषणें तर फारच सुंदर झालीं. शेतकऱ्यांच्या मनावर त्यांचा परिणाम चांगला झाला. सरकारी व लोकनियुक्त अशा मिश्र सभासदांची एक कमिटी नेमून चौकशी मागण्यापलीकडे या सारावाढीच्या ठरावांत दुसरें कांहीं नव्हतें. हा ठराव लिहिण्यामध्यें श्री० बाबूराव जोशी (आतां रा० ब० जोशी) यांनीं भाग घेतला होता, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. एकंदरींत हें अधिवेशन अत्यंत समाधानकारक रीतीनें पार पडले. लोकमत कोणत्या पाऱ्यापर्यंत चढलें आहे याची जाणीव अधिकाऱ्यांना व श्रीमंतांना व्हावयाची होती. परंतु 'दैवमन्यत्र चिंतयेत्' त्याला ते तरी काय करणार !

तारीख १६।९।२८ च्या 'मराठा' पत्रांत या परिषदेविषयीं लिहितांना मराठ्याचे संपादक म्हणतात,—

"The Chief ought to note that the resolution of

the Conference demands a joint inquiry Committee and also that no collection of the increased revenue should be made before the report of the Committee is out.....If however the chief sahib, who threatens to develop into a bureaucrat, remains adamant Bardoli ought to serve as a sufficient warning to him."

'सव्हँट ऑफ इंडिया', 'संस्थानी स्वराज्य' व 'केसरी' वगैरे पत्रांनीं देखील अशाच प्रकारचा इषारा संस्थानाधिपतींना वेळींच दिला होता. वास्तविक आपल्या चळवळीची व प्रयत्नांचीही शिकस्त व शेवट झाला असेंच पुढाऱ्यांना वाटत होत. परंतु कामाला काम शिकवितें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. केवळ परिषदेनें काम भागणार नाहीं. परिषदेंचे ठराव श्रीमंतांकडे पाठविले पाहिजेत आणि त्याचप्रमाणें खेडोपाडीं जाऊन लोकांनाही परिषदेचा संदेश कळविला पाहिजे, म्हणजे आपले काम शेवटाला लागलें असें होईल. ही कल्पना कार्यकर्त्यांच्या मनांत उत्पन्न झाली व त्याप्रमाणें ते कामाला लागले.

आपल्या राज्यामध्यें एवढी मोठी सभा झालेली अधिपतींना माहीत नसतें असें नाहीं; परंतु लोकांनीं प्रत्यक्ष श्रीमंतांना परिषदेंतील ठराव ऐकविल्याशिवाय त्यांना ते ऐकूं गेले आहेत असें समजावयाचें नाहीं ही एक तऱ्हा राज्यकारभारामध्यें असते! 'आमच्याकडे ठराव आले असते तर त्यांचा विचार होऊन अन्यायाचें निराकरण झालें असतें' असे म्हणण्यास श्रीमंत केव्हांही मोकळेच असतात म्हणून अधिवेशनाचा अहवाल छापून तयार होतांच श्रीमंतद्वयांकडे व अधिकाऱ्यांकडे तो रवाना करण्यांत आला. अर्थात् त्याचा विचार कांहीं झाला नाहीं हें सांगावयास नकोच!

इकडे प्रजापरिषदेचा संदेश लोकांना कळविण्याकरितां गांवोगांव सभा भरविण्यासाठीं परिषदेच्या सेक्रेटरींनीं अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी मागितली; परंतु अधिकाऱ्यांना वाटलें कीं, हा प्रजापरिषदेचा संदेश म्हणजे सारावाढीच्या योजनेच्या विधवा उडण्याचा मूळपाया आहे आणि त्यांची ती कल्पना खोटी होती असें नाहीं. म्हणून "मूले कुठारः" या न्यायानें व्याख्यानबंदीची कुऱ्हाड या चळवळीच्या वृक्षाच्या मुळावर घालावी असें त्यांनीं ठरविले. त्यांच्या दृष्टीनें

अन्याय्य सारावाढ कायम करावयाची असें ठरविल्यानंतर व्याख्यानबंदी केल्याशिवाय त्यांचें भागलेंच नसतें. प्रजासेवक असल्या आपत्तीला थोडेच भीक घालणार आहेत ! कायद्यांत न सांपडतां, जाहीर व्याख्यान न करतां, खाजगी जागेंत खाजगी व्याख्यान करून निमंत्रितच पण गांवांतील सर्व लोक एकत्रित करून खाजगी सभांमधून आपलें काम त्यांनीं चालू ठेविलें. या खाजगी सभेंत सरकारी मनुष्यास येऊं द्यावयाचें कीं नाहीं हा हक्क लोकांच्या हातांत राहिला. जाहीर व्याख्यानामध्यें सरकारी रिपोर्टर येऊन बसूं शकत होता तेंही या खाजगी व्याख्यानामुळें सरकारनें आपलें नुकसान करून घेतलें. अशाप्रकारें खाजगी सभा करीत १६।१७ गांवांतून एक दौरा श्री० बा. वि. शिखरे व श्री० पुंडलीकजी यांनीं संपविला. त्यांच्याबरोबर निरनिराळ्या गांवांतील प्रमुख पुढारीही एकमेकांच्या गांवीं जाऊन परिस्थितीचें ज्ञान लोकांना करून देण्यास मदत करीत असत. अधिकाऱ्यांच्या विरोधानें या कामासही चांगलेंच स्वरूप आलें. गांवोगांव भरत असलेल्या खाजगी सभांना सार्वजनिक व्याख्यानांचें स्वरूप देऊन व्याख्यानबंदीचा कायदा मोडल्याच्या आरोपावर खटले भरण्याची खटपट अधिकाऱ्यांनीं करून पाहिली; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

प्रत्येक गांवामध्यें प्रजासभा स्थापन करून त्या सर्व शाखांमधून निवडून येणाऱ्या लोकांची एक मुख्य प्रजासभा मिरजेस स्थापन करावी व कॉंग्रेसच्या धर्तीवर हें लोकजागृतीचें व लोकसेवेचें काम अखंड चालू रहावें अशा हेतूनें प्रत्येक गांवांत प्रजासभा स्थापन करण्याचें काम श्री० शिखरे यांनीं जोरानें सुरू केलें होतें. मिरज, तानंग, पाटगांव, करोली, सिरढोण, मालगांव, कवठेपिराण वगैरे गांवीं या कल्पनेची माहिती देण्याचें काम त्यांनीं केलें आहे. प्रजापरिषदेचा संदेश सांगतांना व प्रजासभेची ठिकठिकाणीं स्थापना होत असतांना लोकांमध्यें अधिकाधिक जागृति होत गेली आणि हें काम एवढ्यावरच न संपतां हा वृक्ष फोंफावणार ही गोष्ट पुढाऱ्यांना दिसून आली. कार्याचा व्याप व जबाबदारी आस्ते आस्ते वाढूं लागली. व्याख्यानबंदीच्या सरकारी हुकुमाचें लोकांत हंसें झालें, लोक धीट बनूं लागले व कायदेभंगाची भाषा लोकांच्या तोंडूनच बाहेर पडूं लागली. स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांना अर्थात् लोकांच्या सामर्थ्याविषयीं आशा वाटूं लागली. बार्डोलीचा दृष्टान्त शेतकरी देखील बोलूं लागले.

इकडे प्रजापरिषदेनें मागणी केलेली चौकशी दरबारकडून मिळेल असें

लोकांना मुळींच वाटेना. सरकार चौकशी करो किंवा न करो, लोकांनीं आपल्या-मधील जवाबदार लोकांची एक कमिटी नेमावी व आपली स्वतंत्र चौकशी करून ती श्रीमंतांकडे सादर करावी असा विचार लोकांमध्यें उत्पन्न झाला व त्याच वेळीं 'केसरी'नें लोकपक्षाला तीच सूचना केली. त्याबरोबर प्रजापरिषदेच्या कार्यकारी मंडळाने आपली सभा बोलावून त्यांत स्वतंत्रपणे आपली चौकशी-कमिटी नेम-ण्याचा व त्या कमिटीचे चिटणीस म्हणून काम करावयास श्री० पुंडलीकजी यांना बोलावून घेण्याचा ठराव पास केला. तो ठराव असाः—

"श्री० पुंडलीकजी यांना येथें (मिरजेस) लवकर येण्याबद्दल व या (रयते-तर्फे नेमलेल्या चौकशी-कमिटी) कमिटीचे सेक्रेटरी होऊन लवकर कामास सुरुवात करण्याबद्दल अध्यक्षांनीं त्यांस लिहावें."

—कार्यकारी-मंडळाची सभा, ठराव नं. १

या ठरावाप्रमाणें श्री० पुंडलीकजी यांनीं आपलें काम श्री० गोविंदराव रानडे यांच्या अध्यक्षतेखालीं व श्री० शिखरे यांच्या मदतीनें चालविलें. या लोकपक्षाच्या स्वतंत्र चौकशी-कमिटीस सर्वांनीं मदत करावी असें सांगण्याकरितां श्री० शिखरे, पुंडलीकजी व डॉ० जोशी मिळून सर्व खेड्यांतून एकवार फिरून आले. या दौऱ्या-मध्यें चौकशी-कमिटी म्हणजे काय, चौकशी कशी करतात, त्यापासून कोणता फायदा आहे, लोकांनीं आपली माहिती कशी तयार करावी याचें ज्ञान शेतकऱ्यां-ना समजावून देण्यांत आलें होतें. हें चौकशीचें काम सुरू झाल्यानंतर व्याख्यान-बंदीचा अधिकाऱ्यांचा हुकूम अधिक कडक झाला. यामुळें या चौकशीच्या कामासही चांगला रंग चढू लागला हें सांगावयास नको. चळवळी अधिकाऱ्यांच्या अदूरदर्शी विरोधानें अधिक लवकर वाढतात व लोकप्रिय होतात हें साधें तत्त्व अधिकाऱ्यांच्या ध्यानांत आले नाहीं ही गोष्ट एका दृष्टीनें बरीच झाली.

सभेला लोकांची संख्या अधिकाधिक जमूं लागली. ही 'खाजगी' सभा भर-विण्यास आपली जागा देण्यास लोक आनंदानें पुढें येऊं लागले. चळवळीच्या पुढाऱ्यांचा सन्मान करावा ही बुद्धि लोकांमध्यें उत्पन्न झाली आणि लोकांना आपल्या एकजुटीच्या सामर्थ्याची जाणीव झपाट्यानें होऊं लागली. पुढाऱ्यांनीं बार्डोलीचा इतिहास लोकांना समजावून सांगण्यास सुरुवात केली. चौकशी कमिटी-तर्फे माहिती मिळविण्याकरितां पहिलें पत्रक छापवून लोकांमध्यें वांटून लोकांकडून त्यांत त्यांची सर्व माहिती भरवून घेण्याचें काम सुरू झालें. खातेदाराचें नांव, वहि-

वाटदाराचें नांव, पोटहिस्सेदारांचीं नांवें, जमीन (जिराईत, बागाईत व एकूण), आकार (जिराइताचा, बागाइताचा व एकूण), इतकी माहिती या पहिल्या पत्रकांत विचारलेली होती. गांवोगांवाहून ही माहिती शेतकरी लोक भरून आणूं लागले. रयतांनीं लिहून आणून दिलेले कागद पाहिले म्हणजे या बाबतींत त्यांना किती चिंता लागून राहिली होती हें दिसून येतें. हें चौकशीचें काम चालूच होतें—;परंतु सरकार प्रजापरिषदेच्या मागणीला अनुसरून चौकशी-कमिटी नेमणार किंवा नाहीं, परिषदेच्या ठरावांचा विचार होणार आहे किंवा नाहीं याची शहानिशा होण्याचें काम अद्यापि बाकी होतें. काय होणार आहे याचा अंदाज लोकांना असला तरी राजकारणांत केवळ अंदाजावर कित्येक वेळीं कामें भागत नाहींत व पुढील पाऊल उचलतां येत नाहीं. म्हणून प्रजापरिषदेचें एक डेप्युटेशन श्रीमंतांकडे पाठवावयाचें ठरून श्रीमंत तात्यासाहेब युवराज यांच्याकडे अध्यक्षांचा पत्र-व्यवहार व बोलणें सुरू झालें. डेप्युटेशनमध्ये दे० भ० दा. वि. गोखले, श्री० वामन-राव पटवर्धन, श्री०श्री. ग. वझे—सर्व्हंट ऑफ इंडियाचे संपादक, श्री० गोविंदराव-रानडे परिषदेचे अध्यक्ष, श्री० बाबाण्णा घुळी, श्री० शिखरे व श्री० पुंडलीकजी इतकी मंडळी होती. श्रीमंत युवराज शिष्टमंडळाची भेट घेणार इतकें निश्चित ठरल्यानंतर शिष्टमंडळांतील सभासदांना मिरज मुक्कामीं एकत्रित करण्यांत आले. शिष्टमंडळांत बसून काम करण्यापूर्वी त्या सभासदांनीं खेडोपाडीं हिंडून प्रत्यक्ष माहिती मिळवून घेतलेली अधिक चांगली असें वाटल्यावरून लोकपक्षाच्या पुढाऱ्यांनीं तशी व्यवस्था आगाऊच करून ठेविली होती. पुण्याहून आलेले 'Servant of India'चे संपादक श्री. वझे,' संस्थानी स्वराज्या'चे संपादक श्री० वामनराव पट-वर्धन यांनीं बा. वि. शिखरे व श्री० पुंडलीकजी वगैरेसह मिरज तालुक्यांतील बऱ्याच खेड्यांत फिरून वाढता सारा व शेतकऱ्यांची स्थिति यासंबंधीं अवलो-कन केलें. श्री० दा. वि. गोखले हेही ता. २९।१०।२८ रोजीं येऊन या मंडळीस दौऱ्यांत मिळाले. सारावाढ करण्याचे बाबतींत संस्थाननें रयतेवर अन्याय चाल-विले आहेत, अशी पूर्ण चौकशीअंतीं या मंडळींची खात्री पटली. प्रजापरिषदेचें डेप्युटेशन ता. ३०।१०।२८ रोजीं मिरज संस्थानचे अधिपति व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या भेटीस जाण्याचें ठरलेलें होतें. ही डेप्युटेशनमधील मंडळी डॉ० जोशी, रा० रा० रा. ह. जयकर व स्वयंसेवक पंडितराव शिखरे यांच्यासह शिर-ढोण, पाटगांव, मालगांव, टांकळी, बोलवाड, तानंग, सावळी वगैरे गांवीं जाऊन तेथील कर्जखतें, कबुलायती, खरेदीखतें व प्रत्यक्ष जमिनी पाहून आली.

अशी सर्व तयारी झाली तरी संकटाशिवाय या कामाला महत्त्व तरी कसें यावें ? 'संस्थानी स्वराज्या'च्या तारीख २।११।२८ च्या अंकांत डेप्युटेशनची सर्व कहाणी संगतवार आलेली असल्यामुळें तीच या ठिकाणीं आम्ही देतों. म्हणजे त्यावरून सर्व घडामोडी वाचकांच्या ध्यानांत येतील.

" प्रजापरिषदेचें डेप्युटेशन— ता. ३० आक्टोबर रोजीं प्रजापरिषदेचें डेप्युटेशन श्रीमंत तात्यासाहेब व श्रीमंत सरकार बाळासाहेब यांचेकडे जाणार हें प्रसिद्ध झाल्यानें ७।८ खेड्यांतील लोक मिरजेस जमा झाले होते. पूर्वी डेप्युटेशनची तारीख ठरून चुकली होती, फक्त वेळ ठरवावयाची होती. परिषदेचे अध्यक्ष श्री० रानडे यांनीं तारीख २८ रोजीं, वेळ कळविण्याबद्दल श्रीमंत तात्यासाहेबांकडे विनंतीपत्र पाठविलें होतें. ता. २९ रोजीं श्रीमंत सर बाळासाहेब यांच्याकडेही 'श्रीमंत तात्यासाहेबांची भेट घेऊन डेप्युटेशन आपल्याही भेटीस येईल, असें कळवून ठेविलें होतें. ता. २९ रोजीं संध्याकाळीं श्रीमंत तात्यासाहेबांकडून दोनप्रहरीं १२–३० ची वेळ रा० रा० बाबूराव जोशी वकील यांच्यामार्फत कळविण्यांत आली. परंतु 'डेप्युटेशनमधील सर्व सभासदांची भेट न घेतां रा० वामनराव पटवर्धन, रा० बाबूराव गोखले व अध्यक्ष रानडे या तिघांचीच भेट घेऊं व ती डेप्युटेशनचे सभासद म्हणून न घेतां खाजगी व्यक्ति या नात्यानें घेऊं', अशा अर्थाचा निरोप रा० जोशी यांच्यामार्फत आल्याचें कळलें. अध्यक्ष रा० रानडे यांनीं सर्व सभासदांच्या संमतीनें, 'यावेळीं खासगी व्यक्ति या नात्यानें कोणीही येऊं शकणार नाहीं, डेप्युटेशनचे सभासद व परिषदेचें डेप्युटेशन म्हणून आपण त्यांची मुलाखत घेण्याचें मान्य करीत असल्यास व तसें उत्तर येत असल्यास मुलाखतीस येतों. तर सदर बाबतींत तशी आज्ञा व्हावी' अशा अर्थाचें पत्र रा० जोशी वकील यांच्यामार्फत पाठवून दिलें. यानंतर 'प्रथम रा० पटवर्धन, रा० रानडे व रा० गोखले यांची खासगी भेट घेऊन नंतर डेप्युटेशनची डेप्युटेशन म्हणून मुलाखत घेण्याचें कबूल असल्याचें' कळविण्यांत आलें. नंतर शिष्टमंडळाच्या सभासदांनीं श्रीमंत तात्यासाहेबांच्या बंगल्यावर जाऊन तेथें मुलाखत घेतली. अध्यक्ष रानडे यांनीं परिषदेचा रिपोर्ट श्रीमंतांस सादर करून परिषदेच्या ठरावांचा श्रीमंतांनीं सहानुभूतिपूर्वक अंतःकरणानें विचार करावा अशा अर्थाची सर्वांतर्फे प्रार्थना केली. श्रीमंत तात्यासाहेबांनीं 'आपल्या हातीं कांहीं करण्याचें नाहीं, ठराव रीतसर श्रीमंत सरकारकडे पाठविण्यांत येतील' अशा प्रकारचें आश्वासन दिलें. यानंतर ताबडतोब सर्व

मंडळी श्रीमंत सर बाळासाहेब यांच्याकडे गेली, तेथें जाऊन अध्यक्ष रानडे यांनीं श्रीमंतांकडे परिषदेच्या डेप्युटेशनमधील सभासदांचीं नांवें लिहून आणलेला कागद शिपायाच्या हातीं वर पाठविला. पांच मिनिटांत श्रीमंतांचे पर्सनल कारकून रा० दप्तरदार यांनीं 'प्रजापरिषदेच्या डेप्युटेशनची मंडळी यापूर्वीही माझ्याकडे आली होती, मीं त्यांची भेट त्यावेळीं घेतली नाहीं व आतांही घेत नाहीं. इतर कामाकरितां मंडळी भेटणार असल्यास मी भेटण्यास तयार आहें' असा स्पष्ट शब्दांत श्रीमंतांचा निरोप कळविला. निरोप समजल्यानंतर 'शिष्टमंडळाचे सभासद म्हणून भेटण्याची सवड नसल्यास आज मंडळीस याशिवाय अन्य कामाकरितां भेटण्याचें नाहीं' असें सांगून सर्व मंडळी परत फिरली. डेप्युटेशनमधील सर्वच सभासदांनीं श्रीमंत बाळासाहेबांकडून कोणत्या प्रकारचें उत्तर येईल त्याचें निदान आगाऊच करून ठेविलें होतें; परंतु एकदां सनदशीर रीतीनें या कामाची 'तड' पोंचवावयाची असा सर्वांचाच निश्चय झाल्यानें श्रीमंतांच्या दारापर्यंत जावयाचें, त्यांनीं भेट घेण्याचें नाकारल्यास निरुपायानें परत यावयाचें असें ठरवूनच मंडळी त्यांच्याकडे गेली होती. श्रीमंत तात्यासाहेबांनीं खाजगी रीतीनें रा० वामनराव पटवर्धन व रा० बाबूराव गोखले यांची पुन्हा एकदां भेट घेतली व एकमेकांनीं अगदीं मोकळेपणानें सर्व गोष्टींची वाटाघाट केली."

शिष्टमंडळाचा प्रकार काय काय होतो हें समजून घेण्याकरितां अनेक खेड्यापाड्यांतील लोक मिरजेस येऊन बसले होते. शिष्टमंडळ श्रीमंताची भेट घेऊन परत आल्यानंतर आपल्याला त्यांच्या तोंडून जाहीर रीतीनें सर्व हकीगत ऐकावयास मिळेल अशी शेतकऱ्यांची समजूत होती; परंतु अधिकाऱ्यांनीं त्या शिष्टमंडळांतील पाहुणे मंडळींच्या व्याख्यानास परवानगीच दिली नाहीं ! श्रीमंतांची बद्कीर्ति त्यामुळें महाराष्ट्रभर पसरेल याची किंमत अधिकाऱ्यांनीं केली नाहीं. तथापि डॉ. जोशी यांच्या दिवाणखान्यांत सर्व मंडळींना एकत्र जमवून शिष्टमंडळांतील पुढाऱ्यांचीं भाषणें झालीं. शिष्टमळांतील पाहुणे मंडळींना पानसुपारी, हारतुरे वगैरे झाल्यानंतर पुढील कार्याची दिशा ठरविण्याकरितां खाजगी वाटाघाट झाली. पुष्कळ शेतकऱ्यांनीं यावेळच्या वाटाघाटींत भाग घेतला होता. जो प्रसंग या संस्थानांत येऊं नये म्हणून इतकी खटपट झाली तो आतां श्रीमंत सर बाळासाहेबांच्या दुराग्रहामुळें व मुत्सद्देगिरीच्या अभावामुळें त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस येणार अशीं स्पष्ट चिन्हें सर्वांनाच दिसूं लागलीं.

या बाबतींत साताऱ्च्या 'समर्थां'नें म्हटलें आहे कीं, " शिष्टमंडळास भेट देणें. इतकी साधी शिष्टाचाराची गोष्ट करण्याससुद्धां श्रीमंत जेथें तयार नाहींत तेथें आतां सनदशीर प्रतिकाराचें शेवटचें शस्त्र जो सत्याग्रह, तो करण्याशिवाय शेतकऱ्यांना गत्यंतरच उरलें नाहीं."

पुढाऱ्यांच्या सनदशीर खटपटीची व चळवळीची ही शिकस्त झाली; आतां यापुढील काम आजच्या स्थितींत शक्य नाहीं असेंच वाटत होतें; परंतु चळवळ जसजशी फोफावूं लागली व अधिकाऱ्यांचे चाळे आणि श्रीमंतांचा हट्ट व दुराग्रह दिसूं लागला, तसतसा पुढील मार्गही कंटकमय असला तरी दृष्टिपथांत येऊं लागला. 'आणखी एकच प्रयत्न करून पाहूं या' असें लोकांना व लोकपुढाऱ्यांना प्रत्येक पायरीवर चढतांना वाटूं लागलें. श्रीमंतांच्या हट्टाग्रहाला किंवा दुराग्रहाला आतां लोकांच्या सत्याग्रहाशिवाय गत्यंतर नव्हतें ! ही 'समर्थां'ची कल्पना शेतकऱ्यांमध्यें त्यापूर्वीच बावरूं लागलेली होती. त्यांना फक्त पुढाऱ्यांनीं चालना देण्याचाच अवकाश होता. सभा, सम्मेलनें, अर्जे, विनंत्या, शिष्टमंडळें व ठराव या अनेकविध प्रयत्नांतून टक्केटोणपे खात आपला मार्ग आक्रमण करीत असतां रयतलोक बरेच शहाणे, जागृत, धीट व चौकस झाले होते यांत शंका नाहीं. या ठिकाणीं चळवळीचा एक भाग पुरा झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

मिरजेची बार्डोली करणार काय ?

याच संधीस ज्ञानप्रकाशच्या संपादकांनीं ता. ६ व ८ सप्टेंबरच्या अंकांत, श्री० मोडकांच्या रिपोर्टावर टीका, श्रीमंतांची या सारावाढीच्या चळवळीकडे पाहण्याची वृत्ति व रयतांची न्याय्य चळवळ आणि श्रीमंतांनीं वेळींच सावध होण्याचें नाकारल्यास पुढील प्रसंगाचा स्पष्ट शब्दांत इषारा अग्रलेखानेंच दिला असल्यानें सदर लेख याखालीं मुद्दाम संपूर्ण दिले आहेत.

— १ —

" मिरजेची बार्डोली करणार काय ! " हा या लेखाचा मथळा वाचून कित्येक लोकांना आश्चर्य वाटेल ! ते त्यावर असा प्रश्न करतील कीं, मिरजेची बार्डोली कोण करणार ! मिरजेचे अधिपति श्री० बाळासाहेब हे मिरजेची बार्डोली होऊं देणार किंवा मिरज संस्थानांतील कल्पनातीत व अन्याय्य सारावाढीमुळें चिडून व

भयभीत होऊन गेलेला शेतकरीवर्ग बार्डोलींतील शेतकरी वर्गाचें अनुकरण करून सारा देण्याचें नाकारणार ? आम्हांला वाटतें कीं, या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें निश्चित स्वरूपांत आजच देणें शक्य नसलें, तरी मिरजेस बार्डोलीची पुनरावृत्ति होणें अगदींच अशक्य व असंभवनीय नाहीं, हें मात्र स्पष्ट आहे. ही परिस्थिति अशीच चिघळत गेल्यास व संस्थानानें शेतकरीवर्गाच्या गाऱ्हाण्यांविषयीं सध्यां-प्रमाणेंच बेपर्वाईचें धोरण चालू ठेविल्यास, करबंदीचें धोरण स्वीकारणें रयतवर्गाला भाग पडेल. या धोरणांत रयतेला यश येईल किंवा नाहीं हें रयतेच्या संघशक्तीवर अवलंबून राहील; पण संस्थानच्या बेपर्वाईच्या वृत्तीमुळें उत्पन्न झालेल्या सत्या-ग्रहाच्या चळवळींत तिऱ्हाईत लोकांच्या सहानुभूतीचा कांटा प्रजाजनांकडेच झुकेल हें सांगावयास नकोच. सध्यां सारावाढीचें प्रकरण हें एक अत्यंत नाजूक प्रकरण झालें आहे, यापूर्वी ब्रिटिश अधिकारी लँड रेव्हिन्यू कोडांतील लवचिक कलमांचा वाटेल तसा अर्थ करून व त्यांतील नियमांची आपल्या लहरीप्रमाणें ओढाताण करून, दर रिव्हिजन सेटल्मेंटच्या वेळीं भरपूर सारावाढ करावयास कमी करीत नसत. जोंपर्यंत रयतवर्ग अज्ञस्थितींत होता, तोंपर्यंत हे प्रकार अशा रीतीनें घडून आले यांत नवल नाहीं; पण आतां रयतवर्ग जागृत झाला आहे व त्यांत संघटित सामर्थ्यही उत्पन्न होत आहे. अशा वेळीं 'हम करेसो कायदा' हा संस्थानांतील न्याय कधींही चालू शकणार नाहीं. लँड रेव्हिन्यू कोडाचा अर्थ लोक आतां समजूं लागले आहेत व सेटल्मेंट ऑफिसरांच्या रिपोर्टांतील हेत्वाभासाचें खरे स्वरूपा-विष्करण करण्याचीं साधनेंही लोकपक्षीय पुढाऱ्यांना प्राप्त झालेलीं आहेत. अशा स्थितींत केवळ अरेरावीचा अवलंब करून किंवा प्रजाजनांच्या सनदशीर हक्कांची पायमल्ली करून, रयतेवर सारावाढ करणें हें अरेरावी संस्थानिकांनाही शक्य नाहीं. मिरज संस्थानच्या अधिपतींवर अशा तऱ्हेची टीका करण्याचा प्रसंग आमच्यावर आला नसता तर आम्हांला फार आनंद वाटला असता; परंतु गेले चारपांच महिने श्रीमंत बाळासाहेबांनीं ही सर्व बाब श्रीमंत युवराजांकडे व दिवाणांकडे सोंपविल्याकारणानें दररोज शेतकरीवर्ग व अधिकारीवर्ग यांच्यामधील वितुष्ट वाढत चाललें असून, हें प्रकरण बरेंच विकोपास जाण्याचा रंग दिसत आहे. शेतकरी-वर्गाला आपलीं गाऱ्हाणीं पुढें मांडावयास योग्य अवसर न देणें, प्रजापरिषदेच्या शिष्टमंडळाची भेट घेण्याचें नाकारणें, रा० पंडिताप्पा चिकोडी यांच्यासारख्या जबाबदार पुढाऱ्याला शेतकरीवर्गाच्या परिषदेचे अध्यक्ष होण्याला बंदी करणें,

मालगांवला परिषद् न भरूं देणें, रा० वालचंद कोठारी यांच्यासारख्या खुद्द मिरज संस्थानांतील जमीनदाराला व ब्राह्मणेतरांच्या विश्वासांतील गृहस्थाला अध्यक्ष करावयास हरकत घेणें, ही व अशाच तऱ्हेची बेजबाबदारपणाची वृत्ति संस्थाननें स्वीकारणें म्हणजे पर्यायानें ब्रिटिश सरकारनें या प्रकरणांत हात घातला पाहिजे अशी मागणी करावयास न्याय्य भूमिका तयार करूं देण्यासारखेंच नाहीं काय? असा आमचा श्रीमंत बाळासाहेब व त्यांचे युवराज श्रीमंत तात्यासाहेब यांना स्पष्ट सवाल आहे. हिंदी संस्थानिक हे आपले जातभाई आहेत, स्वदेशबांधव आहेत, आपल्याच हाडामांसाचे आहेत असें म्हणून त्यांची गय करण्यालाही कांहींतरी सीमा ही असलीच पाहिजे. हें श्रीमंत बाळासाहेबांसारख्या अनुभविक संस्थानिकाला समजूं नये व त्यांना आपल्या युवराजांच्या व कारभाऱ्यांच्या हातून हें प्रकरण अशा रीतीनें चिघळूं देण्याला तयार व्हावें, ही खरोखरच खेदाची आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट होय. खुद्द ब्रिटिश हद्दींत बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं सत्याग्रहाचा अवलंब केल्याबरोबर मुंबई सरकारचेही डोळे उघडले आणि सरकारनें त्या प्रकरणाची फेरचौकशी करण्याची तयारी दाखविली. यावरून तरी श्रीमंत मिरजकरांनीं योग्य तो बोध घेतला पाहिजे. एका बाजूनें असंतुष्ट प्रजा व दुसऱ्या बाजूनें असल्या सारावाढीच्या रूपानें रयतेकडून द्रव्यशोषण करण्याचा दुराग्रह धरणारे संस्थानिक असा तंटा लागल्यास त्यांत ब्रिटिश सरकार संस्थानिकांचीच बाजू उचलून धरील अशी आपली कल्पना जर कोणी संस्थानिक करून घेत असतील, तर ते मूर्खांच्या मनोराज्यांत (Fool's paradise) मध्येंच राहात आहेत असें म्हटले पाहिजे.

मिरज संस्थानच्या अधिपतीविरुद्ध कांहींशी कडक, पण आवश्यक टीका करण्याचा प्रसंग आमच्यावर येत आहे, याबद्दल आम्हांस वाईट वाटतें. या विषयाकडे आम्ही गेले दोन महिने सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करीत होतों व आम्हांस अशी आशा वाटत होती कीं, बार्डोलींतील लढ्याचा निकाल अवलोकन करून तरी मिरजेचे अधिपति आपली जबाबदारी व कर्तव्य हीं ओळखून प्रजेला विश्वासांत घेण्याचा व संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतील. परंतु अलीकडे संस्थानच्या सूत्रचालकांनीं प्रजेची मुस्कटदाबी करण्याचे जे अयोग्य प्रयत्न चालविले आहेत, ते पाहिले, म्हणजे वरील आशा निष्फळ ठरणार हें स्पष्ट होतें. संस्थानाविरुद्ध सारावाढीच्या बाबतींत चळवळ करणाऱ्या लोकांची बाजू कितपत बरोबर आहे हें

पाहिल्याखेरीज या चळवळीला जाहीर पाठिंबा देणें बरोबर होणार नाहीं, असेंही आम्हांस वाटत होतें. त्याप्रमाणें आम्हीं या बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेले रिपोर्ट मिळविण्याचा प्रयत्न केला. हे सर्व कागदपत्र पाहिल्यानंतर आमच्याप्रमाणें इतर लोकांचीही अशी खात्री होईल कीं, या सारावाढीच्या प्रकरणांत श्री० बाळासाहेब हे प्रजेवर अन्याय करीत आहेत, व बेजबाबदार ब्रिटिश अधिकाऱ्यांचें अनुकरण करून प्रजेवर कराचा फाजील व असह्य बोजा बसविण्यास प्रवृत्त होत आहेत.

मिरज संस्थानांत पहिली सर्व्हे सेटल्मेंट १८६८ सालीं झाली. त्यानंतर म्हणजे गेल्या सत्तर वर्षांत ही पहिल्यांदाच रिव्हिजन सेटल्मेंट केली जात आहे, ही गोष्ट खरी; पण तेवढ्यानें वाटेल त्या प्रमाणांत सारावाढ करावयास सरकाराला किंवा संस्थानाला अधिकार प्राप्त होतो, असें कोणीही कबूल करणार नाहीं. बंगालमध्यें १७९३ सालापासून कायमधारापद्धति अस्तित्वांत आहे. समजा कीं, ती उद्यां बदलली व सरकारनें सारा वाढविण्याचें ठरविलें. असें झाल्यास गेल्या १३५ वर्षांत सारावाढ केली नाहीं, अशी सबब पुढें करून सरकार चौपटीनें किंवा पांचपटीनें वाढवूं शकेल काय ? असें करणें हें न्याय, नीति, राजकारण व अर्थशास्त्र यांना धरून होईल काय ? हाच न्याय मिरज संस्थानला लागू पडतो. मिरज तालुक्यांतील कांहीं भागांत गेल्या सत्तर वर्षांत रिव्हिजन सेटल्मेंट झाली नाहीं, या सबबीवर कांहीं भागांत शेंकडा ७५ या प्रमाणांत सारा वाढविण्याची सूचना सेटल्मेंट ऑफिसर मि० मोडक यांनीं केली असून, तिची अंमलबजावणी करण्याचा संस्थानचा विचार आहे. पण हें तर्कशास्त्र, नीति व कायदा यांना धरून नाहीं. मूळ १८६८च्या सर्व्हे सेटल्मेंटच्या वेळीं झालेली आकारणीच असह्य व फाजील प्रमाणांत वाढलेली होती, अशी प्रजेची तक्रार आहे. पहिली सर्व्हेच फाजील फुगलेली असल्याकारणानें पुढें कित्येक वर्षें रिव्हिजन सर्व्हे करणें हें संस्थानाला सोयीचें नव्हतें. शिवाय, दुष्काळ–अवर्षण वगैरे कारणांमुळें मिरज तालुक्यांतील प्रजेची स्थिति इतकी वाईट झाली होती कीं, इ०सन १८९८ सालाच्या सुमारास रिव्हिजन सर्व्हे करण्यांत आली असती, तर सारावाढ करण्याऐवजीं, सारा कमी करणेंच अधिकाऱ्यांना न्यायानें वागावयाचें झाल्यास भाग पडलें असतें. या प्रतिकूल परिस्थितीमुळें सारावाढीचा किंवा रिव्हिजन सर्व्हेचा उपद्व्याप संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं केला नाहीं. यानंतर श्री० बाळासाहेब यांनीं सारावाढीच्या अभावाचा

फायदा घेऊन बरीच लोकप्रियता संपादन करण्याचाही प्रयत्न केला. परंतु, आतां त्यांचा वचपा ते भरून काढीत आहेत. कारण एका सपाट्यासरशीं सबंध मिरज तालुक्यांतील सारा सरासरीनं ५६॥ टक्के वाढविण्याचें त्यांनीं ठरविलें असून कांहीं खेडेगांवांत ही वाढ ८० टक्केपर्यंत झाली आहे ! संस्थानचें हें धोरण लँड रेव्हिन्यू कोडाला धरून कसें नाहीं, हें पुढील लेखांकांत निवेदन करूं.

— २ —

बार्डोली तालुक्यांतील सारावाढीच्या अन्यायाविरुद्ध शेतकरीवर्गानें ज्या प्रकारच्या तक्रारी मुंबई सरकारकडे केल्या होत्या, व अखेर शेतकऱ्यांनीं सारा देण्याचें नाकारून करबंदीच्या चळवळीला प्रारंभ केल्यावर ज्या तक्रारींची फेर-चौकशी करणें मुंबई सरकारला भाग पाडलें, त्याच प्रकारची परिस्थिति मिरज तालुक्यांत उत्पन्न झालेली आहे. या दोन्ही ठिकाणच्या सर्व्हे सेटल्मेंटमधील हें साम्य पाहण्यासारखें आहे; इतकेंच नव्हे तर सारावाढीचें वेसुमार प्रमाण मिरजेंत बार्डोलीच्या मानानें दुपटीहून अधिक झालें आहे. बार्डोलींत फक्त वीस टक्के सारावाढ झाली; परंतु मिरजेंत तें प्रमाण ५० टक्क्यांच्या वर गेलें आहे, व कांहीं खेडेगांवांतून तर तें शेंकडा ८० पर्यंत जाऊन पोहोंचणार आहे !! असें असूनही हा सर्व प्रकार लँड रेव्हिन्यू कोडाप्रमाणें आम्ही करीत आहों, असें मिरज संस्थानचे अधिकारी म्हणत आहेत व आपलीं कृत्यें अगदीं कायद्याला धरून आहेत असें भासवीत आहेत !! पण खरी वस्तुस्थिति मात्र निराळी आहे, असें थोड्या विचारांतीं कोणालाही तेव्हांच दिसून येईल. मिरज तालुक्याची सर्व्हे सेटलमेंट लँड रेव्हिन्यू कोडाप्रमाणें झाली, असें भासविण्याकरितां एका अधिकाऱ्याची सरकारकडे मागणी केली. मुंबई सरकारनें ती मागणी मान्य करून मि० डी. एस्. मोडक, एम्. ए., यांना या कामावर नेमिलें, व त्यासाठीं त्यांना एक हजार रुपये जादा भत्ता मिळाला असें कळतें. या कामावर ब्रिटिश अधिकारी नेमला, म्हणजे ब्रिटिश सरकारचें तोंड बंद पडून ब्रिटिश हद्दींतील टीकाकारही स्वस्थ बसतील अशी संस्थानची कल्पना असल्यास न कळे !! पण ब्रिटिश अधिकारी नेमिला तरी त्यानें आपलें काम मात्र ब्रिटिश हद्दींतील लंड रेव्हिन्यू कोडांतील नियमांना अनुसरून केलें पाहिजे, असा थोडाच निर्बंध आहे ! मि० मोडक यांनीं केलेला रिपोर्ट लंड रेव्हिन्यू कोडांतील मूलभूत तत्त्वेंही धाब्यावर बसविणारा आहे. हाच मिरज तालुका ब्रिटिश हद्दींतील भाग असता, तर रा० मोडक यांनीं असा रिपोर्ट कधींही केला नसता; इतकेंच

नव्हे, तर अशा रिपोर्टाबद्दल त्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व कायदे-मंडळांतही चांगलीच कानउघाडणी झाली असती. बार्डोलींतील सेटल्मेंट ऑफिसर मि० एम्. एस्. जयकर यांनीं अशा प्रकारच्या घोड-चुका केल्या तशाच किंवहुना कांहीं बाबतींत त्याहूनही अधिक ढोबळ चुका मि० डी. एस्. मोडक यांच्या रिपोर्टांत पहावयास सांपडतात!! अर्थात् मि० जयकर यांच्या रिपोर्टाची ज्याप्रमाणें फेर-चौकशी होणार आहे, त्याचप्रमाणें मि० मोडक यांच्या रिपोर्टाचीही फेरचौकशी करून, त्यांनीं सुचविलेली अन्याय्य सारावाढ लोकलज्जेस्तव तरी श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांनीं कमी केली पाहिजे.

सेटल्मेंट ऑफिसरनीं लँड रेव्हिन्यू कोड कसें धाब्यावर बसविलें, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हटलें म्हणजे त्यांनीं आपला रिपोर्ट करण्यापूर्वी सर्व खेडेगांवांत जाऊन तेथें शेतकीची प्रत्यक्ष परिस्थिति काय आहे, याचें सूक्ष्म निरीक्षण केलें नाहीं, हें होय. जी सारावाढ आतां पुढें कायमची होणार ती करण्यापूर्वी एकदां तरी सर्व खेडेगांवांची तपासणी करणें हें रेव्हिन्यू अधिकाऱ्यांचें व विशेषतः सेटल्मेंट ऑफिसरांचें कर्तव्य आहे. लँड रेव्हिन्यू कोडानें त्यांच्यावर तशी कायदेशीर जबाबदारी टाकिली आहे. पण बार्डोलीप्रमाणें मिरजेंतही ही जबाबदारी सेटल्-मेंट ऑफिसरांनीं ओळखली नाहीं, असें स्पष्ट म्हणावें लागतें. त्यांनीं लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या नाहींत, व लोकांच्या भरभराटीचें म्हणून जें भडक चित्र त्यांनीं रेखाटलें आहे तेंही वास्तविक नाहीं. कांहीं ठिकाणीं तें अगदीं वस्तुस्थिती-ला सोडून आहे. कोणत्याही तालुक्यांत सारावाढ करतांना कोणत्याही परिस्थितींत वाढीचें कमालीचें प्रमाण ३३ टक्क्यांपेक्षां अधिक होतां कामा नये, असा स्पष्ट हुकूम लँड रेव्हिन्यू कोडाअन्वयें केलेल्या नियमांत अधिकाऱ्यांना करण्यांत आलेला असतांना मि० मोडक यांनीं त्याकडेही पूर्ण दुर्लक्ष केलें!! खरोखर अशा रीतीनें लँड रेव्हिन्यू कोडाचीं मूलभूत तत्त्वेंच धाब्यावर बसावावयाचा मिरज दरबारचा हेतु होता, तर त्यांनीं ही रिव्हिजन सेटल्मेंट करावयास ब्रिटिश अधि-कारी आणण्याचें नाटक करावयाचें कांहींच कारण नव्हतें. संस्थानांतील अधि-काऱ्यांनाही तें सहज करतां आलें असतें!! मिरज तालुका ब्रिटिश हद्दींत असता तर रा० मोडक हे अशी शिफारस करूं शकले असते काय! सेटलमेंट ऑफिसर-नीं लँड रेव्हिन्यू कोड कशा रीतीनें धाब्यावर बसविलें याचे आणखीही एक ढोबळ उदाहरण दाखवितां येईल. लंड रेव्हिन्यू कोडाचें असें एक तत्त्व आहे कीं,

जी सारावाढ करावयाची, ती शेतकीच्या खऱ्या फायद्यावरच अवलंबून असली पाहिजे. जमिनीच्या उत्पन्नांतून शेतकऱ्यांना होणारा निव्वळ फायदा ज्या प्रमाणांत वाढला असेल तेवढ्याच प्रमाणांत सारा वाढविणें हें कायदेशीर ठरेल. ब्रिटिश सरकारला पैशाची फार जरूर आहे, म्हणून सारा दुप्पट वाढवा अशी शिफारस जर एखादा सेटलमेंट ऑफिसर उद्यां करूं पाहील, तर तें लँड रेव्हिन्यू कोडाला धरून होणार नाहीं. सरकारचा खर्च भागवावयास किती रकमेची जरुरी आहे व ती शेतकरीवर्गाकडून सारावाढीच्या रूपानें कशी वसूल करावी, हें ठरविणें हें सेटलमेंट ऑफिसरच्या कार्यक्षेत्रांत येऊं शकत नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, मि० डी. एस्. मोडक यांनीं सारावाढीची शिफारस करतांना शेतकरी वर्गाच्या सामर्थ्यापेक्षां संस्थानच्या गरजांकडेच अधिक लक्ष दिलेलें दिसतें. ते म्हणतातः—

The Miraj State Darbar has to carry out several schemes of utility for the villages of the Taluka, such as water supply, improvement of the administration by giving better pay and living wage to the staff of the Revenue and Police deparments, etc.

यापुढें मिरज दरबार काय करणार आहे याचा विचार करून अधिकाऱ्यांनीं सारावाढ सुचविणें हें लँड रेव्हिन्यू कोडाला धरून नाहीं. अशा रीतीनें ब्रिटिश हद्दींत सारावाढ केली जात नाहीं. शिवाय यापुढें तरी संस्थान उपरोक्त सुधारणा करीलच अशी हमी कोण देणार ? तसेंच मिरज शहरांतील पाणीपुरवठ्याचा बोजा शेतकऱ्यांवर काय म्हणून असेंही विचारतां येईल. संस्थानला शाळा वाढविण्याची इच्छा असेल तर लोकलफंड वाढवावा. रस्ते, वाढविण्याची इच्छा असेल तर टोलनाकीं बसवावीं; पण त्याकरितां कायमची सारावाढ करणें हें कायद्याला धरून नाहीं. मि० मोडक यांनीं लँड रेव्हिन्यू कोडाला धरून शेतकीचा निव्वळ फायदा (Net profits of cultivation) किती वाढला याचेच आंकडे विचारांत घ्यावयाला पाहिजे होते. तसें न करतां (rental) जमिनीच्या खंडाचे आंकडे, व तेही अगदीं त्रोटक व तुटपुंजे आंकडे घेऊन त्यांवर त्यांनीं कमालीच्या सारावाढीच्या शिफारसी केलेल्या आहेत हेंही लँड रेव्हिन्यू कोडाला धरून झालेलें नाहीं. सध्यां हा वाद ब्रिटिश इंडियांत व मुंबई कायदे-कौन्सिलांत चालूं आहे. या वेळीं तरी श्री० बाळासाहेब मिरजकर यांनीं या बाबतींत नाँकरशाहीनें सुचविलेल्या खंडवाढीप्रमाणें (rental) सारावाढ करण्याच्या सूचनेला उचलून धरतां कामा नये, असें आम्हांला वाटतें. जाणूनबुजून त्यांनीं अशा चुकीच्या व वादग्रस्त तत्त्वांना संमति देणें म्हणजे पर्यायानें शेतकरी वर्गाला करबंदीची चळवळ करावयास बेपर्वाईनें आव्हान देण्यासारखेंच आहे.

प्रकरण चौथें

पहिला सत्याग्रह व श्रीमंतांचे शुद्ध विचार

सत्याग्रहाची हकीगत सांगण्यापूर्वी मागील प्रकरणांत उल्लेख केलेल्या लोकपक्षाच्या स्वतंत्र चौकशी कमिटीच्या कामाचा शेवट काय झाला तें सांगणें जरूर आहे. चौकशी कमिटीचे त्रिटणीस या नात्यानें श्री० पुंडलीकजी यांनीं श्री० मोडक यांच्या रिपोर्टांतील माहिती कोठें कोठें चूक आहे व अधिकाऱ्यांनीं लँड रेव्हिन्यू कोडला कोठें व कसें बाजूला सारलें आहे याची माहिती व उतारे काढून ठेविले होते. चौकशीच्या वेळीं लोकांना कोणते प्रश्न विचारावयाचे त्याचेंही टिपण त्यांनीं तयार केलें होतें. त्याचप्रमाणें श्री० मोडकांच्या रिपोर्टींतील परिशिष्टेंही हातांनीं उतरून त्याच्या नकला घेऊन ठेविल्या होत्या. या कामीं डॉ० ना. वि. जोशी यांनीं रात्रीं तीनचार वाजेपर्यंत जागून काम करून मदत केली आहे. खेड्यांतील रयतांना विचारलेली माहिती छापील फॉर्मवर भरून आणविण्याचें काम चालू होतेंच.

परंतु श्रीमंतांनीं डेप्युटेशनची भेट घेण्याचा साधा शिष्टाचारदेखील न पाळल्यामुळें चळवळीला वेगळीच दिशा लागली. सत्याग्रह करून श्रीमंतांच्या दारांत धरणें धरून बसावें व हा सारावाढीचा अन्याय दूर करून घ्यावा आणि तोंपर्यंत या चौकशी-कमिटीचें काम तहकूब ठेवावें, असें ठरल्यामुळें तें काम तितकेंच राहिलें.

सर्व प्रकारचे साधारण उपाय करून पाहिल्यानंतर, अनेक प्रकारचे जुलमी हुकूम कांहीं काळ सहन केल्यानंतर सत्याग्रह करण्यास एक प्रकारचा मनुष्याला हक्क उत्पन्न होत असतो. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां उपयोग करण्याचें सत्याग्रह हें शस्त्र नव्हे. या शस्त्राचा उपयोग करण्याचा हक्क व सामर्थ्य मिरज तालुक्यांतील रयतांनीं मिळविले होतें. ता. ३०।१०।२८ रोजीं श्रीमंतांनीं शिष्टमंडळाला फेटाळून लाविलें त्याच वेळीं ता. ४।११।२८ रोजीं दोनप्रहरीं ११ वाजतां सर्व गांवांतील रयतांनीं सत्याग्रहाकरितां हिराबागेकडे जमावयाचें नक्की ठरलें होतें. ता. ९।११।२८ च्या 'संस्थानी स्वराज्या'च्या अंकांत त्याविषयींची हकीगत आलेली आहे ती या ठिकाणीं देतों:—

"ता. २ व ३ रोजीं श्री० बा. वि. शिखरे यांची प्रकृति बरी नसल्यानें रा० पुंडलीकजी व वे० शा० सं० भट्याशास्त्री वाटवे हे सावळी, तानंग, पाटगांव, करोली, शिरढोण, मळणगांव व कवठेपिराण या खेड्यांतून समक्ष जाऊन तेथील परिस्थिति पाहून आले. शनिवार रात्रींपासूनच मिरजेस लोक जमण्यास सुरुवात झाली. श्री० बोधलेबुवा (कवठेपिराण) हे आपल्याबरोबर अंदाजी १५० मंडळी घेऊन रात्रींच हजर झाले. रविवारीं सकाळीं ९ वाजेपर्यंत कवठेपिराणची आणखी सुमारें १५० मंडळी आली. करोली, शिरढोण, मळणगांव या गांवचे लोकही येण्यास सुरुवात झाली. अकरा वाजतां श्रीमंतांच्या बंगल्याजवळ निरनिराळ्या गांवचे रयत लोक जमण्यास सुरुवात झाली. यावेळीं रा० पुंडलीकजी, भट्याशास्त्री वाटवे व पंडितराव शिखरे इ० मंडळी सर्व मंडळींना शिस्तीनें नेण्याकरितां व बसविण्याकरितां पुढें गेली होती. दोनप्रहरीं बारा-वाजतां सर्व्हेंट ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद व सर्व्हेंट ऑफ इंडिया पत्राचे दुय्यम संपादक श्री० दत्तोपंत आंबेकर यांस घेऊन डॉ० जोशी व श्री० शिखरे दाखल झाले. रा० आंबेकर हे आजच्या प्रसंगीं मुद्दाम आले होते. यावेळपर्यंत रयतांची एकंदर संख्या एकहजारपर्यंत पोंचली होती व निरनिराळ्या गांवांहून लोकांची सारखी रीघ लागली होती. एक दीड वाजेपर्यंत मालगांवचे रा० बाबण्णा घुळी आपल्या गांवच्या मंडळीसह हजर झाले. तीन वाजण्याच्या सुमारास मालगांव, कवठेपिराण, सावळी, तानंग, पाटगांव, करोली, मळणगांव, शिरढोण, शिंदेवाडी, टांकळी, बोलवाड, कवठेगुलंद वगैरे गांवचीं दोन हजारांहून अधिक रयत मंडळी एकत्र झाली. रयत लोक आल्याची वर्दी श्रीमंतांकडे पाठविण्यांत आली. श्रीमंतांनीं पोलिस इन्स्पेक्टर रा० फाटक व पर्सनल क्लार्क रा० दत्तोपंत दप्तरदार यांस 'उद्यां सोमवारीं मी वाड्यांत (गांवांतील किल्यांत) येईन व तेथें भेट घेईन. आज येथून सर्वजण जा' असा निरोप कळविण्याकरितां पाठविलें. आगाऊच आज पुढें होऊन बोलण्याकरितां प्रत्येक गांवचा एकेक पुढारी निवडून काढण्यांत आला होता. सदर प्रतिनिधीनीं 'सरकार आज आम्हां रयतांची भेट घेत नसतील तर आम्ही येथून जाणारच नाहीं. आम्ही चार चार दिवसांच्या भाकरी बरोबर घेऊन आलों आहों'. अशा अर्थाचें उत्तर दिलें. पोलीस इन्स्पेक्टर रा० फाटक व पर्सनल क्लार्क दप्तरदार यांनीं आज लोकांनीं भेटण्याचा आग्रह सोडावा म्हणून आपली शिकस्त केली; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. रा० पुंडलीकजी जवळच

होते. त्यांनाही रा० दप्तरदार यांनीं लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्याबद्दल विनंति केली. परंतु त्यांचाही या बाबतींत सल्ला ऐकण्यास लोक तयार झाले असते कीं नाहीं याचा त्यांनाही विश्वास लागण्यासारखा नव्हता. अखेर कवठे-पिराणचे बोधलेबुवांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, 'आज येथून यांपैकीं कोणीही हालणार नाहीं'.

रा० दप्तरदारः—तुम्ही हें कोणातर्फे सांगतां ?

बोधलेबुवाः—मी सर्वांतर्फे उत्तर देतों.

रा० दप्तरदार यांनीं प्रत्येक गांवचे पुढारी तेथें जे उभे होते त्यांस विचारलें कीं, 'तुम्हांला हे (बोधलेबुवा) म्हणतात तें कबूल आहे काय ?' पुढाऱ्यांनीं उत्तर दिलें, 'हो, कबूल आहे'. बोधलेबुवांना पुन्हा रा० दप्तरदार यांनीं विचारलें कीं, 'तुम्ही आपली जबाबदारी पुरी ओळखून बोलतांना ?' बोधलेबुवा म्हणाले, 'हो. पुरी ओळखतो'. यानंतर बोधलेबुवांना रा० दप्तरदार यांनीं विचारलें कीं, 'या-पासून जर कांहीं त्रास भोगावा लागला तर तो भोगण्यास तयार आहां काय ?' बोधलेबुवांनीं सांगितलें, 'हो, तयार आहे'. इतकें झाल्यानंतर रा० दप्तरदार यांनीं सर्व समुदायास विचारलें कीं, 'हे म्हणतात तें तुम्हां सर्वांस मान्य आहेना ?' सर्वांनीं सांगितलें, 'हो कबूल'. वरील तऱ्हेचीं प्रश्नोत्तरें झाल्यानंतर रा० दप्तरदार यांनीं रा० पुंडलीकजी यांस एकट्यांनाच श्रीमंतांनीं आंत भेटण्यास बोलावल्याचें सांगितलें; परंतु पुढारी मंडळींचा विचार घेतां त्यांनीं एकटेच आंत न जातां जावयाचें तर सर्व पुढारी मंडळींना घेऊनच जावयाचें, असें ठरलें. नंतर श्रीमंतां-नीं प्रत्येक गांवच्या दोन दोन पुढाऱ्यांस आंत भेटण्यास येण्याबद्दल आज्ञा केली व त्याप्रमाणें पुंडलीकजी इतर मंडळीसह आंत गेले. त्यावेळीं श्री० पुंडलीकजींबरोबर परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री० बावणा घुळी, चुनीलालशेठ राठी, कवठेपिराणचे श्री० बोधलेबुवा व माधवराव देशपांडे, तानंगचे रा० कृष्णाप्पा कानडे, पाटगांवचे रा० ज्ञानोबा गणपतराव पाटील, शिरढोणचे रा० ज्ञानोबा जयराम पाटील, करोलीचे रा० आत्माराम इंगवले, सावळीचे रा० विष्णु रामचंद्र मिरजे याप्रमाणें आणखी कांहीं गांवची मंडळी होती. आंत बराच वेळ खाजगी रीतीनें वाटाघाट झाली."

श्रीमंत व श्री० पुंडलीकजी आणि रयतांचे पुढारी यांच्यामध्यें जी वाटाघाट झाली त्याची हकीगत सत्याग्रह कचेरींत दप्तरीं जी आहे ती खालीलप्रमाणें:—

" कांहीं वेळ गेल्यानंतर रा० दप्तरदार पुन्हा बाहेर आले व 'श्रीमंतांनीं पुंडलीकजींना आंत बोलाविलें आहे असें त्यांनीं सांगितलें. परंतु श्री० पुंडलीकजी म्हणाले कीं, मी आज या रयतांचा पुढारी म्हणून येथें आलेला नाहीं. सत्याग्रहाकरितां बरेच लोक या ठिकाणीं जमले असून मी त्यांना शांत व शिस्तींत राखण्याकरितां आलों आहें. म्हणून मला आंत श्रीमंतांच्या भेटीकरितां या सारावाढीच्या किंवा या सत्याग्रहाच्या बाबतींत येतां येणार नाहीं श्री० दप्तरदार पुन्हा श्रीमंतांकडे जाऊन परत बाहेर आले व श्री० पुंडलीकजींना ते म्हणाले कीं, 'जरी तुम्ही आज पुढारी नसलां तरी श्रीमंतांनीं तुम्हालाच आंत बोलाविलें आहे'. त्यानंतर चळवळीमध्यें पुढाकार घेणाऱ्या सर्वांना व पाहुणे मंडळींना एकत्र जमवून श्री० पुंडलीकजींनी श्रीमंतांच्या भेटीस जावें किंवा नाहीं याची वाटाघाट त्या सर्वांशीं केली. शेवटीं प्रत्येक गांवचे दोन दोन प्रतिनिधी बरोबर घेऊन श्रीमंतांच्या भेटीस श्री० पुंडलीकजींनीं जावें असें सर्वांनुमतें ठरलें. त्याप्रमाणें श्री० पुंडलीकजीनीं श्री० दप्तरदार यांना कळविलें. त्यावेळीं हेंही स्पष्टपणें बजाविलें होतें कीं, तेथें माझा जर व्यर्थ अपमान करण्यांत येईल तर मी तेथून उठून लागलाच चालता होईन. प्रत्येक गांवचे एकदोन असे १५।१६ प्रतिनिधी बरोबर घेऊन श्री० पुंडलीकजी हे श्रीमंतांच्या भेटीस आंत वाडयांत गेले. श्रीमंत सरकार खालच्या मजल्यावरच बसले होते. त्यांच्यापाशीं इतर चारपांच मंडळी होती; परंतु त्यांत अधिकारी असें कोणीच नव्हतें. श्रीमंतांना नमस्कार वगैरे केल्यानंतर सर्व मंडळी एका बाजूला बसली व श्रीमंतांच्या समोर श्री० पुंडलीकजी बसले. त्यावेळीं जें संभाषण झालें तें खालीलप्रमाणें आहे:—

श्रीमंत सरकार:—तुमच्याशीं बोलावयास मला कांहींच हरकत वाटत नाहीं. तुमचें घर येथें आहे व तुमचे वडीलही येथेंच रहात होते.

श्री० पुंडलीकजी:—रयत या ठिकाणीं कां जमले आहेत व त्यांची मागणी काय आहें मा आपल्याला त्यांच्यातर्फे सांगूं शकेन. तेवढें काम मी करीन.

श्रीमंत सरकार:—तुम्ही अद्यापि मला जाणलें नाहीं. या रयतांचें अन्न मी खात आहें ही गोष्ट मला चांगली समजते.

श्री० पुंडलीकजी:—या रयतांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, सारावाढीच्या बाबतींत जो अन्याय झाला आहे त्याची चौकशी करावी. त्याकरितां एक कमिटी नेमावी, त्यांत निम्मे सभासद लोकनियुक्त असावेत व निम्मे सरकारनियुक्त असावेत. चौकशीअंतीं जें ठरेल तें मान्य करण्यास रयत तयार आहेत.

श्रीमंत सरकारः—मी असली कमिटी नेमण्यास कधींही तयार होणार नाहीं. मग काय व्हावयाचें असेल तें होईल. मीही तसा निश्चयी आहें.

श्री० पुंडलीकजीः—परंतु हा निश्चय व हट्ट कोणावर ? आपल्याच गरीब रयतांवर करणार काय ? हे रयत आपल्या विरुद्ध वागण्याकरितां येथें आलेले नाहींत; आपली दाद लावून घेण्याकरितां आलेले आहेत.

श्रीमंत सरकारः—कांहीं असलें तरी मी कमिटी नेमणार नाहीं. मी स्वतः चौकशी करीन. वाटल्यास तुम्ही माझ्यावरोबर चला, चौकशी करूं. तुम्ही व मी मिळून चौकशीअंतीं योग्य तो सारा ठरवूं.

श्री० पुंडलीकजीः—माझ्या समजुतीप्रमाणें हा तंटा थोडक्यांत मिटण्यासारखा आहे. आपण व मी मिळून जी चौकशी करावयाची त्यालाच चौकशी-कमिटी असें मानलें म्हणजे झालें.

श्रीमंत सरकारः—तुम्ही त्याला चौकशी-कमिटी म्हणा किंवा कांहींही समजा. मला त्याच्याशीं कर्तव्य नाहीं.

श्री० पुंडलीकजीः—(रयतांच्या प्रतिनिधींना) श्रीमंतांचें म्हणणें आपण आतां ऐकलेच आहे. आपण जी चौकशी कमिटी मागत आहां तशा प्रकारची चौकशी-कमिटी नेमण्यास सरकार तयार नाहींत; पण श्रीमंत सरकार स्वतः व मी मिळून चौकशी करण्यास ते तयार आहेत. आपण त्याला सारावाढ चौकशी-कमिटी मानल्यास त्यांची हरकत नाहीं. आपला जर माझ्यावर विश्वास असेल तर हें कबूल करा. मला वाटतें कीं, आपण हें कबूल करावें.

रयतांचे प्रतिनिधीः—आम्हांला हें कबूल करण्यास हरकत दिसत नाहीं. पण एकवार बाहेरील आमच्या सर्व लोकांस विचारलेलें बरें असें आम्हांस वाटतें.

श्री० पुंडलीकजीः—(श्रीमंत सरकार यांना) मला एक गोष्ट मात्र आपल्यापुढें स्पष्टपणें सांगावयाची आहे ती ही आहे कीं, जर आपण या ठिकाणीं माझ्यापुढें एखादी गोष्ट निश्चितपणें कबूल कराल व नंतर कांहींही सबबीवर त्याप्रमाणे वागणार नाहीं तर मात्र, मी एक लठ्ठ काठी आपल्या हातीं आणून देईन व त्या काठीनें आपण माझें डोकें फोडलें तरी हरकत नाहीं; पण मी हा राजा असत्य भाषण करणारा आहे असें दहा हजार लोकांत उघडपणें बोलल्याशिवाय राहाणार नाहीं. मग त्यांत माझे प्राण खर्ची पडले तरी मला त्याची पर्वा नाहीं.

श्रीमंत सरकारः—तुम्ही मला अद्यापि जाणलेले नाहीं. एकदां मीं एखादी

गोष्ट कबूल केली किंवा ठरविली म्हणजे त्यापासून मी कधींही ढळणार नाहीं.

श्री० पुंडलीकजी:—आनंदाची गोष्ट आहे. मी लोकांना त्याप्रमाणें कळवितों. परंतु आपले शब्द म्हणून मी लोकांना सांगणार असल्यामुळें या ठिकाणीं ते कागदावर लिहून आपल्याला वाचून दाखवितों व तोच कागद मग रयतांना वाचून दाखवीन. रयतांना तो पसंत पडतांच आपली त्यावर सही झाली म्हणजे आजचें काम संपलें. मग लोक आपापल्या घरीं परत जातील.

श्रीमंत सरकार:—मी सही करणार नाहीं. माझ्या शब्दाला किंमत आहे, मी बोललों म्हणजे बोललों. शिवाय तुम्ही देखील या ठिकाणीं कागदावर लिहिण्याचें कारण नाहीं. तुम्ही गांधींच्या आश्रमांत राहातां; तुम्ही खोटें बोलाल काय ? वामणा जा, तुम्ही सांगून या व लोकांना ही गोष्ट पटवून द्या.

श्री० पुंडलीकजी:—आपल्या सहीचा मी आग्रह धरीत नाहीं. आपला शब्द व सही यांत मी फरक करीत नाहीं. आपल्या सहीचा आग्रह न धरण्यास मी रयतांना देखील समजून सांगतों; परंतु आपला निर्णय म्हणून सांगतांना चुकून जर माझ्या तोंडून एखादा शब्द अधिक गेला आणि मी त्यांत आपल्याला 'कमिट' करून ठेविलें तर मात्र माझ्याविषयीं आपला व्यर्थ गैरसमज व्हावयाचा !

श्रीमंत सरकार:—शुद्ध अंत:करणानें तुम्ही माझें म्हणणें लोकांना सांगा आणि तें सांगतांना जर तुम्हीं मला कोठें कमिट करून ठेविलें तर तुमच्याकरितां मी तुमचें म्हणणें खरें करीन हे ध्यानांत ठेवा. जा, वामणा जा. लोकांना समजून सांगा.

श्री० पुंडलीकजी:—तर मग मी लोकांना असें सांगून पहातों कीं, 'श्रीमंत सरकार स्वत: व मी मिळून प्रत्येक गांवांत जाऊन चौकशी करूं व हें चौकशीचें काम पूर्ण होईपर्यंत तरम जाहीर केला जाणार नाहीं'. आणि हें जर लोकांना पसंत पडलें तर त्यांना आपापल्या घरीं जाण्यास सांगतों. मी बाहेर (लोकांमध्यें) जाऊन येतों व आपल्याला काय तें कळवितों.

(श्री० पुंडलीकजी व रयतांचे प्रतिनिधी सर्व बाहेर रयतांच्या समूहांत नंतर निघून आले.) सारावाढीच्या चळवळींत पुढाकार घेणाऱ्या सर्व लोकांना एकत्रित करून श्री० पुंडलीकजींनीं घडलेली सर्व हकीगत सांगितली. 'श्रीमंत सरकार यांचा तसा लेख पाहिजे' असा हट्ट रयतांनीं घेतलेला होता. श्रीमंत आपलें वचन पाळणार नाहींत असें रयत स्पष्टपणें बोलत होते. बाकीच्या इतर गोष्टी त्यांना मान्य झाल्यासारख्याच होत्या. त्या वेळीं श्री० पुंडलीकजी रयतांना उद्देशून म्हणाले:—

"रयत बंधूंनों, मागच्या गोष्टी कांहींही असोत. इतक्या तीनचार हजार लोकांसमक्ष दिलेलें वचन श्रीमंत सरकार मोडणार नाहींत असें मला वाटतें. कांहीं झालें तरी ते आपले राजे आहेत. त्यांच्या शब्दावर आपण असा उघडपणें गैरविश्वास करूं शकत नाहीं. त्यांनीं आपला शब्द दिल्यानंतर त्यांची सहीच घेण्याचा आग्रह आपल्याला शोभत नाहीं. तसा आग्रह धरण्यास मी स्वतः आज तयार नाहीं. ते आपलें वचन पाळीत नाहींत किंवा पाळणार नाहींत असा मला स्वतःला अनुभव आल्याशिवाय, त्यांच्यावर गैरविश्वास करणें मला पाप वाटतें. सहीच्या हट्टाकरितां आपण हा समेट मोडूं नये असें माझें आपल्याला सांगणें आहे. जाहीरनामा आतांच्या आतां छापवून होणें शक्य नाहीं व श्रीमंत सरकार यांनीं एका अर्थीं आपली कमिटीची मागणी मान्य केल्यानंतर तसा जाहीरनामा काढीपर्यंत आपण येथून हालणार नाहीं असा हट्ट धरणें न्याय्य असलें तरी व्यवहार्य नाहीं. आणि इतक्या उपर जर श्रीमंत सरकार आपल्या शब्दाच्या मागें जातील तर या सारावाढीच्या लढ्याची कड पोचविण्यास मी आपल्याबरोबर शेवटपर्यंत राहीन एवढें सांगून ठेवितों."

एक वृद्ध रयतः—अहो पुंडलीकजी, तुम्ही म्हणतां तें सर्व खरें असलें तरी आम्हांला या सर्व प्रकारावर बिनधोक विश्वास ठेवण्याचें धाडस होत नाहीं. निदान एवढें तरी करा कीं, श्रीमंतांना आमच्यामध्यें येथें येऊन सर्वांसमक्ष बोलावयास तरी सांगा आणि त्यांचें म्हणणें काय आहे तें पुन्हा एकवार आम्हाला समजून सांगा.

श्री० पुंडलीकजीः—श्रीमंतांचें म्हणणें काय आहे तें मी आपल्यादेखत येथें कागदावरच लिहितों. नंतर तोच कागद पुन्हा श्रीमंतांना वाचून दाखवितों व पक्कें करून घेतों.

(नंतर सर्व पुढाऱ्यांमध्यें बसून श्री० पुंडलीकजींनीं श्रीमंतांचें म्हणणें एका कागदावर लिहून काढलें. तें श्री० शिखरे, डॉ० जोशी, श्री० दत्तोपंत आंबेकर श्री० बाबणा घुळी व इतर मंडळींना दाखविलें आणि पुन्हा सर्व लोकांना वाचून दाखवून श्री० पुंडलीकजी तो कागद घेऊन श्रीमंतांकडे गेले.)

श्री० पुंडलीकजीः—(श्रीमंत सरकार यांना) मीं लोकांची समजूत घातली आहे. आपल्या सहीची आवश्यकता नाहीं. रयत आपल्या शब्दावर विश्वास ठेवण्यास तयार झाले आहेत. सहीचा आग्रह कां सोडला पाहिजे हें मीं त्यांना सांगितलें

आहे. मीं रयतांना जी गोष्ट सांगितली आहे ती या कागदावर लिहून काढून तीच रयतांना पुन्हा वाचून दाखविली आहे. आपण हा कागद पाहा. (श्रीमंतांना तो कागद दाखविला.) तो कागद असा आहेः—"**श्रीमंत सरकार स्वतः व श्री० पुंडलीकजी मिळून प्रत्येक खेड्यांत जाऊन चौकशी करतील आणि या चौकशीचें काम पूर्ण झाल्यानंतरच आकार (तरम) जाहीर करण्यांत येईल.**"

श्रीमंत सरकारः—ठीक आहे. मग लोकांची समजूत पटली आहे तर! आतां लोकांना घरोघर जाण्यास सांगा.

श्री० पुंडलीकजीः—पण ही गोष्ट आपण स्वतः रयतांमध्यें जाऊन त्यांना आपल्या मुखानें समजून सांगितली पाहिजे. म्हणजे नंतर लोक आपापल्या घराकडे निघून जातील.

श्रीमंत सरकारः—मीं साठ वर्षांत तरम वाढविलेला नाहीं. इतर ठिकाणीं आतांपर्यंत दोनदोन तीनतीन सर्व्हे होऊन गेलेल्या आहेत. प्रत्येक सर्व्हेला मला २५ टक्के तरी द्याल!

श्री० पुंडलीकजीः—पण साठ वर्षांपूर्वीच एकदम इतका तरम वाढविलेला आहे कीं, इतर ठिकाणीं दोनदोन सर्व्हे होऊन देखील अद्यापि आपल्याइतका तरम वाढला गेला नाहीं याची वाट काय! आपल्या येथील रयत साठ वर्षांपासून इतका जबर तरम भरत आले आहेत!

श्रीमंत सरकारः—साठ वर्षांपूर्वी झालेल्या वाढीची जबाबदारी माझ्यावर कशी पडूं शकेल!

श्री० पुंडलीकजीः—मी ती जबाबदारी आपल्यावर टाकू इच्छीत नाहीं; परंतु साठ वर्षें तरम न वाढविण्यांत लोकांवर मोठासा अनुग्रह झाला आहे असें मुळींच नाहीं. शिवाय आजपर्यंत न वाढविल्याचा 'वचपा' जर काढला तर न वाढविल्याचें श्रेय काय शिल्लक राहिले! शिवाय श्री० मोडक व त्यांची पार्टी आणि येथील अधिकारी यांनीं या सारावाढीच्या बाबतींत अत्यंत अन्याय केलेला आहे. एकच उदाहरण अगदीं साधें देतो म्हणजे आपल्या ध्यानांत येईल. दहा दिवसांत पांच जाहीरनामे अधिकाऱ्यांनीं प्रसिद्ध केलेले आहेत! ज्या दिवशीं तक्रारी अर्जाला एक महिन्याची मुदत रयतांना दिली आहे त्याच दिवशीं मुदत संपल्याचा जाहीरनामा अधिकाऱ्यांनीं काढलेला आहे. शिवाय हे पांच जाहीरनामे पुढें कधींतरी

एकदम एकाच दिवशीं खेड्यांमधून चावडीवर लाविलेले आहेत असें कळतें. या अन्यायाची दाद आपण घ्यावयाची नाहीं तर कोणीं घ्यावयाची ? असो. आपण आतां बाहेर रयतांमध्यें येतां ना ?

श्रीमंत सरकारः—पण मी बाहेर येऊन आपलें ठरल्याप्रमाणें बोलल्यानंतर सर्व लोकांनीं संतुष्ट होऊन आपापल्या घरीं गेलें पाहिजे. पुन्हा 'जात नाहीं' असा हट्ट धरून रयत बसतील तर मग तें मला खपणार नाहीं. जा. त्याला लोक तयार आहेत कीं नाहींत पुन्हा एकवार पाहून या.

श्री० पुंडलीकजीः—आपली भावना व इच्छा बरोबर आहे. त्याचा अर्थ मी जाणतों. कमिटीची मागणी मान्य केल्याचें आपण आपल्या मुखानें लोकांना सांगितल्यानंतर, लोकांनीं आपला मान राखून घरीं परत गेलें पाहिजे. मी तशी व्यवस्था करून नंतरच आपल्याला बोलावण्यास येतों.

(नंतर श्री० पुंडलीकजी रयतांच्या पुढाऱ्यांना भेटून सर्व गोष्टींचा खुलासा झाल्यानंतर सर्व रयतांना तसें सांगण्यांत आलें. आणि नंतर श्रीमंतांना बोलावून आणण्यास श्री० पुंडलीकजी गेले.)

श्री० पुंडलीकजीः—(श्रीमंत सरकार यांस) आपण येण्यास हरकत नाहीं. सर्व व्यवस्था मी करून आलों आहें.

नंतर श्रीमंत सरकार पायीं चालत येऊन सर्व रयतांसमोर उभे राहिले. लोकांना शांत करतांना श्री० पुंडलीकजी म्हणालेः—

" रयतांनों शांत व्हा व गलबला बंद करा. श्रीमंतांचे शब्द सर्वांना स्पष्टपणें ऐकूं जाण्याकरितां आपण गलबला एकदम बंद केला पाहिजे. नाहींतर तीनचार हजार लोकांना त्यांचा शब्द ऐकूं जाण्यास त्यांना फारच मोठ्याने बोलावें लागेल. श्रीमंतांचें म्हणणें मी आपल्याला आतांच वाचून समजून दिलें आहे तेंच पुन्हा एकवार श्रीमंतांच्या समक्ष वाचून दाखवितों.

" श्रीमंत सरकार स्वतः व श्री० पुंडलीकजी मिळून प्रत्येक गांवांत जाऊन चौकशी करतील व या चौकशीचें काम पूर्ण झाल्यानंतर आकार (तरम) प्रसिद्ध केलें जाईल."

त्यानंतर श्रीमंत सरकार म्हणालेः—

" आतांच पुंडलीकजींनीं वाचून दाखविल्याप्रमाणें मी व पुंडलीकजी मिळून आपल्या गांवीं येऊन चौकशी करूं व अन्याय दूर करूं. त्यानंतरच

आकार प्रसिद्ध करूं. तुम्ही काळजी करूं नका. आतां आपापल्या घरीं जा. पुन्हा येथपर्यंत येण्याचा त्रास घेऊं नका."

यानंतर लोक श्रीमंतांचा फोटो मागूं लागले. त्यावेळीं श्रीमंत म्हणाले:—

"फोटो इतक्यांत देत नाहीं. सर्व चौकशी संपून भानगड मिटली म्हणजेच फोटो देईन."

श्री० पुंडलीकजी:—(लोकांना उद्देशून) श्रीमंत सरकार सांगत आहेत त्यांत एक महत्त्वाचें तत्त्व आहे. सर्व प्रकरण मिटल्यावरच त्यांचा फोटो घ्यावा. आतांच फोटोचा आग्रह धरूं नका. केवळ चौकशी करावयाचें ठरलें म्हणजे कांहीं सारावाढ कमी झाली असें समजूं नका.

इतका प्रकार झाल्यानंतर सर्व रयतांना आपल्या घराकडे जाण्याकरितां सांगून श्री० पुंडलीकजी म्हणाले:—" आज येथें काम संपलें नसून कामाला खरी सुरुवात येथून झाली आहे. श्रीमंत सरकार व मी आपल्या गांवीं चौकशीला येऊं, त्यावेळीं आपापला पुरावा व कागदपत्र तयार ठेवा. आतां व्यर्थ वेळ घालवूं नका."

सर्व रयत धरणें धरलेलें उठून आपापल्या गांवीं जाण्याकरितां निघाले.

* * * *

सर्व रयत निघून गेल्यानंतर श्री० पुंडलीकजी श्रीमंत सरकार यांचा निरोप घेण्याकरितां पुन्हा वाडयांत गेले, त्यावेळीं श्रीमंत सरकार म्हणाले:—कांहीं चहा, कॉफी, दूध घेतां काय !

श्री० पुंडलीकजी:—नाहीं. एकदां हें सारावाढीचें अनिष्ट प्रकरण माझ्या मध्यस्थीने नीट मिटेल व आपली आणि रयतांची पूर्णपणें दिलजमाई होईल त्याच वेळीं आपल्याकडे येऊन मी दूध घेईन; तोंपर्यंत नको.

श्रीमंत सरकार:—ठीक आहे. मग आपल्याघरीं श्रीराघवेंद्र स्वामींचा प्रसाद घेऊं

श्री० पुंडलीकजी:—मीं मघांशीं वाचून दाखविलेल्या कागदाची नक्कल करून घेण्यास कोणासतरी आपण सांगावें किंवा मीच नक्कल काढून देईन.

श्रीमंत सरकार:—नकलेची आवश्यकता नाहीं. त्या कागदांत तुम्ही फरक करणार नाहीं असा माझा विश्वास आहे. तुमच्या तोंडाला काळें फासावयाचें माझ्या मनांत येईल तर प्रथम मला माझ्या हाताला काळें फांसून घ्यावें लागेल.

श्री० पुंडलीकजी:—इतक्यांत माझ्यावर इतका कशाला विश्वास टाकतां !

माझा व आपला परिचय होऊं द्या व मग विश्वास टाका. आपल्या विश्वासाला मी पात्र झालों तर मला त्यांत अत्यंत आनंदच वाटेल.

श्रीमंत सरकार:—तुम्ही या पूर्वीच स्वतः माझ्याकडे आलां असतां तरी काम झालें असतें.

श्री० पुंडलीकजी:—शिष्टमंडळांत मी होतों व आपण मंडळाची भेट घेतली नाहीं. तेव्हां मी स्वतंत्रपणें आपल्याकडे आल्यास माझी भेट आपण घ्याल किंवा नाहीं याची मला शंका वाटल्यामुळें मी आपल्याकडे आलों नाहीं.

श्रीमंत सरकार:—मला भेटण्याच्या योग्यतेचा मनुष्य असल्याशिवाय मी भेटत नाहीं. तुम्हाला गम्मत दाखवूं काय ? दप्तरदार, ती वही आणा पाहूं.

(यानंतर एका छोट्या वहींतील संवाद श्रीमंत सरकार यांनीं पुंडलीकजींना दाखविला. तो खासगी असल्यामुळें त्याची माहिती देऊन ती जाहीर करण्याचें श्री० पुंडलीकजींनीं नाकारलें म्हणून तो संवाद या ठिकाणीं देतां आला नाहीं.

या सत्याग्रहाविषयीं मद्रासच्या 'New India'मध्यें खालीलप्रमाणें मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

" * * * Finding that the raiyats meant business, their duly accredited representatives were called into the chief's presence, where a prolonged discussion as to terms of settlement took place, the chief eventually promising an inqiry by a Committee, consisting of himself and Mr. Pundlikji, the raiyat's representative. Having as they said, not a very reassuring experience of the Chief's oral promises so far, they asked for a written assurance to that effect, but as a result of the leader's persuations were prevailed upon to accept what was offered as an indication of the Chief's *bona-fides*. The Chief ultimately appeared before the crowd and repeated the assurance given to their representatives privately. This had already been

reduced to writing and was read out by Mr. Pundlik to the assembled raiyats in the Chief's presence. The statement gave an assurance that the chief and Mr. Pundlik would visit their villages and make inquiries on the spot and that not only the enhanced land revenue would not be collected, but even enhanced individual assessment would not be notified until the committee's labours were over. This pacified the discentonted raiyats who included people of all communities, Brahmins, Non-Brahmins, Mohamedans & submerged classes, and who had provided themselves with four day's food supply in case the negotiations should drag on."

श्रीमंतांच्या या थोरपणाबद्दल रयतांना खरोखरच आनंद झाला. या संस्थानांत अद्यापि थोडी कां होईना; दाद लागूं शकते असें लोकांना वाटलें असल्यास नवल नाहीं. श्रीमंतांचें अभिनंदन खालील पत्रकानें करण्यांत आलें होतें:—

मिरज संस्थानांतील सारावाढ

श्रीमंतांचें अभिनंदनीय अभिवचन

या सारावाढीच्या चळवळीचा त्रोटक अहवाल मिरज संस्थान-प्रजापरिषदेच्या चौथ्या अधिवेशनाच्या रिपोर्टांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यापुढील या चळवळीचा विस्तार या चळवळीशीं संबंध असणाऱ्या व या चळवळींत काम करणाऱ्या मंडळींना अवगतच आहे. मंगळवार, ता. ३० आक्टोबर रोजीं प्रजा-परिषदेचें डेप्युटेशन श्रीमंत सरकार बाळासाहेब यांच्याकडे जाऊन आपल्या रयतेचें या बाबतींतिल गाऱ्हाणें थोड्याफार प्रमाणांत दूर होईल अशी अपेक्षा होती. परंतु दुर्दैवानें ती खोटी ठरली ! परमेश्वर व आपले सरकार एकप्रकारें आपली कसोटीच पाहात बसले कीं काय असा संशयही क्षणभर मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. हा संशयच रयतेमध्यें एक जूट करून, धैर्यानें, शांतपणानें व सत्याला स्मरून आपल्या सरकारांच्या पुढें आपलें म्हणणें पुन्हा एकवार मांडण्यास कारणीभूत झाला असेल असें वाटतें. ता. ३० रोजीं डेप्युटेशनची सरकार भेट घेत नाहींत,

असें सदर दिवशीं गांवोगांवच्या येथें हजर असलेल्या रयतांस समजून आल्यानंतर त्याच दिवशीं रयतांनीं रविवार ता. ४ नोव्हेंबर रोजीं सरकारांच्या चरणांजवळ धरणें घेऊन बसण्याचा निर्धार केला. यास अनुसरून रविवार, ता. ४ रोजीं कवठेपिराण, मालगांव, करोली, तानंग, पाटगांव, सिरढोण, सावळी, मळणगांव, टाकळी, बोलवाड, सिद्देवाडी, कवठेगुलंद वगैरे गांवची रयत मंडळी अपेक्षेबाहेर हिरावागेनजांक एकत्र झाली. प्रत्येकानें आपण चारसहा दिवस बसण्याचा प्रसंग आला तरी आपल्या सरकारांच्या चरणांजवळ बसून आपलें गाऱ्हाणें दूर करून घेण्याचा जवळ जवळ संकल्पच केला होता कीं काय असें त्यांच्या तयारीवरून दिसून आलें. प्रारंभीं एक हजार लोक येतील असा अंदाज; परंतु सर्व मिळून अडीच हजारांहून अधिक लोक जमा झाले. हा सर्व देखावा पाहून सरकारनीं या प्रसंगीं जी दयार्द्रता दाखविली ती केव्हांही प्रशंसनीयच समजली जाईल व अर्वाचीन इतिहासांत ही गोष्ट नमूद होऊन राहील यांत संशय नाहीं. सरकार व श्री० पुंडलीकजी आणि प्रत्येक खेड्याची दोन दोन रयत पुढारी मंडळी यांच्यामध्यें सोकळेपणानें वाटाघाट होऊन सरकारांच्या समक्ष, सरकारचें म्हणून आश्वासन श्री० पुंडलीकजींनीं सर्वांना ऐकूं जाईल अशा मोठ्या आवाजांत वाचून दाखविले, तें खालीलप्रमाणें आहे.

"श्रीमंत सरकार स्वतः व श्री० पुंडलीकजी मिळून प्रत्येक गांवांत जाऊन या सारावाढीच्या बाबतींत चौकशी करूं. चौकशीचें काम पूर्ण झाल्यानंतर आकारबंद (तरम) प्रसिद्ध करूं." स्वतः सरकारांनीं याचवेळीं याच अर्थाचें भाषण करून जमलेल्या सर्व मंडळीस अभिवचन दिले.

आजच्या घटकेस या सारावाढीच्या चळवळींतील एक मागणी श्रीमंत सरकारनीं वरीलप्रमाणें मान्य केली आहे, याबद्दल श्रीमंत सरकारचे आम्ही फार आभारी आहों. व याबद्दल श्रीमंतांचे आम्हो अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों.

यापुढें सर्व गांवच्या रयतांनीं आपली बाजू सरकार व पुंडलीकजी या उभयतांच्या पुढें व्यववस्थेशीर मांडण्याकडे आपलें संपूर्ण लक्ष पोंचविणें जरूर आहे व तसें तें त्यांनीं पोंचवावें व आपलें गाऱ्हाणें वस्तुस्थिति व सत्याच्या पायावरच रचलेलें असल्याबद्दलची खात्री करून द्यावी, अशी सर्व रयतबंधूस आमची प्रार्थना आहे.

बाळकृष्ण विठ्ठल शिखरे.
नारायण विष्णु जोशी.
चिटणीस, मिरज संस्थान-प्रजापरिषद्.

मिश्र-कमिटी नेमण्याची मिरज संस्थान-प्रजापरिषदेची मागणी श्रीमंतांनीं मान्य केली असल्यामुळें मिरज संस्थान-प्रजापरिषदेच्या चिटणिसांनीं वरीलप्रमाणें जाहीरपत्रक काढून श्रीमंतांचें अभिनंदन केलें व भावी चौकशीची तयारी करण्यास लोकांना इषारत दिली. ता. ६।११।२८ च्या ज्ञानप्रकाशमध्यें या पत्राच्या खास बातमीदारानें खालीलप्रमाणें लिहिलें आहेः—

"बार्डोलीवर सरशी"

"ॐ ॐ ॐ याप्रमाणें कसल्याही प्रकारचा तंटाबखेडा न होतां शेतकऱ्यांच्या मिरजेवरील या मोहिमेचा शेवट झाला. याचें पुष्कळसें श्रेय शेतकऱ्यांचा निर्धार, चिकाटी व निर्भयपणा यांसच देणें जरूर आहे. परंतु तो दिसून आल्यानंतर श्रीमंतांनीं आपला पूर्वीचा बेमुर्वतखोरपणा सोडून सामोपचारानें हें प्रकरण मिटविण्याची मुत्सद्देगिरी दाखविली याबद्दल तेही स्तुतीस पात्र नाहींत असें कोण म्हणेल ? परंतु ही श्रेयविभागणी एका बाजूस ठेविली तरी शेतकऱ्यांचा या बाबतींत पूर्ण जय झाला ही गोष्ट खास. आणि तीबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. मिरज व बार्डोली येथील चळवळी अगदीं एका स्वरूपाच्या आहेत. बार्डोलीस होणारी चौकशी सरकारी अधिकाऱ्यांची होणार आहे तर मिरजेंतील चौकशी प्रजापरिषदेंतील एक प्रमुख कार्यकर्ते व शेतकऱ्यांचे कैवारी श्री० पुंडलीकजी यांना श्रीमंत बाळासाहेबांनीं आपल्या बरोबरीचा दर्जा आपण होऊन दिलेला आहे ही समाधानाची गोष्ट आहे आणि या दृष्टीनें पाहतां बार्डोलीपेक्षां सुद्धां मिरजसारख्या मागासलेल्या संस्थानांतील शेतकऱ्यांच्या चळवळीस आलेल्या यशाची किंमत निःसंशय जास्त आहे. चौकशी पुरी झाल्याशिवाय सारावसुली होणार नसल्यामुळें चौकशीस लवकरच प्रारंभ होईल असा अंदाज आहे."

Servant of India, नवाकाळ, प्रबोध, वैनतेय, तरुण भारत, वगैरे पत्रांतून अशाच आशयाचा मजकूर आला होता. हे उतारे देण्याचा उद्देश हें दाखविण्याचा आहे कीं, बाहेरचे वर्तमानपत्रकार व स्थानिक कार्यकर्ते या सर्वांचीच कल्पना हा झगडा आतां मिटला असून अन्याय दूर झाल्याशिवाय आतां रहात नाहीं अशीच होती. कांहीं रयतांना व श्री० बा. वि. शिखरे यांना मात्र श्रीमंत वचन पाळतीलच अशी खात्री नव्हती. खरोखरच इतक्यावर हा लढा मिटला असता तर 'सोन्यापेक्षां पिवळें' झालें असतें. यापुढें गोष्टी विकोपाला पुन्हा

जातील अशी कोणासच कल्पना नव्हती. नाहीं म्हणावयास सातारच्या 'समर्थ' पत्रानें मात्र मिरजेच्या रयतांना आपल्या ता. १२।११।२८ च्या अंकांत योग्य इषारा देऊन ठेविला आहे. 'समर्थां'च्या अचूक निदानाबद्दल त्याची तारीफ केलीच पाहिजे. तो इषारा असा आहेः—

" श्रीमंतांच्या कानाचा चावा घेणारे लाळघोटे लोक श्रीमंतांची ही सद्बुद्धि किती दिवस टिकूं देतात, पहावें. खुद्द श्रीमंत व धुंडलीकजी ह्या उभयतांनीं सारावाढीच्या अन्यायाची चौकशी करण्याचें ठरविलें असलें तरी एवढ्यानें मिरजेच्या शेतकऱ्यांपुढील प्रश्न मिटतो असें त्यांनीं समजूं नये. कारण या चौकशींचें खरें फळ त्यांचे पदरांत पडण्याचे मार्गांत कितीतरी अडथळे आहेत मिरजेंतच हे अडथळे आहेत असें नव्हे तर जेथें जेथें म्हणून राजाच्या अन्याया-विरुद्ध चळवळ करावी लागते, तेथें तेथें हे अडथळे आहेत.

[१] पहिला अडथळा इज्जतीचा. 'आम्ही राजे, आम्ही शहाणे, आम्हीं केलेली गोष्ट अन्यायाची कशी असेल आणि जरी यद्यपि अन्यायाची असली तरी वाटेल त्या फुकट्या लोकांनीं त्याविरुद्ध चळवळ करावी म्हणजे झालें ! असल्या फुकट्या लोकांच्या हुलकावणीला आम्ही भीक घालूं कीं काय ? असली खोटी इज्जतीची कल्पना प्रत्येक राजाचे ठिकाणीं अगर राज्ययंत्राचे ठिकाणीं दिसून येते. वास्तविक जो जो म्हणून जिवंत मनुष्य आहे त्याला त्याला कोणताही प्रतिकार करण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. अन्यायाविरुद्ध चळवळ करणारा मनुष्य फुकट्या आहे का विकत्या आहे हें पाहण्याचें कारणच नाहीं. मूळ अन्याय झाला आहे किंवा नाहीं हाच खरा महत्त्वाचा प्रश्न असतो; पण इज्जतीच्या खोट्या कल्पनेनें डोकें भणाणलें म्हणजे मनुष्य अंध होतो. तेव्हां इज्जतीचा हा खडक सहजासहजीं नाहींसा होईल अशी शेतकऱ्यांनीं समजूत करून घेऊं नये.

[२] दुसरा अडथळा लाळघोटे व हांजीखोर लोकांचा. राजानें कोणतीही चांगली अगर वाईट गोष्ट करावयाची असो, तिचें उदक लाळघोट्या झारींतूनच पडलें पाहिजे, असें त्यांना वाटत असतें आणि तसें झालें तर हे लोक आयत्या-वेळीं झारीच्या तोंडाशीं येऊन बसण्यास कमी करीत नाहींत.

[३] तिसरा अडथळा लब्धप्रतिष्ठित पुढाऱ्यांचा. यांना अन्यायाची जाणीव नसते असें नाहीं; पण राजाचा कल पाहून व आपल्या बुद्धिचातुर्यानें हळुहळू या अन्यायाची जाणीव राजाला करून देऊन त्याचेकडून थोडथोडा अन्याय दूर

करविण्याचा मुत्सद्दी मार्ग त्यांना पसंत असतो व त्यामुळें अन्यायाचें खरें उच्चाटण होण्याच्या कामांत या बड्या मुत्सद्द्यांचा अडथळाच होतो.

[४] चौथा अडथळा खुद्द ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांनाच आपण कडेपर्यंत प्रतिकार करूं शकूं कीं नाहीं हा आत्मविश्वास नसतो. हा आत्मविश्वासाचा अभाव वरील तिन्ही अडथळ्यांना डोईजड करतो. कोणत्याही राज्यघटनेंतील अन्यायाविरुद्ध प्रतिकार करतांना वरील चार अडथळे येत असतात.

मिरजेच्या सारावाढीच्या अन्यायाची चौकशी करण्याचें खुद्द श्रीमंतांनीं कबूल केलें असलें तरी वरील अडथळे शेवटपर्यंत त्यांच्या पदरांत यशाचें माप पडूं देतील कीं नाहीं याची शंका वाटते. हे अडथळे नाहींसे करण्याचा एकच धोपट मार्ग आहे. सारावाढीच्या प्रकरणांत बावनकशी अन्याय झाला आहे, याचें पुराव्यानिशीं भरपूर माप श्रीमंतांच्या पदरांत टाकणें व खुद्द श्रीमंतांची– इतर बगलबच्चांची नव्हे–या अन्यायाबद्दल खात्री करणें. मिरजेच्या शेतकऱ्यांना खुद्द श्रीमंतांची अशी खात्री करून जर देतां आली नाहीं अगर खुद्द श्रीमंतांनीं अशी खात्री करून घेतली नाहीं, तर श्रीमंतांच्या औदार्यामुळें म्हणा, लाळघोट्यांच्या कावेबाजपणामुळें म्हणा, किंवा बड्या प्रतिष्ठितांच्या मुत्सद्देगिरीमुळें म्हणा, या अन्यायाची तीव्रता थोडी कमी केल्यासारखी दाखविली गेली अगर हें प्रकरण लांबणीवर टाकलें गेलें तरी आज ना उद्यां हें सारावाढीचें पिशाच पुन्हा शेतकऱ्यांच्या मानगुटीला बसल्याखेरीज राहाणार नाहीं. अन्यायाची खरी जाणीव व अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याचा आत्मविश्वास याच गोष्टी शेतकऱ्यांच्या पुढील प्रश्न सोडविण्यास खऱ्या उपयोगीं पडतील."

'समर्थां'नें दिलेली ही इषारत अत्यंत मननीय आहे असें कोण म्हणणार नाहीं ! जणुं काय पुढील सर्व चळवळींचें भविष्य या लेखांत 'समर्थां'ने लिहिले आहे असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं. या सारावाढीच्या चळवळीचा इतिहास वाचक जसजसे वाचत जातील तसतशी आमच्या या वरील विधानाची सत्यता त्यांना पटत जाईल. 'समर्थ' साताऱ्याकडील दऱ्याखोऱ्यांमधून रहात असला तरी संस्थानी राजकारणांत अगदीं मुरलेल्या व अनुभवी मनुष्याप्रमाणें त्यानें इषारत देण्याचें काम केलें आहे.

प्रकरण पांचवें

वकिलांचा बळी

अर्थात्

श्रीमंतांच्या वचनभंगाची तयारी !

श्रीमंत सरकार यांच्या वचनानुसार आतां चौकशीचें काम सुरू होणार, या कल्पनेनें मिरज संस्थान प्रजा-परिषदेच्या कार्यकारी-मंडळानें जी लोक-पक्षाची स्वतंत्र चौकशी कमिटी नेमिली होती व सत्याग्रहामुळें जिचें काम तहकूब ठेविलें होतें, त्या चौकशीची आतां गरजच न राहिल्यामुळे ती कमिटी विसर्जन केली गेली.

श्री० पुंडलीकजी यांना सत्याग्रहाच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ५।११।२८ रोजीं तिसऱ्या प्रहरीं श्रीमंत सरकार यांनीं बोलावून नेऊन चौकशीला जाण्याची पूर्वतयारी करण्यास सांगितलें. श्री० दप्तरदार, श्री० बागलकोटे, व श्री० घोरपडे मामलेदार यांच्याकडून जरूर ती माहिती व आवश्यक ते सर्व कागदपत्र पाहण्यास श्री० पुंडलीकजींना श्रीमंतांनीं सांगितले. त्यावेळीं श्रीमंत म्हणाले:—**दोन तीन गांवांवर मुद्दाम आकसानें अन्याय केला गेला आहे.** कांहीं गांवांतून आपण जाऊं व कांहीं गांवांतील लोकांना हिराबागेंतच बोलावून आणूं आणि हें काम संपवून टाकू. तुम्ही सर्व कागदपत्र पाहून टिपणें करून ठेवा.

श्री० पुंडलीकजी:—आपल्या आश्वासनाप्रमाणें प्रत्येक गांवाला जावें लागेल. मग चार दिवस अधिक लागले तरी त्याला इलाज नाहीं. मी कागद पाहून ठेवितों.

इतकें बोलून श्रीमंत मोटारींतून निघून गेले व पुंडलीकजी सारावाढीचे कागद घेण्याकरितां श्री० घोरपडे मामलेदार यांच्याबरोबर ऑफिसकडे गेले. परंतु कोणते कागद मला द्यावेत, कोणते कागद देऊं नयेत, याबद्दल श्री० घोरपडे वगैरेंनीं वाद उपस्थित केला. सारावाढीचा मोडकांचा रिपोर्ट व त्याचीं परिशिष्टें मला दाखविण्यास ते तयार होते; परंतु हा रिपोर्ट श्री० मोडक यांनीं ज्या माहितीवरून केला होता तीं जीं पत्रकें होतीं तीं मूळ पत्रकें मला दाखविण्यास श्री० घोरपडे तयार किंवा राजी होईनात ! हा वाद पुन्हा श्रीमंतांपर्यंत न्यावयाचा ठरवून श्री०

पुंडलीकजी त्या दिवशीं घराकडे निघून आले. त्याशिवाय त्यांनीं दुसरा असा एक सवाल उपस्थित केला कीं, कागद श्री० पुंडलीकजींच्या घरीं दिले जाणार नाहींत. 'एकट्याला लवकर काम आटोपणार नाहीं, तेव्हां आणखी दोन माणसें मदतीला घेऊन मी लवकर काम संपवीन'. असें श्री० पुंडलीकजींनीं सांगतांच 'श्रीमंतांनीं आपल्याशिवाय इतरांना कागदपत्र दाखविण्यास आम्हांला हुकूम दिलेला नाहीं'. असें नवीनच एक सोंग उपस्थित करून कागदपत्र कोणाकोणाला दाखवावयाचे नाहींत हाच एक वादविषय श्री० घोरपडे वगैरे मंडळींनीं करून ठेविला. हे अडथळे पाहून 'समर्थ' पत्रानें दिलेल्या इषारतीची आठवण झाल्याशिवाय कशी राहील ? दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्री० पुंडलीकजी हे पुन्हा सर्व गोष्टींचा खुलासा करून घेण्याकरितां श्रीमंत सरकार यांच्याकडे गेले. त्यांची भेट झाली त्या वेळीं खालील-प्रमाणें संवाद झाला होता.

श्री० पुंडलीकजी:—सारावाढीच्या चौकशीच्या बाबतींत मी एकदां सर्व गोष्टींचा खुलासा करून घेण्याकरितां आलों आहें. त्याचप्रमाणें एकदां Line of inquiry ठरवून टाकिली म्हणजे बरें होईल.

श्रीमंत सरकार:—तुम्ही अजून मला ओळखीत नाहीं. मी एकदां तुमच्यावर सर्व सोंपविलें आहे. **तुम्ही वाटेल ती सारावाढ कायम करा. वाटल्यास अजीबात वाढवूं नका, किंवा वाटल्यास यापेक्षांही अधिक वाढवा. तुम्ही जो कागद तयार करून आणाल त्यावर मीं सही करण्याचें ठरविलें आहे व एकदां मीं ठरविलें म्हणजे त्यांत मुळींच बदल होणार नाहीं**

श्री० पुंडलीकजी:—आपल्या विश्वासाला मी पात्र होईन अशीच वृत्ति ठेवीन. आपण इतके म्हणत आहां तर सर्व कागदपत्र पाहून नंतरच आपल्याकडे येतों. परंतु श्री० घोरपडे मामलेदार सर्व कागदपत्र मला दाखवीत नाहींत, कागदपत्र मला घराकडे नेऊं देत नाहींत आणि माझ्याबरोबर दुसऱ्या कोणासही ते पाहूं देत नाहींत.

श्रीमंत सरकार:—आपल्याला वाटतील ते कागदपत्र सर्व दाखविण्यास मी त्यांना आतांच कळवितों. कागदपत्र घरीं नेऊं नका, माझें ऐका, वाड्यांतच एका स्वतंत्र जागेत बसा व सर्व कागद पहा. तुमच्या मदतीला कोणी पाहिजे अस-ल्यास कोणीही कारकून घ्या. पण ज्या लोकांनीं मला आजपर्यंत त्रास दिला आहे त्यांना यांत घेऊं नका. मला तें आवडत नाहीं.

श्री० पुंडलीकजीः—मला कागदपत्र मी मागेन ते मिळाले म्हणजे माझें काम झालें. आपली इच्छा नसल्यास मी कागदपत्र घरीं नेण्याचा आग्रहही धरीत नाहीं. माझ्या मदतीला कोणासतरी घेईन. आपल्याला कोणतीं माणसें नको आहेत हें मला माहीत आहे. त्या बाबतींतसुद्धां आपला गैरसमज आहे हें मला माहीत आहे व पुढें कधींतरी मी तें आपल्याला दाखवून देईन. परंतु आज मी तो प्रश्न येथेंच सोडून देतों. पण डॉ० ना. वि. जोशी यांची मदत घेण्यास कांहींच हरकत नाहींना ?

श्रीमंत सरकारः—त्यांनादेखील घेऊं नका. तुम्हाला वाटेल तर दोन कारकून हाताखालीं घ्या. चला, आतां जा. कामाला लागा.

श्री० पुंडलीकजीः—मग मी म्हणतों मी बाहेरचा कोणीच आणीत नाहीं. एकटाच मी कागदपत्र वाचून पाहीन. जरूर लागल्यास श्री० घोरपडे यांच्याकडून एखादा कारकून मागून घेईन.

इतकें बोलणें झाल्यानंतर श्री० पुंडलीकजी गांवांत निघून गेले व पुन्हा कचेरीच्या वेळीं श्री० घोरपडे यांना भेटले. घडलेल्या सर्व गोष्टी त्यांनाही कळलेल्याच होत्या. त्याप्रमाणें त्यांनीं जागा, कागदपत्र व एक कारकून देण्याचें कबूल केलें; परंतु श्री० दप्तरदार, श्री० बागलकोटे व श्री० घोरपडे यांनीं श्री० मोडकांच्या रिपोर्टांतील किंवा खेड्यांतून फिरतांना श्री० पुंडलीकजींना जे अन्याय किंवा कायद्याच्या चुका दिसून आल्या असतील त्याचें टिपण करून पुंडलीकजींपाशीं मागण्याचा हा नवीनच 'अव्यापारेषुव्यापार' उपस्थित केला ! " रिपोर्ट तुम्हींही वाचला असेल तेव्हां त्यांतील ज्या चुका तुम्हांला आढळून आल्या असतील त्यांची तरी एक यादी करा. का त्या रिपोर्टांत चुकाच नाहींत असें तुम्हास वाटतें ? " असें त्यांना श्री० पुंडलीकजींनीं उलट विचारलें. त्यावेळीं श्री० घोरपडे मामलेदार म्हणाले कीं, **" खरें विचाराल तर आम्हीं कोणींही रिपोर्ट अद्यापि वाचला नाहीं."** या त्यांच्या अज्ञानाची व मामलेदार या नात्याच्या जबाबदारीच्या जाणिवेच्या अभावाची कोणासही कींव येण्यासारखी असली तरी त्यांच्या मोकळ्या व उघड अंतःकरणाची स्तुति करण्यासारखी नाहीं असें कोण म्हणेल ? असो. रिपोर्टांतील चुकांची व अन्यायांची यादी श्री० पुंडलीकजींकडून मागविण्याचा त्यांनीं सपाटा चालविला होता; परंतु त्यांतील कावा श्री० पुंडलीकजींच्या ध्यानांत आला असल्यामुळें त्यांनीं त्यांच्या नादाला न लागतां पुन्हा दुसऱ्या दिवशीं श्रीमंत सरकारांची भेट घेतली व कागदपत्र पाहण्याच्या कामास अद्यापि

कां सुरुवात झाली नव्हती याचें कारण निवेदन केलें. त्यावेळीं श्री० पुंडलीकजी श्रीमंत सरकार यांना म्हणाले:—" मी एक गोष्ट अगदीं स्पष्टपणें आपल्याला सांगून्ची परवानगी घेतों कीं, ज्या अधिकाऱ्यांना माहिती विचारण्यास आपण मला सांगितलें आहे किंवा जे आज माझ्याकडे 'अन्यायाची यादी' मागत आहेत, त्यांना वाटल्यास आणखी आपण पगार वाढवा, त्याला माझी हरकत नाहीं; परंतु त्यांनीं श्री० मोडकांचा रिपोर्ट वाचलेला देखील नाहीं ! रयतांच्या डोक्यावर ज्यांना तो रिपोर्ट व सारावाढ मारावयाची आहे व सारा वसूल करावयाचा आहे त्यांनीं रिपोर्ट वाचूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? मला आतांच्या आतां कागदपत्र व बसावयास जागा मिळेल अशी तजवीज करावी म्हणजे माझें काम सुरू होईल."

ताबडतोब ही सर्व व्यवस्था करून देण्यांत आली. गांवांतील किल्ल्यामध्यें श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या माडीवर सर्व व्यवस्था करून देण्यांत आली व श्री० घोरपडे मामलेदार यांच्या व इतरांच्या 'यादी'ची कटकट नाहींशी झाली. दोन दिवसपर्यंत श्री० पुंडलीकजी हे कागदपत्र वाचीत होते. त्यांनीं आपल्याला पाहिजेत तीं सर्व टिपणे करून घेतलीं व ते एकदोन दिवस पुण्यास गेले. श्रीमंतांबरोबर चौकशीला हिंडतांना रयतांच्या बाजूनें बोलणारे एखादे रि. हु. डे. कलेक्टरच्या हुद्द्याचे या कामांतील तज्ज्ञ मिळूं शकल्यास पाहाण्याकारितां व चौकशीची इतर तयारी करण्याकरितां व माहिती घेऊन येण्याकरितां ते पुण्यास गेले होते. घडलेली सर्व हकीगत श्री० पुंडलीकजी यांनीं पुण्याच्या येथील चळवळींत आस्थापूर्वक मन घालणाऱ्या पुढारी मंडळींना कळविली. 'पिंडीवरील विंचू' असेच असणार व त्यांना दूर करतांना पिंडीलाही एखादा तडाखा लागला तरी त्याबद्दल ईश्वरी दरबारांत मनुष्य गुन्हेगार कसा ठरणार ? असो. महाराष्ट्राच्या व विशेषतः पेशवाईच्या इतिहासाकडे नजर फेंकल्यास असेच दिसून येईल कीं, स्त्रिया, मोल. करणी, कारकून व अशाच खालच्या दर्जाच्या लोकांनीं राजकारणांत जितके गोंधळ केले किंवा आपल्या धन्याच्या अब्रूला डांवर फासलें तितकें मोठमोठ्या राजकारण-धुरंधरांनादेखील करितां आलें नाहीं. एखादा सरदार किंवा सुभेदार फितूर झाला तर तो उघड किंवा गुप्तपणे प्रतिपक्षास जाऊन मिळेल किंवा त्यांच्या बाजूनें लढूं शकेल. पेशवाईच्या वेळेला इंग्रजांबरोबर असे गुप्त तह करून आपल्या धन्याशीं निमकहरामी कांहींनीं केली असल्याची इतिहास साक्ष देत आहे. असो.

श्रीमंत सरकार यांनीं अभिवचन देऊन श्री० पुंडलीकजी यांच्या मदतीनें हा

सारावाढीचा तंटा मिटला जात आहे ही गोष्ट श्रीमंत सरकार यांच्या जवळील कांहीं कारकून, हुजरे व इतर कांहीं लोकांना पसंत पडली नाहीं, असें कळलें ! ही गोष्ट खरी असल्यास यांत आश्चर्य खात्रीनें नाहीं. श्रीमंतांचें वचन कसें मोडवावें व श्री० पुंडलीकजी आणि श्रीमंत यांची कमिटी कशी उधळून लावावी याबद्दल कारस्थानें सुरू झालीं ! पहिल्या सत्याग्रहाच्या वेळीं श्रीमंत सरकार व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांचें थोडेंसें भांडण (Dispute) झालें असल्यामुळें युवराज तेथें हजरदेखील राहिले नाहींत असें म्हणतात. पिता-पुत्रांचीं अशीं प्रेमाचीं भांडणें घरोघर होत असतात. त्याला विशेष गांभीर्य असें कधींच येत नसते व येऊंही नये. ही श्रीमंत सरकार यांची कमिटी उधळून लावण्याच्या कारस्थानांतील पहिला दुवा म्हणजे हें पिता-पुत्रांचें भांडण प्रथम झटदिशीं आंवरतें घेण्यांत आलें व या कामांत श्रीमंत युवराज यांनीं आपली बुद्धि चालविण्यास सुरवात केली. कमिटीशिवायच काम उरकून घेतलें व कमिटीची जरूरच ठेविली नाहीं तर आपोआप काम होईल व मग कोणीही नांवें ठेवूं शकणार नाहीं हा या कारस्थानाचा आधार आहे. पण रयत किंवा रयतांचे पुढारी किंवा श्रीमंत सरकार यांपैकीं कोणींही या कारस्थानांत भाग घेणें शक्य नव्हतें. कारण ते तिघेही वचनबद्ध झालेले होते. त्या तिघांवांचून सारावाढीची चळवळ निकालांत काढणे म्हणजे नवरानवरी दोघेंही गैरहजर असतांना लग्नकार्य उरकून घेण्याइतकेंच कठिण होतें. परंतु प्रयत्न करणें हें मनुष्याचें काम असतें ना ?! यश न आलें तर, नाहीं हें आहेच !! निष्काम कर्माचें यापेक्षां दुसरें कोणतें उदाहरण मिळूं शकेल बरें ?

श्री० बाबूराव काशिनाथ जोशी हे एक मिरज संस्थानांतील चांगल्यापैकीं वकील असून स्वभावानें फार प्रामाणिक, अंतःकरणानें सरळ व कनवाळू गृहस्थ आहेत. पुढील प्रकरणांत प्रसंगानुसार त्यांच्याविषयीं यापेक्षां अधिक लिहावें लागणार असल्यामुळें येथें विस्तार करीत नाहीं. श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांनीं या सद्गृहस्थांना आपल्या हातीं धरलें. श्रीमंतांच्या भाषणावर व योजनांवर भोळसटपणानें भरपूर विश्वास ठेवून श्री० जोशी यांनीं आपलें मत ४० टक्क्यांपर्यंत सारावाढ करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें बनवूं दिलें किंवा बनवून घेतलें ! एके दिवशीं रात्रीं रयतांच्या पुढाऱ्यांना व कांहीं वकील मंडळींना त्यांनीं एकत्र जमविलें व तडजोड झाल्यास कितीवर व्हावी याविषयीं वाटाघाट केली. आपलें मत ४० टक्क्यांपर्यंतचें आहे असें त्यांनीं तेथें व्यक्त केलें. श्रीमंत युवराज यांच्या

सांगण्यावरून मी हें आपल्याला एकत्रित जमवून वाटाघाट करण्याचें घडवून आणीत नाहीं, असें त्यांनीं सर्वांना बजावलें व तें त्यांचें म्हणणें सत्य होतें, असें अद्यापही पुष्कळांना वाटत आहे. परंतु ४० टक्क्यांचा हा जो प्रामाणिक मत बनविण्याचा प्रयोग त्यांनाही नकळत त्यांच्यावर झाला ही गोष्ट दृष्टिआड करून भागणार नाहीं. शिक्षणानें इतर कांहीं शील मनुष्यामध्यें उत्पन्न होवो किंवा न होवो, इतका मात्र अहंकार मनुष्यामध्यें उत्पन्न झालेला पुष्कळांच्या बाबतींत दाखवून देतां येईल कीं, आपलें मत दुसऱ्याच्या सांगण्यानें बनतें किंवा मोडतें ही गोष्ट कबूल करण्यास मनुष्य तयार होत नाहीं, लाजतो किंवा त्यांत कमीपणा व अपमान मानतो ! कसेंही असो. ४० टक्क्यांवर एकदां श्री० बाबूराव जोशी हे कायम झाल्यावर व त्यांचें तें मत हलवून नीट घट्ट केल्यावर त्यांच्यामार्फत इतर वकिलांना 'श्रीमंतांनीं बोलाविलें आहे' या गळानें पकडून हिराबागेंत नेण्याचें काम करविण्यांत आलें. 'श्रीमंत' हा शब्द फारच सोयीचा आहे. कारण तो वाटेल त्यांना लावितां येतो. श्रीमंत सरकार व श्रीमंत युवराज दोन्हीही 'श्रीमंत'च आहेत. श्रीमंतांनीं बोलाविलें आहे म्हणून या सर्व वकिलांना श्रीमंत तात्या-साहेबांच्याकडे नेण्यांत आलें व तेथें सर्वांकडून ४० टक्क्यांला संमति मिळविण्याचें म्हणण्यापेक्षां मिळालीच आहे असें समजण्याचें काम प्रथम ठरवून घेण्यांत आलें. त्या वकील मंडळीमध्यें श्री० बाबूराव जोशी, श्री०गोविंदराव रानडे, श्री० अनंत-राव दातार, श्री० भास्करराव मराठे व श्री० रा. धों. शिराळकर असे पांच वकील होते. त्यांपैकीं श्री० बाबूराव जोशी यांचें प्रामाणिक मत आगाऊच बनविण्यांत आलें होतें ! श्री० गोविंदराव रानडे हे मिरज संस्थान-प्रजापरिषदेच्या चौथ्या अधि-वेशनाचे अध्यक्ष होते. आपण अध्यक्ष या नात्यानें बोलत नाहीं किंवा श्रीमंत युवराजां-कडे गेलों नाहीं असें ते स्वतःच्या मनांत समजत होते व तसें बाहेर सांगतां येईल अशी दक्षताही पण त्यांनीं ठेवण्याची शक्य ती खटपट केली होती. परंतु जे श्रीमंत मिरज संस्थान-प्रजापरिषदेस ओळखीत किंवा जुमानीत नाहींत तेच आज श्री० गोविंदराव रानडे यांच्या अध्यक्षपणाचा फायदा घेण्यास एका पायावर सिद्ध झालेले पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं ? किंवा त्यांत आश्चर्य तरी कसलें ? 'बुभुक्षितः किन करोति' हेंच खरें ! श्री० रानडे यांना भीड मोडवेना व श्री० बाबूराव जोशी यांच्यावर सर्व बोजा टाकण्याची शक्य ती खटपट करून त्यांनीं ४० टक्क्यांला एकदां संमति दिल्यासारखें केलें. पण त्यांच्या त्या संमतीविषयीं

त्यांच्यावर जसजशी टीका होत जाऊं लागली. तसतसें पुढें ते आपलें तें ४० टक्क्यांचें मत प्रामाणिक बनवून घेऊं लागल्याचें दिसूं लागलें. हा त्या परिस्थितीचा दोष आहे. श्री० अनंतराव दातार हे तिसरे वकील त्या जाळ्यांत श्री० बाबूराव जोशी यांनीं जातां जातां व कदाचित् अजाणतां ओढलेले होते. पण कोणत्याही मताकडे त्यांना सहज ढकलतां येईल इतकी कल्पना त्यांना नसावी हें शक्य वाटत नाहीं. श्री० दातार वकील हे सभ्य, थोडे विसराळू व गोड स्वभावाचे गृहस्थ आहेत. कोणास दुखवावें ही त्यांच्या ठिकाणीं वृत्तिच नाहीं; परंतु तसें त्यांच्या समक्ष कोणी बोलून दाखवितील तर ते बोलणाराचें मनही पण दुखवून दाखविण्यास चुकणार नाहींत. 'श्री० गोविंदराव रानडे यांच्यासारख्यांनीं ४० टक्क्यांला संमति दिली, तेव्हां काय करावें तें समजेना. मला तर तें आवडेना. श्रीमंत तात्यासाहेबांची तर एकसारखी घिसाडघाई चाललेली होती' असें सांगितलें असतां आपल्यावरचा दोष जाईल असा आपल्या मनाशीं बहुधा विचार करून श्री० दातार यांनींही त्या ४० टक्क्यांला मूकसंमति देऊन टाकली ! श्री० मराठे यांनीं ४० टक्क्यांचें ३३ टक्क्यांवर, अखेर ३५ टक्क्यांवर आणण्याची आपल्याकडून शिकस्त केली. आपल्याकडून ही संमति काढण्याचें काम चाललें आहे, याची लाज श्री० शिराळकर यांना वाटत होती असें म्हणतात. पण करतात काय ! जाणून किंवा उघड्या डोळ्यांनीं आपल्या हातून रयतांच्या अन्नांत माती कालविण्याचें काम चालू असलेलें सर्व वकील पहात होते; परंतु प्रतिकार करण्याची छाती किंवा युक्ति एकासही प्रत्यक्ष अमलांत आणतां आली नाहीं. श्री० जोशांखेरीज सर्वांनाच प्रथम अधिक प्रमाणांत वाईट वाटत होतें; परंतु पुढें या तडजोडीचा अभिनिवेश कांहींमध्यें उत्पन्न झाला व कांहींमध्यें तितकासा झाला नाहीं हाच काय तो फरक ! पण या वकिलांमध्यें 'काळे, गोरे' कोणीं निवडीत बसावें ?

वकिलांच्या या अनाहूत मध्यस्थीमुळें रयतांमध्यें त्यांच्याविषयीं असंतोष व कित्येक ठिकाणीं तात्पुरती द्वेषाच्या भावनेची छटाही उमटल्याचें दिसत होतें ! पण पुढें पुढें ही आस्ते आस्ते कमी होत गेली व झाली. आमच्या दृष्टीनें हा वकिलांचा दोष नसून परिस्थितीचा आहे. हेच वकील संस्थानांत नसते व ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजकारणांत असते तर त्यांनीं असें वर्तन केलें नसतें. मागासलेल्या संस्थानांतील चळवळ व ब्रिटिश इंडियांतील चळवळ यांत जसा नेहमीं फरक

करावा लागतो त्याचप्रमाणें सर्वच गोष्टींत कांहीं प्रमाणांत फरक मानणें आवश्यक आहे असें म्हणणें भाग आहे. श्री० बाबूराव जोशी यांनीं बोलविल्यानंतर श्रीमंतांकडे जाण्यापूर्वी वकील मंडळींनीं चळवळीच्या पुढाऱ्यांची भेट घेऊन जावयास कोणती हरकत होती ? त्यांत त्यांचा फार वेळ गेला असता किंवा नुकसान झालें असतें असें नाहीं. परंतु शिक्षणाची जाणीव व स्वतःलाच शहाणे समजण्याची प्रामाणिक समजूत आणि जबाबदारीचा आभाव या गोष्टींमुळें मनुष्य खोल विचार करण्यास अपात्र बनत असतो व तसें या वकील मंडळींच्या हातून झालें ! स्वतःला कांहींही झळ न लागतां, श्रीमंतांच्या मर्जीतून न उतरतां, सत्याग्रहाशीं आपला संबंध मुळींच न लागूं देतां, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अंगरख्याची इस्तरी न बिघडवितां जपून खेळणाऱ्याप्रमाणें, या वकील मंडळींना रयतांच्या उपयोगीं पडावें व त्यांची सेवा आपल्या हातून व्हावी अशी मनापासून उत्कट इच्छा होती यांत संशय नाहीं. या दृष्टीनें पाहतां रयतांच्या चळवळीशीं त्यांनीं जी सहानुभूति दाखविली ती थोडी आहे असें नाहीं. आणि म्हणूनच आम्ही ४० टक्क्यांच्या बाबतींत 'वकिलांना फसविले' असें म्हणत नाहीं, 'वकील फसले' असेंही म्हटलें नाहीं, तर 'वकिलांचा बळी घेतला गेला' असें म्हटलें आहे.

वकिलांनीं ठरविलेली तडजोड केवळ ४० टक्क्यांपुरतीच होती असें नाहीं. त्यांत आणखीही कांहीं गोष्टी गोविलेल्या होत्या. [१] स्वतंत्र हायकोर्टाची स्थापना, [२] पाण्याचा पुरवठा, [३] मोफत प्राथमिक शिक्षण आणि [४] जबाबदार राज्यपद्धति. या चार गोष्टी ४० टक्क्यांला जोडून होत्या. वकिलांच्या शहाणपणानें या गोष्टी श्रीमंत युवराजांनीं कबूल केल्या म्हणा किंवा ४० टक्क्यांकडे वकिलांचा कल अधिक करण्याकरितां वरील गोष्टींचें मांस गळाला अडकविलें होतें म्हणा, कांहींही असलें तरी या गोष्टी होत्या हें खरें ! इतका हा सर्व प्रकार किंवा वादविवाद श्रीमंत युवराज यांच्यापाशींच झाला होता.

त्यानंतर श्रीमंत युवराजांनीं या सर्व सन्मान्य वकीलमंडळींना एका सुंदर मोटारींत घालून अर्धफर्लांगावर असलेल्या श्रीमंत सरकार यांच्या बंगल्यांत नेलें. तेथें खुद्द श्रीमंत सरकार यांनीं त्यांचें स्वागत केलें. 'गांवांतील ही सर्व जबाबदार वकीलमंडळी ४० टक्क्यांपर्यंत सारावाढ करून तडजोड करावी व त्याबरोबर कांहीं सुधारणाही द्याव्यात असें एकमतानें सुचविण्याकरितां आलेले आहेत' असें 'सूत उवाच' करून बोलण्यास प्रारंभ केला गेला. ४० टक्क्यांला व पहिल्या तीन

सुधारणांना श्रीमंत सरकार यांनीं झट्दिशीं तोंडी संमति दिली व जबाबदार राज्य-पद्धतीचा मुद्दा हलकेच जो निसटला तो पुन्हा कोणाच्याच तडाख्यांत सांपडला नाहीं. "४० टक्के ठरले, ठरले" असें श्रीमंत बोलतात न बोलतात तोंच रयतांच्या कल्याणाविषयीं (!) आतुर असणाऱ्या एका अधिकाऱ्यानें मध्येच तोंड घालून म्हटलें कीं, "हो, ठरलें. यंदां ४० टक्के वाढ घ्यावयाची असें ठरलें. पुढल्या वर्षींचें पुढें पाहूं." हा 'नारदा'चा किंवा 'रौलेट'चा पार्ट इतका बेमालूम व उत्तम वठला कीं, तें काम थिएटरमध्यें झालें असतें तर श्रोतृसमाजाकडून खात्रीनें टाळी घेतली असती ! असो. आपापल्या मनांत विचार करीत सर्व वकीलमंडळी घरीं परत आली. चळवळीच्या पुढाऱ्यांना भेटण्याला किंवा कळविण्याला जाण्याइतकें त्यांत त्यांना महत्त्व वाटण्याचें कारणच नव्हतें; कारण आपल्या मनांत सर्वच चूर होते. त्यांचीं अंतःकरणें शुद्ध असल्याचा तो एक पुरावा खात्रीनें म्हणतां येईल. वकीलमंडळींना वाटत असे कीं, "मिळतील त्या सुधारणा पदरांत पाडून घेण्यास कोणती हरकत आहे ? सुधारणा पदरांत पडोत किंवा न पडोत; पण मागणी करून ठेवण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? वाढलेला सारा निदान लोकांच्याकरितां तरी खर्च होऊं द्या."

या बाबतींत महात्मा गांधींच्या आश्रमांतील श्री० कालेलर यांनीं श्री० पुंडलीक-जींना लिहिलेल्या एका पत्रांत धोक्याची सूचना म्हणून दिली होती ती या ठिकाणीं उद्धृत करितों. ते म्हणतात—

"प्रजेकडून घेतला जाणारा कर प्रजेच्या हितार्थ खर्च झाला पाहिजे हें तर खरेंच; पण एवढें बस नाहीं. पण प्रजेच्या इच्छेप्रमाणें, प्रजेच्या प्रतिनिधीद्वारां तो खर्च झाला पाहिजे हीही गोष्ट लोकांपुढें मांडण्याजोगी आहे. पण तुम्ही त्या भानगडींत पडूं नका. तसें केल्यानें तुमच्या चळवळीला राजकीय स्वरूप येईल आणि चळवळ राजकीय झाली म्हणजे तिला हाणून पाडण्यास वेळ लागणार नाहीं. शेतकऱ्यांमध्यें राजकीय वृत्ति अजून आली नाहीं आणि म्हणून आपल्या राजकीय आकांक्षा कितीही योग्य असल्या तरी त्यासाठीं शेतकऱ्यांचा बळी देणें योग्य होणार नाहीं."

"यासाठीं तुमची चळवळ राजकीय करूं नका. शहाणे वकील लोक ही चूक हटकून करणार आणि तुम्हांला गोत्यांत आणणार ! चळवळ खरोखर पोटापाण्याची आहे आणि ती तशीच राहिली पाहिजे."

रयतांनीं आपली चळवळ पोटापाण्याचीच शेवटपर्यंत राखिलेली होती; परंतु दरबारनें आपल्या कर्तव्याला जागून सुधारणा दिल्या असत्या तर त्यांना नको होत्या असें नाहीं. रयतांनीं आपल्या मागणींत सुधारणांचा समावेश करावा किंवा नाहीं हा प्रश्न जरी बाजूला सोडला तरी सुधारणा करण्याची श्रीमंतांची खरी इच्छा होती असें दिसत नाहीं. कारण श्रीमंत युवराजांच्या बंगल्यापासून श्रीमंत सरकार यांच्या बंगल्यापर्यंत मोटारीनें जातांच त्यांतील एक महत्त्वाची सुधारणा—जबाबदार राज्यपद्धति—गळून पडली किंवा नाहींशी झाली. "स्वर्गे गता वाथ भुवंगता वा" हें कोणासच कळलें नाहीं. बाकीच्या सुधारणा कधीं अंमलांत येतील त्या दिवशीं आपलें कर्तव्य बजावल्याबद्दल श्रीमंतांचे आभार रयत लोक मानतील व 'आम्ही तेव्हां बोललों म्हणून हें आज मिळालें' असें तोंड भरून म्हणण्याचा सुप्रसंग वकिलांनाही लाभेल. असो. अशा प्रकारें तीन राजकीय सुधारणा उराशीं बाळगून व यंदां ४० टक्के व पुढल्या वर्षीं पुन्हा विचार व्हावयाचा असें ठरलें असलें तरी श्रीमंतांच्या मनांत ४० टक्केच कायम करावयाचे आहेत यावर अंतराळीं विश्वास ठेवून तशा प्रकारचा एक लेख श्री० बाबूराव जोशी यांनीं तयार केला. स्वतः त्याच्या ४।५ प्रती काढून त्यांवर श्री० गोविंदराव रानडे व आपण स्वतः यांच्या सह्या घेऊन तो कागद केसरी, संग्राम व ज्ञानप्रकाश यांच्याकडे छापण्यास पाठविला.

त्या लेखांत ज्या ठिकाणीं श्री० गोविंदराव रानडे यांचें नांव आलें आहे. तेथें कंसांत (अध्यक्ष-प्रजापरिषद्) असे शब्द घालण्यास श्री० बाबूराव जोशी विसरले नाहींत किंवा श्रीमंत युवराज यांनीं त्यांना तसें करावयास लाविलें असें म्हणतात. मग त्या कागदावर आतां श्री० गोविंदराव रानडे यांनीं सही करावी किंवा नाहीं असा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिलाच. श्री० बाबूराव यांचा आग्रह व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांची इच्छा या दोहोंचें उल्लंघन श्री० रानडे यांच्या भिडस्त स्वभावाला करतां आलें नाहीं. शेवटीं 'आपल्या सहीपुढें आपण कांहीं कंसांत 'अध्यक्ष—प्रजापरिषद् असें' म्हटलेलें नाहीं' अशी आपल्या स्वतःच्या मनाची समजूत करून श्री० रानडे यांनीं सही केली व ते कागद पुण्यास रवाना झाले.

श्री० रानडे यांची व चळवळीचे पुढारी श्री० बा. वि. शिखरे वगैरेंची भेट

होऊन वाटाघाट झाली व हे कागद त्यांच्या सहीनें छापले जाऊं नयेत असें ठरलें व त्यांनीं पुण्यास खालीलप्रमाणें तारेनें कळविलें. ती तार अशीः—

(1) Kesari (2) Prakash Poona.

Do not publish our letter regarding Miraj assessment. Letter follows.

Govindrao Ranade.

Miraj. 12-11-28.

त्यामुळें श्रीमंत युवराज यांचा हा डाव फसला. त्यांचे कागद कोणत्याच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले नाहींत. श्री० बाबूराव जोशी व श्रीमंत युवराज वर्तमानपत्रें चाळीत वाट पहात बसले होते म्हणतात व तें सहाजिकही आहे. पुढें कांहीं दिवसांनंतर त्यांच्या डावावर प्रतिडाव बराबर झाला ही गोष्ट सर्वांच्या ध्यानांत आली. त्या कागदावर श्री० दातार, मराठे व शिराळकर या वकिलांनीं कां सह्या केल्या नाहींत किंवा त्यांच्या सह्या कां मागण्यांत आल्या नाहींत हें कोणासही सहज कळण्यासारखें आहे. वकिलांच्या या ४० टक्क्यांच्या तडजोडीला मुळींच भीक घालावयाची नाहीं असाच सर्व खेड्यांतून श्री० शिखरे, पुंडलीकजी व डॉ० जोशी यांनीं दौरा काढल्यावेळीं रयतांचा निर्धार असल्याचें निश्चित आढळून आलें. श्री० बाबण्णा घुळी यांनीं तर या वकिलांच्या तडजोडीला एका क्षणांत भुसासारखें उडवून दिलें. त्याचबरोबर लोकांना खरी स्थिति समजून सांगून पुढाऱ्यांनीं वकिलांविषयीं रयतांमध्यें द्वेष माजूं दिला नाहीं. वस्तुस्थितीचें ज्ञान लोकांना बरोबर करून दिलें.

या वकिलांच्या अनाहूत मध्यस्थीच्या बाबतींत लिहितांना ता. १९।११।२८ चा 'समर्थ' म्हणतो कीं:—

"दुर्दैव असें कीं, हें आश्वासन दिलें गेल्यामुळेंच लाळघोट्या नोकरशाहीचें धाबें दणाणलें व कावेबाजपणानें श्रीमंत तात्यासाहेब व बडे मुत्सद्दी यांना इरेस घरून शेतकऱ्यांच्या पदरांत पडलेलें चौकशीच्या आश्वासनाचें यश त्यांनीं उधळून लाविलें. श्रीमंतांना आपल्या बुद्धिचातुर्यानें शह देऊन राज्यसुधारणा पदरांत पाडून घेण्याचा पराक्रम या बड्या मुत्सद्द्यांनीं केला असें नव्हे तर श्रीमंतांच्या आश्वासनाप्रमाणें कृति जर झाली असती तर लाळघोट्या नोकरशाहीची इज्जत

नाहींशी झाली असती व श्रीमंत तात्यासाहेबांना खाजगी खर्चाला पैशाचा तुटवडा पडला असता. ह्या संकटापासून वांचविण्याला आपला उपयोग करून देण्याचा अवसानघातकीपणा ह्यांनीं दाखविला हेंच यावरून सिद्ध होत आहे. अशा प्रकारें शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांत एकीची बेकी व्हावी व त्यांतल्या त्यांत 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' म्हणतात त्याप्रमाणें प्रजापरिषदेचे अध्यक्षही त्यांत सामील व्हावे, हें मिरजेच्या शेतकऱ्यांचें दुर्दैव नव्हे असें कोण म्हणेल ?'

"मुद्द्यांच्या पोटापाण्याचा हा प्रश्न नसून शेतकऱ्यांच्या पोटापाण्याचा हा प्रश्न असल्यामुळें शेतकऱ्यांना स्वस्थ बसून सोय नाहीं हें उघडच आहे. यश पदरांत पडो न पडो, अन्यायाचा प्रतिकार कडेपर्यंत करण्यांतच ज्यांना समाधान वाटतें त्यांचा तात्पुरत्या अपयशानें कधींही मार्ग खुंटत नाहीं."

वकिलांना हाताशीं धरून श्रीमंत युवराजांनीं जी तडजोड म्हणून गोंधळ केला होता त्याची प्रसिद्धीच, रयतांच्या पुढाऱ्यांनीं योग्य ती काळजी घेतल्यामुळें कोठें होऊं शकली नाहीं आणि म्हणून त्यावर बाहेरच्या वर्तमानपत्रांत कोठेंही विशेष टीका आलेली नाहीं.

अशा प्रकारें श्रीमंत सरकार यांच्या वचनभंगाची तयारी खटपट्यांच्या दृष्टीनें पूर्ण झाली होती. फक्त त्या तयारीचा उपयोग करण्याच्या संधीचीच वाट पहात अधिकारी बसले होते.

प्रकरण सहावें

चौकशी-कमिटीची सिद्धता

आणि

श्रीमंतांचा वचनभंग

एकाबाजूला कांहीं अधिकारी, कारकून यांच्या मदतीनें श्रीमंत युवराज यांचें– किंवा श्रीमंत युवराजांच्या मदतीनें त्यांचें म्हणा–श्री० पुंडलीकजी व श्रीमत सरकार यांची कमिटी व श्रीमंत सरकार यांचें अभिवचन उधळून लावण्याचे प्रयत्न चालले होते. आणि दुसऱ्या बाजूला श्री० पुंडलीकजी आपल्या चौकशी-कमिटीची तयारी, श्रीमंत सरकार यांच्या सांगण्यावरूनच करीत होते.

चौकशी-कमिटीची सिद्धता

श्री० पुंडलीकजी यांनीं त्यांना जरूर होते ते कागदपत्र व श्री० मोडकांना संस्थाननें उघड रीतीनें पुरविलेलीं पत्रकें पाहिलीं, त्यांतील टिपणें करून घेतलीं व तीं सर्व टिपणें क्रमवार लावून ठेविलीं. श्री० मोडकांचा रिपोर्ट व तीं टिपणें, दोहोंचा उपयोग करून सारावाढीच्या बाबतींत झालेला अन्याय किती ढोबळ व भयंकर आहे याविषयीं पुण्यास जाऊन दे० भ० बाबूराव गोखले व वामनराव पटवर्धन यांच्याशीं चर्चा केली. आपल्या नोट्स् तयार केल्या. श्री० पुंडलीकजी यांच्या कामाची दिशा वाचकांच्या ध्यानांत येण्याकरितां त्यांतील कांहीं भाग या ठिकाणीं उद्धृत करितो.

रिपोर्टावर टीका करण्याचे मुद्दे

१. जाहीरनाम्यांचा गोंधळ.

२. मिरज तालुक्याची प्रगति झाली आहे काय ?

३. रेल्वेः—[१] रेल्वेपासून गांवें फार अंतरावर आहेत.

[२] मिरजेस लोकसंख्या कमी झाली आहे.

[३] नवीन व्यापार कांहींही उत्पन्न झाला नाहीं.

[४] अधिक कामही लोकांना मिळालेलें नाहीं.

[५] बाशीं लाईट रेल्वेपासून होणाऱ्या फायद्याचा व्यर्थ बोभाटा.

४. रस्तेः—[१] पूर्वीपेक्षां नवीन रस्त्यांची संख्या वाढली नाहीं.
[२] वाहतुकीचीं साधनें वाढलीं नाहींत.
[३] ने-आण करण्यास खर्च कमी येऊं लागला काय ?
[४] धान्याच्या किंमती व मजुरी वाढली; पण खर्चही तितका वाढल्यामुळें उत्पन्न पदरांत पडत नाहीं.

५. जमिनीची खरेदी व विक्रीः—पोटाचा धंदा दुसरा राहिला नाहीं म्हणून खरेदी-विक्री वारंवार होत नाहीं.

६. खंडः—किंमती वाढल्यामुळें खंड वाढले; सावकारी अधिक सुरू झाली; व्याज हाच बहुतेक अंशीं खंड झाला.

७. मिरज हा गेट-वे नाहीं. कोल्हापूर व सांगली उतारपेठ होऊं शकतील. मिरज होऊं शकत नाहीं.

८. लोकसंख्येंतला मोडकांनीं केलेला घोंटाळा.

९. संस्थानांत नवीन रस्ते मुळींच केलेले नाहींत.

१०. श्री० मोडकांनीं पक्क्या खडीचे म्हणून दाखविलेल्या रस्त्यांपैकीं फारच थोडे पक्क्या खडीचे आहेत.

११. मोटारीनें बैलगाड्या मारल्या. दुय्यम धंदा गेला.

१२. सर्व्हे पुन्हा नीट केलेली नाहीं.

१३. मोटस्थळ व पाटस्थळ यांच्याविषयींचे फुगविलेले व चुकीचे आंकडे आणि माहिती.

१४. अंडीं व कांबळीं यांच्या व्यापाराचा अतिशयोक्तीचा व थोडा चुकीचा उल्लेख.

१५. शेतकरी घरबसल्या जे उद्योग करतो त्यावर कर बसविण्याचा सरकारास हक्क नाहीं.

१६. जमिनीचें निव्वळ उत्पन्न पहाणें ही महत्त्वाची गोष्ट असतांना त्या बाबतींत (पॅरा २०) रिपोर्टांत कांहींच विचार केलेला दिसत नाहीं.

१७. तीस वर्षांची मुदत वीस वर्षांवर कां आणिली ?

१८. मिरज संस्थानचा व्यापार न वाढतां तो उलट कमीच झाला आहे.

१९. रिपोर्टांत आयातीपेक्षां निर्गत अधिक दाखविली आहे, त्याला कांहींच आधार दाखविलेला नाहीं.

२०. लागवडीस आणण्याजोग्या जमिनीचा कांहींही भाग संस्थानांत व्यर्थ

पडलेला नाहीं. आपल्या जमिनी करून शिवाय दुसऱ्याच्या जमिनी शेतकरी करतात. मग ते आंळशी बनले आहेत असें मि० अँडरसनसाहेब कशावरून म्हणतात ?

२१. शेतकऱ्याला पुरेशी मेहनत करून देखील त्याला पुरेसें उत्पन्न होत नाहीं.

२२. प्रतिवर्षीं सारा व खंड भरण्याकरितां शेतकरी सावकाराचें कर्ज काढतो.

२३. शेरी जमिनीची हीच स्थिति..

२४. प्रत्येक गांव शेंकडा ६० पासून ८० टक्के कर्जांत बुडलें आहे व व्याजाइतका खंड कबूल करून तशी कबुलायत केली जाते.

२५. साठ वर्षांपूर्वी मिरज संस्थानांत जो सारा बसविला तोच भयंकर असल्यानें साठ वर्षांत सारा वाढ केली नाहीं हा एक रयतेवर एकप्रकारें उपकार केला असें वारंवार जाणवण्याचा प्रयत्न केला तरी तो उपकार न वाटतां अपकारच वाटणें साहाजिक आहे.

[वरील मुद्द्यांपैकीं महत्त्वाच्या मुद्द्यांवर खुलासेवार व मुद्देसूद टीका 'संस्थानी स्वराज्य' पत्रांत श्री० बा. वि. शिखरे यांच्या "मिरज संस्थानांतील सारावाढ" या लेखमालेंत व डॉ० ना. वि. जोशी यांनीं प्रजापरिषदेंत सारावाढीच्या ठरावावर बोलण्याकरितां तयार केलेल्या भाषणांत आलीच आहे.]

श्रीमंत सरकार यांच्या अभिवचनाप्रमाणें चौकशी कमिटीचें काम सुरू होईल त्यावेळीं ज्यांच्या साक्षी घेतल्या जातील त्यावेळीं त्यांस विचारण्याकरितां जे प्रश्न श्री० पुंडलीकजींपाशीं तयार होते ते या ठिकाणीं वाचकांकरितां देत आहों.

चौकशी-कमिटीची प्रश्नमालिका

१. पिकास उपद्रव

१. पिकास उपद्रव आपल्या बाजूला टोळांपासून होतो काय ?

२. गेल्या पंचवीस वर्षांत किती वर्षें पिकांस असा उपद्रव झाला ?

३. त्याबद्दल सरकारकडून कांहीं उपाय अगर मदत करण्यांत आली होती काय ?

४. पीक किती वर्षें व किती आणे टोळांमुळें नाहींसें झाल

५. टोळांपासून पिकाचें रक्षण करण्यासाठीं आपण स्वतः कांहीं खर्च केला आहे काय ? असल्यास किती ?

२. जनावरांची संख्या

१. पंचवीस वर्षांपूर्वीं आपल्या घरीं शेतीचीं जनावरें किती होतीं ?

२. दुभतीं जनावरें किती होतीं ?

३. हल्लीं दुभतीं जनावरें किती आहेत ?

४. जनावरांची संख्या कमी झाल्यामुळें शेतांत खत कमी पडूं लागलें काय ? व त्यामुळें शेताचें उत्पन्न थोडें कमी झालें काय ?

५. पंचवीस वर्षांपूर्वी आपल्या घरीं दूध किती खपत असे ?

६. हल्लीं आपल्या घरीं दूध किती लागतें ?

७. आपलीं मेंढरें आहेत काय ? पंचवीस वर्षांपूर्वी किती होतीं व हल्लीं किती आहेत ?

३. मजुरीचे दर

१. पंचवीस वर्षांपूर्वी गड्यास मजुरी काय असे ?

२. हल्लीं गड्यास मजुरी किती द्यावी लागते ?

३. मजुरींच्या वाढीमुळें शेतकरी शेती सोडून मजुरी करण्याकडे गेले आहेत काय ?

४. शेतकरी मजुरीकडे अधिक गेले असल्यास त्यापासून शेतीच्या उत्पन्नांत तूट येते काय ?

४. माल-विक्री करण्याचें ठिकाण

१. आपल्या गांवापासून बाजार किती दूर आहे ?

२. बाजार कोणत्या गांवीं आहे ?

३. मालवाहतुकीचीं साधनें काय आहेत ?

४. दर ठरीव आहेत अगर कसे ? काय दर आहेत ?

५. माल घरीं पडून राहतो अगर कसें ?

६. घरीं पडून राहात असल्यास किती महिने ?

७. माल आपण विक्री करतां अगर कसें ?

८. घरच्या खर्चास पुरून माल विक्रीस शिल्लक उरतो काय ?

९. माल विक्री करण्यास जाण्याचा रस्ता कशा स्थितींत आहे ?

१०. गेल्या पंचवीस वर्षांत सदर रस्ता सरकारनें किती वेळां दुरुस्त केला आहे ?

५. जमिनीचा कस

१. गेल्या पंचवीस वर्षांत जमिनीची सुधारणा केली आहे काय ?

२. केली असल्यास खर्च किती केला ?

३. वरील खर्चाची रक्कम पदरची अगर सावकाराची होती ?

४. सावकाराची असल्यास व्याज किती द्यावें लागलें ?

५. जमिनीचा कस आहे तोच कायम आहे काय ?

६. खराब झाली असल्यास त्याचीं कारणें कोणतीं व आतां चांगल्या स्थितींत आणण्यास खर्च किती येईल ?

६. दुष्काळ

१. गेल्या पंचवीस वर्षांत किती सालें नापिकाचीं झालीं ? व तीं कोणकोणतीं ?

२. सरकारचा सारा स्वतःच्या पदरचा किती वेळ भरावा लागला व कर्ज काढून किती वेळ भरावा लागला ?

३. दुष्काळाच्या सालीं फाळ्याची सूट मिळाली होती काय ? असल्यास किती वेळां व किती ?

४. तहकुबी कधीं मिळाली होती काय ? असल्यास किती वेळां ?

५. दुष्काळांत पोट भरण्याकरतां गांव सोडून किती लोक बाहेर गेले ?

७. विहीर व पाणी

१. आपल्या जमिनींत विहिरी आहेत काय ? असल्यास किती ?

२. विहिरी काढून किती वर्षें झालीं ?

३. विहीर काढण्यास खर्च किती झाला ?

४. विहीर खणण्याच्या खर्चाकरितां कर्ज काढावें लागलें काय ? असल्यास तें फिटलें काय व किती वर्षांनीं फिटलें ?

५. विहिरीला किती मोटा आहेत ?

६. वर्षांतून किती महिने मोटा चालू शकतात ?

७. गेल्या पंचवीस वर्षांपेक्षां हल्लीं विहिरीस पाणी कमी आहे का अधिक आहे ?

८. विहिरी दुरुस्त करण्यास खर्च झाला आहे काय ? असल्यास किती ?

९. विहिरी काढण्यास व दुरुस्त करण्यास सरकारकडून मदत झाली आहे काय ? असल्यास किती ?

८. जमिनींतील पीक

१. आपल्या जमिनींत पंचवीस वर्षांपूर्वी कोणकोणतें पीक काढीत होतां ?

२. पीक किती किती निघत होतें ?

३. पंचवीस वर्षांतिल पिकाची सरासरी आणेवारी काय होती ?

४. हल्लीं पीक कोणकोणतें काढतां ?

५. हल्लीं पीक किती येतें ?

९. पाण्याचे पाट

१. आपल्या जमिनीस पाटाचें पाणी मिळतें काय ? मिळत असल्यास किती जमिनीस मिळतें ?

२. पंचवीस वर्षांपूर्वी तें मिळत होतें काय ?

३. पाटाचें पाणी बंद होऊन किती वर्षें झालीं ?

४. पाटाच्या पाण्यावद्दल कर द्यावा लागतो काय ? असल्यास किती ?

५. पाटाच्या पाण्यानें पूर्वी किती एकर जमीन भिजत होती व हल्लीं किती भिजते ?

१०. सामान्य प्रश्न

१. आपल्या गांवाला वाचनालय, शाळा आहे काय ?

२. आपल्या गांवाला आखाडा आहे काय ?

३. देऊळ आहे काय ? असल्यास तें दुरुस्त आहे काय ?

४. पिण्याच्या पाण्याची काय व्यवस्था आहे ?

५. गांवांतील रस्ते दुरुस्त आहेत काय ?

६. आपल्या गांवाला सावकार कोठले आहेत ?

७. सामान्य सावकार व सरकार–सावकार यांत कोणता सावकार आपल्याला अधिक जाचक वाटतो ?

८. आपल्या सरकारला आपण यापूर्वी सार्वजनिक एखादी सामान्य मागणी केली होती काय व सरकारनें त्याचा विचार केला होता काय ?

श्री० मोडकांचा रिपोर्ट वाचतांना कोणासही आढळून येणाऱ्या चुका व वस्तु-स्थितीला सोडून असलेली माहिती.

१. जमिनीची पाहणी पुन्हा केली नाहीं.

२. जमिनीचे वर्गीकरण नीट व पुन्हा केलें नाहीं.

३. गटांची संख्या कमी करण्यांत झालेला अन्याय.

४. पूर्वीचा रिपोर्ट लिहिणाराची जी चूक म्हणून दाखविली आहे, तीच श्री० मोडक यांनीं केली आहे.

५. जीं गांवें वरच्या ग्रूपमध्यें घातलीं आहेत, त्यांच्याविषयीं दिलेलीं कारणें चूक व बव्हंशीं खोटीं आहेत.

६. पाटस्थळें नाहींत तेथें पाटस्थळें धरलीं आहेत.

७. पानमळे नसतील तेथें मानले आहेत.

८. विहिरीचें पाणी गेलें असलें तरी पूर्वीचें मोटस्थळ बहुतेक जागीं कायम ठेविलें आहे.

९. प्रत्यक्ष मोडकसाहेब प्रत्येक खेड्यांतून स्वतः चौकशीकरितां जाऊन आलेच नाहींत.

१०. लोकसंख्येचे आंकडे सपशेल चूक आहेत. ८५ टक्के लोकसंख्या वाढलेली आहे, हें विधान पराकाष्ठेचें धाडसाचें आहे.

११. ३३ टक्के व ६६ टक्के हा नियम धाव्यावर बसविला आहे.

१२. जमीनवर्गीकरणाच्या बाबतींत तक्रारी सांगण्यास रयतांना तीन महिन्यांचा अवधि देण्याची वहिवाट असतांना तसा अवधि देण्यांत आला नाहीं.

१३. सारावाढीची योजना व सूचना यांच्या बाबतींत आपलें म्हणणें मांडण्यास रयतांना दोन महिन्यांऐवजीं एकच महिन्याची मुदत दिली होती.

१४. रयतांनीं स्वकष्टानें व स्वतःच्या खर्चानें लागवडीस आणलेल्या जमिनींवर देखील जबर कर बसविले आहेत.

१५. बहुधा सर्वच बाबतींत सन १९१६ ते १९२५पर्यंतचा हिशेब ध्यानांत घेतला आहे. लढाईच्या काळांत सर्वच जिन्नस महाग झालेले होते. त्यामुळें केवळ तोच काळ ध्यानांत घेऊन भागणार नाहीं.

ठरल्याप्रमाणें चौकशी-कमिटीचें काम न होतां तडजोड करावयाचें बोलणें श्रीमंत सरकार यांनीं चालू केल्यास तडजोड कोठपर्यंत करावी याचा विचार करून जी योजना श्री० पुंडलीकजींनीं तयार करून ठेविली होती ती अशी:—

१. पड पडलेल्या जमिनीवर सारा मुळींच बसवूं नये.

२. ग्यारंटी ३० वर्षांची कायद्यास अनुसरून असावी.

३. पाटस्थळ अजीबात काढून टाकावें.

४. मोटस्थळांची पुन्हा पाहणी करावी.

५. कायद्यास अनुसरून इगतपुरी सवलत देण्यांत यावी.

६. श्री० मोडकांचा रिपोर्टच रद्द समजण्यांत यावा.

७. जास्तींत जास्त तीस ३० टक्के सारावाढ करावी व त्याचा मोबदला म्हणून न मागतां सुधारणा मिळाव्यात.

८. ढालगांव कर्यातींत कांहींही वाढ होऊं नये.

९. वरील गोष्टींचा एक जाहीरनामा काढण्यांत यावा.

श्रीमंत सरकार व श्री० पुंडलीकजी यांच्या चौकशी-कमिटीच्या कामाविषयीं श्री० पुंडलीकजी यांनीं किती काळजीनें व जबाबदारीनें तयारी चालविली होती याची माहिती वर दिलीच आहे. तथापि आपल्या एका स्नेह्यास श्री० पुंडलीकजी यांनीं एक खाजगी पत्र पाठविलें होतें त्यांतील कांहीं भाग या ठिकाणीं उद्धृत केल्यास सर्व गोष्टी अगदीं उघड होतील.' ते आपल्या पत्रांत म्हणतातः—"मी प्रत्यक्ष रयतांची सेवा अशी कांहींच केलेली नसतांना रयतांनीं माझ्यावर विश्वास ठेविला ही खरोखरच फार मोठी गोष्ट आहे. त्याचप्रमाणें श्रीमंत सरकार बाळासाहेब यांनींही माझ्यावर पूर्ण विश्वास टाकिला आहे. त्यामुळें माझ्यावरील जबाबदारी दुप्पट वाढली आहे. दे० भ० बाबूराव गोखले, वामनराव पटवर्धन, श्री. ग. वझे व शिखरे यांच्या साहाय्याशिवाय ही जबाबदारी पार पडणें मला कठिण वाटतें. कागदपत्र वाचून झाले, टिपणें तयार केलीं आहेत, प्रश्नमालिका तयार झाली आहे, रिपोर्टांतील दोषस्थलें टिपून काढलीं आहेत आणि बसल्या बैठकीलाच जर तडजोड करावयाची ठरली तर त्याचाही विचार करून ठेविला आहे."

"ठरल्याप्रमाणें हें एवढें थोर व विकट काम श्रीमंत सरकार यांच्या हातून त्यांच्या भोंवतींचे लोक होऊं देतील असा आज रंग दिसत नाहीं. मनुष्य स्तुतिप्रिय असतो. भोंवतालच्या लोकांच्या कचाट्यांतून श्रीमंत सुटतील तर या लढ्याचा निकाल रयतांच्या कलानें लावून आपली कीर्ति ते वाढवूं शकतील असें वाटतें."

"चौकशीची जी सिद्धता मी करीत आहें त्या कामीं श्री० बा. वि. शिखरे, डॉ० जोशी व आणखी कांहीं स्नेही मंडळी यांची मदत विशेष झाली आहे. प्रश्नमालिका तर त्यांच्या मदतीशिवाय होऊंच शकली नसती. आतां चौकशीचें काम सुरू झालें म्हणजे आणखी कांहीं नवीन प्रश्न सुचतीलच. कारण प्रश्नावलि अगर रिपोर्टांतील मुद्दे वगैरे अद्याप पूर्णपणें तयार झाले आहेत असें कोणासच वाटत नाहीं. प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर त्यांत भर पडणें अगर कमी करणें या गोष्टी ओघानेंच–कारण आम्ही सर्वच या कामांत अगदीं नवीन आहोंत–कराव्या लागणार आहेत."

"तुम्ही लिहून आणाल त्या कागदावर मी सही करतो." अशा अर्थाचे उद्गार जरी श्रीमंत सरकार यांनीं माझ्यापुढें काढले असले तरी मी इतकी जबाबदारी घेऊन त्यांची सही घेण्याच्या भरीस पडणार नाहीं. त्यांचें व माझें एकमत होईल तरच चौकशीशिवाय तडजोड होऊं शकेल. नाहींतर चौकशीच्या कामाला सुरुवात करण्यास मी त्यांना विनंति करीन. मात्र अगदीं खरोखरच प्रत्येक लहानसहान खेड्यावर श्रीमंत सरकार यांना नेतां यावयाचें नाहीं. ते वृद्ध झाले आहेत. याचाही मला विचार केला पाहिजे." असो.

"परवांच्या मुलाखतींत श्री० शिखरे यांच्याविषयीं श्रीमंत सरकार व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांनीं जी वृत्ति माझ्यापुढें व्यक्त केली ती पाहून वाईट वाटलें व चीडही आली; परंतु कार्याकडे दृष्टि देऊन मीं त्यावेळीं सर्व कांहीं सहन केलें. माझा व श्रीमंतद्वयांचा चांगला परिचय होईल व कायम टिकेल तर मी त्यांच्या मनांतील भलत्या कल्पना काढून टाकूं शकेन. परंतु हा योगायोग आज येईलच असें आजच सांगवत नाहीं."

"आणखी २।४ दिवसांनीं आमच्या चौकशी-कमिटीचें काम सुरू होईल. नंतर पुन्हा आपल्याला पत्र पाठवीन. तडजोडच झाली तर वर्तमानपत्रांत आपण वाचालच."

"रयतांनींही आपले कागदपत्र व पुरावा जमवून ठेवून चौकशी-कमिटीपुढें तो मांडण्याची तयारी चालविली आहे. चौकशी-कमिटीपुढें रयतांची बाजू नीट मांडण्यास जबाबदार व तज्ज्ञ माणसांची जरुरी आहे. चौकशी कमिटींत असण्यापेक्षां मी रयतांची बाजू मांडण्यास मोकळा असतों तर अधिक बरें झालें असतें. परंतु लोकांचें दारिद्र्य प्रत्यक्ष पाहिल्यावर श्रीमंत सरकार कदाचित् कित्येक गांवांवर वाढ मुळीं करणारच नाहींत असें होणेंही असंभवनीय नाहीं. चौकशीचें काम संपण्यास एक महिना तरी लागेल. चौकशीचें काम चालू असतांना एखाद्या गांवांत आपण हजर रहाल तर मला बरें वाटेल."

असो. इतकी सिद्धता व मनाचा सरळपणा ठेवून आणि जबाबदारी ओळखून श्री० पुंडलीकजी पुण्याहून परत आल्यानंतर ता. ११।११।२८ रोजीं सकाळीं ८–३० वाजतां श्रीमंत सरकार यांच्याकडे चौकशी-कमिटीसंबंधीं वाटाघाट करण्यास गेले. आपलीं टिपणें व इतर सर्व कागद त्यांनीं आपल्या बरोबर नेले होते;

परंतु तेथें गेल्यावर त्यांना विपरीत परिस्थिति दिसून आली ! सर्वच घडी विसकटलेली त्यांना अधिकाधिक स्पष्ट कळून येऊं लागली. श्रीमंत सरकार यांची त्यावेळीं देवपूजा चाललेली होती. दोन तासपर्यंत श्रीमंत सरकार हे श्री० पुंडलीकजींबरोबर बोलले नाहींत एवढेंच नव्हे तर त्यांच्याकडे त्यांनीं पाहिलेंही नाहीं. श्री० पुंडलीकजी यांच्या ध्यानांत परिस्थिति आलेली असल्यामुळें फक्त आतां 'जें जें होईल तें तें पाहात बसणें' एवढेंच त्यांच्या हातीं होतें.

देवपूजा करतांना श्रीमंत सरकार बोलत नाहींत असें नाहीं. पूजा करतांना सर्व कामें चाललेलीं असतात. टपालवाचन, ग्रथवाचन व भेटावयास येणाऱ्या लोकांच्या भेटीही त्याचवेळीं होतात. शागीर्द, हुजरे, शिपाई, आचारी किंवा इतर कोणी नोकर यांच्याकडून कांहीं चुका किंवा प्रमाद त्याठिकाणीं झाल्यास अथवा प्रमाद झाला असें श्रीमंत सरकारना वाटल्यास त्यांच्यावर श्रीमंत स्वतः आपल्या मुखानें शेलकी पुष्पवृष्टीही करीत असतात. पूजेंतील देवांना तो रोज एका अर्थीं खुराकच असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो. हा विषय अप्रस्तुत आहे. पण हा सर्व प्रकार पाहात श्री० पुंडलीकजी यांना तेथें दोन तास बसावें लागलें. नंतर मोटार पाठवून श्री० दप्तरदार यांना गांवांतून आणविलें. श्रीमंत युवराजही इतक्यांत तेथें आले किंवा त्यांनाही बोलावून आणविलें. श्रीमंतांची देवपूजा आटोपल्यानंतर सर्वच मंडळी (श्री० पुंडलीकजींशिवाय) एका पडद्याच्या आड गेली. त्यांत श्रीमंतद्वय, दोन कारकून, दोन हुजरे व एक आचारी इतकी मंडळी आंत गेलेली दिसली. तेथें चाललेली त्यांच्यांतील वाटाघाट मधून मधून श्री० पुंडलीकजी यांना अस्पष्ट अशी ऐकूं येत होती. सुमारें अर्ध्या तासानें एकटे श्रीमंत सरकार श्री० पुंडलीकजी यांच्यासमोर येऊन बसले. दोघेही एकमेकांकडे पाहात होते. बोलणें प्रथम कोणीं सुरू करावें एवढाच प्रश्न होता. शेवटीं श्रीमंत सरकार उठून जातील व आपल्याला मात्र येथें बसून राहावें लागेल असें पाहतांच श्री० पुंडलीकजींनीं 'आळी मिळी' फोडली व सांगितलें कीं, " मी चौकशी-कमिटीच्या कामासंबंधीं वाटाघाट करण्यास आलों आहें. कागदपत्र मीं पाहिले व चौकशीची तयारीही पण करून ठेविली आहे. ती आपल्याला केव्हां दाखवूं ? "

श्रीमंत सरकारः—गांवांतील वकीलमंडळी माझ्याकडे आलेली होती. सर्व काम झालें आहे. आतां चौकशीची गरज नाहीं. मला यापेक्षां अधिक बोलावयाचें नाहीं.

श्री० पुंडलीकजीः—(आश्चर्यानें) रयतांवर अन्याय फार झाला आहे. श्री० मोडकांचा रिपोर्ट असत्य असून भलत्या विधानांनीं भरलेला आहे.

श्रीमंत सरकारः—तें सर्व मी पाहून घेतों. तुम्हाला काय बोलावयाचें आहे तें तात्यासाहेबांपाशीं बोला. मी त्यांच्याजवळ सर्व बोलून ठेविलें आहे. (इतकें बोलून सरकार उठूं लागले.)

श्री० पुंडलीकजीः—मला पुन्हा रयतांमध्यें चळवळ करावी लागेल. रयतेला चळवळीची संवय लागणें म्हणजे एका अर्थी कुत्र्याच्या जिभेला रक्त लावण्यासारखें आहे! आपल्या राज्यांत अनिष्ट प्रसंग न यावा अशी माझी मनापासूनची इच्छा आहे.

श्रीमंत सरकारः—पाहून घेईन. रक्त कुत्र्याच्या जिभेला लागतें कीं तुमच्या लागतें कीं माझ्या लागतें तें मी पाहून घेईन.

ज्या 'कुत्र्याच्या जिभेच्या रक्ता'बद्दल ज्याच्या त्याच्यापुढें ध्वनि निघत असतो त्याची खरी स्थिति अशी आहे. श्री०पुंडलीकजी जातांना नमस्कार करण्यास उभे राहिले, त्या वेळीं श्रीमंत सरकार त्यांच्याकडे पाठ फिरवून उभे राहिले. उष्णतेचा पारा फार चढला आहे हें जाणून श्री० पुंडलीकजी त्यांचा निरोप घेऊन निघून गेले. जातांना श्रीमंत तात्यासाहेब यांचीही त्यांनीं भेट घेतली. 'श्री० पुंडलीकजी आमच्याकडे आले नाहींत, आले असते तर कांहीं मार्ग निघाला असता' असा आक्षेप त्यांच्यावर पुढें घेतां येऊं नये एवढ्याचकरितां ते श्रीमंत युवराजमहाराजांकडे गेले होते. तेथें गेल्यानंतर श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांना श्री० पुंडलीकजी म्हणाले कीं, "श्रीमंत सरकार यांनीं मला आपल्याकडे जाण्यास सांगितलें आहे, म्हणून मी आलों आहें." तेव्हां श्रीमंत युवराजांनीं त्यांना शांतपणें सांगितलें कीं, "मी त्यांना विचारून मग आपल्याला काय तें सांगतों. त्यांनीं तुम्हाला माझ्याकडे कां पाठविलें आहे हें मला माहीत नाहीं."

श्री० पुंडलीकजीः—श्रीमंत आपल्या अभिवचनाच्या मार्गें जात आहेत ही गोष्ट चांगली नाहीं. त्यांच्यासारख्या थोर गणल्या जाणाऱ्या पुरुषाला ही गोष्ट शोभत नाहीं. तीन हजार लोकांसमक्ष त्यांनीं वचन दिलें आहे. ते लोक त्यांच्याविषयीं काय कल्पना करतील याचा विचार झालेला दिसत नाहीं. त्यांना आपल्या अभिवचनाच्या मार्गें जाण्यास ज्यांनीं सल्ला दिली त्यांनीं फार मोठी चूक केली आहे.

श्रीमंत तात्यासाहेबः—पण मी त्याला काय करूं ? तुम्ही त्यांना जाऊन विचारा. मी त्यांना शिकवावयास जाण्याची माझी कांहीं योग्यता नाहीं.

अशा प्रकारें 'गड सासवडयोर्मध्ये' लुडबुडत बसण्याचा प्रसंग श्री० पुंडलीकर्जीवर आला. त्यांनाही क्षणभर कांहींच सुचेनासें झालें. ही 'गुंडगिरी' झाली, हें कांहीं 'राजकारण' नव्हे असें त्यांना वाटूं लागलें. आपण या चौकशी-कमिटींत जाण्यास कबूल झालों नसतों तर बरें झालें असतें. लोकांना मीं परत घरीं जाण्यास सांगितलें. या कामाची तड न लाविल्यास माझ्या हातून रयतांचें मोठेंच अकल्याण होणार आहे. पण आतां या कार्याची तड कशी पोचवावयाची याचा उपाय तर ध्यानांत येईना. अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनांत घोळत असल्याचें दिसून आलें. पुढें श्री० बा. वि. शिखरे, बाबाण्णा घुळी, डॉ० जोशी व इतर कांहीं मंडळींनीं त्याच दिवशीं एकत्र जमून पुढें काय करावयाचें यासंबंधीं विचार केला व शेवटीं पुन्हा सर्व गांवचे लोक हिराबागेभोंवतीं जमून सत्याग्रह करावयाचा असें सर्वानुमतें ठरलें. 'शुभस्य शीघ्रम्' या न्यायानें हा सत्याग्रह शक्य तितक्या लवकर झाला पाहिजे असेंच सर्वांना वाटत होतें. एकदां तीन हजार लोक जमले म्हणून रोजरोज कांहीं जमत नाहींत,अशी कल्पना अधिकारी व श्रीमंत यांची असली पाहिजे हें अगदीं उघड आहे. ही सारा-वाढ चळवळ आतां मोडली असें सामान्य लोकांना वाटूं लागलें. श्रीमंतांजवळचे कारकून व हुजरे यांना बरें वाटलें. 'पुंडलीकजींना बाजूला सारण्यास काय उशीर ? आम्ही त्यांची डाळ शिजूं देतों काय ? मग आम्ही श्रीमंतांपाशीं कशाला आहों ?' असेंही कित्येकांना वाटूं लागलें. " आम्ही म्हणतच नव्हतों का, या सरकारांकडून लेखी घ्या म्हणून ? आमचे केस काळ्याचे पांढरे झाले आहेत." असें रयत म्हणूं लागले. 'आतां या बाबतींत कांहींही जुळून येईल असें दिसत नाहीं' असेंही कित्येक लोक सांगूं लागले.

पुन्हा पूर्वीप्रमाणें इतक्या मोठ्या जमावानें सत्याग्रह करण्याचें काम जुळवून आणणें खरोखरच कठिण होतें यांत शंका नाहीं. पण अंगावर आल्यावर शिंगावर घेतलें पाहिजे असेंच रयतांच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें व त्या प्रयत्नाला हात घातला. ता. १५।११।२८ रोजींच लोकांनां पुन्हा जमवावयाचें असें निश्चित ठरून कामाला सुरुवात झाली. गेल्या सत्याग्रहाच्यावेळीं व तत्पूर्वी अधिकारी व श्रीमंत इतके जागरूक नव्हते; परंतु आतां मात्र हा दुसरा सत्याग्रह यशस्वी

होऊं नये अशाबद्दल त्यांच्याकडून कसून प्रयत्न झाल्याशिवाय राहणार नाहीं, ही गोष्ट सर्वांना कळून चुकलेली होती. अर्थात् त्यांच्याकडून कोणत्या प्रकारचा विरोध होईल याची अटकळ रयतांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें करून ठेविली होती. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही आहे कीं, श्रीमंतांनीं आपलें वचन मोडलें असलें तरी आपली चळवळ आपल्या हातून गेली आहे असें मात्र रयतांना वाटत नव्हतें. आणि याच एका आधारावर पुढील सत्याग्रह व जरूर तर करबंदीही यशस्वी होऊं शकेल अशी आशा पुढाऱ्यांना वाटत होती. चळवळीमधील एकंदर स्थित्यंतरांत ही वेळ चिंताजनक व आणीबाणीची होती. जर पुन्हा सत्याग्रहास लोक न जमतील तर मात्र सर्वच प्रकारें खालीं मान घालण्याचा प्रसंग होता. परंतु ईश्वरानें खैर केली व वेळ निभावून नेली. रयतांचा सत्पक्ष होता. व ईश्वराचें त्याला साहाय्य होतें. फक्त कित्येक वेळां ईश्वर 'कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहें' हेंच खरें. वास्तविक 'सदा सर्वदा ईश संन्नीध आहे' यांत बिलकुल शंका नाहीं.

पुन्हा दुसरा सत्याग्रह यशस्वी करून दाखविण्यास पहिल्यापासून सर्व तयारी करावयाची आहे व अवकाश फारच थोडा आहे म्हणून आतां त्याकडे वळूं या.

प्रकरण सातवें

सत्याग्रहाचा आठवडा

चळवळीला 'पुनश्च हरिः ॐ' करण्याचा प्रसंग कां व कसा आला हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. दुसऱ्या सत्याग्रहाकरतां रयतांना निमंत्रण देण्याच्या हेतूनें श्री० बा. वि. शिखरे, श्री० बावाण्णा घुळी (मालगांव) आणि सांगलीचे श्री० विष्णुपंत राजवाडे ही मंडळी कवठेपिराणला ता. १२।११।२८ रोजीं गेली होती. त्याविषयीं 'संस्थानी स्वराज्यां'त कवठेपिराणच्या वातमीपत्रांत म्हटलें आहे कीं, "रात्रीं ८--३० पर्यंत स्वयंसेवक मंडळींनीं फार मेहनत घेऊन सुमारें ७००।८०० मंडळी एकत्र केली. बैठकीच्या जागीं 'परवानगीशिवाय आंत येऊं नये' अशी एक पाटी लाविलेली होती. ८—३० वाजतां श्री० शिखरे यांनीं सारावाडीच्या चळवळीचा आजपर्यंतचा त्रोटक इतिहास सांगितला व श्रीमंतांनीं स्वतः रा० पुंडलीकजींस घेऊन चौकशी करतों व चौकशी पुरी झाल्याशिवाय आकार बंद प्रसिद्ध करीत नाहीं, असें जें ता. ४ रोजीं सर्वांसमक्ष वचन दिलें होतें तें त्यांनीं मोडल्याचें मोठ्या खेदानें जाहीर केलें."

श्रीमंतांनीं वचन दिल्यावेळीं शिखरे यांनीं आपल्यास याबद्दल विश्वास वाटत नसल्याचें सांगितलें होतें; परंतु लोकांना वाटलें कीं, इतक्या लोकांसमक्ष दिलेलें वचन कसें मोडण्यांत येईल ?

हे संस्थानिक आपल्या राज्यकारभाराचा जो वार्षिक अहवाल पाठवितात त्यांत अखेरीस संस्थानचे दिवाण लिहितात कीं, 'आमच्या प्रभूशीं आपण गेल्या सालमध्यें फार संभावितपणाचें वर्तन ठेविलें होतें. आपण दयाळूपणानें आम्हांला वागविलें याबद्दल आमच्या प्रभूंनीं आपलें अंतःकरणपूर्वक आभार मानण्यास मला आज्ञा केली आहे'. पोलिटिकल एजंट कोणीकडे व हे राजे कोणीकडे; परंतु यांच्यांतील राजेपणा गेल्यानें अशी खुशामती भाषा बोलूनच त्यांना आपलें राज्य टिकविण्यांत भूषण वाटतें ! असो.

हे राजे आपल्या प्रजेशीं किती इमानानें वागतात हें पाहाण्यासारखें आहे. प्रजेशीं वचनभ्रष्ट होण्यांत आज त्यांना दिक्कत वाटत नाहीं; परंतु एक दिवस असा येईल कीं, तेव्हां त्यांना आपल्या प्रजेची आराधना करण्याचा प्रसंग येईल.

"वरील तऱ्हेची चर्चा बराच वेळ झाल्यानंतर वकील मंडळींनीं आपली स्थिति किती बिकट करून ठेविली याबद्दल बोलणें झालें. पुढें सर्व खेड्यांतील लोकांनीं जास्तींतजास्त संख्येनिशीं ता. १५ गुरुवारीं सकाळीं आठ वाजतां हिराबागे-जवळ जमण्याचें ठरलें." त्याप्रमाणें ता. १२।१३।१४ या तीन दिवसांत श्री० पुंडलीकजी हे स्वतः सावळी, तानंग, करोली, पाटगांव, मळणगांव, सिरढोण या गांवीं जाऊन सर्वांना सत्याग्रहाला निमंत्रण देऊन आले होते. मोळे, कैंपवाड व वड्डी या गांवीं ही परिस्थिति समजून सांगण्याकरितां माणसें पाठविलीं होतीं. रयतांच्या पुढाऱ्यांचा हा संदेश गांवोगांव पोंचविण्याचें काम फारच शीघ्र व परिणामकारक झालें.

ही बातमी श्रीमंत व अधिकारी यांना ताबडतोब कळली असावी असें त्यांच्या पुढील हालचालींवरून आढळून आलें. त्यांनींही सत्याग्रहास लोकांनीं जमूं नये असें सांगण्याकरितां मोटारीनें माणसें पाठविलीं होतीं. ता. १४ दिवशीं रात्रीं सर्व गांवीं जाऊन आल्यास आपल्या प्रयत्नाचा परिणाम नाहींसा करण्याकरितां रयतांच्या पुढाऱ्यांना सवडच मिळणार नाहीं, अर्थात् सत्याग्रहास लोक जमणार नाहींत, अशी युक्ति अधिकाऱ्यांनीं योजिली. बुधवार, ता. १४ रोजीं रात्रीं ८ ते ९ च्या दरम्यान मिरज तालुक्याचे मामलेदार रा० घोरपडे, रा० हरि नारायण पन्नालाल शेठ व रा० रामभाऊ भोकरे यांच्यासह मालगांवांस गेले होते. 'उद्यां मिरजेस जाऊं नका, श्रीमंत बोलल्याप्रमाणें तुमच्या गांवची चौंकशी करणार आहेत', असें लोकांना सांगून, ते तानंग गांवाकडे गेल्याचें कळलें. हा आपला निरोप लोकांना समजावून सांगण्यास गांवच्या पाटलांना व पुढाऱ्यांना बजावून मामलेदार निघून गेले होते. ही बातमी शिखरे वगैरे रयतांच्या पुढाऱ्यांना कळतांच त्यांनीं ताबडतोब रात्रीं सर्व खेड्यांतून मामलेदारांच्या मोटारीपाठोपाठ आपली मोटार लावण्याचे ठरविलें, आणि त्याप्रमाणें ते प्रथम मालगांवास आले. मामलेदारांचा निरोप लोकांना समजावून सांगण्यास गांवच्या पाटलांनीं गांवांतील सर्व लोकांना एकत्रित केलें होतें. अर्थात् त्याचा फायदा घेऊन श्री० शिखरे वगैरे पुढारी मंडळींनीं आपलाही निरोप लोकांना सांगितला. श्री० शिखरे म्हणाले:—

"मामलेदारांच्या उलट माझा आपल्याला निरोप आहे. माझा निरोप, आपण उद्यां मिरजेस या, श्रीमंतांना त्यांनीं 'पूर्वी वचन दिल्याप्रमाणें चौंकशी करा', अशी विनंति सर्वांनीं मिळून आणखी एकवार करा असा आहे. आतां हे मामलेदार हलूं

लागले, उद्यां कारभारी हलतील; पण ही त्यांची हालचाल आपल्याला फसविणारी आहे हें मात्र सर्वांनीं लक्षांत ठेवावें." पत्त्यांच्या खेळाचा दृष्टान्त देऊन ते म्हणाले कीं, "राजापेक्षां एक्क्याची योग्यता अधिक आहे. प्रजा एकजूट होऊन निर्भयतेनें व शांतपणानें कोणतेंही कार्य करूं लागेल तर राजाचें काडीमात्र कोठेंही व कांहींही चालणार नाहीं हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. श्री० पुंडलीकजी हे आतांच थकून आले आहेत तरी त्यांना येथें येऊन आपल्याला चार गोष्टी सांगितल्यावांचून राहवेना म्हणून ते आले आहेत." यानंतर श्री० पुंडलीकजींनीं अथपासून सर्व हकीगत सर्वांना सांगून उद्यां सकाळीं जास्तींत जास्त मंडळींनीं मिरजेस यावें अशी प्रार्थना केली. रात्रीं ११ वाजतां मंडळी तेथून मिरजेकडे गेली.' (संस्थानी स्वराज्य, ७।१२।२८.) असो. लोकांना, सत्याग्रहाला येऊं नये म्हणून नाकेबंदी केली आहे किंवा काय हें पाहाण्याकरितां पुन्हा पहांटे श्री० पुंडलीकजी हे मोटारनें ३।४ खेड्यांतून जाऊन आले. त्याच दिवशीं पहांटे मेलनें पुण्याहून श्री० बाबूराव गोखले, श्री० वामनराव पटवर्धन व श्री० ग. वि. केतकर वगैरे मंडळी मिरजेस सत्याग्रहाचे वेळीं हजर राहाण्यास मुद्दाम आली होती. सत्याग्रहाच्या आठवड्यांत रोजची डायरी ठेविली जात असे. तीच या ठिकाणीं आम्ही देतों म्हणजे वेगळी हकीगत लिहिण्याचें कारणच उरणार नाहीं.

दुसऱ्या खेपेस म्हणजे ता. १५।११।२८ पासून रयतांनीं श्रीमंतांच्या दारांत जो धरणें धरून बसण्याचा सत्याग्रह केला त्याची रोजची डायरी:—

सत्याग्रहाचा पहिला दिवस. (ता. १५।११।२८)

" दोनप्रहरीं बाराच्या सुमारास सर्व गांवचे सत्याग्रही हिराबागेजवळ जमा झाले. हिराबागेच्या दारांत जाण्यायेण्याची वाट सोडून सर्व लोक शिस्तीनें बसलेले होते. हा सत्याग्रह पाहाण्याकरितां पुण्याहून श्री० दा. वि. गोखले, संपादक–'मराठा', श्री० ग. वि. केतकर, संपादक–'केसरी', श्री० वामनराव पटवर्धन, संपादक–'संस्थानी स्वराज्य,' श्री० पंडिताप्पा चिकोडी, एम्. एल्. सी., बेळगांव व श्री० जोगळेकर टाईम्सचे बातमीदार बेळगांव वगैरे मंडळी श्रीमंतांच्या दरवाज्यानजीक हजर राहिलेली होती. सुमारें दीड वाजतां श्री० रामभाऊ पोतनीस–सिटी मॅजिस्ट्रेट (ह्या गृहस्थांनीं मिरज संस्थानांत मामलेदारीचें काम बरींच वर्षें श्रीमंतांची अधिकाधिक खुषी व रयतांची अधिकाधिक नाखुषी संपादून केलेलें आहे असें, म्हणतात. इतकी जबर सारावाढ करण्यास ज्यांच्या अनुभवाच्या

माहितीनें श्री० मोडकांस मोह उत्पन्न झाला व ज्यांना श्री० मोडकांनीं सर्व दक्षिण महाराष्ट्रांत यांच्याइतके **'समर्थ अधिकारी'** ablest officer in S. M. C. States नाहींत म्हणून आपल्या रिपोर्टांत अभिप्राय देऊन टाकला, ते हे श्री० रामभाऊ पोतनीस होत.) यांनीं बाहेर येऊन सर्व गांवच्या लोकांना निरनिराळे गट करून बसण्यास सांगितलें व ज्या ज्या गांवांहून लोक आले होते त्या त्या गांवांचीं नांवें लिहून घेऊन पोतनीस आंत गेले. त्यावेळीं "श्रीमंतांच्या अभिवचनाचा खुलासा" या मथळ्याचें एक पत्रक श्री०पुंडलीकजी यांच्या सहीचें लोकांमध्यें वांटण्यांत आलें. त्याच्या प्रति श्रीमंतांकडे पाठविण्यांत आल्या होत्या; परंतु श्रीमंत सरकार किंवा त्यांच्यापैकीं कोणीही त्या खुलाशाला उत्तर दिलें नाहीं. तो 'खुलासा' खालीलप्रमाणें आहेः—

'मिरज' तालुक्यांतील रयतांना श्रीमंतांच्या अभिवचनाचा खुलासा

श्रीमंत सरकार मिरज यांच्या बंगल्यावर ता. ४–११–२८ रोजीं आपण सुमारें तीन हजार मंडळी जमलां होतां, त्या वेळीं श्रीमंत सरकार यांनीं आपल्याला अभिवचन दिलेलें आपल्या स्मरणांत असेलच. त्याप्रमाणें श्रीमंत सरकार व श्री० पुंडलीकजी मिळून प्रत्येक गांवांत जाऊन चौकशी करण्याचें निश्चित झालेलें होतें. श्रीमंतांचें हें आश्वासन आपल्याला समजून सांगून मी एक प्रकारची जबाबदारी माझ्यावर घेतली आणि नंतर आपल्याला आपापल्या घरीं परत जाण्यास भाग पाडण्यांत मी अंशभागी झालों. श्रीमंतांच्या अभिवचनावर शुद्ध अंतःकरणानें विश्वास ठेवून मीं ही जबाबदारी मजवर घेतली. त्यावेळीं आपणही माझ्यावर विश्वास ठेविलात याबद्दल मी आपला सदैव ऋणी राहीन. चौकशीची पूर्वतयारी करण्याकरितां श्रीमंतांनीं मला कागदपत्रें पाहाण्यास सांगितलें आणि त्यावेळीं श्रीमंतांनीं देखील माझ्यावर पूर्ण विश्वास टाकिला, त्याबद्दल मी श्रीमंतांचा अत्यंत ऋणी आहें. कागदपत्रें मीं पाहिलीं, अनेक तज्ज्ञ लोकांचा विचार मीं घेतला आणि काल (तारीख १२–११–२८) सोमवारीं सकाळीं मीं पुन्हा श्रीमंतांची भेट घेतली. झालेल्या कामाचा वृत्तान्त सांगितला; परंतु मी इकडे कागद वगैरे पाहात असतांनाच श्रीमंतांनीं गांवांतील कांहीं वकील मंडळीशीं वाटाघाट करून कांहीं तडजोड तयार व मुक्रर करून ठेविली होती असें कळतें. ही

अशा प्रकारें कांहीं वाटाघाट झालेली असल्यामुळें आतां माझ्याकडील काम उरलें नाहीं असें श्रीमंतांनीं आपल्या भेटीतें मला कळविलें. अर्थात् त्यांचें आपल्या सर्वांच्या समक्ष दिलेलें चौकशी करण्याचें अभिवचनच आतां शिल्लक राहिलें नाहीं अशी त्यांची समजूत झाली. तेव्हां श्रीमंत सरकार व मी आपल्या गांवीं आतां चौकशीकरितां येणार नाहीं. आपल्याला मीं वेळींच कळवून ठेवणें माझें कर्तव्य आहे म्हणून मी आज हें जाहीर करीत आहें. आपला विचार देखील न घेतां झालेल्या वाटाघाटीनें श्रीमंतांची समजूत निराळी झाली. त्यांच्या समजुतीबरोबरच त्यांचें आश्वासन गेलें. आणि श्रीमंत व रयतलोक यांना सहज पसंत होईल अशी जी तडजोड घडवून आणण्याची माझी उमेद होती ती नष्ट झाली. ईश्वरेच्छा बलीयसी !

आपण आपल्या सेवेस पुन्हा बोलवाल त्यावेळीं मी माझ्या सवडीप्रमाणें हजर राहीन; किंवा श्रीमंत सरकार आपल्या अभिवचनाप्रमाणें चौकशी करण्यास बोलावतील त्यावेळीं अवश्य सादर होईन.

आपला नम्र

पुंडलीक कातगडे.

या खुलाशाला उत्तर मिळालें नाहीं म्हणून श्री० पुंडलीकर्जीनीं स्वतः एक पत्र श्रीमंत सरकार यांना पाठविलें. तें पुढीलप्रमाणे होतें:—

श्रीमंत सरकार मिरज यांचे सेवेसीः—

गेल्या खेपेस आपण जें अभिवचन लोकांना दिलें होतें त्याप्रमाणें आपण व मी मिळून प्रत्येक गांवांत जाऊन चौकशी करावयाची होती; परंतु आपण मला तें शक्य नाहीं असें दर्शविल्याप्रमाणें मीं तसें लोकांना कळविलें आहे. तरी कृपा करून मागील खेपेप्रमाणेंच लोकांच्या प्रतिनिधींना बोलावून आपलें म्हणणें समजून द्यावें अशी विनंति आहे. आज्ञा होईल तर त्यांच्याबरोबर मीही येतों. काय ती आज्ञा व्हावी. कळावें, सेवेसीं श्रुत होय.

आपला नम्र

पुंडलीक कातगडे.

या पत्राच्या सोबत श्री० पुंडलीकर्जीनीं प्रसिद्ध केलेला 'खुलासा' जोडलेला होता. हें पत्र स्वतः श्री० पुंडलीकर्जीनीं पहारेवाल्याच्या हातीं दिलें; परंतु आपलें पत्र मला वाचावयाचें नाहीं असा निरोप श्रीमंतांकडून पहारेकऱ्यामार्फत आला

आणि त्या निरोपाबरोबर श्री० पुंडलीकजींचें पत्र न फोडतां जसेंच्या तसें परत आलें.

नंतर कोणी रयतांनीं आंत श्रीमंतांकडे निरोप पाठविला कीं, आपण निदान पाहुणे मंडळींना तरी भेटतां काय ? परंतु 'मला त्यांनाही भेटावयाचें नाहीं' असा जबाब श्रीमंतांकडून आला.

❧ ❧ ❧

प्रत्येक गांवचा एकेक प्रतिनिधि रयतांनीं निवडला व त्या १७।१८ प्रतिनिधींची तरी श्रीमंत भेट घेतील काय ? असा प्रयत्न करण्यांत आला; परंतु रयतांना त्यांतही यश आलें नाहीं.

❧ ❧ ❧

सायंकाळीं पांचपासून रयत लोकांचा लोंढा आस्ते आस्ते हिराबागेच्या बाहेरील दरवाज्यांतून आंतल्या बाजूस सरकूं लागला. त्यांना पोलिसांनीं मात्र कोणत्याही प्रकारचा अडथळा केला नाहीं.

❧ ❧ ❧

इतक्यांत दरम्यान श्री० जोगळेकर–टाईम्सचे बातमीदार–यांनीं श्रीमंतांची मुलाखत घेण्याचा प्रयत्न केला. भेट न मिळाल्यास त्यांना तसें प्रसिद्ध करावें लागेल असें त्यांनीं श्री० पोतनीस यांना सांगितलें असतां श्री० पोतनीस असें म्हणाल्याचें कळलें कीं, " चीफसाहेब वृद्ध असून पूर्वकाळचे आहेत, तेव्हां त्यांना त्याचें कांहींच वाटणार नाहीं." शेवटीं दुसरे दिवशीं त्यांना मुलाखत देण्याचें ठरून तें प्रकरण संपलें.

❧ ❧ ❧

इकडे लोकांनीं श्रीमंतांना कसें तरी बाहेर आणविण्याचा प्रयत्न चालविला होता. श्री० बा. वि. शिखरे, डॉ० जोशी, श्री० बाबाण्णा घुळी, श्री० पुंडलीकजी, शेठ चुनीलाल राठी वगैरे मंडळी पाहुणे मंडळीपाशींच वाटाघाट करीत बसली होती. हिराबागेच्या आंत शिरलेला समाज श्रीमंतांना बाहेर बोलविण्याच्या हेतूनें 'हरहर महादेव', 'पुंडलीकवरदे हारीविट्ठल' वगैरेचा गजर सारखा करीत होता.

❧ ❧ ❧

इतक्यांत श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांचे चिरंजीव व कन्या श्रीमंत सरकार मिरज यांच्या भेटीस मोटारीनें गेले. लोकांनीं त्यांच्या मोटारीस जातांना शांत-

पणें वाट करून दिली. परंतु ती मोटार परत येतांना मात्र लोकांनीं मोटार अडवून उभी केली. त्यावेळीं लोकांना धाक, धमकी देण्याचा प्रयत्न समरीवाले श्री० पोतनीस यांनीं केला; परंतु त्यांना कोणीही भीक घातली नाही. शेवटीं श्री० पोतनीस व दप्तरदार यांनीं श्रीमंतांच्या मुलांना कडेवरून पलीकडे पोंचविलें आणि नंतर मोकळी मोटार गेली. मोटारचा हा प्रकार पाहून श्रीमंत सरकार यांनीं रोजच्याप्रमाणें सायंकाळीं देवाला जाण्याचें धाडस केलें नाहीं.

❧ ❧ ❧

असा हा प्रकार पाहून, सत्याग्रह त्याच दिवशीं संपवावा किंवा कसें असा एक विचार सत्याग्रही लोकांमध्यें उत्पन्न झाला होता. परंतु दूरवर विचार होऊन त्याला कोणींच संमति दिली नाहीं. पाहुणे मंडळी सायंकाळीं हिरावागेंतून निघून गेली व रात्रीच्या गाडीनें पुण्यास रवाना झाली.

❧ ❧ ❧

श्री० पुंडलीकजी यांनीं हिरावागेच्या आंतील भागांतून सर्व लोकांना बाहेर बोलावून घेतलें व सर्व लोक पुन्हा शिस्तींत बसविले. या अवधींत श्रीमंतांनीं श्री० बाबाण्णा घुळी यांना आंत आपल्याकडे बोलावून घेतलें व 'मला देवाला जाण्यास वाट करून द्या म्हणजे मी परत आल्यावर मला काय सांगावयाचें तें एकदां सांगून टाकतों, असें त्यांना सांगितलें श्रीमंतांच्या या बोलण्यावर श्री० बाबाण्णा घुळी यांनीं विश्वास ठेविला आणि देवदर्शनास जाऊन येण्यास श्रीमंतांच्या मोटारीस वाट करून दिली, परंतु लोकांमधून मोटार बाहेर निघतांच श्रीमंतांनीं आपलें पूर्वस्वरूप प्रगट केलें व मोटारीला रस्ता देण्याकरितां एक पोलीस रयतांना बाजूस सारूं लागला असतां, श्रीमंत त्याच्यावर रागावून त्या बिचाऱ्या पोलिसास म्हणतात कीं, ' माझ्या रयतांना त्रास काय देतोस ? ..... ते माझे आहेत. तुझे आठ दिवसांचे खाडे घातले आहेत ! ' गर्दींतून मोटार बाहेर आली. कांहीं रयत सरकारना म्हणत आहेत कीं, 'सरकार' आमचा एकदां न्याय करा. पोलिसाचे खाडे वाढतांना रयतांच्याविषयीं कनवाळूपणाचा व आपलेपणाचा उत्पन्न झालेला झरा मिनिट अर्धमिनिटामध्यें आटून गेला. देवाला जाऊन परत आल्यावर श्रीमंत जें कांहीं सांगणार म्हणत होते तें त्यांनीं मोटारीला रयतांनीं सरळ वाट करून दिल्यानंतर बाहेर येतांच सांगून टाकलें. ते म्हणालेः—

" फुकट्या देशभक्तांच्या नादीं लागूं नका. तुम्ही येथें बसून मला त्रास देऊं

नका व तुम्ही त्रास करून घेऊं नका ! माझ्या मनांत कांहीं थोडा सारा कमी करावयाचा होता; परंतु आतां मी कमी करीन किंवा नाहीं हें सांगूं शकत नाहीं. आणि इतक्याउप्पर तुम्हाला येथें बसावयाचें असेल तर खुशाल बसा. ज्यांचें ज्यांचें देणें तुम्हीं फेडावयाचें असेल तें खुशाल देत बसा. मला यापेक्षां अधिक कांहींच सांगावयाचें नाहीं. " एवढें सांगून श्रीमंत सरकार देवदर्शनास निघून गेले व परत येऊन तसेच वाडयांत शिरले.

* * *

त्यानंतर सव लोकांना शांत बसवून श्री० पुंडलीकजींनीं लोकांना शिस्तीनें वागण्याबद्दल चार शब्द सांगितले. ते म्हणालेः—

" श्रीमंत सरकार यांनीं जरी आतां आपल्याला शेवटचे म्हणून दोन शब्द सांगितले तरी त्यांना शेवटीं रयतेच्या न्याय्य आग्रहापुढें नमावें लागल्याशिवाय राहाणार नाहीं. मात्र आपण शिस्तीनें, चिकाटीनें व एकजुटीनें वागलें पाहिजे. आतां यापुढें कोणींही रस्त्यावर बसून रस्ता अडवावयाचा नाहीं. श्रीमंतांच्या बागेंत जावयाचें नाहीं. केव्हांही कोणाची मोटार आडवावयाची नाहीं. अत्यंत शांतपणानें वागावयाचें. रात्रीं कोणीही बडबड करावयाची नाहीं. आपल्या गोंगाटानें श्रीमंतांची झोंप मोडणार नाहीं याची आपण काळजी घेतली पाहिजे. आम्ही न्याय्य मागणीकरितां झगडत आहों, त्याखेरीज आमचा दुसरा कोणताही हेतु नाहीं असें आपल्या वर्तणुकीनें दाखवावयाचें आहे."

श्री० शिखरे यांना आजच खांडव्याचें निमंत्रण तारेनें आलेलें होतें.

* * *

रात्रीं श्री० पंडितराव शिखरे व पुंडलीकजी रयतांमध्येंच झोपण्याकरितां गेले होते. डॉ० जोशी यांनीं आपल्या घरांतील कांहीं जाजमें व पांघरुणें दिलीं होतीं. डॉ० जोशीही झोंपण्याकरितां तेथेंच येणार होते; परंतु त्यांना तेथील हवा मानवणार नाहीं म्हणून ते आले नाहींत. रात्रीं सर्व रयत थंडीमध्यें तसेच झोंपीं गेले.

* * *

मालगांवच्या शंभर स्त्रिया सत्याग्रहास हजर होत्या परंतु त्यांना सायंकाळींच परत मालगांवास पाठवून दिलें.

* * *

" आपण आतां दाद लागेल म्हणून येथें बसलों नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या

डोळ्यांतून टिपें पडेपर्यंत आपण येथें बसावयाचें आहे. प्रत्येक माणसाच्या अंतःकरणास पीळ पडला पाहिजे. म्हणजे आमच्या मनाची तयारी होईल आणि तेंच आपलें यश आहे." असें श्री० बोधलेबुवा (कवठेपिराण) यांनीं सांगितलें. त्यांच्या भाषणाचा रयतांच्या मनावर चांगला परिणाम झाला. किंबहुना सत्याग्रहास अधिक नेट लावण्यास त्या क्षणापासूनच सुरुवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सत्याग्रहाचा दुसरा दिवस (ता: १६।११।२८.)

सकाळीं सर्व सत्याग्रही दूर जाऊन शौचमुखमार्जन करून आपापल्या स्थळीं येऊन बसल्यानंतर श्री० बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांनीं त्यांच्याशीं वाटाघाट केली. आपल्या नोकरीवर जाण्याविषयीं त्यांनीं सर्वांना खुलासा केला. अगदीं प्रारंभापासूनच शिखरे यांनीं आपण नोकरीवर जाणार असल्याचें बहुधा सर्व गांवीं सांगून ठेविले होतें व त्याच वेळीं आरंभिलेलें कार्य परमेश्वरकृपेनें शेवटास लावण्याकरितां आपल्या जागीं श्री० पुंडलीकजी यांस मुद्दाम आणविलें आहे व ते आपल्या सर्वांच्या विचारें व सामर्थ्य पाहून हें कार्य तडीस नेतिल याबद्दल त्यांनीं सर्वांना खात्री दिली होती. असो, जाण्यासंबंधीं खुलासेवजा जे त्यांनीं आज भाषण केलें तें हृदयद्रावक असेंच होतें. त्यांचें भाषण ऐकून रयतांच्या डोळ्यांतून अश्रु आले. निरनिराळ्या कॅम्पमधून त्यांनीं लोकांना जमवून चार गोष्टी सांगितल्या. ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद या ठिकाणीं उत्पन्न होईल, तर सर्व चळवळ व्यर्थ जाईल असें त्यांनीं श्री० बोधलेबुवांना बजावलें. व श्री० बोधलेबुवांनीं त्यांना तसें न करण्याबद्दल आश्वासन दिलें, आज रात्रीच्या गाडीनें श्री० शिखरे हे जाणार होते; परंतु त्यांचे जाणें त्यांनीं दुसऱ्या दिवसावर ढकललें.

आज जेवण करावें किंवा सर्व लोकांनीं उपवासी राहून सत्याग्रह चालवावा याविषयीं सत्याग्रही लोकांमध्यें बरीच वाटाघाट झाली. शेवटीं उपवासी राहूं नये असेच ठरले. त्यावेळीं श्री० गोविंदराव रानडे वकील त्या ठिकाणीं आले. त्यांच्याविषयीं त्यावेळीं सत्याग्रही रयतांमध्यें बराच गैरसमज होता. श्री० रानडे यांनीं एक दिवसास सर्व रयतांना लागेल तितका शिधा देण्याचें कबूल केले. त्याचप्रमाणें डॉ० जोशी यांनींही हा सर्व बोजा उचलण्याचें प्रत्यक्ष बोलून दाखविलें व तेथून ते ती व्यवस्था करण्यास गेले.

श्री० गोविंदराव रानडे व डॉ० जोशी यांनीं भांडीं, शिधा, जळाऊ लांकडांच्या गाड्या वगैरे पाठविण्याची व्यवस्था केली. सर्व माल श्री० गोविंदराव रानडे यांच्या नांवावरच एक दिवसापुरता आणविला होता. दुसऱ्या दिवसापासून मालगांवच्या लोकांनीं ती सर्व व्यवस्था आपल्याकडे घेतली.

❀ ❀ ❀

सकाळीं श्री० पुंडलीकजींनीं सर्वांना वर्तमानपत्रें वाचून दाखविलीं व समजावून दिलीं.

❀ ❀ ❀

दोनप्रहरीं तीन वाजतां भात व पिठलें करून सर्व रयतांनीं खालें. तोंपर्यंत लोकांनीं आपापली थोडी थोडी भाकरी खाल्ली होती. तीनचार ठिकाणीं चर खणून भाताचे हंडे व पिठल्याचीं पातेलीं शिजविलीं होतीं. यावेळीं सत्याग्रही कँपमध्यें श्री० शिखरें हे पुन्हा येऊन मंडळींचीं जेवणें वगैरे झालीं कीं नाहीं याची चौकशी करून गेले.

❀ ❀ ❀

जेवण झाल्यानंतर मंडळी थोडी झोंपी गेली. श्रीमंतांनीं लोकांना चावीचें पाणी मिळवून देण्याची व्यवस्था करविली होती. त्यांच्या हिराबागेनजीक रस्त्याच्या बाजूला एक नळ असून त्याच्या जवळच विहिरींतील पाणी रहाटगाडग्यानें तेथें येत असतें.

❀ ❀ ❀

सायंकाळीं ४–३० वाजतां डॉ०जोशी हे सत्याग्रह कँपकडे आले होते. रयतांनीं आपापल्या घरून आपल्याबरोबर आणलेल्या भाकरी आज संपल्या आहेत. सर्वांकरितां भाकरी करविण्याची व्यवस्था गांवांत होऊं शकेल किंवा काय याची वाटाघाट रयतांच्या पुढाऱ्यांमध्यें चालू होती.

❀ ❀ ❀

आज कवठेंपिराणहून आणखी अधिक लोक येऊन सत्याग्रहांत सामील झाले. मळणगांवाहून कांहीं लोक आज अधिक आले.

❀ ❀ ❀

निरनिराळ्या गांवांतील टोळ्यांमध्यें सारावाढीविषयीं चर्चा चालू असते.

❀ ❀ ❀

अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून गांवांतील एक चहाचें दुकान सत्याग्रहाच्या

जागेला आणवून लावण्यांत आलें होतें; परंतु सत्याग्रही लोकांनीं त्या दुकानावर बहिष्कार घातला व त्यांचा परिणाम असा झाला कीं, तें दुकान तेथून लागलीच उठून गेलें.

❧ ❧ ❧

सायंकाळीं नित्याप्रमाणें श्रीमंत सरकार देवदर्शनास गेले. त्यांची मोटार कोणींही अडविली नाहीं. आज रात्रीपासून सत्याग्रही लोकांनीं आपल्याकरितां तीन-चार गॅसबत्त्या गांवांतून आणवून दिव्याची सोय करून घेतली.

❧ ❧ ❧

आज देखील लोक एक वेळांच जेवले कांहींच्या भाकरी त्यांच्या त्यांच्या गांवांतून आलेल्या होत्या.

❧ ❧ ❧

ढवळीचे ४।५ लोक सत्याग्रह पाहून गेले. दोन माणसें ढालगांवच्या लोकांना बोलावून आणविण्यास आज पाठविलीं गेलीं आहेत.

रात्रीं ९ वाजतां शिखरे यांनीं रयतांनां पुन्हा भेट दिली आणि आणखी एकदां आपल्या नोकरीवर जाण्याविषयीं खुलासा केला. 'तशीच वेळ आल्यास मी नोकरी सोडून येण्यास कचरणार नाहीं' असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. लोकांनीं त्या वेळीं त्यांना निरोप दिला. आपले काम श्री० पुंडलीकजी यापुढें चालवितील असेंही लोकांना त्यांनीं बजाविलें. श्री० पुंडलीकजींना विचारल्याशिवाय या सत्याग्रहा-विषयीं कोणींही व कोठेंही लिहावयाचें नाहीं असें त्यांनीं गांवोगांवच्या पुढाऱ्यां-ना सांगितलें व लोकांनीं तें मान्य केलें. वड्डीचे लोक आज सत्याग्रहांत सामील झाले. मिरजेचे माळी व शेतकरी आज सत्याग्रहांत बसण्याकरतां आले आहेत.

❧ ❧ ❧

सत्याग्रहाचा तिसरा दिवस (ता. १७।११।२८.)

सकाळीं सर्व मंडळी शौचमुखमार्जन करून चिंताग्रस्त होऊन बसली होती. दान दिवस हजारों लोक आपल्या दरवाज्यांत थंडीवाऱ्यांत पडून राहिले असले तरी आपल्या राजाला दया येत नाहीं यांचें लोकांना अत्यंत वाईट वाटत होतें, व त्यांचा सात्त्विक राग कित्येक वेळीं व्यक्तही होत होता.

❧ ❧ ❧

दा. क्र. ३८... १०१

श्री० शिखरे हे गांवास जाण्याकरितां निघण्यापूर्वी पुन्हा एकवार सर्वांना भेटून सकाळीं ९–३० च्या गाडीनें आज गांवीं गेले.

❀ ❀ ❀

श्री० पुंडलीकजींनीं वर्तमानपत्रें लोकांला मोठ्यानें वाचून दाखविलीं. सत्याग्रहाच्या दुसऱ्या दिवसाची हकीगत त्यांत छापून आलेली होती.

❀ ❀ ❀

आज मालगांव गांवीं पूर्ण हरताळ पाळण्यांत आला. शाळेचीं मुलेंदेखील शाळेला गेलीं नाहींत.

❀ ❀ ❀

प्रत्येक गांवानें आपापल्या गांवांतून भाकरी गोळा करून त्या एका गाडींत टाकून ती भाकरीची गाडी मागविण्याचा उपक्रम कालपासून केला होता. त्या भाकरीच्या गाड्या आज येऊं लागल्या आहेत. त्याशिवाय भात व पिठलें यांचे हंडे शिजविण्याचा क्रम पूर्ववत् चालला होताच. आज लोकांचें जेवण दोनप्रहरीं तीन वाजण्याच्या सुमारास झालें.

❀ ❀ ❀

ढवळीचे शंभर रयत आज सत्याग्रहांत सामील झाले. रयतांची संख्या वाढत आहे. अद्यापपावेतो कोणीही आजारी पडलेलें नाहीं.

❀ ❀ ❀

रयतांमध्यें फूट पाडून सत्याग्रही लोकांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न प्रतिपक्षाकडून आज सुरू झाला आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद येथें उत्पन्न व्हावा अशीही खटपट कांहीं लोकांकडून होऊं लागली आहे.

❀ ❀ ❀

सकाळीं दहा वाजतां लोकांना एकत्रित जमवून श्री० पुंडलीकजी यांनीं एक व्याख्यान दिले. ते म्हणाले:—

" मीं आपणां सर्वांना कांहीं विशिष्ट हेतूनें एकत्रित बोलाविलें आहे. मला दोनतीन गोष्टी आपल्याला कळवून ठेवावयाच्या आहेत. त्या लक्ष लावून ऐका.

[१] पहिली गोष्ट ही आहे कीं, या ठिकाणीं जेवण केल्यानंतर आपण पत्रावळी अस्ताव्यस्त फेंकून देत असतों ही गोष्ट चांगली नाहीं. स्वच्छता हा मनुष्य-

पणाचा पहिला गुण आहे. श्रीमंतांच्या बंगल्याभोंवतींची स्वच्छता आपल्याला कायम ठेविली पाहिजे. त्यांच्या बंगल्याभोंवतींची हवा बिघडविणें हें आपल्याला केव्हांही शोभणार नाहीं. म्हणून या ठिकाणीं थोडया अंतरावर एक खड्डा काढून उष्ट्या पत्रावळी त्यांत टाकण्याचा नियम आपण केला पाहिजे. असें न कराल तर येथील हवा बिघडून आपल्याला देखील येथें राहाणें कठिण होऊन बसेल. आपल्या घराप्रमाणें या जागेची व्यवस्था आपण ठेविली पाहिजे. सत्याग्रही हा आंतबाहेर स्वच्छ स्फटिकासारखा असला पाहिजे.

[२] दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. ती अशी आहे कीं, आपल्यामध्यें फाटाफूट व्हावी आणि आपण हळुहळू येथून निघून जावें व अशा रीतीनें हें धरणें धरलेलें वितळून जावें असा प्रयत्न कांहीं लोकांकडून चालू आहे. आपल्यामध्यें येऊन बोलत बसावयाचें व हळुहळू आपला बुद्धिभेद करावयाचा अशी खटपट सुरू झालेली आहे. अशा प्रकारें येथें वावरणारा एक मनुष्य मीं आतांच पकडलेला होता. तो शेतकरी म्हणून आपल्या-मध्यें येऊन बसला होता. त्याचप्रमाणें आपल्यांतील कांहीं लोक आंघोळीला व जेवणाला आपल्या घरीं बोलावून त्यांच्यामार्फत येथील लोकांमध्यें फूट पाड-ण्याचा प्रयत्न कांहीं हलक्या वृत्तीचे लोक करीत आहेत. तेव्हां आपण सावध राहिले पाहिजे. कांहीं गांवांच्या कुलकर्ण्यांना आपापल्या गांवच्या लोकांना परत गांवीं घेऊन जाण्याबद्दल ताकिदी देण्यांत आल्या आहेत. अधिकाऱ्यांच्या किंवा वकिलांच्या घरीं कामानिमित्त गेलेल्या लोकांना देखील मन वळवून सत्याग्रहांतून बाजूला काढण्याचे कपट कांहीं दिशांनीं होत आहे. या सर्वांना आपण पुरून उरलें पाहिजे. त्यांतच आपलें यश आहे.

[३] आपल्यापैकीं कोणालाही स्वतंत्रपणें बोलावून तडजोडीचें बोलणें कर-ण्याचा अधिकाऱ्यांनीं आंव घातल्यास त्याला बळी पडूं नका. 'तुमच्या पुढाऱ्यांना सोडा व आमच्याकडे या म्हणजे आम्ही तडजोड करून देतों'. असें अधिकारी सांगतील; परंतु तो शुद्ध लपंडाव व कावा आहे हें विसरूं नका. 'आम्ही तडजोडीस जाऊं तर थोडक्यांत तडजोड होईल' असें आपल्यापैकीं कांहीं दीर्घ शहाण्यांना वाटत असेल पण तें चुकीचें आहे. कारण ज्यांना खरी तडजोड करावयाची आहे त्यांना पुढाऱ्यांशीं बोलण्यास कोणती हरकत आहे ! हा त्यांचा कावा तुम्हीं ओळखिला पाहिजे. आपलें भांडण काय आहे याची सर्व

माहिती व विवेचन मी आज सायंकाळीं आपल्यापुढें करणार आहें. तेव्हां सायंकाळीं कोणींही गांवांत फिरावयास जाऊं नये. एकदां धरणें धरल्यानंतर आपण येथून उठून गांवांत सहल करून येऊं लागलों, तर आपल्या मनाला ती सत्याग्रहाची आंच कशी लाभावी ? शिवाय गांवांत तुम्ही सहज कांहीं कामा-निमित्त जरी गेलांत तरी 'हे पहा, रयत लोक सत्याग्रहास कंटाळून परत घरीं चालले' अशा कंड्या किंवा बातम्या कांहीं लोक उठविण्याचें कार्य करीत आहेत. त्यांना त्याबद्दल सरकारांतून कांहीं मिळत असावें किंवा काय हें मला समजत नाहीं.

श्री० शिखरे कांहीं दिवसांकरितां आपल्यापासून दूर गेले आहेत. त्याचा फायदा घेऊन त्यांच्याविषयीं गैरसमज पसरविण्यांत येत आहे असें मला समजतें. परंतु आपण त्यावर विश्वास ठेवूं नये. त्यांनीं मला आपल्या सेवेला येथें आणून ठेविलें व मगच ते आपल्या कामाला गेले आहेत. शिवाय तशी वेळ आल्यास ते परत आपल्यामध्यें येऊन आपलें पुढारीपण घेतील यांत शंका नाहीं. मी त्यांच्याच धोरणानें यापुढें काम चालविणार आहें. आपण सर्व मिळून एक-जुटीनें कार्य करण्यास उभे राहूं तर श्री० शिखरे यांची उणीव फारशी भासणार नाहीं. डॉक्टर जोशी यांनीं गांवांतून आपल्याला मदत मिळवून देण्याचें काम स्वतःवर घेतों असें आज ते म्हणाले आहेत. मी येथें आपल्यामध्यें आपल्या सेवेला हजर आहें. असो. सायंकाळीं पांच वाजतां पुन्हा एकत्र जमूं. मी एक तासभर गांवांत जाऊन येतों."

❀ ❀ ❀

श्रीमंत सरकार आज सांगलीस मेजवानीस गेले आहेत असें कळतें.

❀ ❀ ❀

डॉ० जोशी यांनीं सत्याग्रही लोकांना भेटून एका टोळीमध्यें भगवद्गीतेचा एक श्लोक समजावून सांगितला.

❀ ❀ ❀

रा० पंडितराव शिखरे सत्याग्रही लोकांमध्यें झोंपण्यास आले होते. गांवांतून बरेच लोक सत्याग्रह कॅंप पाहावयास आले होते. त्यांत कांहीं अधिकारी व वकीलही होते.

❀ ❀ ❀

ठरल्याप्रमाणें सायंकाळीं साडेपांच वाजतां श्री० पुंडलीकजी यांचें व्याख्यान झालें. त्यावेळीं ते म्हणाले:—

" व्यक्तिशः तुमच्यापैकीं कोणासही या सारावाढीच्या लढ्याबद्दल प्रश्न विचारल्यास आपणांला मुद्देसूद व व्यवस्थित उत्तर देतां यावें याकरितां मी आपल्याला या लढ्याची माहिती देऊन ठेवितों. त्याकडे नीट लक्ष देऊन ऐका. 'आपल्या हयातींत सारावाढ करीत नाहीं', असं वचन यापूर्वी श्रीमंत सरकारांनीं अनेक वेळां दिलें होतें; परंतु तें मोडून त्यांनीं आज आपल्यावर भयंकर सारावाढ केलेली किंवा करविलेली आहे. श्री० मोडक यांना माहिती पुरविणाऱ्या येथील एका अधिकाऱ्यानें ताळतंत्र सोडून वाटेल ती व खोटीनाटी माहिती पुरविली असून श्रीमंतांची मर्जी संपादन करून घेऊन आपली पोळी कायमची पिकवून घेण्याच्या मूर्ख व अदूरदर्शी कल्पनेनेंही सारावाढ करण्यास स्वतःला कारणीभूत करवून घेतलें आहे. म्हणून रिपोर्टांत वाटेल तीं भलतीं विधानें केलीं आहेत.

'एक पै देखील सारावाढ होऊं नये असें आपण भांडत नाहीं'. नीट विचार करा व योग्य असेल ती सारावाढ खुशाल करा, असें आमचें मागणें आहे. आपल्याला आपण दिलेलें वचन पाळावयाचें नसेल तर खुशाल सारावाढ करा; पण ती बेतानें व हळूहळू करा म्हणजे झालें. त्याकरितां ता. ४।११।२८ रोजीं आपण सर्व मंडळी निघून या ठिकाणीं श्रीमंतांच्या दारांत येऊन बसलों. त्यावेळीं हिरा-बागेंत श्रीमंत एकटेच होते. खोटी माहिती पुरविणारे अधिकारी त्यांच्यापाशीं येऊं शकले नाहींत. चौकशी करण्याबद्दल आपण जी मागणी आपल्या परिषदेंत मागितली होती ती श्रीमंतांनीं मान्य केली. श्रीमंत सरकार स्वतः व मी मिळून सर्व खेड्यांची चौकशी करावयाची; शेवटीं दोघांच्या व रयतांच्यामतें जो ठेरल तो योग्य सारा बसवावयाचा असें ठरलें होतें. त्याकरितां आम्हीं त्यांचें अभिनंदन देखील केलें होतें.

परंतु कोठें माशी शिंकली ईश्वराला माहीत, श्रीमंतांनीं आपण तीन हजार लोकांमध्यें दिलेलें वचन मोडलें ! आतां ते चौकशी करण्यास तयार नाहींत ! हें त्यांनीं असें कां केलें व आतां या सारावाढीच्या बाबतींत त्यांचें काय धोरण आहे तें कळवून घेण्याकरितां आपण येथें येऊन बसलों आहोंत. श्रीमंतांनीं आपण दिलेलें वचन मोडून आपल्या नांवाला कमीपणा आणून घेतला, एवढेंच नव्हे तर सबंध संस्थानच्या नीतीला जबरदस्त धक्का पोंचविला आहे. एखाद्या लुंग्यासुंग्यानें वचनभंग करणें वेगळें व प्रत्यक्ष राजानें वचनभंग करणें वेगळें ! 'यथा राजा तथा प्रजा' अशी आपल्यामध्यें म्हण आहे. विशेषतः श्रीमंत बाळासाहेबांसारख्या

विख्यात व विद्वान् संस्थानिकानें वचनभंग करणें या गोष्टीचें आश्चर्य अखिल महाराष्ट्राला वाटत आहे. या वचनभंगानें श्रीमंतांनीं आपली आजपर्यंतची पुण्याई व्यर्थ खर्ची घातली ! (श्रीमंतांनीं वचनभंग केल्याच्या तारा याच वेळीं विलायतेंत 'लंडन टाईम्स'सारख्या पत्रांतून प्रसिद्ध झाल्याचें आम्हाला नंतर समजून आलें.) त्यांच्या सल्लागारांनीं त्यांचें हें फार मोठें नुकसान करून ठेविलें आहे. याची भरपाई सारावाढीनें कशी होईल !

त्यांनीं आपल्या वचनाप्रमाणें एक चौकशी तरी केली पाहिजे किंवा लोकांच्या प्रतिनिधींशीं तडजोड तरी केली पाहिजे. या दोन्हीपैकीं एक गोष्ट झालीच पाहिजे. परवां दिवशीं सर्व प्रयत्न करून पाहिले, परंतु श्रीमंतांनीं कोणाचीच भेट घेतली नाहीं. आपलीं घरेंदारें सोडून लोक येथें येऊन थंडीवाऱ्यांत बसले असतां, त्यांची भेट देखील राजानें घेऊं नये हें त्यांना शोभत नाहीं. राजेपणाचा हा अधःपात आहे."

" आपली शक्ति मात्र आपल्या शांत व शिस्तींत राहाण्यामध्यें आहे. आपण शांतपणा राखाल तर कोणीही आपला एक केसदेखील वांकडा करूं शकत नाहीं. जेथून एक कुत्रा देखील भुंकत गेलेला खपत नव्हता किंवा एक कावळा देखील ओरडत जात नसे, तेथें आज तीन दिवस आपण चार हजार लोक बसला आहांत, आपलें जेवणखाण वगैरे सर्व येथेंच चाललेलें आहे; परंतु कोणीही आपल्याला येथून हालवूं शकत नाहीं. हा कशाचा प्रभाव असेल तर तो आपल्या शांतपणाचाच आहे. शांतपणा हे या जगांतील फार मोठें शास्त्र आहे. त्यानें मोठमोठी धेंडें मऊं येऊं शकतात. आणि या गोष्टीचा अनुभव आपण आज तीन दिवस घेत आहां. कोणाविषयींही राग मनांत आणूं नका. रस्ता किंवा मोटार अडवूं नका. ज्यांना अंतःकरण नसेल असे लोक आपल्या अंगावरून खुशाल मोटार उडवीत जाऊं देत. त्यांची त्यांनाच खंती किंवा लाज वाटेल. (इतक्यांत श्रीमंत तात्यासाहेब व श्री० बाबूराव जोशी वकील मोटारींतून तेथूनच फिरावयास गेले आणि हंसूं लागले !) आपण हंसूं नये. आपण हंसून दुसऱ्याचा उपहास करतांना आपलें मन देखील खालच्या पायरीला पोहोंचत असतें. मग दुसऱ्याला हंसून आपण आपले आत्मिक नुकसान व्यर्थ काय म्हणून करून घ्यावें ?"

* * *

रात्रीं टोळ्या टोळ्यांमधून भजन करावें किंवा कसें हा विचार आज रयतांमध्यें निघालेला होता; परंतु शेवटीं, तसें करूं नये असें सर्वानुमतें ठरलें.

* * *

मिरज गांवांतील लोक आजही सत्याग्रह कँप पाहाण्यास आले होते. आज कवठे-पिराणच्या लोकांनीं आपल्या गांवीं हरताळ पाळण्याकरितां ४।५ मंडळी परत कवठ्यास पाठविली.

❀ ❀ ❀

प्रत्येक गांवच्या सत्याग्रही रयतांची नांवनिशीवार यादी करून दिवसांतून एकवेळ त्यांची हजेरी घेण्याचा उपक्रम करण्यांत आला.

❀ ❀ ❀

आपापल्या गांवच्या पुढाऱ्याला विचारल्याशिवाय कोणींही गांवांत जाऊं नये असें श्री० बाबाण्णांनीं सर्वांना बजावलें.

❀ ❀ ❀

कांहीं गांवांतील लोकांनीं आपापलीं पांघरुणें आज आणविलीं आहेत.

❀ ❀ ❀

रोजच्या रोज तांदुळाचीं पोतीं आणविण्यापेक्षां एकदमच एक शंभर पोतीं आणून सत्याग्रही कँपमध्यें मोठा ढीग लावून ठेवावा अशी कल्पना श्री० बावाण्णा घुळी व चुनीलाल शेठ वगैरे मालगांवच्या लोकांनीं सुचविली व त्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें सर्वांनीं ठरविले.

❀ ❀ ❀

लोकांमध्यें बसून लोकांचा बुद्धिभेद करण्याचें निंद्य काम कोणी करीत असेल तर त्याला शोधून काढण्याकरितां श्री० बोधलेबुवांनीं आपलीं माणसें नेमलीं.

❀ ❀ ❀

आज पत्रें वगैरे लिहिण्याचें काम कँपमध्यें बसूनच केलें.

❀ ❀ ❀

करोलीच्या लोकांना दरवाजांतून काढून समोरच्या शेतांत बसविले.

❀ ❀ ❀

प्रत्येक गांवची चारपांच माणसें सर्वांच्या भाकरी गोळा करून आणण्यास आपापल्या गांवीं आज पाठविलीं.

आपसातींत तडजोड करण्याविषयीं श्री० दप्तरदार यांच्याशीं थोडेंसें बोलणें झालें.

दे० भ० गंगाधरराव देशपांडे सत्याग्रहाचें पुढारीपण घेण्यास तयार आहेत अशी गांवांत दाट वदंता पसरलेली होती; परंतु ती बातमी निराधार असल्याचें श्री० पुंडलीकजींनीं सत्याग्रही कँपमध्यें जाहीर केलें.

आज दोनप्रहरीं उष्मा बराच झाला होता.

* * *

सत्याग्रहाचा चौथा दिवस (ता. १८।११।२८.)

पहांटे पांच वाजतां कांहीं सरकारपक्षीय लोकांनीं व्यापाऱ्यांना थोडें लवकर जागें केलें व त्यांच्याकडून व्यापारी मंडळींना सत्याग्रहाच्या विरुद्ध करून ठेवण्याचा उपद्व्याप त्यांनीं करून ठेविला असें समजतें.

सकाळीं ९ ते १० च्या दरम्यान १७।१८ व्यापारी मंडळी सत्याग्रही लोकांना भेटण्याकरितां कॅंपमध्यें आली. श्री० केशवदासजी वाटेंतच श्रीमंत तात्यासाहेब यांच्या बंगल्याच्या वाजूला गेले होते. त्यांची वाट पहात एकदोन व्यापारी रस्त्यावर उभे होते.

व्यापारी लोक भेटावयास आल्यामुळें श्री० पुंडलीकजी यांनीं सर्व सत्याग्रही मंडळींना एकत्र जमविलें व व्यापारी आणि सत्याग्रही यांची भेट झाली. व्यापारी मंडळीतर्फे श्री० केशवदास शेठजींनीं भाषण केलें. त्यांत ते म्हणाले:—

"सत्याग्रही लोकांना भेटण्याकरितां आम्ही व्यापारी लोक आलों आहों. आज सत्याग्रहाला सहानुभूति दाखविण्याकरितां आम्ही व्यापारी लोकांनीं गांवांत हरताळ पाळावा अशी आम्हाला विनंति करण्यांत आली आहे; परंतु आम्हांला विचारून या लोकांनीं सत्याग्रह केलेला नाहीं म्हणून भी या सत्याग्रहाचा निषेध करतों. लोकांनीं आतां घरोघर निघून जावें व नंतर कांहीं दिवसांनीं आम्हाला येऊन भेटावें. मग आम्ही व ते मिळून पुन्हा सत्याग्रह करूं. सत्याग्रह करण्याबद्दल आम्ही विरुद्ध नाहीं.

त्यानंतर सत्याग्रही लोकांतर्फे श्री० पुंडलीकजी यांनीं श्री० केशवदास शेठजी व इतर व्यापारी मंडळी यांना उत्तर दिलें. त्यावेळीं श्री० पुंडलीकजी म्हणाले:—

"आज चार दिवस सत्याग्रह चालल्यानंतर कां होईना, व्यापारी वर्ग जागा झाला व आपल्याला भेटण्याकरितां आला ही आनंदाची गोष्ट आहे. यांच्यापैकीं एक व्यापारी आतांच श्रीमंत तात्यासाहेब यांना येतां येतां भेटून आले आहेत. (श्री० केशवदास—'नाहीं, आम्ही श्रीमंत तात्यासाहेबांच्या भेटीकरितां गेलों नव्हतों. तहान लागल्यामुळें विहिरींत पाणी पिण्याकरितां गेलों होतों'.) ठीक आहे. सकाळीं थंडीनें तहान लागल्यामुळें कोणी विहिरींत पाणी पिण्याकरितां गेले असतील असें मी मानून चालतों. मला सत्याग्रही रयतांच्यातर्फे या व्यापाऱ्यांना

इतकेंच सांगावयाचें आहे कीं, व्यापारी बंधूंनों, या रयतांविषयीं मनांत प्रेम बाळगा. आपण सर्व त्यांच्या कष्टाच्या पायावर इतके धनवान् झालेले आहोंत. जगांत उत्पादक म्हणजे नवीन धन उत्पन्न करण्याचा धंदा एक शेतकीशिवाय दुसरा नाहीं. जमिनीच्या पोटांतील अन्न या शेतकऱ्यांनीं बाहेर काढलें नसतें तर आपण सर्व उपवासी मेलों असतों. आज या भयंकर सारावाढीच्या टांचेखालीं हे लोक ठेंचले आहेत. श्री० मोडक व त्यांची पार्टी यांना वास्तविक संस्थाननें जाब विचारावयास पाहिजे होता. आपल्याला पहांटे उठवून या लोकांसमोर आणून उभें केलें आहे, त्यापेक्षां श्री० मोडक व मोजणीदार यांना येथें आणून उभें केलें असतें तर त्यांत अधिक शहाणपणा व बाणेदारपणा होता. सारावाढीचा रिपोर्ट वाचून हे व्यापारी लोक येथें आले असते तर ते आमच्यासारखेच या सत्याग्रही लोकांमध्यें सामील झाले असते यांत मला शंका वाटत नाहीं. व्यापाऱ्यांनीं आमच्याकरितां आज गांवांत हरताळ पाळावा अशी मागणी करण्यामध्यें सत्याग्रही लोकांनीं काय चूक केली ? आपलीं दुकानें रोज बंद करावीं लागतील म्हणून 'रोज येथें येऊन बसा' अशी मागणी आम्हीं केली नाहीं. व्यापाऱ्यांचें म्हणणें असें आहे कीं, 'आम्हांला विचारून सत्याग्रही लोकांनीं सत्याग्रह सुरू केलेला नाहीं'. परंतु या त्यांच्या शब्दांत केवढा भयंकर अहंकार सांठविलेला आहे याचें भान त्यांना राहिलेलें दिसत नाहीं. व्यापारी बंधूंनों, कोणी कोणास विचारावयाचें असतें ? ज्या शेतकरी वर्गाला हरत-हेनें लुबाडून आपण सर्व गब्बर झालेले आहोंत, ते आज या सारावाढीखालीं चिरडले जाणार आहेत, ही गोष्ट तुम्हांला कळली नव्हती काय ? 'बाबांनों, आतां तुम्ही काय उपाय योजणार ?' असें या रयतांना तुम्ही विचारावयास नको होतें काय ? सरकारनें तुम्हांला विचारून सारावाढ केलेली आहे काय ? मग रयतांचा निषेध करतां त्याप्रमाणे छाती असेल तर सरकारचा निषेध करा पाहूं ! लोकांच्या हातांत सत्ता नाहीं म्हणून ही त्यांची अशी अवहेलना करतां काय ? आज लोक शांत आहेत. शांत रहाण्याचें त्यांनीं व्रत घेतलें आहे. नाहींतर आपल्या तोंडून 'निषेध' शब्द निघतांच काय प्रकार उडाला असता याची कल्पना करून पहा. म्हणजे लोक-सत्ता काय असते याची जाणीव होऊं शकेल. आणखी कांहीं काळानें, रयतलोक शहाणे होतील व जागृत होतील. त्यावेळीं ते या आपल्या 'निषेधा'ला चोख उत्तर देतील. पैसा मिळेल पण रयत मिळणार नाहींत.

"या व्यापाऱ्यांचें दुसरें म्हणणें असें आहे कीं, लोकांनीं सत्याग्रह मोडावा व आपल्या घरीं निघून जावें, कांहीं दिवस स्वस्थ बसावें आणि मग या व्यापाऱ्याकडे जावें आणि नंतर हे काय प्रसन्न होतील ते होतील; नंतर म्हणे, पुन्हा सत्याग्रह करावयास दोघांनीं मिळून यावें. स्वतःचे डोळे झांकून दूध पिण्यापैकींच हा प्रकार आहे. ही युक्ति न समजण्याइतका मूर्ख रयत आज राहिलेला नाहीं हें मी त्यांना सांगून ठेवितों. सत्याग्रह करण्याबद्दल व्यापारी लोक विरुद्ध नाहींत असें आतां श्री० केशवदास शेठजींनीं कबूल केलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. श्रीमंत सरकारांच्याविरुद्ध सत्याग्रह करण्यास ते तयार आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. आमचा सत्याग्रह त्यांना पसंत नसेल तर त्यांनीं स्वतंत्रपणें आपला सवता सत्याग्रह सुरू केल्यास त्याला आमची हरकत नाहीं. सत्याग्रहाच्या तत्त्वाच्याविरुद्ध आपण नसतांना, केवळ रयतांनीं त्यांना विचारून आपला सत्याग्रह सुरू केला नाहीं एवढ्या क्षुल्लक गोष्टीला बुजून किंवा लाजून इतक्या जनसमूहाचा निषेध करण्यास धजणें म्हणजे आपली विवेकशून्यता प्रगट करण्यासारखेंच आहे. असो. आमच्या सत्याग्रहांत त्यांनीं सामील व्हावें अशी प्रार्थना मी सत्याग्रही रयतांतर्फे त्यांना करितों. आपलीं दुकानें बंद करून व एकाअर्थीं तितक्यापुरता कां होईना हरताळ पाळून हे सर्व व्यापारी आज आपल्या भेटीस आले याबद्दल मी त्यांचे आभार मानतों."

सत्याग्रही लोकांची भेट घेऊन नंतर श्रीमंतांना भेटण्याकरितां आलेले व्यापारी श्रीमंतांना न भेटतांच परत आपापल्या घरीं निघून गेले. परंतु परत जातांना ते वाटेंत ओढ्याच्या पलीकडे पुन्हा वाद करीत बसल्याचें समजलें. श्री० बाबाण्णा घुळी व पुंडलीकजी तेथें गेले व सर्वच मंडळी बोलत गांवाकडे परत आली.

❀ ❀ ❀

मालगांवला गेलेल्या कांहीं पोलिसांना कोणत्याही दुकानांत पैसे देऊनहीं माल मिळाला नाहीं.

❀ ❀ ❀

कवठ्यास हरताळ आहे असें कळलें.

❀ ❀ ❀

मालगांव, पाटगांव, तानंग, सावळी वगैरे गांवांतून रयतांनीं आपापल्या भाकरी आणविल्या.

❀ ❀ ❀

एकदम शंभर पोतीं तांदुळाचीं आणण्याकरितां श्री० बावाण्णा घुळी व शेठ चुनीलाल गांवांत गेले आहेत.

❧ ❧ ❧

श्री० बाळा झारी यांनीं दोन पोतीं तांदूळ देण्याचें कबूल केलें; परंतु अद्यापि आणून द्यावयाचे आहेत !

❧ ❧ ❧

रोजच्याप्रमाणें श्री० पुंडलीकजी यांनीं लोकांना वर्तमानपत्रें वाचून दाखविलीं. आज परमपूज्य दे० भ० लालाजी यांस देवाज्ञा झाल्याची बातमी वर्तमानपत्रावरून लोकांना समजली. सायंकाळीं सत्याग्रही कँपमध्यें त्याबद्दल दुःखप्रदर्शनसभा भरविण्याचें ठरून तसें जाहीर करण्यांत आलें.

❧ ❧ ❧

आज पोलीसपार्टी येऊन गोळीबार होणार आहे अशी कंडी लोकांमध्यें पसरलेली होती. लोक शांत व निश्चयी होते.

❧ ❧ ❧

सायंकाळीं ५–३० वाजतां सभा भरली. मध्यभागीं डॉ० ना. वि. जोशी हे श्री० पुंडलीकजीजवळच बसले होते. श्री० पुंडलीकजी म्हणाले कीं:—

"आज आपल्या देशांतील एक अत्यंत मोठा पुढारी नाहींसा झाला आहे. दे० भ० लाला लजपतराय यांचें नांव आपण ऐकलें असेलच. देशांतील लोकांची सेवा करण्यांत दे० भ० लालाजींनीं आपलें सर्व आयुष्य व शेवटीं जीवही खर्ची घातला. लोकांना शांत राखून मोठमोठ्या चळवळी कशा करतात हें पाहावयाचें असेल तर लालाजींच्या चरित्राकडे आपण पाहावें. आपण देखील आज चार दिवस शांतपणानें या ठिकाणीं राहिलांत हा आपला मोठाच विजय आहे. लालाजींना या गोष्टीनें आनंद झाला असता. आज आपल्या परीक्षेची वेळ येणार आहे अशा बातम्या गांवांत पसरल्या आहेत. पोलीसपार्टी आतांच येथें येणार आहे असें मला कळले आहे. कदाचित् पार्टी इकडे येण्यास निघालेली असेलही. (त्यावेळीं डॉ० जोशी हे सभेंतून उठून गांवाकडे निघून गेले.) पण आपण भिण्याचें कारण नाहीं. आपण सर्व शांत बसा, जागचे हालूं नका. शांत माणसाचें कोणीही कांहीं करूं शकत नाहीं. आपण आज चार दिवस शांत राहिलां हें आपलें भांडवल आहे. एवढ्यावर हा सारावाढीचा लढा आपण जिंकूं शकाल. सशस्त्र पोलीस

आपल्याला गराडा देतील तर ती एक प्रकारची शोभाच येईल. (इतक्यांत पोलीस इन्स्पेक्टर फाटक व फौजदार सभेच्या जागीं आले. नऊ इसमांवर नोटिसा बजावण्याच्या आहेत असें त्यांनीं श्री० पुंडलीकजींना सांगितलें. श्री० बाबाण्णा घुळी, चुनीलाल शेठजी, माधवराव देशपांडे, बोधलेबुवा, डॉ० जोशी, दादा भंडे, दत्तू पाटील, यशवंत पाटील वगैरे लोकांवर नोटिसा बजावल्या व त्या त्यांनीं आनंदानें बजावून घेतल्या.)

श्री० पुंडलीकजींनीं आपलें व्याख्यान पुढें चालू केलें. ते म्हणाले, "नोटीसा ज्यांच्यावर बजावल्या त्यांची सेवा ईश्वराचे घरीं रुजू झाली. माझें नांव त्यांत नाहीं याचें मला वाईट वाटतें. (इतक्यांत सुमारें २० सशस्त्र पोलीस 'मार्च' करीत हिराबागेंतून बाहेर पडले व गांवाकडे निघून गेले.) नोटिसा बजावतांना कदाचित् तुम्ही दंगा कराल या भीतीनें हे सहस्त्र पोलीस तुमच्या समोरून नेले आहेत. (हंशा) त्यांच्या बंदुका आज तरी थोड्या साफ केल्या गेल्या हें चांगलें झालें. ज्यांना नोटिसा बजावल्या आहेत त्यांनीं त्या मानल्या आहेत. कायदा मोडावयाचा असें आम्हीं अजून ठरविलेलें नाहीं. एवढ्यानें भागत नाहीं असें दिसून आल्यास आम्ही कायदा बाजूला ठेवण्यासही कमी करणार नाहीं. आम्ही मानतों म्हणून या नोटिसांच्या कागदाला कांहीं किंमत आहे, नाहींतर जाहिराती इतकी देखील त्याला किंमत नाहीं. आमच्यापैकीं प्रत्येकाला नोटीस लाविली असती तरी ती आम्हीं आज मानली असती. आपल्याच प्रजेवर नोटिसा बजावण्याची पाळी राजावर येत आहे ही राजाची नामुष्की आहे. राजानें वचन मोडले नसतें तर या चळवळीला इतकें तीव्र स्वरूप आलें नसतें. अधिकारी किंवा सल्लागार लोकांनीं राजाच्या तपाची राखरांगोळी केली यांत मला शंका नाहीं. आपल्या दरवाजांत इतके दिवस आपली प्रजा थंडीवाऱ्यांत पडलेली आहे ही एकच गोष्ट राजानें शांतपणें विचार करून पाहिली असती तर या नोटिसा बजावल्या नसत्या. आतां नोटिसा बजावल्यानंतर सारावाढ किती वसूल केली गेली हा मुद्दाच अगदीं गौण आहे. मानधन मनुष्याला पैशापेक्षां अब्रूची चाड अधिक असते. ज्यांच्यावर नोटिसा बजावल्या आहेत ते लोक फार दूर नाहींत. तर, रस्त्याच्या पलीकडील बाजूस ते बसणार आहेत. पूर्वपश्चिम रस्ता व उत्तरेचें रान यांमध्यें रहावयाचे नाहीं अशी नोटीस आहे; पण त्यांत 'दक्षिणेचें रान असें कोठें लिहिले आहे?' (हंशा) दक्षिणेच्या रानांत ते लोक बसून राहातील म्हणजे त्या ठिकाणीं आतां आमचें

ऑफिस उघडलें आहे असें समजा. 'सर्व मिळून जगूं किंवा सर्व मिळून मरूं' हा मंत्र चांगला ध्यानांत ठेवा."

ॐ ॐ ॐ

टाळ, मृदंग आणून भजन करावें या कल्पनेचा आज जोर झाला होता; परंतु तो विचार सर्व पुढाऱ्यांच्या विचारानें रहित करण्यांत आला.

ॐ ॐ ॐ

श्री० बाबाण्णा, चुनीलाल, बोधलेबुवा, पंडितराव शिखरे व पुंडलीकजी ही मंडळी कँपमध्येंच राहिली होती.

ॐ ॐ ॐ

रात्रीं दोन वाजेपर्यंत सर्व मंडळी जागी होती. आज दोन रयतांना थंडीमुळें थोडासा ज्वर आला होता. एका रयताच्या पायांत कांटा मोडून पाय सुजला होता. पुष्कळांना पडसें आलें होतें.

ॐ ॐ ॐ

आज सर्वांचें लक्ष स्वच्छता ठेवण्याकडे लागलें आहे. आज पाण्याची सोय चांगली झाली होती. नवीन नवीन लोक सत्याग्रहांत सामील होतच होते. गांवांतील शिकलेले लोक व सुखवस्तू आज सत्याग्रही रयतांना पाहाण्यास आले होते.

ॐ ॐ ॐ

श्रीमंत तात्यासाहेब आज दोन वेळां सत्याग्रही लोकांपुढून पायीं चालत गेले. मोटार उडवीत गेले नाहींत हें लोकांना बरें वाटलें.

ॐ ॐ ॐ

सायंकाळीं डॉ० जोशी यांच्या घरीं कांहीं मंडळींनीं बसून थोडी वाटाघाट केली. इतक्यांत कायदा मोडावयाचा असें ठरलें.

ॐ ॐ ॐ

रात्रीं सांगलीस श्री० माधवराव आठवले वकील यांच्याकडे श्री० बाबाण्णा घुळी व पुंडलीकजी गेले होते. कलम १२७ प्रमाणें सर्वांना नोटीस मिळाली तरी ती पाळावयाची; परंतु इतक्यांत कायदा मोडावयाचा नाहीं असेंच सत्याग्रही लोकांच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें.

सत्याग्रहाचा पांचवा दिवस (ता. १९।११।२८)

काल नोटिसा ज्यांच्यावर बजावल्या होत्या ते सर्व, सत्याग्रह कँपवरच दक्षिणेच्या बाजूला हजर होते.

श्री० शिखरे यांनीं खांडव्यास जातांना निदान सत्याग्रह चालू असेतोंपर्यंत पत्रानें व तारेनें दररोज त्रोटक परंतु महत्त्वाची सर्व हकीगत कळाविण्यास सांगितल्यावरून आज सकाळीं खांडव्यास खालीलप्रमाणें त्यांस तार पाठविली:—

"Notices under 144 served last evening upon nine persons excluding myself. Notices obeyed. Rayats firm, lawful. Town observes hartal. Don't worry."

सकाळीं ८-३० वाजतां श्री० पुंडलीकजींनीं वर्तमानपत्रें वाचून दाखविलीं. इतक्यांत गांवांतून व्यापारी वर्गातर्फे दोन व्यापारी सत्याग्रह कँपवर आले. त्यांनीं ५१ सह्या असलेला एक कागद श्री० पुंडलीकजींच्या हातांत आणून दिला. तो कागद खालीलप्रमाणें आहे.

श्री.

आज तारीख १८ माहे नोव्हेंबर सन १९२८ इसवी रविवारीं सकाळीं रा० केशवदास शेटजी यांनीं पेठेंत कांहीं व्यापारी मंडळींना शेतकऱ्यांनीं सत्याग्रह केला आहे त्या बाबतींत तिकडे जावयाचें आहे असें सांगून तेथें गेल्यानंतर सर्व पेठकऱ्यांतर्फे म्हणून शेतकऱ्यांनीं केलेल्या सत्याग्रहाचा निषेध केला, तो आम्हांस मान्य नाहीं. त्यांनीं चालविलेल्या सत्याग्रहास आमची पूर्ण सहानुभूति आहे.

व्यापारी मंडळीच्या सह्या

गणेश केशव उत्तुरकर.	रा. ह. जयकर.
कृष्णाजी रामचंद्र शिखरे.	घुळाप्पा बाळाप्पा हलवाई.
रामचंद्र नारायण फडके.	लुकमानसाहेब घुडुभाई तांबोळी.
कृष्णाजी गोविंद पवार.	फरीद महमदसाहेब बागवान.
चिंतामण मोरेश्वर फडके.	लाला व॥ लाडजी.
बाबुलाल दामोदरदास मारवाडी.	सिदाप्पा महालिंगाप्पा गोटखिंडी.
चन्नाप्पा विरपाक्षप्पा जावशेटी.	कृष्णा संतु चौगुले.
बापु गणपती पिसे.	घुडुलाल फरीद मोमीन.
रामकृष्ण विठोबा सन्मुख.	बाळाप्पा इराप्पा इचलकरंजे.
शंकर गोपाळ वैद्य.	दिगंबर लक्ष्मण धोंगडे.
सिद्राम संगाप्पाआण्णा सावणे.	कलाप्पा करबसप्पा हलवाई.

दुंडाप्पा व्हनाप्पा मळवाडे.
रामचंद्र गोविंद रेळेकर.
म्हमुलाल फरीद मोमीन.
महमदसाहेब आबदुलरजाक मणेर.
गणेश विनायक आठवले.
नारायण बाबाजी झारी.
ज्ञानोबा रामकृष्ण बोंगाळे.
लक्ष्मण दशरथा धोत्रे.
व्यंकटेश वामन चिपलकट्टी.
गोविंद राघवेंद्र जांभळे.
नरहर धोंडो काळे.
बाळा मिरासाहेब झारी.
भाऊ विश्वनाथ भोकरे.
रघुनाथ मार्तंड गुजर.
चंदुलाल रायचंद मारवाडी.

रामचंद्र गणेश रुईकर.
महादेव कल्लाप्पा कारजोळकर.
गंगाराम आप्पा जाधव.
हरि वासुदेव नरगुंदे.
केशव सीताराम भस्मे.
केशव धोंडो शिराळकर.
केशव बाबाजी नरगुंदे.
दामोदर हरि रेळेकर.
रामा शेट्याप्पा तमगावे.
G. V. Sanmukh.
एकनाथ गोविंद म्हादार.
तुकाराम बहिरनाथ बोंगाळे.
पांडुरंग गंगाधर नेने
सिद्राम मल्लिकार्जुन जिरेसाळ.

श्री० पुंडलीकजींनीं सर्व सत्याग्रही लोकांना एकत्र जमवून या व्यापाऱ्यांचे आभार मानले. श्री० गणपतराव उत्तुरकर व श्री० बंडोपंत शिखरे यांनीं ही सर्व खटपट स्वयंस्फूर्तीनें केली होती. हा कागद छापविण्यास पाठविला आहे.

❀ ❀ ❀

जेवणाची व्यवस्था रोजच्याप्रमाणेंच झाली.

❀ ❀ ❀

लोकांचें लक्ष थोडेंसें आपल्या शेतांकडे जाऊं लागलें. श्री० बाबाण्णांनीं आपल्या गांवचे लोक शिस्तींत बसविले.

❀ ❀ ❀

सर्व जागा साफ करविली. सातआठ टोळ्या करून लोक बसले होते. शेताचा मालक येऊन भेटला. त्याच्या पिकाची झालेली नुकसानी आम्ही देऊं असें श्री० पुंडलीकजी व श्री० बाबाण्णांनीं त्यांना सांगितलें.

❀ ❀ ❀

आजहीं गांवांतील कांहीं लोक सत्याग्रहकँप पाहावयास आले होते. आज पेठकऱ्यांनीं हरताळ पाळला आहे. फारच थोडीं दुकानें उघडीं होतीं.

❀ ❀ ❀

दोनप्रहरीं सत्याग्रह कॅंपमध्येंच बसून सर्व टपाल लिहिलें.

❀ ❀ ❀

आज कांहींतरी विशेष होणार आहे असें दोनप्रहरीं दोन वाजतांच श्री० पुंडलीकजींना समजलें होतें.

❀ ❀ ❀

कवठेपिराणचे एक गृहस्थ सरदार खुळे आपल्या गांवच्या व इतर टोळीमधून बसून सत्याग्रहाच्या विरुद्ध बोलूं लागल्याचें समजतांच सर्वांनीं मिळून त्यांना आंवरलें व नोटिसा लागलेल्या लोकांमध्यें त्यांना आणून बसविलें. रयतांमध्यें फूट पाडण्याचा एक उद्योग अशा तऱ्हेनें थांबविला.

❀ ❀ ❀

श्री० गोविंदराव बिनीवाले, श्री० दादासाहेब खाडिलकर वकील व इतर कांहीं मंडळी सांगलीहून आज सत्याग्रह कॅंप पाहाण्यास सहज आलेली होती.

❀ ❀ ❀

श्री० दसरदार व बाबूराव बागलकोटे हे आपसातींचें बोलणें करण्याच्या बहाण्यानें श्री० पुंडलीकजी यांना एका रानांत घेऊन गेले व तेथें बोलत बसले. यांतील डाव श्री० पुंडलीकजींच्या ध्यानांत पूर्वीच आल्यानें त्यांनीं योग्य ती तजवीज करून ठेविली होती; म्हणून एक सायकल स्वयंसेवक त्यांना बोलावण्याकरितां आला व ते त्याच सायकलवर बसून परत कॅंपकडे गेले.

❀ ❀ ❀

पोलीस इन्स्पेक्टर व चार पोलीस यांनीं कलम १२७ प्रमाणें प्रत्येक टोळींत जाऊन स्थानत्याग करण्याबद्दल हुकूम दिला. लोक अगदीं शांत व आनंदी होते. कायदा मोडावयाचा नाहीं हें धोरण सत्याग्रही लोकांचें ठरलेलेंच होतें. त्याचप्रमाणें श्री० पुंडलीकजी यांनीं जवळच्याच दुसऱ्या जागेंत लोकांना एकदम जाण्यास सांगितलें. सर्व लोक मोठ्या शिस्तीनें जागा बदलूं शकले. सर्व कॅंपच एका जागेपासून निघून दुसऱ्या जागेकडे गेला. सत्याग्रही लोकांनीं आपला संताप खरोखरच आंवरला.

❀ ❀ ❀

आज नोटीस बजावण्याच्या वेळीं सशस्त्र पोलीस नव्हते.

❀ ❀ ❀

कॅंपची ही नवीन जागा पूर्वीच्या जागेपेक्षां अधिक चांगली होती.

❀ ❀ ❀

कोणी एक गुजराथी शेठिया सत्याग्रही लोकांचें दर्शन घेण्याकरितां आले होते. त्यांना श्रीमंत सरकार यांच्या या धोरणाचें अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं तसें बोलूनही दाखविलें.

यावेळीं मिरज गांवांतील बरेच लोक कँपवर आले होते. गांवांत आज बरीच खळबळ उडाली आहे. नवीन जागेंत सर्व लोक शिस्तीनें वसल्यानंतर श्री० पुंडलीकजींनीं व्यापाऱ्यांच्या जाहिराती लोकांमध्यें वांटल्यावर पुन्हा एकवार या सहानुभूति दाखविणाऱ्या लोकांचे आभार मानले. त्यानंतर श्री० पुंडलीकजी यांनीं लोकांना परिस्थिति समजावून सांगितली. ते म्हणाले:—

"काल नऊ इसमांवर नोटिसा बजावून त्यांना आमच्यापासून दूर केलें होतें; परंतु आज आम्हां सर्वांवरच १२७ कलमाप्रमाणें नोटीस बजावून त्यांना पुन्हा आम्हांमध्यें आणून सोडलें आहे. आपल्याच हाडामांसाचा राजा असतांना त्याची हीनवृत्ति व चढेलपणा पाहून, या दगडी भितीवर डोकें आपटून घेण्यानें कांहीं उपयोग होईल किंवा काय याचा विचार पुन्हा एकवार करण्याचा प्रसंग आंज आपल्यावर आलेला आहे. राजाला ही वृत्ति शोभत नाहीं. पण या गोष्टी अशा कां घडून येतात तें कळण्यास मार्ग नाहीं. लोक येथून निघून गेले तरी शेवटीं पैसा देणें लोकांच्याच हातीं आहे, ही गोष्ट सल्लागार व संस्थानिक दोघेही कसे विसरले याचें आज महाराष्ट्राला आश्चर्य वाटत आहे. आज गांवांतील सर्व दुकानदारांनीं आपलीं दुकानें बद करून हरताळ पाळून या सरकारचा एकपरी निषेधच केला आहे. आतां कांहीं गणंग त्यांतही असावयाचेच! कांहींची मनोवृति भित्री असल्यामुळें त्यांनीं दुकानें बंद केलीं नाहींत; परंतु त्यांच्या मनांतून तुमच्याबद्दल सहानुभूति आहे ही गोष्ट विसरूं नका. कायदा मोडावयाचा नाहीं या वृत्तीस आपण जागलोंत ही उत्तम गोष्ट केली. पुढें करवंदीची चळवळ करण्यास हेच भांडवल तुम्हाला उपयोगी पडेल. कित्येक वेळां जुलूम सहन करण्यानेंच त्याविरुद्ध झेंडा उभारण्याचा हक्क आपल्याला मिळत असतो.

"१२७ कलम सर्वांवर बजावून राजानें आज आपल्या प्रजेला—ज्यांच्या पैशावर व श्रमानें आज हें वैभव त्याला मिळालें आहे अशा प्रजेला—लाथाडलें आहे! आतां त्याच्या दरवाजांत यापुढें बसावें किंवा नाहीं हा आपल्यापुढें प्रश्न आहे. मी त्याचा विचार करून सकाळीं आपल्यापुढें मांडतों.

"सारावाढीच्या या लढ्याचा निकाल. पुढें काय लागेल व गोष्टी कोणत्या

थराला जाणार आहेत याविषयीं आपल्यामध्यें टोळ्याटोळ्यांतून वाटाघाटी चाललेल्या आहेत हें मला माहीत आहे. पण मी सांगतों एवढें ध्यानांत ठेवा कीं, राजाला शेवटीं रयतांपुढें नमूनच तडजोड करावी लागेल. आपल्या नांवाचा किती डांगोरा पिटून झाल्यानंतर ही गोष्ट त्याच्या हातून होणार आहे कोणास ठाऊक ? परंतु क्षणभर असें मानून चालूं कीं, ही सारावाढ मुळींच कमी झाली नाहीं तरी या चळवळीचें यश कांहीं थोडें नाहीं.

" निर्भयवृत्ति आपल्यामध्यें बाणूं लागली हें या सत्याग्रहाचें पहिलें यश आहे. आतां या चळवळीचें यश पैशानें मोजावयाचें नाहीं. ज्या अधिकाऱ्यांना पाहातांच आपण भीतीनें थरथरत होतां त्यांची आज आपल्याला परवा नाहीं. निर्भयता बाणून घ्या; पण उद्धट बनूं नका.

" आपल्यांतील एकजूट हें या चळवळीचें दुसरें महत्त्वाचें यश आहे. आपापसांत भांडून आपण रयत लोक या सरकारास वर्षाला साठसत्तर हजार रुपये देत असतां. या एकीनें ते आपण वांचवूं शकाल. शेरी चढाओढीनें न मागण्यानें आपण आपल्यामध्यें पुष्कळ पैसा बचावून राखूं शकाल. या जगांत आपला अपमान न करणारा मनुष्य फारच क्वचित् सांपडेल.

" आपण सर्व रयत जागृत झालेले आहांत. ही जागृति तशीच कायम राखिली पाहिजे. श्री० बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांनीं आपल्यामध्यें नवचैतन्य उत्पन्न केलें आहे, त्यापासून लाभ घेण्यास शिका. आपण या ठिकाणीं बसून या लढ्याचा निकाल लावून घेण्याचा विचार आपल्यापुढें असतांही आपण कायदा पाळून तळ हालविलात हा आपला संयम खरोखरच वाखाणण्यासारखा आहे. असो.

" आतां पाणी आणण्यासही हिराबागेंत जाऊं नका. जवळपास कोठें विहिरी असतील तेथील पाणी घ्या."

❀ ❀ ❀

रात्रीं डॉ० जोशी यांच्या घरीं श्री० पुंडलीकजी, श्री० बाबाण्णा घुळी वगैरे पुढाऱ्यांची बैठक होऊन पुढील कार्याची वाटाघाट झाली.

❀ ❀ ❀

पुढारी मंडळी रात्रीं दोन वाजतां झोपीं गेली.

❀ ❀ ❀

सत्याग्रहाचा सहावा दिवस (ता. २०।११।२८.)

पुन्हा पहांटे पांच वाजतां उठून आम्ही सत्याग्रह कँपवर गेलों. आज सत्याग्रह कँप उठवून सर्व सत्याग्रहींनीं करबंदीचा निश्चय मनांत करून आपापल्या घरीं जावें, असा निर्णय काल रात्रीच्या वाटाघाटींत ठरलेला होता. हा निर्णय प्रथम प्रत्येक गांवच्या पुढाऱ्यांना समजावून सांगितला. नंतर सकाळीं सहा वाजतां सर्व सत्याग्रही लोकांना जागें करून एकत्र केलें व श्री० पुंडलीकजींनीं खालीलप्रमाणें जाहीर केलें:—

"काल रात्रीं व आज पहांटे सर्व गांवच्या पुढाऱ्यांनीं मिळून वाटाघाट केली. यापुढें कोणता मार्ग अवलंबावयाचा याची भवति-न-भवति केली. शेवटीं सर्वानुमतें असें ठरविण्यांत आलें आहे कीं, आपल्या राजाच्या दरवाजांत आपण आज सहा दिवस अर्धपोटीं वसलेले आहों; तथापि आमच्यावर नोटिसा बजावण्यापलीकडे त्यांनीं आमची दाद घेतलेली नाहीं. तेव्हां आतां हे पांचव्या मजल्यावरून खालीं उतरून रयतांकडे तडजोडीस येईपर्यंत यांच्याकडे पाहाण्याचें देखील कारण नाहीं. तितक्यापुरतें आज राजा व प्रजा यांचें नातें मलीन किंवा खराब झालें आहे. आपण पाळलेली शांतता व धारण केलेला संयम पाहून गांवांतील लोक आपल्याला धन्यवाद देत आहेत. आपलें सर्वांचें दर्शन त्यांना घ्यावयाचें आहे. तेव्हां यानंतर येथें आपल्या सर्वांचा फोटो घेण्यांत येईल. शेवटीं गांवाच्या बाहेरील गणपतीच्या देवालयांत सभा करण्यांत येईल आणि त्यानंतर तेथें प्रत्येकानें हा लढा शेवटपर्यंत लढण्याविषयीं आपापल्या मनांत शपथा घेऊन घरीं जावयाचें आहे. या राजाला प्रजेच्या दुःखाकडे पाहून दयेचा पाझर फुटत नाहीं, ही गोष्ट आज त्रिवार जाहीर झाली आहे. महाराष्ट्राला या गोष्टीनें आज आपली मान खालीं घालावयास लाविली आहे."

ॐ ॐ ॐ

शौचमुखमार्जन करून लोक फोटोकरितां तयार झाल्यानंतर फोटो घेण्यांत आले.

ॐ ॐ ॐ

काल खांडव्यास दिलेल्या तारेला श्री० शिखरे यांजकडून सकाळींच खालीलप्रमाणें तारेनें उत्तर आलें:—

"Reaction just begun. Advise Rayats remain firm peaceful. Wire Khandwa tomorrow morning."

(श्री० शिखरे यांजकरून पुढें दोन दिवसांनीं पत्र आलें. त्यांत या तारेसंबंधीं-चा खुलासा आला होता. आम्हीं येथून दिलेली तार काल त्यांना सकाळीं बारा वाजण्याच्या पूर्वी पोंचली. त्यांनीं लगेच एक तार लिहून ती तारऑफिसकडे पाठविली. परंतु ती "Can not be accepted owing to the text appears to be of objectionable character" असा शेरा मारून तारऑफिसांतून परत आली ! त्या तारेंत खालील शब्द होते:—

"Reaction just begun. Advise Rayats continue Satyagraha. Remain firm peaceful. Myself will sacrifice anything when time demands wire Khandwa tomorrow."

(ही तार परत आल्यानंतर दुसरी तार लिहून त्यांनीं संध्याकाळीं पाठविली ती आम्हांला आज सकाळीं पोंचली. यापुढें आम्हींही येथून त्यांना वारंवार तारा दिल्या व त्यांच्याकडूनही आल्या; परंतु वरील तारेचें थोडें वैशिष्ट्य असल्यानें त्याबद्दलचा खुलासा दिला इतकेंच.)

❧ ❧ ❧

बार्शी लाईट रेल्वेचे सुपरिन्टेन्डन्ट सत्याग्रही लोकांना पाहाण्याकरितां आले होते. त्यांना डॉ० जोशी यांनीं चळवळीची सर्व माहिती दिली. राजाचें धोरण व नीति पाहून त्यांनाही वाईट वाटल्याचें आढळून आलें.

❧ ❧ ❧

रयतांची मिरवणूक निघण्यापूर्वी सर्व सामान, भांडीं वगैरेची व्यवस्था श्री० बाबाण्णा घुळी व मालगांवच्या इतर मंडळींनीं केली.

❧ ❧ ❧

सत्याग्रही कँप उठविण्यापूर्वी सर्व रयतांतर्फे श्री० ज्ञानोबा पाटील यांच्या-कडून एक शेवटचें पत्र म्हणून श्रीमंतांना पाठविलें होतें; परंतु त्यांनीं त्या एका रयतेची देखील भेट घेतली नाहीं. तें पत्र नंतर पोस्टानें त्यांच्याकडे पाठविण्यांत आलें. त्याच्या प्रती छापवून गांवांत वाटण्यांत आल्या. तें पत्र खालीलप्रमाणें आहे:—

श्री

श्रीमंत राजश्री बाळासाहेब महाराज सरकार मिरज,

यांचे सेवेसीं.

आम्ही चौदापंधरा गांवचे सुमारें चार हजार रयत ता. १५-११-२८ पासून

आज सहा दिवस आपल्या दाराशीं सारावाढीबद्दल दाद लावून घेण्याकरितां बसलों आहों. आमच्या प्रतिनिधींची भेट आपण घ्यावी म्हणून आपणास नम्र विनंति केली; परंतु आजपावेतों ती आपण मान्य केली नाहीं; यावद्दल आम्हांस फार दुःख होतें.

राजा आपल्याच धर्माचा व हाडामांसाचा असल्यामुळें प्रेमानें धरणें धरून दाद लावून घेण्याचा न्याय्य मार्ग आम्हीं अवलंबिला; थंडी, वारा, ऊन यांचे आघात निमूटपणें सहन करीत आणि आपल्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटेल अशा आशेनें आजपर्यंत आम्ही आपल्याकडे डोळे लावून बसलों. परंतु परवांच्या दिवशीं आमच्यापैकीं नऊ लोकांना व काल सर्वांना येथून निघून जावें अशा अर्थाचा जाहीरनामा काढण्यापलीकडे आमची दाद लागलेली नाहीं.

श्री० पुंडलीकजींना बरोबर घेऊन आपण चौकशीअंतीं ठरेल ती सारावाढ करूं असे आपण आम्हां सर्वांसमक्ष दिलेल्या आश्वासनाच्या मागें आपण गेलांत या गोष्टीनें आम्हांस दुःख होत आहे.

आम्ही कष्ट सहन करीत आहों आपण हें प्रत्यक्ष पाहात असतांही परमेश्वरानें आपल्याला द्रव फोडला नाहीं हें आमचें दुर्दैव आहे. आम्हांस कोणत्याही प्रकारें अन्यायाची वर्तणूक करावयाची नाहीं. आम्ही आज येथून अत्यंत दुःखी अंतःकरणानें जात आहों. वाढलेला सारा देण्याचा आमच्या अंगांत त्राण नाहीं हें येथून निघून जाण्यापूर्वी स्पष्टपणें आपल्याला कळविण्याची परवानगी घेतों.

आपण पूर्वी दिलेलें अभिवचन पाळलें गेल्यास आम्ही आमची खरी व दुःखद कहाणी आपल्यापुढें सादर करूं.

पूर्वी ठरल्याप्रमाणें आमच्या प्रतिनिधींसह चौकशी पूर्णपणें करण्याची बुद्धि परमेश्वर आपल्याला देवो अशी त्याच्या चरणीं नम्र प्रार्थना करून आम्ही जात आहों.

आपले रयत.

* * *

मिरवणूक जवळ जवळ पाऊण मैलपर्यंत लांब पसरलेली होती. गाड्या वगैरे जाण्यायेण्याकरितां अर्धा रस्ता मोकळा ठेवलेला होता. मिरवणुकीमध्यें कोणींही मोठ्यानें बोलावयाचें नाहीं असें ठरविण्यांत आलें होतें.

* * *

याच वेळीं श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत सौ० आक्कासाहेब वगैरे मंडळी मिरजेस आली व मिरवणुकीच्या रस्त्यानेंच ती हिराबागेकडे गेली. त्यांनीं सर्व रयतांना रस्त्यानें मिरवणुकीनें जातांना पाहिलें आहे.

❧ ❧ ❧

मिरवणूक गांवांत पेठेंत आल्यानंतर अनेक दुकानदारांनीं त्यांच्यावर चुरमुरे व बत्तासे वगैरे मिठाई उधळली. कांहीं दुकानदारांच्या डोळ्यांतून अश्रू आले. राजानें फार वाईट गोष्ट केली असें लोक बोलत होते.

❧ ❧ ❧

काल ज्या व्यापाऱ्यांनीं भीतीनें आपलीं दुकानें बंद केलीं नव्हतीं ते व्यापारी-देखील रयतांचा निश्चय व शिस्त पाहून थक्क झाले. मिरवणूक दोनप्रहरीं बारा-वाजतां गणपतांच्या देवालयांत येऊन थांबली. सर्व देवालय लोकांनीं फूलून गेलें होतें. अस्पृश्यबंधू देवालयाच्या दरवाज्यांत बसले होते.

सर्व लोक शांत बसल्यानंतर श्री० पुंडलीकजी यांनीं देवाची प्रार्थना केली. एकेक वाक्य ते सांगत होते व सर्व लोक नंतर ते म्हणत होते. ती प्रार्थना खालीलप्रमाणे आहेः——

"हे गजानना, आमच्या राजाला सद्बुद्धि दे; हे गजानना, आमचें कोठें चुकत असेल तर आम्हाला नीट मार्गावर आण; हे गजानना, आमच्या राजाला बद सल्लागारांच्या कचाट्यांतून सोडीव; हे गजानना, राजाच्या मनांत आमच्याविषयीं प्रेम व दया उत्पन्न कर; हे गजानना, आमच्या राजाला सद्बुद्धि देऊन त्याचें आयुरारोग्य वाढीव."

ही प्रार्थना झाल्यानंतर श्री०पुंडलीकजीनीं 'केसरी' वाचून दाखविला. त्यावेळीं ते म्हणाले कींः——

"रयत बधूंनो, आमच्या हातून जेवढें करणें शक्य होतें तेवढें करून आम्हीं आमची शिकस्त केलेली आहे. सर्व रयतांना आपल्या पोटांत घेण्याची ही सुवर्ण-संधि आपल्या राजानें व्यर्थ दवडली आहे याबद्दल आपणां सर्वांना वाईट वाटत आहे. पैसा आज नाहीं उद्यां मिळेल; परंतु रयतांचीं मनें मात्र आतां या राजाला पुन्हा मिळणार नाहींत. माणसांपेक्षां पैशाची किंमत राजाला अधिक वाटली आहे! राजानें ज्यावेळीं वचनभंग केला, त्याचवेळीं या राज्यांतून लक्ष्मी व सरस्वती उठून

जाण्याच्या तयारीला लागल्या. आपल्या दारांत बसलेल्या प्रजेला जेव्हां अधिकाऱ्यामार्फत नोटीसा बजावून राजानें लाथाडलें त्याचवेळीं त्यांची सर्व पुण्याई खर्ची पडली आहे. राजाचें अंतःकरण इतकें फत्तरासारखें आहे हें आपल्याला या पूर्वी कळलें असतें तर धरणे धरण्याच्या भानगडींत आपण पडलोंच नसतों. परकीय राजावर प्रेमानें धरणें धरण्याचा परिणाम कांहींही झाला नसता, तर त्याचें आपल्याला कांहींच वाटलें नसतें; परंतु हा राजा आपला आहे व याच्या आचरणाबद्दल आपल्या सर्वांना आदर आहे आणि अशा राजाची प्रजेविषयीं जर ही उदासीन वृत्ति पाहिली, तर त्यांचें धार्मिक आचरण म्हणजे निव्वळ ढोंग आहे असें लोकांना वाटल्यास त्यांत काय वावगें आहे ? अधिकाऱ्यांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची ही वृत्ति अनुभवी व विद्वान् राजाला शोभत नाहीं.

" सारावाढ करविणें जितकें सोपें आहे तितकें ती वसूल करविणें सोपें नाहीं. दिवसेंदिवस अशी परिस्थिति येणार आहे कीं, प्रजेला विश्वासांत घेऊन हे राजे वागतील तरच यांना चांगले दिवस दिसतील. आपण राजाच्या दरवाज्यांत गेलों आणि त्यानें आम्हांला लाथाडलें; परंतु सारा वसूल करण्याच्यावेळीं त्यांना आमच्या दारीं यावयाचें आहे ही गोष्ट विसरून कशी चालेल ? वेळ पडली तर करवंदीचें निशाण उभारण्याचा निश्चय या देवालयांत करून नंतर येथून आपल्या घरीं जा. आज सत्याग्रह संपला नसून, येथून पुढें सत्याग्रह सुरू झाला असून, आतां तो अधिकाधिक उग्रस्वरूप धारण करणार आहे. घमेंडींत असलेले अधिकारी सारावसुलीच्या कामावर आल्याशिवाय त्यांच्या डोळ्यांवरील सारा कसा दूर होणार ? आपण अजून संयम केलेला आहे म्हणजे कायदेभंग करण्यासही डगमगणार नाहीं ही गोष्ट आज मी येथें जाहीर करून ठेवितों. असो.

" आतां वेळ फार झाला असून मी आपली सर्वांची रजा घेतों. मी आपल्या गांवीं वारंवार येऊन पुढील दिशा दाखविण्याचे काम माझ्या शक्तीप्रमाणें करीन. आपण काळजी करूं नका. आपली सर्वांची एकी राहिली व आपण नुकसान करून घेण्यास किंवा संकटें सोसण्यास तयार आहां असें आजपर्यंतच्याप्रमाणें मला दिसत राहील तरच मी आपल्याला पुढें पाऊल टाकण्यास सांगेन. कोणत्याही एकट्या गांवावर मी अवलंबून राहून त्याला संकटांत लोटणार नाहीं. आतां या चळवळीचें यश पैशानें न मोजतां अब्रूच्या मापानें मोजलें पाहिजे. दरवाजें दोन टक्के जरी सारावाढ कमी केली तरी तो आमचाच जय आहे. रयतांच्या

आग्रहाच्या मागणीस दरबारनें लवून मान दिला पाहिजे असें स्वरूप या चळवळीस येत चाललें आहे."

यानंतर सर्व सत्याग्रही लोक मिशन हॉस्पिटलवरून आपापल्या गांवीं गेले. हॉस्पिटलजवळ डॉ० किणी यांनीं सर्वांचा फोटो घेतला.

❀ ❀ ❀

नंतर घरीं येऊन श्री० पुंडलीकजी थोडावेळ विश्रांति घेतात न घेतात तोंच त्यांना बातमी समजली कीं, श्रीमंत तात्यासाहेब व अधिकारी मिळून चौकशीचा फार्स करण्यास वडुी व ढवळीकडे उद्यां सकाळीं जाणार आहेत. त्यांच्या चौकशावर बहिष्कार घालण्याचा निश्चय डॉ० जोशी व पुंडलीकजींनीं केला.

❀ ❀ ❀

रात्रीं १०–३० वाजतां वे० रा० बाळंभट्ट चौथाई व श्री० पुंडलीकजी वडुीस गेले होते. वडुीच्या ओढ्यांत एका सरकारी बैलगाडींत श्री० घोरपडे मामलेदार, फौजदार व एक पोलीस इतकी मंडळी भेटली. दुसरे दिवशींच्या चौकशीची तयारी करण्याकरितां हे लोक चाललेले होते.

❀ ❀ ❀

वडुीमध्यें एका खाजगी घरांत वडुीच्या शेतकऱ्यांची सभा झाली. दुसरे दिवशींच्या चौकशीचा अर्थ, कावा व धोरण श्री० पुंडलीकजींनीं लोकांना समजावून दिलें. नंतर रात्रीं १२–३० वाजतां श्री० पुंडलीकजी व वे०रा०चौथाई मिळून ढवळीस गेले. तेथें एका गुरवाचें पुराण चाललें होतें, त्यामुळें गांवांतील सर्व लोक त्या ठिकाणीं एकत्रित जमलेले आयतेच मिळाले. त्यांनाही सर्व गोष्टी समजावून दिल्या गेल्या. श्रीमंत तात्यासाहेब यांच्या चौकशीवर बहिष्कार घालण्याचा विचार दोन्ही गांवांनीं नक्की केला. नंतर पुन्हा रात्रीं दोन वाजतां श्री० पुंडलीकजी वडुीस परत आले व ३–४५ वाजतां मिरजेस येऊन छापखानेवाल्यांना जागें करून त्यांच्याकडून खालीलप्रमाणें कागद त्यांनीं छापवून घेतले. रात्रभर कोणासच झोंप नव्हती.

रयत आपल्या विचाराचे नाहींत हें कळून आल्यानंतर श्री० मामलेदार व फौजदार यांनीं दूरवर विचार करून रात्रीं वस्ती हिराबागेंतच केल्याचें कळतें. वडुींत रात्रीं राहाणें त्यांना शहाणपणाचें वाटलें नसावें.

सकाळीं सहा वाजतां कागद छापून मिळाले. वड्डी व ढवळीच्या लोकांच्या सह्या श्री० पुंडलीकजी यांनीं मूळ कागदावर रात्रींच घेऊन ठेविल्या होत्या.

ढवळी गांवच्या लोकांचीं मनें ते सत्याग्रहांत येऊन बसल्यापासून अधिक दृढ झालेलीं होतीं. ढवळींतील एक दोन म्हातारे गृहस्थ सरकारशीं विरोध करण्यास थोडेसे भीत होते.

वड्डींतील बहुतेक शेतकरी मिरजेंत राहाणारे असल्यामुळें त्यांची भेट वड्डीस होत नाहीं.

सत्याग्रहाचा सातवा दिवस (ता. २१।११।२८)

मागें उल्लेखिलेल्या छापवून घेतलेल्या कागदाचा उतारा:—

विज्ञापना.

आम्ही रयत श्रीमंत सरकार मिरज व युवराज श्रीमंत तात्यासाहेब यांना अत्यंत नम्रपणें असें कळवितो कीं, श्रीमंत सरकार मिरज यांनीं पूर्वी दिलेल्या जाहीर आश्वासनाप्रमाणें आमचे प्रतिनिधि श्री० पुंडलीकजी यांच्यासमवेत सारावाढीबाबत रीतसर चौकशी करावी. त्या चौकशीपुढें आम्ही आमचें म्हणणें मांडण्यास तयार आहों. इतर कसल्याही प्रकारच्या चौकशीपुढें आम्हांस आमचें म्हणणें मांडावयाचें नाहीं. तरी श्रीमंतांनीं या गोष्टीचा अवश्य विचार करावा, अशी नम्र प्रार्थना आहे. कळावें सेवेसी श्रुत होय.

ता.
मु. मिरज. } आपले नम्र रयत.

या 'विज्ञापने'च्या छापवून घेतलेल्या प्रती घेऊन सकाळीं श्री० पुंडलीकजी प्रथम वड्डीस गेले. डॉ० ना. वि. जोशी हेही आले होते. सर्व रयत जमून बसलेले होते. त्या सर्वांना एका खाजगी घरांत बोलावून प्रत्येकास एकेक विज्ञापना कागद देण्यांत आला. प्रत्येकानें आपापल्या कागदावर सही करून तो आपल्या हातांत तयार ठेविला होता. सकाळीं ९–३० च्या सुमारास श्रीमंत युवराज तात्यासाहेब वड्डीस आले. बरोबर एक दोन अधिकारीही होते. डॉ० जोशी व श्रीमत तात्यासाहेब यांच्यामध्यें कांहीं गमतीचीं प्रश्नोत्तरें झालीं. डॉ० जोशी यांनीं आपला कागद श्रीमंत तात्यासाहेबांच्या हातीं न दिल्यामुळें इतर लोकांनींही ते कागद दिले नाहींत. दुसऱ्या दिवशीं सर्वांचे कागद रजिस्टर्ड पोस्टानें श्रीमंतांकडे पाठविले.

पोलीस अधिकाऱ्यानें वे० रा० बाळभट्ट चौथाई यांस पिण्याचें पाणी आणून ठेवण्यास सांगितले होतें; परंतु अधिकाऱ्यांच्या या उद्दामपणास रा० चौथाई यांनीं उत्तम सडेतोड उत्तर दिल्याचें समजतें.

❧ ❧ ❧

श्रीमंत तात्यासाहेब ढवळीस येण्यापूर्वी श्री० पुंडलीकजी हे मोटारनें ढवळीस पोंचले होते. तेथेंही श्रीमंतांकरितां बैठक घातलेली होती. श्रीमंत लागलीच पंधरावीस मिनिटांत तेथें येऊन दाखल झाले. युवराज आलेल्या वेळीं त्यांच्या स्वागताला किंवा सभास्थानाच्या ठिकाणीं एकही रयत नव्हता. सर्व रयत एका खाजगी घरामध्यें विज्ञापना कागदावर सह्या करीत बसले होते.

लोकांना बोलावण्याकरितां पोलीसपाटील तेथें त्या घरांतच आले. आपापली सही केलेला कागद हातांत घेऊन सर्व लोक श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्यापाशीं आले. श्रीमंत तात्यासाहेबांबरोबर श्री० रामभाऊ पोतनीसही (श्री० मोडकांना यथेच्छ सारावाढ करण्याच्या बाबतींत मदत करणारे एक अधिकारी) आलेले होते. त्यांनीं या ढवळी गांवांत एक शेत नुकतेंच विकत घेतलें आहे व त्यांच्या घराण्यांतील कांहीं जमीन याच गांवीं विशेष आहे असें कळलें. श्रीमंत तात्यासाहेब व रयतांपैकीं एक पुढारी यांच्यामध्यें प्रश्नोत्तरें झालीं. श्री० पोतनीस व रयत यांच्यामध्येंही कांहीं प्रश्नोत्तरें झालीं. ढवळीमध्यें श्री० पोतनीस यांचें वजन आज किती आहे, तें एकदां प्रत्यक्ष श्रीमंतांना पाहावयास मिळालें हें एकप्रकारें बरेंच झालें. श्री० पोतनीस यांच्यावर लोकांचा विश्वास कितीसा आहे याची परीक्षा होण्यास तो प्रसंग उपयोगीं पडला. आपल्या तोंडानें 'मला पुढारी करा, माझी येथें जमीन आहे' असें म्हणूनही कांहींच उपयोग झाला नाहीं. हा सर्व प्रकार उभ्याउभ्याच झाला.

आपापली सही करून आणलेला 'विज्ञापना' कागद सर्वांनीं श्रीमंत युवराजांना दिला. त्यांनीं ते कागद एकत्रित करविंले व आपल्याबरोबर नेले. सर्व प्रकार आटोपण्यास वीस मिनिटें लागलीं. अशा रीतीनें दोन्ही ठिकाणीं हा चौकशीचा फार्स रयतांनीं सपशेल उघळून लाविला. रयत जागृत झाले आहेत अशी सर्वांची खात्री झाली असली पाहिजे.

❧ ❧ ❧

दोन गांवांत हा प्रकार झाल्यामुळें आतां पुन्हा ही विषाची परीक्षा पाहाण्याच्या मोहानें इतर गांवांत जाण्याच्या भानगडींत अधिकारी व श्रीमंत तात्यासाहेब पाऊल टाकतील असें आज तरी वाटत नाहीं.

तथापि अशाप्रकारें असल्या या चौकशीला उघळून लावण्याचा निरोप रयतांना कळविण्याकरितां डॉ० जोशी यांच्या घरीं वाटाघाट होऊन, सर्व गांवांतून दौरा काढण्याचा विचार नक्की झाला व त्याप्रमाणें दौरा सुरू करण्याचें श्री० पुंडलीकजींनीं ठरविलें आहे.

या सत्याग्रहाच्या आठवड्यांतील रोजनिशीवरून वाचकांना सर्व गोष्टींचा उलगडा होईल. 'विज्ञापना' कागदाची कल्पना व वट्टी–ढवळीची हकीगत सर्व खेड्यांतून कळविण्यास श्री० पुंडलीकजी बहुतेक खेड्यांतून फिरून आले. कांहीं गांवांमध्यें त्यांच्याबरोबर डॉ० जोशी हेही गेले होते; परंतु वट्टी–ढवळीपासून श्रीमंत युवराज व अधिकारी यांनीं धडा शिकून घेतला आणि हा चौकशीचा फार्स करण्याची कल्पना सोडून दिली. ज्या अधिकाऱ्यांनीं श्रीमंत युवराजांना या चौकशीचा सल्ला दिला असेल त्यांनीं संस्थानची किंमत कमी करण्याचें पाप तेवढ्यापुरतें आपल्या माथीं मारून घेतलें असें कोण म्हणणार नाहीं ! हें चौकशीचें तट्टू आपल्या गांवीं कधीं येईल व आपल्याला गम्मत करावयास केव्हां मिळेल याची वाट लोक मोठ्या आतुरतेनें पाहात होते. आमच्या मतें श्रीमंत तात्यासाहेब यांनीं वट्टी–ढवळीप्रमाणें इतर गांवांत जाण्याचें रहित केलें ही एखाद्या राजकारणी मुत्सद्द्यास शोभण्यासारखी गोष्ट केली. असो.

हें प्रकरण बरेंच लांबल्यामुळें व चळवळीस यापुढें अधिक रंग चढलेला असल्यामुळें वाचकांची जिज्ञासा पूर्ण करण्याकरितां चळवळींतील पुढील भागाकडे आम्ही वळतों.

प्रकरण आठवें

श्रीमंत स्वतः चळवळींत उतरले !

श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांनीं चौकशीचा फार्स करून पाहिला; परंतु तो वार फुकट गेला. कारण सत्याग्रहांत एक आठवडा धरणें धरण्याच्या कार्यांत भाग घेतल्यामुळें रयत हुषार व धीट झाले होते. मिरजेस राजपक्षाच्या व व लोकपक्षाच्या चाललेल्या उलाढालींकडे खेड्यांतील रयतांचें लक्ष लागून राहिलें होतें.

श्रीमंत युवराज निराश होऊन मागें फिरल्यामुळेंच कीं काय, खुद्द श्रीमंत सरकार आखाड्यांत दंड थोपटून उभे राहिले व ता. २३-११-२८ इ० रोजीं त्यांनीं व युवराजांनीं 'टाईम्स'च्या बातमीदाराला मुलाखत दिली. ता. २५-११-२८ च्या 'टाईम्स'च्या अंकांत ती मुलाखत प्रसिद्ध झाली. आहे. ती अशीः—

मिरज चीफसाहेब खुलासा करितात.

सारावाढींत सूट मिळणार नाहीं.

लोकोपयोगी सुधारणांकरितां सारावाढ.

आतां सत्याग्रही लोकांनीं गांव सोडल्यामुळें जिकडे तिकडे चळवळ मंदावल्यासारखी दिसत आहे.

मिरज येथील शेतकऱ्यांनीं सारावाढीविरुद्ध चालविलेल्या चळवळीसंबंधांत 'टाईम्स'च्या बातमीदारानें ता. २३ रोजीं मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत सर बाळासाहेब व युवराज श्रीमंत तात्यासाहेब यांची मुलाखत घेतली. सदर बातमीदारानें या मुलाखतीचा आशय असा दिला आहे.

"सुरुवातीसच श्रीमंतांनीं सांगितले कीं, गेल्या साठ वर्षांत आमच्या संस्थानांत सारावाढ झालेली नाहीं व नवीन कोणतेही कर बसविलेले नाहींत; परंतु हें करण्याची आवश्यकता अलीकडे वाटल्यावरून आम्ही साऱ्याची फेरआकारणी करण्यासाठीं ब्रिटिश हिंदुस्तानांतील सदर खात्यांतील कांहीं निष्णात अधिकारी मागवून आमच्या दिमतीस घेतले. त्यांनीं आपल्या रिपोर्टांत सध्यां सारा आहे त्याच्या दुप्पट करण्याबद्दल शिफारस केली. दुसऱ्या संस्थानच्या हद्दींत असलेल्या

घालवाड व म्हैसाळ या दोन खेड्यांतील लोकांवर जेवढा सारा आहे त्यापेक्षां त्याच्याच शेजारीं मिरज हद्दींत असलेल्या ढवळी या गांवच्या लोकांवर सध्यां सारा फारच कमी आहे असेंही श्रीमंत सर बाळासाहेब म्हणाले.

"'सारावाढीची पूर्ण व स्वतंत्र चौकशी करण्याचें श्रीमंतांनीं सत्याग्रही रयतांच्या पुढाऱ्यांना ता. ४ नोव्हेंबर रोजीं आश्वासन दिलें होतें काय!" असा बातमीदारानें प्रश्न केला. त्यावर श्रीमंत बाळासाहेब म्हणाले कीं, 'चौकशी करीन असें मी बोललों होतों; पण कोणतेंही वचन दिलें नव्हतें. चौकशीसंबंधानें स्वतः रयतांचे पुढारी म्हणविणारे श्री० पुंडलीकजी कातगडे यांनीं आपलें धोरण सोडून दिलें. श्री० पुंडलीकजी यांना संस्थानच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं कागदपत्र दाखविले होते हें खरें; परंतु मी त्याबद्दल विशेष बोलूं इच्छीत नाहीं. त्या कागदपत्रांत कोणत्या चुका आहेत त्या श्री० पुंडलीकजी यांना योग्य रीतीनें दाखवितां आल्या नाहींत."

श्री० पुंडलीकजींचें चमत्कारिक वर्तन व उद्धटपणा असा जो श्रीमंतांना वाटला त्यावर श्रीमंतांनीं विशेष भर दिला होता.

लोकोपयोगी सुधारणांकरितां सारावाढ

तडजोडीच्या वाटाघाटीसंबंधीं चीफसाहेब पुढें म्हणाले कीं, "शहरांतील रा० जोशी, रानडे, मराठे, शिराळकर व दातार यांसारख्या कांहीं समंजस मंडळींनीं सारावाढ फक्त ४० टक्क्यानेंच करावी ही जी सूचना पुढें मांडली तिचा विचार करण्याचा व या सारावाढीचा मोबदला म्हणून लोकांना मोफत प्राथमिक शिक्षण, स्वतंत्र हायकोर्ट व पाणी पुरवठ्याची सोय या सुधारणा देण्याचा आमचा विचार होता; पण श्री० पुंडलीकजी यांना तें कांहींच मान्य होईना. उलट ते या पुढाऱ्यांना, तुम्ही कोण व रयतेच्या वतीनें तुम्हांला बोलण्याचा काय अधिकार आहे, असें म्हणूं लागले." मिरज संस्थानांत श्री० पुंडलीकजी यांचें स्वतःचें घरदार किंवा शेतीवाडी कांहींएक नाहीं; ते शेतकऱ्यांचे खरे पुढारी नव्हत व ते संस्थाना. बद्दल निष्कारण गैरसमज पसरवून लोकांत चळवळ करितात असेंही चीफसाहेब म्हणालें.

शेतकऱ्यांनीं सत्याग्रह करून पहिल्याच दिवशीं वाड्याभोंवतीं धरणें धरलें या प्रकरणासंबंधीं प्रश्न विचारला असतां चीफसाहेब म्हणाले कीं, "मीं लोकांना समजावून सांगितलें कीं, तुम्ही मुकाट्यानें निघून परत जा, मी कागदपत्र पाहून व जरूर

तर खेड्यापाड्यांना भेटी देऊन तुमच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करीन. तुम्हीं स्वतः त्रास घेऊं नये व मलाही देऊं नये. तुम्ही हाल सोसणें ही गोष्ट मला स्वतःला हाल सोसण्यासारखीच क्लेशदायक आहे."

चीफसाहेब पुढें म्हणाले कीं, "वाड्यासमोर जमलेल्या लोकांत सुमारें पांचशें लोक दोनतीन खेड्यांतील मिळून होते. बाकीचे लोक केवळ बघे व सारावाढीच्या प्रकरणाशीं कांहींएक संबंध नसलेलेच होते."

आपण कांहीं दडपशाही केली काय किंवा कोणास तुरुंगांत टाकिलें काय? असा प्रश्न विचारला असतां श्रीमंत म्हणाले कीं, "नाहीं. कलम १२७ प्रमाणें कांहीं लोकांवर मीं नोटिसा बजावल्या व त्या देखील शांतताभंग होईल असें मला वाटूं लागल्यानंतरच बजावल्या आहेत."

शेवटीं श्रीमंत म्हणाले कीं, "आतां श्रीमंत तात्यासाहेब कित्येक खेड्यांना जाऊन स्वतः चौकशी करणार आहेत. ते वडुी व ढवळीला या पूर्वी त्याकरितां जाऊनही आले आहेत; परंतु त्या खेडयांतील लोकांनीं तात्यासाहेबांना सांगितलें कीं, "पुंडलीकजी आमचे पुढारी व वकील आहेत आणि आपल्याबरोबर कृपा करून त्यांनाही घेऊन या." त्या खेडयांमध्यें श्रीमंत तात्यासाहेब जाऊन पोंचण्यापूर्वी श्री० पुंडलीकजी तेथें गेले व तेथील रयतांवर त्यांनीं आपलें वजन पाडल्यामुळें हें असें झालें." असा त्याचा खुलासा श्रीमंत सरकार यांनीं केला.

आपण अजूनही आपल्याच मार्गानें जाणार काय आणि सारावाढींत कांहीं कमी करणार नाहीं काय! असा प्रश्न विचारला असतां चीफसाहेब म्हणाले कीं, "चळवळ यांनीं चळवळ बंद केल्याशिवाय मी कांहींही करणार नाहीं. आणि नंतर इतकेंच करीन कीं, संस्थानांतील प्रजेच्या कल्याणाशीं ज्यांचा संबंध आहे, जे रयतांचे खरे प्रतिनिधी आहेत अशा सुसंघटित लोकांना भेट देऊन त्यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेईन. प्रजा माझी आहे व मी प्रजेचा आहे आणि मी त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां शक्य ते सर्व प्रयत्न करीन. असे उद्गार श्रीमंतांनीं आपल्या प्रजेविषयीं काढले." इतकें बोलल्यानंतर श्रीमंतांनीं स्मित हास्य करून असें दर्शविलें कीं, त्यांना परिस्थितीची पुरी जाणीव असून पुढें काय केलें पाहिजे हें ते पूर्णपणें जाणून आहेत.

त्याच वातमीदारानें रयतांचे पुढारी श्री० पुंडलीकजी यांचीही मुलाखत घेतली व ता. २७-११-२८ च्या 'टाईम्स'च्या अंकांत ती प्रसिद्ध केली आहे.

मिरजेंत करबंदीची धमकी !

रयतांचा दृढसंकल्प अढळ आहे !

सत्याग्रहाचे पुढारी साबरमतीस तयार झालेले आहेत.

श्री० पुंडलीकजी यांची 'टाईम्स'च्या बातमीदारानें मुलाखत घेतली त्यावेळीं त्यांनीं खालीलप्रमाणें उत्तरें दिलीं आहेत.

ते म्हणाले—" संस्थानांतील सर्व खेड्यांची संख्या जरी ६५ असली तरी (मिरज तालुक्यांतील २९ पैकीं) १७ खेडयांतील रयतांनीं सत्याग्रहांत भाग घेतलेला होता." बाकीच्या खेड्यांनीं सत्याग्रहांत कां भाग घेतला नाहीं असा प्रश्न विचारला असतां ते म्हणाले कीं, " मिरज या राजधानीच्या शहरापासून तीं खेडीं दूरच्या अंतरावर असल्यामुळें त्या खेड्यांना सत्याग्रहाकरितां बोलावण्यांत आलें नव्हतें." मग हा सत्याग्रह सबंध संस्थानचा असें कसें म्हणतां येईल ! असें विचारतां, " प्रत्यक्ष सत्याग्रहांत येऊन बसण्याची चळवळ फक्त मिरज तालुक्यापुरतीच आहे." असें त्यांनीं उत्तर दिलें.

श्रीमंतांनीं चौकशी करण्याचें आश्वासन दिलें असें म्हणतांच त्याविषयीं प्रश्न विचारला असतां श्री० पुंडलीकजी म्हणाले कीं, " मी त्या वेळीं, रयतेचा पुढारी नाहीं. फक्त लोक शांतता राखतील अशी काळजी घेण्याकरितां मी आलों आहें असें मीं श्रीमंतांना सांगितलें असतांही श्रीमंतांनीं मलाच आपल्या भेटीस बोलाविलें. रयतांच्या पंधरा प्रतिनिधींना बरोबर घेऊन मी श्रीमंतांकडे गेलों. प्रथम अशी सूचना पुढे आली होती कीं, लोकनियुक्त व सरकारनियुक्त अशा मिश्र सभासदांची एक कमिटी नेमली जावी आणि त्या कमिटीची चौकशी पूर्ण झाल्याशिवाय सारा वसूल केला जाऊं नये. मला आपल्याबरोबर घेऊन स्वतः चौकशी करतों, असें श्रीमंतांनीं आपण होऊन सांगितलें होतें. माझ्याबरोबर जे प्रतिनिधी होते त्यांनीं श्रीमंतांची ही सूचना मान्य केली. नंतर तसें बाहेर रयतांमध्यें येऊन स्वमुखानें जाहीर करण्यास मीं श्रीमंतांना विनंति केली व ती त्यांनीं मान्य करून तसें लोकांमध्यें येऊन लोकांना अभिवचन दिलें. नंतर चौकशीच्या कामास सुरुवात करण्यापूर्वी तत्संबंधींचे कागदपत्र पहाण्यास मला सांगण्यांत आलें. मामलेदारांनीं मला कागदपत्र दाखविले; परंतु ते बाहेर कोठें नेण्यास परवानगी दिली नाहीं."

नंतर पुंडलीकजी पुढें म्हणाले, " त्यानंतर एक विलक्षण प्रकार घडून आला. कांहीं

वकिलांनीं एक गट करून असें सुचविलें कीं, सारावाढ ४० टक्के व्हावी व त्याचा मोबदला म्हणून श्रीमंतांनीं लोकांना कांहीं सुधारणांचें दान करावें. ते वकील हे रयतांचे खरे प्रतिनिधी नसल्यामुळें मी ती तडजोडीची सूचना मान्य केली नाहीं, श्रीमंतांच्या पूर्व अभिवचनानुसार चौकशीच व्हावी असा मीं आग्रह धरिला; परंतु त्यावेळीं श्रीमंतांनीं चौकशी अनवश्यक म्हणून अशक्य असल्याचें मला सांगितलें."

शेवटीं 'टाईम्स'च्या बातमीदाराजवळ पुंडलीकजी म्हणाले कीं, "श्रीमंतांच्या अभिवचनानुसार चौकशी न केली जाईल तर रयत बहुधा एक पै देखील सारा देण्यास तयार होणार नाहींत."

श्री० पुंडलीकजी हे अदमासें बत्तीस वर्षांच्या वयाचे एक तरुण असून स्वाभावानें धाडसी, आनंदी व उत्साही आहेत. ते कांहींकाळ महात्मा गांधींच्या आश्रमांत होते. रयत व चीफसाहेब यांच्या या लढ्याचा परिणाम काय होतो पहावें !

श्रीमंतांच्या मुलाखतीस उत्तरें देणें हो एक वर्तमानपत्रांना कांहीं दिवस चळवळच होऊन बसली होती. श्रीमंतांच्या मुलाखतींतील असत्य विधानें वाचून रयतांना आश्चर्यच नव्हे तर सात्त्विक संतापही येत असे. त्यांच्या त्या मुलाखतीस कोणीं कोणीं कशीं उत्तरें दिलीं आहेत त्याचा येथें थोडासा विचार केल्यास श्रीमतांना ते चळवळीच्या आखाड्यांत उतरतांच पहिली सलामी कशी मिळाली याची कल्पना वाचकांना सहज येईल. या मुलाखतीचा व त्यांतील विधानांचा फोलपणा जगजाहीर झाला व त्यांतील लटपटपंचींचा बोभाटा फारच झाला. त्यांतील कांहीं महत्त्वाचीं अवतरणें येथें उद्धृत केल्यास अस्थानीं होणार नाहींत.

श्रीमंतांच्या या मुलाखतीला अगदीं वेळेवर, मुद्देसूद, जोरदार व साधार उत्तर दिलें असेल तर तें 'एका रयतानें'च होय. ता. २७।११।२८ च्या 'नव्या काळां'त तें प्रसिद्ध झालें आहे. त्यांत तो 'रयत' म्हणतो कीं:—

"(१) श्रीमंत म्हणतात 'सत्याग्रहास फक्त ५०० च रयत सामील होते. व तेही दोनतीन खेड्यांचेच होते. बाकी सर्व मजा पाहण्याकरितां जमलेले तमासगीर होते'. परंतु सत्याग्रहास आलेल्या रयतांची एकंदर संख्या पांच हजारांवर असून निरनिराळ्या सतरा खेड्यांचे रयत त्यावेळीं आले होते असा स्पष्ट लेखी पुरावा आमच्यापाशीं आहे. शिवाय खरी कळकळ असल्याशिवाय उन्हातान्हांत किंवा थंडीवारा सहन करीत श्रीमंतांच्या वाड्यासमोर सहा दिवस कोणी केवळ मजेखातर पडून राहील !

"(२) 'रा० पुंडलीकजी कातगडे यांचें मिरजेंत शेत किंवा घर नाहीं, ते मुद्दाम लोकांची दिशाभूल करीत आहेत; मीं केवळ चौकशी करण्याचें वचन दिलें होतें. पुंडलीकांना बरोबर घेऊन चौकशी करण्याचें मीं कधींच वचन दिले नाहीं. पुंडलीकांनीं लोकांची भलती समजूत करून दिली व विनाकारण एकाएकीं मजवर उलटले'. अशा गर्भित अर्थाचें विधान श्रीमंतांनीं केलें आहे, पण तें सपशेल खोटें आहे. तीन हजार लोकांपुढें उभें राहून श्रीमंतांनीं स्वतः स्वमुखानें जाहीर केलें कीं, 'मी व श्री० पुंडलीकजी दोघे मिळून गांवोगांव जाऊन पूर्ण चौकशी करितों व चौकशी पूर्ण होईतों वाढलेला तरम आकार प्रसिद्ध करीत नाहीं'. त्याप्रमाणें पुढें कागदपत्रही सर्व त्यांनीं श्री० पुंडलीकजींना पहावयास दिलें. पण जेव्हां कागदोपत्रीं विलक्षण चुका असल्याचें श्री० पुंडलीकजींनीं निदर्शनास आणिलें, तेव्हां श्रीमंतांनीं दिलेलें वचन न पाळून पुढे चौकशी करण्याचें कांहीं कारण नाहीं, आपलें व कांहीं वकील मंडळींचें या बाबतींत सर्व कांहीं टरले आहे असें पुंडलीकजीस सांगितलें. अशी खरी वस्तुस्थिति घडलेली आहे.

श्री० पुंडलीकजी व त्यांचे वाडवडील गेल्या तीन पिढ्यांमिरजेंतच राहणारे होते. मिरजेतच त्यांचें स्वतःचें घरही आहे. पण घर किंवा शेतभात नाहीं; असें गृहीत धरले, तरी रयतेचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास असल्यामुळें तेच खरे रयतेचे प्रतिनिधी होण्यास लायक आहेत. श्रीमंतांपाशीं असलेले कागदपत्र व इतर पुरावा खरोखरीच वस्तुस्थितीस धरून असेल तर पुंडलीकजींची तरी श्रीमंतांना एवढी भीति कां वाटावी !

" (३) श्रीमंत म्हणतात, 'गेल्या साठ वर्षांत आपण सारा मुळींच वाढविला नाहीं. ब्रिटिश रेव्हिन्यू खात्यांतील अधिकाऱ्यांनीं सुद्धां सारा टुप्पट करण्याची सल्ला दिली आहे'. पण श्रीमंतांनीं दिलेलीं हीं सारावाढीचीं कारणें अगदींच फुसकीं आहेत. साठ वर्षांपूर्वीं वाढविलेला तरम आकार शेजारच्या ब्रिटिश मुलुखांतील त्यावेळच्या तरम आकाराच्या तिप्पट होता. व आतांच्या तेथील तरम आकाराहूनही कांहींसा अधिकच आहे. इतका जबदस्त तरम आकार पूर्वीच बसविला गेल्यामुळें गेलीं साठ वर्षें सारावाढ करतांच येणें शक्य नव्हतें व अजूनही मिरजेचा तरम आकार शेजारच्या ब्रिटिश हद्दींतील तरम आकारापेक्षां अधिक असल्यामुळें आतांही सारावाढ करणें रास्त नाहीं.

" (४) 'पाणी आणणें, स्वतंत्र हायकोर्ट स्थापणें, प्राथमिक शिक्षण मोफत

करणें यासाठीं आपण सारा वाढवीत आहों' असें श्रीमंत म्हणतात. परंतु हें म्हणणें चुकीचें आहे. कारण जमिनीचा मगदूर वाढून; शेतकऱ्यास शेतीपासून होणारा निव्वळ फायदा पूर्वीपेक्षां अधिक वाढला असेल तरच सारा वाढवावा असें तत्त्व लंड रेव्हिन्यू कोडमध्यें ग्रथित केलें आहे. निरनिराळ्या सुधारणा करण्यासाठीं सरकारास अधिक पैशाची जरुरी असेल तर त्यासाठीं सारा वाढविणें हें लँड रेव्हिन्यू कोडाच्या मूलभूत तत्त्वाच्या अत्यंत विरुद्ध आहे. कारण सुधारणा या केवळ तात्पुरत्या असतात; पण सारावाढीचा बोजा मात्र रयतेवर कायमचा बसतो आहे. याहून अधिक सारा देणें मिरजेच्या रयतेस त्यांच्या गरिबीमुळें जवळ जवळ अशक्य आहे व शेतीची स्थितीही अधिकाधिक खालावत चालली आहे. अशा वेळीं सारा वाढवून रयतेस अधिक पिळून काढणें स्वकीय म्हणविणाऱ्या संस्थानाधिपतीस अगदींच अनुचित आहे."

मिरज संस्थान-प्रजापरिषदेच्या चिटणिसांकडूनही एक उत्तर या श्रीमंतांच्या मुलाखतीस म्हणून प्रसिद्ध झालें आहे. तें 'ज्ञानप्रकाश' (२८।११।२८), 'नवाकाळ' (२९।११।२८) 'केसरी' (४।१२।२८) आणि 'टाईम्स ऑफ इंडिया' (१२।१२।२८) इत्यादि वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. वर उद्धृत केलेल्या 'एका रयता'च्या उत्तरापेक्षां या चिटणिसांच्या उत्तरांत जेवढा भाग नवीन आला आहे तेवढाच भाग त्यांतून या ठिकाणीं देतो.

" श्रीमंतांनीं 'टाईम्स'च्या बातमीदारास दिलेल्या मुलाखतींत म्हटलें आहे कीं, 'पुंडलीकजी यांनीं सारावाढीबद्दलचे कागदपत्र पाहिले; पण त्यांत त्यांना कांहीं चुका दाखवितां आल्या नाहींत'. परंतु ही गोष्ट वस्तुस्थितीला सर्वस्वीं सोडून आहे. श्री० पुंडलीकजी श्रीमंतांजवळ त्या चुकांविषयीं खुलाशास गेले असतांना श्रीमंतांनीं त्यांना धुडकावून देऊन सांगितलें कीं, 'कांहीं स्थानिक वकिलांशीं या संबंधीं तडजोड झाली आहे, तेव्हां यापुढें दिलेल्या अभिवचनाचें कारण नाहीं'. अशी खरी स्थिति आहे. तेव्हां पुंडलीकजींनीं चुका दाखविल्या नाहींत या म्हणण्यांत अर्थ काय ! पुंडलीकजींचें वर्तन विचित्र कसे याचा खुलासा श्रीमंतांनीं करावा.

" ज्या वकिलांनीं श्रीमंतांशीं तडजोड केली असें श्रीमंत म्हणतात ते रयतांचे प्रतिनिधी केव्हांच नव्हते. युवराजांजवळ त्या लोकांनीं या गोष्टीचें असें स्पष्टीकरण केलें होतें कीं, आपण फक्त आपणांपुरतेंच बोलूं, रयतांबद्दल नाहीं. तेव्हां त्यांच्या प्रतिनिधित्वाबद्दल प्रश्नच रहात नाहीं. उलट जमलेल्या रयतांतून श्रीमंतांनीं

चौकशीसाठीं आपण होऊन श्री० पुंडलीकजी यांची निवड केली होती. रयतां-चाही एकट्या पुंडलीकर्जीवरच अढळ विश्वास आहे. वडी व ढवळी येथील रयतांनींही युवराजांच्या तोंडावर पुंडलीकजींवरच आपला पूर्ण विश्वास असल्याचें सांगितले होतें. यावरून रयत पुंडलीकर्जीस कसें मानतात हें दिसून येणार आहे.

"पुंडलीकर्जीनीं गैरसमज पसरविला असें श्रीमंत म्हणतात तो कसा याचा खुलासा त्यांनीं करावा. मिरजेशीं पुंडलीकर्जीचा संबंध नाहीं असें विधान श्रीमंतांनीं करावें ही फारच गैर गोष्ट होय ! पुंडलीकर्जीचे वडील श्रीमंतांचे एक स्नेही होते व त्यांच्या घरीं श्रीमंत किती वेळां तरी जात असत ही गोष्ट सर्वांस माहिती आहे.

सत्याग्रहाच्या पहिल्या दिवशीं श्रीमंतांनीं रयतेच्या प्रतिनिधींची मुलाखत घेण्याचेही नाकारले. मग, 'मी रयतांचा व रयत माझी' हें त्यांचें म्हणणें खरे कसें मानावयाचें ! रयत सारखी सहा दिवस उन्हांत व थंडींत तळमळत होती; पण त्याची दखलगिरी श्रीमंतांना नव्हती. यावरून रयतेवद्दल श्रीमंतांच्या मनांत किती प्रेम असेल याची चांगली कल्पना येते. श्रीमंतांना प्रजापरिषदेची पर्वा नाहीं, रयतेच्या शिष्टमंडळाचीही नाहीं. प्रजापरिषद् सुसंघटित संस्था नाहीं असें श्रीमंत म्हणतात, तर सुसंघटित संस्था म्हणजे काय हें श्रीमंतांनीं एकवार स्पष्ट करावें. वाड्याभोंवतीं जमलेल्या रयतांची संख्या पांचशेंपेक्षां जास्त नव्हती हें म्हणणेंही वस्तुस्थितीला सोडून आहे. त्यांची संख्या तीन हजारांवर होती व सोळा सतरा गांवांतून ते जमा झाले होते. आमच्याजवळ, जमलेल्या सत्याग्रही रयतांची यादी व फोटोही आहेत."

श्रीमंतांच्या मुलाखतीस गांवोगांवच्या प्रतिनिधी रयतांनीं आपल्या सहीनें उत्तर दिलें आहे. तें 'ज्ञानप्रकाश' व 'नवाकाळ' पत्रांतून प्रसिद्ध झाले आहे. 'एक रयत' किंवा परिषदेचे चिटणीस या दोघांच्या उत्तरापेक्षां जो नवीन मजकूर या रयत प्रतिनिधींच्या उत्तरामध्ये प्रसिद्ध झाला आहे तेवढाच भाग या ठिकाणीं वाचकां-करितां देतों.

"श्रीमंत सरकार आज आपला शब्द मोडीत आहेत या गोष्टीनें आम्हांस फार दुःख होत आहे. श्री० पुंडलीकर्जीची वर्तणूक विलक्षण होती, असें श्रीमंत आज म्हणत आहेत त्याचा खुलासा श्रीमंत करतील तर त्यांचा गैरसमज दूर करण्यास बरें पडेल.

"ज्या सभ्य वकिलांनीं ४० टके सारा वाढविण्यास कबुली दिली ते आमचे

प्रतिनिधी नव्हेत. आम्ही ज्यांना आमचे प्रतिनिधी मानतों त्यांना धुडकावून लावणें व दुसऱ्याच कांहीं लोकांना आमचे प्रतिनिधी म्हणून आमच्या डोक्यावर बसवूं पाहणें ही श्रीमंतांची वागणूक मात्र 'विलक्षण' आहे.

" पुंडलीकजींवर लोकांचा विश्वास असल्यामुळेंच श्रीमंत तात्यासाहेब व अधिकारी लोक यांना वडी व ढवळी येथील चौकशीच्या फार्सांचें चंबूगवाळें गुंडाळावें लागलें, ही गोष्ट श्रीमंतांनीं आपल्या मुलाखतींत कबूल केली आहे.

" ज्याचें गांवांत घर नाहीं किंवा रानांत शेत नाहीं असे अनेक लोक या संस्थानांत रहात आहेत. ते संस्थानचे कोणी नव्हत असें तर चीफसाहेबांचें म्हणणें नाहीं ?

" घालवाड व म्हैसाळ यांचें उदाहरण देतांना व ढवळीशीं त्यांची तुलना करितांना श्रीमंतांनीं त्या ठिकाणची सारावाढ कधीं झालेली आहे याचा विचार केलेला नाहीं. साठ वर्षांत सारावाढ केली नाहीं हें सांगतांना, साठ वर्षांत रयतेची सुधारणा व उन्नति किती झाली आहे याचा खुलासा करण्यास श्रीमंत कसे विसरले !

" शिवाय कवठेपिराण येथें संस्थानच्या हद्दींत शेरी चौथाईचे नंबर संस्थानच्या नंबरामध्यें मिसळून आहेत. त्यांच्या साऱ्याशीं तुलना करण्यास श्रीमंत तयार आहेत काय ! दोन दोन वेळ फेरआकारणी केल्यावर त्या शेरी चौथाईच्या जमिनीचा सारा आतां कोठें या कवठेपिराणच्या पूर्वीच्या साऱ्याबरोबर आला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण साठवर्षांपूर्वी पासूनच कवठेपिराणचे लोक असा दुप्पट तिप्पट सारा भरीत आले आहेत याला श्रीमंत काय उत्तर देतील ! "

असो. ता. ३०।११।२८ च्या 'संस्थानी स्वराज्य' मध्यें संपादकांनीं एक अग्रलेख लिहिलेला आहे. त्यांतही श्रीमंतांच्या मुलाखतीच्या—सप्रमाण व मार्मिक कोटिक्रमानें—चिंधड्या उडविल्या आहेत. त्यांतील कांहीं नाविन्यपूर्ण भाग या ठिकाणीं देण्यासारखा आहे. ते म्हणतातः—

" ब्रिटिश सरकारचे अधिकारी (फेरआकारणी करण्यास) जे घेतले होते, त्यांनीं रिपोर्ट केले आहेत ते आतां प्रसिद्ध झाले आहेत. या रिपोर्टांतून कोणतीं चुकीचीं विधानें करण्यांत आलेलीं आहेत, हें, रिपोर्ट ज्या मूलभूत तत्त्वावर उभारण्यांत आले आहेत तीं तत्त्वेंच कशीं चुकीचीं आहेत हेंही दाखवून देण्यांत आलें आहे. बार्डोली येथील लढ्यानें खालसा मुलुखांतील अधिकारी कसे चुका करतात

हें जाहीर झालें आहे. सबब या अधिकाऱ्यांचे रिपोर्ट केव्हांही छानून घेतले पाहिजेत व ते 'वेदवाक्य' समजण्याचें कांहींही कारण नाहीं."

शेजारच्या इतर संस्थानशीं तुलना करण्याच्या श्रीमंतांच्या मुद्द्याला उत्तर देतांना 'संस्थानी स्वराज्य' म्हणतें कीं:—

" श्रीमंत सर बाळासाहेबांनीं खालसा हद्दींतील खेडयातील दरांशीं तुलना केली असती तर एखादे वेळीं शोभले असतें. संस्थाना-संस्थानांत निवड करणे म्हणजे 'उडदामाजी काळेंगोरें, काय निवडावें निवडणारें!' हा प्रकार आहे. श्रीमंत बाळासाहेबांच्या मिरज तालुक्यांतील शिरढोण गांवाच्या हद्दीस लागलेल्या सांगली संस्थान हद्दींतील 'जाय गव्हाण' हा गांव पूर्वीच्या आकारापेक्षां रिव्हिजन सर्व्हे-मध्यें उतरला आहे, असेही उदाहरण श्रीमंतांच्या पुढें चौकशीच्या वेळीं अवश्य मांडलें गेलें असतें."

आपल्या मुलाखतींत श्रीमंतांनीं पुंडलीकजींवर जो चिखल उडविण्याचा प्रयत्न केला आहे त्याच्या बाबतींत लिहितांना 'संस्थानी स्वराज्य' म्हणतें कीं:—

" शिवाय रा० पुंडलीक यांचा संबंध श्रीमंत सर बाळासाहेब यांच्याशीं निराळा आहे. रा० पुंडलीक यांच्या वडिलांचा व श्री० सर बाळासाहेब यांचा घरोब्याचा ऋणानुबंध होता. युवराज श्री० तात्यासाहेब यांच्याबरोबर वरील संबंधामुळें रा० पुंडलीक यांना शिक्षणाकरितां ठेविलेलें होतें. तेव्हां अशी स्थिति असतांना श्रीमंत रा० पुंडलीक यांच्यावर वरीलप्रमाणें चिखल टाकूं पहात आहेत ही आश्चर्याची गोष्ट आहे. ता. ४ नोव्हेंबर रोजीं रा० पुंडलीक यांना रयतांचे प्रतिनिधि म्हणून श्रीमंतांनीं तावडतोब मान्य करण्यांतील मर्म वरील गोष्टीवरून चांगले लक्ष्यांत येणार आहे.....श्री० सर बाळासाहेब हे मिरजेच्या गादीला दत्तक होण्यापूर्वी त्यांचें मिरजेस घर वगैरे नव्हतें, म्हणून त्यांना दत्तक घेऊं नये म्हणणाऱ्या एखाद्या माथेफिरू-च्या विचारसरणीप्रमाणेंच श्रीमंतांची विचारसरणी आहे असें कोणासही वाटेल."

सत्याग्रहास जमलेल्या लोकांविषयीं 'संस्थानी स्वराज्या'नें श्रीमंतांना 'टाईम्स'-च्या तारीख १६।११।२८ च्या अंकांतील तार आहेर केली आहे. त्यावरून श्रीमंतां-ची मुलाखत ढांसळून पडत आहे. ती तार अशी आहे:—

" A peaceful but determined crowd of about 4000 villagers had surrounded the palace of the chief-saheb."

याच बाबतींत पुण्याच्या 'संग्राम' पत्रांत 'गोसावी'नें एक कविता प्रसिद्ध करविली आहे. श्रीमंतांच्या वचनभंगाचें त्यालाही आश्चर्य वाटलेलें आहे. ती कविता खालीलप्रमाणें आहेः—

मी बोललों तथापि । नाहीं दिलेंच वचन ॥
म्हणतोस आज राजा । तुज तूंच घे बघून ॥ ध्रु० ॥
सर्वज्ञ देव देतो । पात्रत्व पारखून ॥
जीव जगांत उंच । वा नीचसें ठिकाण ॥ १ ॥
तव पूर्व पुण्य मोठें । द्विविधा म्हणून लाभें ॥
तुज थोरवी पुरी ही । आहे तुलाहि जाणा ॥ २ ॥
प्रकटेल एरवीं कां । प्रकटे जशी कितीदां ॥
तव विप्रता प्रभुत्व । लोकांत स्वाभिमान ॥ ३ ॥
पण आज होय नवल । तो साभिमान लोपे ॥
बेबंद जीभ खेळे । टाकी जुनें प्रमाण ॥ ४ ॥
द्विज एकदांच बोले । नृप एकदांचि सोडी ॥
तो बोल आणि बाण । फिरणें कधीं घडे न ॥ ५ ॥
निज वाक्य पालनार्थ । विभवा स्वजीविताही ॥
टाकून कीर्तिशेष । होणेंचि ज्यास मान्य ॥ ६ ॥
त्या विप्र-राज-लोकीं । तुज जन्म दे विधाता ॥
तुजशा बहुश्रुता हें । कथणें नको फिरून ॥ ७ ॥

श्रीमंतांनीं आपली मुलाखत दिल्यापासून महाराष्ट्रांतील सर्व वर्तमानपत्रांतून त्यांवर अर्शाच सारखी टीका होत राहिली. त्या मुलाखतीचा मसुदा प्रथम ज्यानें केला असेल त्याची स्वतःच्या बुद्धीविषयीं स्वतःची व श्रीमंतांची खात्री झाली असली तर पुष्कळच फायदा झाला असें म्हणतां येईल. श्रीमंतांच्या 'टाईम्स'-मधील मुलाखतीच्या इतक्या अशा ठिकऱ्या उडतील असें कोणासच प्रथम वाटलें नसेल; परंतु 'पांचांमुखीं परमेश्वर' एकदां बोलूं लागल्यास मग त्या ठिकाणीं असत्य कसें टिकावें ! असो.

चळवळ हाणून पाडण्याचा यानंतर जो डाव पिता–पुत्रांनीं मिळून टाकला तो यापेक्षां विशेष महत्त्वाचा असून त्यामुळें क्षणभर कां होईना, सर्व तालुकाभर आश्चर्य वाटलें, दुःख वाटलें व त्याचबरोबर खांदेबदल झाला म्हणजे वाटतो तितका

आरामही पण वाटला. खांदा बदलला कीं क्षणभर जरी बरें वाटल्यासारखें होतें तरी लागलीच पहिल्याइतकाच दुसरा खांदाही बोचूं लागतो. तशी स्थिति चळवळीची झाली. वाचकांना फार वेळ वाट पहात न दाखतां आपण चळवळीच्या पुढील इतिहासाकडे वळूं!

प्रकरण नववं

यदनेन तरुर्न पातिताः क्षपिता ताद्धटपाश्रिता लता ।

—रघुवंश, अष्टमसर्ग, श्लोक ४७.

"श्रीमंतांनीं खाजगीकडे आपल्या दर्जाप्रमाणें रक्कम ठरवून घेऊन बाकीची रक्कम प्रजेनें आपल्या योग्य अडचणीकडे खर्च करण्याची त्यांची सत्ता कबूल करावी. बजेटावर सर्व ताबा प्रजेचा पाहिजे. पूर्वीचा व हल्लींचा मनू लक्षांत घेणें अगदीं जरूर आहे. नवीन मनूंत प्रजेचा विचार घेऊनच राज्यकारभार चालविला पाहिजे. प्रजेकडे अधिकार सोंपविला तर राज्यकर्त्यांस दोष येणार नाहीं व सर्व जबाबदारी प्रजेवरच राहील. तसेंच कोणताही कर झाला तरी तो पुढें लोकांच्या संमतीनेंच बसविला पाहिजे." (श्री० बाबूराव काशीनाथ जोशी वकील. ता. ९।९।२८.)

[कारभारी होण्यापूर्वी]

हें प्रकरण व त्याचा मथळा वाचून वाचकांना असें वाटण्याचा संभव आहे कीं, ही व्यक्तिशः टीका असून तशी करावयास नको होती. परंतु चळवळीशीं संबंध आलेल्या व्यक्तीवर त्यांच्या (खाजगी कृत्याविषयीं नव्हे, पण) सार्वजनिक कृत्याविषयीं त्या व्यक्तीचा उल्लेख करून टीका करण्यास मुळींच हरकत नाहीं. त्या व्यक्तीच्या खाजगी वर्तनावर टीका करणें मात्र अयुक्त व असमंजसपणाचें आहे. श्री० बाबूराव काशीनाथ जोशी यांच्याविषयीं आमच्या मनांत चांगला आदर वसत आहे त्यांचा स्वभाव प्रेमळ असून अंतःकरण शुद्ध आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या स्वतःच्या स्वार्थाकडे दृष्टि देऊन त्यांनीं कोणतीहि गोष्ट या चळवळींत केली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आपल्याला

कारभाऱ्याची जागा मिळावी म्हणून त्यांनीं अमुक एक गोष्ट केली किंवा अमुक एक गोष्ट त्यांच्या हातून झाल्यामुळें त्यांना कारभाऱ्याच्या जागेवर नेमलें असें मानणें हें चुकीचें गणलें जाईल. रयतांच्या कल्याणाला आडकाठी होईल अशी गोष्ट त्यांच्या हातून सहसा जाणून बुजून कधींही होणार नाहीं. आज संस्थानांत जे अधिकारी आहेत, त्यांमध्यें श्री० जोशी यांच्या योग्यतेचे अधिकारी फारच थोडे सांपडतील अशी आमची मनोदेवता आम्हांस सांगते. मिरज संस्थानांत कारभाऱ्याची जागा स्वीकारण्यामध्यें वास्तविक त्यांचें आर्थिक नुकसानच झालें आहे. ते कारभारी झाले त्यावेळीं त्यांच्या नांवावर कोर्टांत जवळ जवळ सहाशें कामें होतीं ही गोष्ट कोणीही दृष्टीआड करूं शकणार नाहीं. रयतांना मदत करण्याचा प्रयत्न त्यांनीं आजपर्यंत केला असून यापुढेंही आपल्या कुवतीप्रमाणें व समजुतीप्रमाणें संधी मिळेल त्यावेळीं ते करीत रहातील. परंतु त्यांचा भिडस्त व भोळसट स्वभाव आणि संस्थानांतील हल्लींची परिस्थिति लक्ष्यांत घेतां त्यांच्या कल्पनेप्रमाणे व इच्छेप्रमाणें रयतांची सेवा घडून त्यांच्या हातून कांहीं जुळून येईल असें आज तरी वाटत नाहीं. इतक्या गोष्टी सांगितल्यानंतर हें कोणाच्याही ध्यानांत येईल कीं, या प्रकरणांत आम्हीं जें विवेचन किंवा टीका केली आहे ती केवळ तात्त्विक आहे आणि या दृष्टीनेंच त्याचा विचार करावा अशी आमची वाचकांना विनंति आहे.

सारावाढीच्या बाबतींत श्री० बाबूराव जोशी यांनीं श्रीमंत तात्यासाहेब यांच्याशीं वाटाघाट करितांना आपलें मत बनवून घ्यावयास नको होतें. आपलें मत आगाऊच ४० टक्के बनत चालले असले तरी चळवळीचे पुढारी आणि रयत यांची चाललेली चळवळ लक्षांत घेतां त्यांनीं आपले ४० टक्यांचें मत कोणाजवळही बोलून व्यक्त करवयास नको होतें. श्रीमंत तात्यासाहेब यांच्याकडे तर मुळींच बोलण्याचें कारण नव्हतें. आपलीं मतें जाहीर करण्याला प्रत्येकाला हक्क आहे ही गोष्ट आम्ही जाणतों; परंतु ज्याला तसें महत्त्व आलेलें असतें अशा मनुष्यानें आपलीं मतें जाहीर करतांना त्याचा परिणाम पुढें इतरांवर काय होईल याचा विचार करणें अत्यंत आवश्यक असतें. बाजारांतील एखाद्या शेठजीनें आपलीं मतें लोकांत बोलत सुटणें वेगळें असतें. त्याच्याकडून जबाबदारीच्या जाणिवेची कोणीं कधीं अपेक्षाच केलेली नसते. आणि इतकेंही करून जबाबदार मनुष्यानें आपलीं मतें जाहीर होऊं द्यायचींच तर त्याप्रमाणें लोकमत बनविण्याची खटपट करणें हें त्याचें

काम होऊन बसतें. या सर्व गोष्टी न करतां वाटेल तसें व वाटेल तेथें बडबडत सुटण्याचें व्यक्तिस्वातंत्र्य वेजबाबदार मनुष्याला खात्रीनें ईश्वराच्या घरीं देखील दिलें गेलेलें आहे.

२ दुसरी विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, चारपांच वकील मंडळींना गोळा करून श्रीमंत तात्यासाहेब यांच्याकडे नेतांना, श्री० बाबूराव यांनीं रिक्रूट भरती अधिकाऱ्याचें काम करतांना चळवळीच्या पुढाऱ्यांशीं त्याची दखलगिरी देऊन वाटाघाट करावयास पाहिजे होती. त्यांत कोणत्याही पक्षाला जाऊन मिळाल्यासारखें खात्रीनें झाले नसतें. वकील मंडळींची योग्यता कित्येक बाबतींत चळवळीच्या पुढाऱ्यांपेक्षां अधिक आहे ही गोष्ट खोटी नाहीं. त्यांच्याकडे या वकिलांनीं त्यांचा मोठेपणा कबूल करण्याकरितां जावयाचें असतें असें नाही; तर चळवळीच्या पुढाऱ्यांनीं एक जबाबदारीचें काम आरंभिलें असून त्यांच्या कामांत आपल्या कोणत्या वर्तणुकीनें आपण अजाणतां आडकाठी उत्पन्न करून ठेवूं याचा अंदाज आपल्याप्रमाणें त्यांनाही कांहीं असेल आणि म्हणून या बाबतींत त्यांचाही विचार घेणें रास्त आहे. एवढ्या साध्या दूरदर्शीपणानें जी गोष्ट त्यांनीं करावयास पाहिजे होती, ती त्यांनीं केली नाहीं. इतर कोणत्याही वकिलांना हा विचार त्यावेळीं सुचला नाहीं किंवा सुचला असल्यास महत्त्वाचा वाटला नाहीं किंवा महत्त्वाचा असूनही त्यांच्या हातून तसें झालें नाहीं. हें खरोखरच रयतांचें व चळवळीचें दुर्दैव आहे. या उप्परही पुढें श्रीमंत तात्यासाहेब यांच्याकडे आपण गेल्यानंतर तेथें जे काय बोलावयाचें तें सर्वांनीं मिळून एकमतानें सांगावयाचें असें आगाऊ ठरवावयास पाहिजे होतें. श्रीमंतांकडे कशाला बोलावून नेलें जात आहे ही गोष्ट या वकीलपंचकास माहीत होती. हिराबागेंत मेजवानीला तर बोलावलें नव्हतें ! हें एकमत बनवितांना श्री० बाबूराव जोशी यांनीं आपण ४० टक्क्यांचा आग्रह सोडून ३० किंवा ३२ टक्क्यांवर येऊन सर्वांचें एकमत करून घ्यावयास पाहिजे होतें. आणि असा प्रसंग पुढे कधींकाळीं आपल्यावर येईल हें हेरून ४० टक्क्यांवरच आपलें प्रामाणिक मत बनवून घेतांना एकदां सोडून दहा वेळां विचार करावयास नको होता काय ? त्याकरितां नेहमीं आपल्या बोलण्यांत हातचा राखून ठेवण्याचें धोरण त्यांना राखतां आलें नाहीं. बरें, आपण चुकून किंवा बरोबर ४० टके कबूल केले आहेत व आतां आपल्याला त्यांच्या पाठीमागें जातांच येत नाहीं अशी स्थिति

आपणच उत्पन्न करून ठेविली असल्यामुळें स्वतः फारतर ४० टक्क्यांवर रहावयाचें; पण इतर चौघांचें मत तरी तसें बांधलें गेलें नसल्यामुळें तिसांवर त्यांचें तरी एकमत बनूं द्यावयाचें किंवा बनवून मग त्यांना श्रीमंतांपुढें न्यावयाचें होतें !! 'आम्हीं प्रत्यक्ष रयतांची स्थिति पाहिली नाहीं व त्या दृष्टीनें श्री० मोडक यांचा रिपोर्ट अभ्यासला नाहीं तेव्हां आम्हांस तसें मत देतां येणार नाहीं; शिवाय रयतांच्या विश्वासांतील लोकांचा उपयोग यापेक्षां अधिक होईल' असें स्पष्टपणें श्रीमंतांना सांगून सर्वच वकिलांनीं परत घरीं निघून यावयास पाहिजे होतें, त्या-योगें त्यांच्या सनदा खात्रीनें गेल्या नसत्या. असो.

आपले मत देऊन हे वकील महाशय परत आल्यानंतर 'आम्हीं हें मत व्यक्तिशः आमचें दिलें आहे. रयतांच्या तर्फेने आम्ही बोललों नाहीं. आमचें बोलणें रयतांना बंधनकारक होऊं शकत नाहीं. आम्ही हे ४० टक्के कबूल करण्याबद्दल रयतांना उपदेश करणार नाहीं'. असें जाहीर तरी करावयास पाहिजे होतें. स्वयंस्फूर्तीनें हें त्यांना करितां आलें नाहीं तर निदान चळवळीच्या पुढाऱ्यांनीं त्यांना तसें उघड सांगि-तल्यानंतर तरी ती गोष्ट त्यांच्याकडून व्हावयास पाहिजे होती. त्या वकील मंडळीपुढें चळवळीच्या पुढाऱ्यांनीं सहीकरितां खालील तार ठेविली होती असें म्हणतात:—

"Deputation of local pleaders, consenting 40 %, have plainly explained to the young chief and also to rayats, that they have not at all studied the con-ditions of lands and rayats, that they cannot preach rayats to this 40% compromise, that their so called consent is purely personal."

कोणी कांहीं सबबीवर तर कोणी कांहीं सबबीवर या कागदावर सही करण्याचें कांहीं वकिलांनीं नाकारलें व त्यांतील कोणाही एकदोन वकीलांच्याच सह्या मिळ-वून त्याचा तसा चळवळीला उपयोगही झाला नसता. म्हणून ही तार प्रसिद्ध करविण्याचा प्रयत्न पुढाऱ्यांना सोडावा लागला. असो.

यानंतर श्री० जोशी वकील यांनीं कारभाऱ्याची जागा पत्करण्याच्या प्रश्नाकडे वळूं. त्यांना कारभाऱ्याची जागा द्यावी या गोष्टीची वाटाघाट चळवळीच्यापूर्वी देखील बरेच दिवस चाललेली होती ही गोष्ट आम्हांस माहीत आहे. तथापि यावेळीं त्यांना ती जागा देण्यामध्यें दरबारला राजकारण साधावयाचें होतें आणि

ही जागा या आणीबाणीच्या वेळीं श्री० जोशी यांनीं त्याकरितांच स्वीकारावयास नको होती. त्यांत त्यांचा बाणेदारपणाच व्यक्त झाला असता. त्यायोगें दरबारांत त्यांची किंमत वाढली असती. या वकिलांना व श्री० बाबूराव जोशी यांना अशा प्रकारें रयतांची सेवा करण्याची संधि अनेक वेळां आली असतां त्यांनीं ती आम्हीं वर वर्णन केल्याप्रमाणें गमावली आहे असें आम्हांस दुःखानें म्हणावें लागतें!

" राज्यशकट हांकण्यामध्यें तुमचा प्रत्यक्ष हात नसल्यामुळें तुम्ही वाटेल ती टीका करितां, उगाच अमुक सुधारणा करा, तमुक सुधारणा करा असें टीका करीत बसण्यांत काय हंशील आहे ! आतां तुमच्या हातांतच अधिकार आम्ही देतों. मग करून दाखवा पाहूं, काय काय व किती सुधारणा करतां तें ! आतां जबाबदारी पत्करण्यास मागें कां हटतां ? चला, व्हा स्टेटकारभारी आणि दाखवा सुधारणा करून ! असें म्हणून अधिकाराची जागा सरकारनें देऊं केल्यास मग नको कां ती स्वीकारावयास ? " असा आक्षेप कित्येक वेळां कांहीं लोकांकडून पुढें करण्यांत येतो. हा आक्षेप ज्यांच्या तोंडून बाहेर पडतो ते गृहस्थ लवकरच सरकारी नोकरींची शृंखला आपल्या पायांत अडकवून घेणार हें निश्चित मानावें. फक्त ते संधीचीच वाट पहात बसले आहेत ! श्री० बाबूराव जोशी यांनीं, स्वतःच्या जबाबदारीवर संस्थानच्या राज्यकारभारावर टीका करण्याची, संस्थानला जाणवेल अशी चळवळ कधींही केली नव्हती व वरील सबब त्यांनीं कधींही सांगितलेली नव्हती. केवळ तात्त्विक वाद या दृष्टीनें आम्ही सदर आक्षेपाचा या ठिकाणीं उल्लेख करून त्याला उत्तर देत आहें.

पहिली ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणल्याशिवाय ज्यांस झोंपच येत नाहीं, इतकी ज्यांना आस्था, कळकळ किंवा भावनेचा तीव्रपणा असतो, त्यांना सरकार कधींहीं कोणत्याही बहाण्यानें किंवा सबबीवर अधिकाराची जागा देण्याच्या भानगडींत पडत नसतें. अशा माणसाला अधिकाराची जागा देणेंच काय; पण जवळ करण्यासही कोणीही संस्थानिक धजणार नाहीं. कारण त्यांना माहीत असतें कीं, हे गृहस्थ आपल्या अवाढव्य, अस्थानीं व फाजील खाजगी खर्चाला प्रथम आळा घालणार किंवा कात्री लावणार, 'नाकापेक्षां मोती जड' आम्हांस नको असेंच त्यांना वाटणार. दुसऱ्याच्या ज्ञानाचा व सल्ल्याचा उपयोग करून घेण्याची किंवा विचार करण्याची बुद्धि त्यांच्यापैकीं फार थोड्या लोकांमध्यें असते.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, राज्यकारभारांत सुधारणा व्हाव्यात, नव्हे झाल्याच पाहिजेत; एवढेंच नव्हे, जर झाल्या नाहींत तर राज्यशकटाला खीळ घालण्याइतकी आम्ही चळवळ करूं असें जरी एखाद्या चळवळ्यानें म्हटलें असलें आणि आपल्या सामर्थ्यानुसार तशी चळवळही केली असली, तरी तेवढ्यानें त्यानेंच स्वतः सरकारी नोकरी पत्करली पाहिजे असें कोणत्या तर्कशास्त्राप्रमाणें ठरेल ? 'लग्न करून घ्या' असा एखाद्यास उपदेश केला कीं, लागलीच स्वतः उपदेशकानेंच त्याचें पत्नीत्व स्वीकारावयाचें कीं काय ? हा कोठला न्याय आहे ? फार तर मुलगी पाहून देण्याच्या खटपटींत किंवा प्रत्यक्ष कार्यामध्यें मेहनतीचीं कामें करण्याच्या बाबतींत सवडीप्रमाणें भाग घेण्याची जबाबदारी त्यायोगें त्याच्यावर येऊं शकेल. असें जरी मानलें कीं, सुधारणा व्हाव्यात याबद्दल आपण चळवळ केल्यावर जबाबदारी घेण्यास मागें पाऊल घेऊं नये, तरी हें केव्हां शक्य आहे याचाही विचार केला पाहिजे.

अधिकार सर्वस्वी आपल्या हातांत मिळत असेल व आपल्या बुद्धीप्रमाणें व आकांक्षेप्रमाणें आपण सुधारणा घडवून आणण्यास जर स्वतंत्र व मुखत्यार राहूं शकणार असलों, तर त्या मार्गानें एकदां प्रयोग करून पाहण्यास तरी हरकत नाहीं. अशा वेळीं अधिकारपद स्वीकारतांना आपण किती दिवसांत कोणत्या सुधारणा घडवून आणणार आहों याची कालमर्यादा व सुधारणा दोन्ही, लोकपक्ष व राजपक्ष या दोघांपुढें जाहीर करून केवळ त्याचकरितां अधिकारपदावर आरूढ होण्याचें धाडस करावें. मग त्यांत दुसऱ्या कोणीं लुडबुड केलेली–मग ती व्यक्ति गरीब असो कीं, श्रीमंत असो, किंवा श्रीमंतांच्या मर्जीतली असो–आपण चालूं देतां उपयोगीं नाहीं. आणि हा आपला निर्धार किंवा धोरण चालत नसेल तर राज्यशकटाचें जूं आपल्या मानेवर घेऊन नेहमींच्या चाकोऱ्यांतून तें ओढीत दिवस घालवीत बसण्याच्या 'अव्यापारेषु व्यापारांमध्यें आपण अडकून बसूं नये. इतकी तडफ तरी आपल्यामध्यें असावयास पाहिजे. सारांश, अधिकारपद कोणत्याही क्षणीं फेंकून देण्याची तयारी असणाराच त्या पदावर शोभूं शकतो आणि लोकांच्या कल्याणाच्या गोष्टी करवूं किंवा करूं शकतो. 'मी एक नोकर आहे, पगाराकरितां मला सरकारचें काम केलें पाहिजे, मी सरकारचें अन्न खातों'; असें जर अधिकाऱ्यास वाटत असेल, तर तो अधिकारीच नव्हे. 'मी लोकांची सेवा व कल्याण करण्याकरितां या अधिकारपदावर आलों आहें, मी खातों तें अन्न

लोकांचें आहे.' ही जाणीव अधिकाऱ्यांमध्यें असली पाहिजे. हुजरे, नोकर, आचारी, शागीर्द किंवा खाजगी कारकून यांची विचारसरणी व दर्जा वेगळा आणि जबाबदार अधिकाऱ्याची विचारसरणी व दर्जा वेगळा ! या दोघांची विचार-सरणी एक होऊंच शकत नाहीं व एक झाली तर फारच घोटाळा होईल. या ठिकाणीं आम्हास एक बोधपर गोष्ट आठवली आहे ती येथें देतों. एका श्रीमंत घराण्यांतील एक चाकर बरेच दिवस घरची बैलगाडी हांकण्याचें काम करीत असे. पुढें कांहीं दिवसांनंतर बैलगाडीचें युग संपलें आणि देशांत यांत्रिक युग आल्यामुळें घरोघर मोटारगाडया वापरल्या जाऊं लागल्या. तेव्हां सदर श्रीमंतांच्या घरींदेखील मोटारगाडी ठेवण्यांत आली. अर्थात् त्या धन्यानें आपल्या नोकराला मोटारगाडी चालविण्यास शिकविलें. त्या नोकराला बैलगाडी कशी उभी करावयाची, बैलांना कसें थांबवावयाचें हें चांगले कळत होतें; परंतु त्याच्या त्या संवयीमुळें मोटार थांबवितांनादेखील त्यानें आपली पूर्वीची विचारसरणी उपयोगांत आणिली. बैलांच्या वेसणींत अडकविलेल्या काढण्या मागें खेंचून धरतात त्याप्रमाणें मोटार-चें आपल्या हातांतील चाक तो मागें जोरजोरानें ओढूं लागला आणि बैलांना थांबविण्यास तोंडानें जी इषारत देतात, तशी तो मोटारीस इषारत देऊं लागला आणि या गडबडींत मोटारचा ब्रेक दाबण्याचें भान न राहिल्यामुळें मोटार खड्ड्यांत घातली. असो.

माझा हें लिहिण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, अधिकाऱ्याची विचारसरणी नोकराच्या विचारसरणीपेक्षां अगदींच भिन्न असणार व असली पाहिजे.

शिवाय अधिकारपद आपल्याला कोणत्या वेळीं व कां दिलें जात आहे याचाही थोडासा विचार केला पाहिजे. अधिकारपद यदृच्छेनें मोकळे व सुनें पडलें असतां तें आपल्याकडे येणें वेगळें व त्या पदावर असलेल्या मनुष्याचे अधिकार काढून घेऊन ते आपल्याला दिले जाणें वेगळे ! दुसऱ्याच्या हातांतील खेळणें होऊन बसण्याचा किंवा आपल्या पूर्वीच्याचीच गति आपली होऊन जाण्याचा संभव कितपत आहे याचाही विचार आपण करावयास पाहिजे. असो. या सर्व तात्त्विक विवेचनाचा प्रस्तुत प्रकरणाशीं अगदींच थोडा संबंध असला तरी त्याचा आम्हांस या ठिकाणीं अंतर्भाव करावा लागला. कारण आम्हीं वर उल्लेखिलेला किंवा त्या-सारखे इतर आक्षेप त्या दिवसांत लोकांमध्यें वावरत होते. इतकें खरें कीं, यावेळीं कारभारीपदाची जागा पत्करून आपल्या स्वतःला विलक्षण परिस्थितींत श्री० जोशी

यांनीं घालून घेतलें असेंच त्यांच्या पुष्कळ मित्रांना देखील वाटतें. सातारच्या 'समर्थ' पत्राला तर रा० जोशी (आतां रा० ब० जोशी) यांचें 'अभिनंदन करावें कां य !' असा प्रश्नच करावासा वाटला. याच मथळ्याखालीं तो म्हणतो:—

" पण-हा पणच नेहमीं बाधतो. ज्या परिस्थितींत श्री० जोशी यांची नेमणूक झाली ती परिस्थितीच असें सांगते कीं, 'अभिनंदन करण्यासारखी ही गोष्ट असली तरी इतक्यांतच तें करूं नका. दुर्दैवानें मिरजेचे अधिपति व रयत यांच्यामध्यें सारावाढीसंबंधानें जो लढा चालू आहे, त्यांत ४० टक्के सारावाढीस ज्या वकिलांनीं संमति दिली त्यांपैकीं श्री० जोशी हे प्रमुख आहेत.....अशा स्थितींत त्यांच्या अंगावर अधिकारार्चीं वस्त्रें दिलीं गेलीं असल्याकारणानें आजपर्यंतचा रयतेचा पुढारी यापुढें रयतेचा विरोधक होणार कीं काय, अशी भीति वाटूं लागली आहे.....मिरजेचें अधिपति वचनाला जागणारे आहेत अशी त्यांची कीर्ति करून त्याबरोबर रयतेचें हितही साधण्याची श्री० जोशी यांच्यावर जबाबदारी येऊन पडली आहे. ती ते कितपत पार पाडतात, यावरच त्यांचें अभिनंदन करावें कां न करावे ही गोष्ट अवलंबून आहे." (समर्थ, ३।१२।२८.)

कारभारीपदाची जागा न पत्करणें त्यांना अशक्य वाटलें असल्यास निदान दरबारला कांहीं अटी घालून तरी ती जागा पत्करण्याचें त्यांनीं करावयास पाहिजे होतें. चालू चळवळ ध्यानांत घेतां " कुन्हाडीचा दांडा गोतास काळ " असेंही होण्याची पाळी न जाणो आपल्यावर आणिली जाईल ही साधी गोष्ट तरी त्यांच्या ध्यानांत यावयास नको होती काय ? निदान " माझें प्रामाणिक मत '४० टक्के व सुधारणा' असें असल्यामुळें मी माझ्या कारकीर्दीत त्यापेक्षां रयतांवर अधिक सारा लादण्यास तयार नाहीं " ही वृत्ति तरी त्यांच्याकडून अढळपणें राखिली जावयास पाहिजे होती. परंतु त्यांच्याकडून कोणत्याच प्रकारें दृढपणा व आपल्या स्वतःच्या मताचीही श्रद्धा सिद्ध केली गेली नाहीं. त्यांनीं रयतांकडे ज्या आपलेपणानें पाहिलें तें आमच्या डोळ्यांसमोर नाहीं असें नाहीं. तें रयत किंवा रयतेचे पुढारी विसरूं शकत नाहींत. पण या त्यांच्यासारख्या मनुष्याकडून अपेक्षा याहून कितीतरी अधिक केली गेली होती.

सारावाढीच्या प्रकरणांतून दरबार एकदां मुक्त झाल्यानंतर श्री० जोशी यांच्या सल्लामसलतीला काय किंमत दिली जाईल याची जाणीव किंवा कल्पना संस्थानी कारभाराची माहिती असलेल्या कोणाही मनुष्यास सहज करितां येईल.

श्री० बाबूराव जोशी हे एका अर्थी दरबारचे जरी सल्लागार असले तरी पुढें त्यांच्या सल्ल्याचा रयतांच्या दृष्टीनें फारसा उपयोग होईल असें वाटत नाहीं. एका सभेमध्यें श्री० न. चिं. केळकर व लोकमान्य टिळक या दोघांनीं 'सल्लागार' या शब्दावर कोटी केलेली आम्हांला या ठिकाणीं आठवल्याशिवाय राहात नाहीं. 'ज्यांचा सल्ला गरगर फिरतो ते 'सल्लागार' असें दे० भ० तात्यासाहेब म्हणाले; परंतु ही कोटी थोडी सुधारून 'ज्यांचा सल्ला गार पडतो ते सल्लागार' अशी व्याख्या लोकमान्यांनीं सांगून मोठा सुंदर विनोद एका ठिकाणीं केला होता. आमच्या लिहिण्याचा उद्देश हा आहे कीं, यांपैकीं कोठल्यातरी एका व्याख्येंत रा० ब० जोशी यांना यापुढें सल्लागार म्हणून बसावें लागण्याचा बराचसा संभव आहे. असो. श्री० जोशी हे रा० ब० झाल्यानंतर **रयतांनीं काय केलें** या मुद्द्याचा आपण विचार करूं रयतांनीं त्यांना एक पत्र पाठविलें तें खालीलप्रमाणें होतें:—

श्री

रा० ब० बाबूराव जोशी कारभारीसाहेब यांनाः—

कृ. शि. सा. न. वि. वि.—

"आपण आमच्यापैकींच म्हणजे मिरज संस्थानचेच एक रयत असून कारभारी-पदावर आपली नेमणूक झाली याबद्दल आम्हांस आनंद होत आहे व आम्ही आपलें मनःपूर्वक अभिनंदन करितों. सारावाढीचा प्रश्न आपल्यापुढें प्रामुख्यानें उभा आहे. आपण अधिकाराच्या जागेवर आल्यामुळें आम्हांस पुन्हा थोडी आशा उत्पन्न झाली आहे. आपल्यामार्फत श्रीमंतांपाशीं आमची दाद लावून घेण्याचा हाही एक मार्ग आहे. प्रजापरिषद् होईपर्यंत या सारावाढीच्या चळवळीमध्यें आपण-ही काम केलेलें आहे. आमचें दारिद्र्य व कर्जबाजारी स्थिति आपल्याला माहीत आहे. आमचीं शेतें व घरेंदारें आपण येऊन पाहा व पूर्वीचा सारा देतांनाच आमची कशी फजिती होते याचा विचार करा. श्रीमंतांच्यापुढें आमची करुण-कहाणी मांडा. आमच्या पोटावर मारूं नका. शिक्षणानें आपल्या अंतःकरणावर जे स्वातंत्र्याचे व नीतीचे ठसे उमटले असतील त्यांची प्रतीति आज जनतेला आणून द्या. आमच्यामध्यें बिलकूल त्राण उरलेला नाहीं, ही गोष्ट आज आम्हीं कोणापुढें सांगावी? आपण तरी आमच्या पोराबाळांचा दुवा घ्या. या सारावाढीचा अन्याय पाहून आमचीं अंतःकरणें तळमळूं लागलीं आहेत. तो हंबरडा आपल्या कानावर जात नाहीं काय? रयत आज आपलेपणानें आपल्यापुढें लोटांगण घालीत आहे.

आपल्या हातून चांगलें कांहीं होत नसेल तर निदान वाइटाचे धनी तरी आपण होऊं नका. रयतांच्या पोटावर लाथ मारून हो अन्याय्य सारा वसूल करण्याकरितां दडपशाही करण्याचा पाळी आपल्यावर येईल त्यावेळीं आपण त्यापेक्षां अधिकारपदावरच पाणी सोडाल अशी आम्हां सर्वांस उमेद आहे.

आपले

"गरीब व असहाय रयत."

'समर्थां'ला जरी रा० ब० जोशी यांचें अभिनंदन करण्यांत शंका वाटली तरी पण रयतांनीं वरील पत्रकांत त्यांचें अभिनंदन कां केलें आहे हें स्पष्ट करणें जरूर आहे. पूर्वीचे कारभारी रा० ब० ठाणेदार यांना लोक एका अर्थीं कंटाळले होते. जरी रा० ब० बाबूराव यांना जॉइन्ट कारभारी म्हणून नेमिलें होतें तरी रा० ब० ठाणेदारांकडील सर्व अधिकार काढून ते यांना दिले होते. त्यांना श्रीमंतांनीं त्यांच्या नेमणुकीचा जो हुकूम दिला आहे त्यांत तसें स्पष्ट लिहिल्याचें समजतें. पुढचे येणारे अधिकारी कसे निघतील तें पुढें पहातां येईल. पण आज खांदावदल होतांना जितका विसांवा मिळतो तितका तरी लोकांना मिळाला व त्याचकरितां रा० ब० बाबूराव यांचें रयतांनीं अभिनंदन केलें आहे. त्या पत्रकांत रयतांनीं त्यांना सूचनात्मक भाषेनें व दूरान्वयानें आपल्या अनेक भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यांतील रयतांची तळमळ पाहून मनाला दुःख होतें. यापेक्षां आम्ही अधिक कांहींच लिहूं इच्छीत नाहीं.

या पत्रकावर पुढीलप्रमाणें सह्या केल्या होत्याः—

१ सावळी ६५; २ तानंग १३१; ३ मळणगांव ११०; ४ करोली १२२; ५ पाटणांव ७२; ६ ढवळी ९१; ७ मालगांव ५११; ८ सिद्देवाडी ९०; ९ कवठे-पिराण २९६; १० ढालगांव ३६; ११ ढालेवाडी २४; १२ निमज २२, १३ घोरपडी—शिंद्याची वाडी ३४; एकंदर मिळून १५७३ पेक्षां अधिक सह्या झालेल्या होत्या.

परंतु रा० ब० जोशी यांच्या मनावर या पत्रकाचा कांहींच परिणाम न होतां ते आपल्या कामाला लागले. आपलें ४० टक्क्यांचे ग्रामाणिक मतही बाजूला ठेवून त्यांनीं भर सारावाढ वसूल करण्याकरितां तरम जाहीर करण्यास सुरुवात केली ते दडपशाही करतील तर "आतां '४०' टक्के व सुधारणा' याकरितां दडपशाही होईल. श्री० मोडक यांचा रिपोर्ट तरी आतां जाणार." असें रयतांना वाटत होतें.

पण दैवदुर्विपाक असा आहे कीं, "लोक ४०. टक्के मानीत नाहींत. आणि दडपशाही जर करावीच लागणार; तर मग ४० टक्के काय म्हणून ? ५६ टक्के चोपून वसूल करूं" अशा भावनेनें ते तरम आकार जाहीर करण्यास घरांतून किंवा कचेरींतून म्हणा बाहेर पडले. लोकांना त्याचें आश्चर्य वाटलें. रयत व रयतांचे पुढारी यांच्यामध्यें 'पुढें काय ?' याविषयीं वाटाघाट होऊन या कारभाऱ्यांच्या आगमनावर बहिष्कार घालावयाचें ठरलें. त्यांच्या आगमनाच्या वेळीं सर्व रयतांनीं गांव ओसाड पाडावयाचें व एका मनुष्यानें एक कागद त्यांच्या हातांत देऊन आपण कां बहिष्कार घातला आहे; हें त्यांना लेखी कळवावयाचें अशी योजना ठरविण्यांत आली. ती 'रयतांची नम्र विनंति' खालीलप्रमाणें आहे:—

रयतेची नम्र विनंति.

"मे० रा० ब० कारभारीसाहेब, इलाखा मिरज, यांना:—

क्रु. सा. न. वि. वि.

"श्रीमंत सरकार बाळासाहेब यांनीं ता. ४ नोव्हेंबर सन १९२८ इ० रोजीं दिलेल्या जाहीर अभिवचनाप्रमाणें चौकशीचें काम रीतसर पूर्ण होऊन नंतरच आकारबंद प्रसिद्ध व्हावयाचे होते. परंतु चौकशी न होतांच आकारबद प्रसिद्ध केले जात आहेत ही गोष्ट अत्यंत अन्याय्य आहे. सबब आमचा निषेध व्यक्त करण्याकरितां आज आम्ही.....गांवचे सर्व रयत गैरहजर रहात आहोंत. पूर्वी श्रीमंतांनीं दिलेल्या जाहीर वचनाप्रमाणे रीतसर चौकशी करावी व नंतर आकारबंद प्रसिद्ध करावेत एवढीच आमची विनंति आहे. कळावें.

तारीख माहे सन १९२८.

आपले

गांवच्या रयतेचे प्रतिनिधी."

रा० ब० कारभारीसाहेब यांच्या आगमनावर वरील पत्रकानुसार बहिष्कार कसा टाकावयाचा हे रयतांना समजावून सांगण्याकरितां चळवळीचे पुढारी सर्व गांवांतून फिरून आले. त्यांचा दौरा सर्व खेड्यांतून आगाऊच संपला असल्यामुळें, आतां तरम जाहीर करण्यास रा० ब० जोशी कोणकोणत्या गांवीं व कधीं जाणार आहेत हें पाहण्याचें कारणच फारसें राहिलें नव्हतें. श्री० बाबूराव जोशी ज्या ज्या गांवीं गेले त्या त्या गांवीं रयतांनीं त्यांच्या आगमनावर बहिष्कार टाकण्याचा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणें पार पाडला यांत शंका नाहीं. रयतांनीं रा०

च० जोशांना पाठविलेलें पत्र व हा त्यांच्या आगमनावरील बहिष्कार यांचा वर्तमानपत्रांत बराच गवगवा झाला. 'इंडियन डेली मेल' (१३।१२।२८), 'टाईम्स' (१३।१२।२८), 'संस्थानी स्वराज्य' (१४।१२।२८), व इतर अनेक इंग्रजी-मराठी पत्रांतून हे दोन्ही कागद प्रसिद्ध झाले होते आणि त्यामुळेंच कीं काय, रा० ब० कारभारीसाहेब यांनीं ता. १३ रोजीं 'टाईम्स'च्या बातमीदारास आपली मुलाखत देऊन खालील मजकूर प्रसिद्ध करविला. त्यांत त्यांनीं " चारपांच खेडेगांवांत मात्र वाढत्या शेतसाऱ्याबद्दल निषेध व्यक्त करण्यांत आला " असें कबूल केलें आहे. " फेरचौकशी होणार नाहीं व झालेला तरम कायमच राहाणार " अशा आशयाचा मजकूरही त्यांनीं आपल्या मुलाखतींतून प्रसिद्ध करविण्यास मागें-पुढें पाहिलें नाहीं हें आश्चर्य आहे ! रा० ब० जोशी हे एकंदर १४ गांवांतून तरम आकार जाहीर करण्यास गेले होते. त्यांत कवठेपिराण व मालगांव ह्या दोन्ही गांवांना त्यांनीं विचारपूर्वक, अर्थात् त्या ठिकाणचा चळवळीचा जोम पाहूनच प्रथम जाण्याचें टाळलें होतें. बाकीच्या ज्या ज्या गांवांना ते गेले तेथें तेथें चळवळीस तीव्र स्वरूप येत असलेलें त्यांना पाहावयास मिळालें. त्याचा परिणाम त्यांच्या मनावर अगदींच झाला नसेल असें नाहीं.

रा० ब० बाबूराव जोशी यांच्या या अनपेक्षित व विचित्र वर्तणुकीमुळें रयतांमध्यें त्यांच्याविषयीं भलतेसलते गैरसमज व शंका उत्पन्न होऊं व पसरूं लागल्या ! चळवळीच्या पुढाऱ्यांनीं आपली चळवळ शुद्ध व सत्य राखण्याकरितां त्यांच्याविषयींची खरी वस्तुस्थिति रयतांपुढें विशद करून गैरसमज दूर करण्याची मनापासून खटपट केली आहे.

रयतांची चळवळ मरावी अशी रा० ब० जोशांची इच्छा असणें शक्य नाहीं, हें जरी कदाचित् खरें असलें तरी त्यांनीं कारभारीपद स्वीकारण्यानें चळवळीस चांगलाच धक्का बसला यांत मात्र मुळींच शंका नाहीं. गांवामध्यें त्यांच्या 'गोडबोले' स्वभावामुळें ते थोडे लोकप्रिय होते. त्यांचे स्नेही बरेच आहेत. त्या सर्वांमध्यें तडजोड व्हावी अशी बुद्धि उत्पन्न झाली. आपल्या बाबूरावांच्या कारभारीपणाच्या कारकीर्दीच्या सुरवातीस तरी कांहीं अनिष्ट घडूं नये असें वाटणारे त्यांच्या मित्रमंडळींमध्यें पुष्कळच होते व हें अगदीं साहजिक होतें. एका बाजूला रयतांचा जय व्हावा असें वाटत असलें तरी दुसऱ्या बाजूला रा० ब० जोशांची कारकीर्द यशस्वी व्हावी असें इच्छिणारे लोक मिरज गांवांत दिसूं लागले. रा० ब० बाबूराव

कारभारीपदावर आरूढ होण्यापूर्वी, बाबूरावांचे कांहीं स्थानिक मित्र, चळवळीकडे ज्या दृष्टीनें पहात होते, ती त्यांची दृष्टि पुढें बदलली ! बाबूराव स्नेही व ते आतां कारभारी झाले म्हणून, रयतांच्या पदरांत थोडें कमी यश पडून कां होईना, बाबूरावांच्या कारकीर्दीची सुरुवात चांगल्या प्रकारें व्हावी अशी बुद्धि स्थानिक मित्रमंडळीमध्यें उत्पन्न झाली ! रयतांच्या चळवळीस पूर्ण यश लाभावें हें जें सर्वांच्या मनोवृत्तीचें केंद्रीकरण झालें होतें तें या नवीन उत्पन्न झालेल्या बुद्धीमुळें विभागलें गेलें ! आणि या विभागलेल्या बुद्धीस अनुसरून बाबूरावांचे स्नेही म्हणविणारे लोक तशी जोराची खटपट करूं लागले ! श्री० बाबूराव जोशी कारभारी झाल्यानें त्यांच्या स्नेह्यांच्या ह्या नवीन मनोवृत्तीनें चळवळीस पुढें फार मोठा धक्का बसला ही गोष्ट. लपविण्यांत अर्थ नाहीं ! असो.

सरकारांनीं रा० ब० बाबूराव जोशी यांना कारभारीपद देण्याचा डाव टाकला त्या डावाकरितां आपणच आपल्या हातानें ज्यांना कारभारी केलें होतें त्यांना खालीं ओढावें लागले. ही कारभारीपदाची माला फेंकून चळवळीचा संबंध वृक्ष आमूलाग्र उलथून पाडण्याचा विचार जरी अधिकाऱ्यांचा असला तरी त्यांत त्यांना यश आलें नाहीं. पण अशाप्रकारें चळवळरूपी वृक्ष जरी अढळ व कायम राहिला तरी त्या वृक्षाला अत्यत प्रेमानें चिकटून असलेली लता मात्र या कारभारीपदरूपी मालेने चळवळीपासून एका व जूला फेंकली गेली ! मिळविलेलें नांव घालविणें, आर्थिक नुकसान सोसणें, स्वतंत्रता गमावून गुलामगिरीचा स्वीकार करणें आणि वेळोवेळीं रयतांना असंतुष्ट करीत राहाणें या गोष्टी आपले अंतःकरण व प्रामाणिक मतें अनेक वेळां एका बाजूस सारून करीत त्यांना दिवस काढावे लागणार हें दृश्य आमच्या ज्ञानचक्षूपुढें आलें म्हणजे मनाला वाईट वाटतें. त्यांतल्या त्यांत अधिकाराच्या जागेवर गेल्यानंतर, ज्या इज्जतीच्या व सोवळेपणांच्या कल्पना येऊन मनुष्य स्वतःला इतरांपेक्षां भिन्न व कांहींतरी अधिक समजूं लागतो, तेवढ्या गुणाची जर त्यांत भर पडेल तर मात्र खरोखरच त्यापेक्षां दुसरी कोणतीही स्थिति अधिक बरी असें म्हणण्याची पाळी येईल आणि रयतांना 'अमृतं वा विषमीश्वरेच्छया भवेत्' असेंच म्हणत बसावें लागेल !!

प्रकरण दहावें

करबंदीची सिद्धता

'शत्रूस्य कथा रम्या' या न्यायानें करबंदी बोलावयास सोपी असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ती फारच कठिण आहे. महात्मा गांधींच्या असहकारितेची शेवटची पायरी म्हणजे करबंदी हीच होय. असहकारितेच्या चळवळीपासून पुढारी व जनता करबंदीचा उच्चार करूं लागले. परंतु असहकारितेच्या त्या चळवळींत देखील देशाला करबंदीपर्यंत मजल मारतां आली नाहीं. पण लोक करबंदीच्या वल्गना सर्रास करूं लागले. त्याचा देखील परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. पुढें बार्डोलीमध्यें जेव्हां सारावाढ सरकारनें केली त्यावेळीं या करबंदीच्या अस्त्राचा उपयोग करून पाहाण्याचें गुजराथनें ठरविलें. अर्थात् सर्व हिंदुस्थानचें लक्ष त्याकडे लागलें. या करबंदीच्या प्रयोगाचा मासला एकदां सरकारासही कोठें तरी पाहावयाचा होताच. असो. बार्डोलीचा सबंध इतिहास सांगून या ठिकाणीं जागा अडवीत नाहीं. बार्डोलीच्या लढ्यानें करबंदीची शक्यता सिद्ध झाली एवढेच नव्हे तर शेतकरी वर्ग हें शस्त्र चांगलें वापरूं शकतो ही गोष्ट हिंदुस्थानांतील सर्व रयतांना स्पष्टपणें दिसून आली. ज्या ज्या ठिकाणीं गेल्या दोन वर्षांत सारावाढ झाली त्या त्या ठिकाणच्या पुढाऱ्यांकडून व रयतांकडून सभांतून व लेखांतून बार्डोलीचें ध्येय आपल्या डोळ्यांपुढें असल्याचा उल्लेख मधून मधून झाला आहे. अर्थात् या उल्लेखामुळेच पुन्हा करबंदीची शक्यता सामान्यतः सर्व ठिकाणीं कितपत संभवनीय आहे याची चर्चा सुरू झाली. गुजराथसारखा सधन प्रांत पाहिजे; महात्मा गांधींसारखा पुढारी त्या चळवळीकडे आशीर्वादपूर्ण दृष्टीनें पाहात असला पाहिजे. सरदार वल्लभभाईसारखा पुढारी प्रत्यक्ष रणांगणावर हजर पाहिजे; अनेक प्रांतांकडून पैशाने साह्य मिळालें पाहिजे; स्वयंसेवकदल अत्यंत शिस्तीचें, करारी व सत्याग्रहार्ची तत्त्वें पटलेले पाहिजे; आणि असें असल्यानंतर मग त्या कार्यांत यश येणें शक्य आहे. नाहींतर 'प्रगट होवोनी नासावें' हें चांगलें नाहीं असें वातावरण देशांत उत्पन्न झालें. मोर नाचतो म्हणून लांडोरीनें नाचावें हें शक्य नाहीं, असेंच कोणास झालें तरी वाटणार. बार्डोलीनंतर या सारावाढीच्या विरुद्ध ज्या चारपांच ठिकाणीं थोड्याफार प्रमाणांत चळवळी झाल्या व चालू आहेत त्यांपैकींच मिरज संस्थान येथील एक चळवळ होय.

अगोदर मिरज हें संस्थान, त्यांत शेतकरीवर्ग अत्यंत अशिक्षित व विशेष दरिद्री ! अशा स्थितींत करबंदीपर्यंत शेतकऱ्यांमध्यें जागृति उत्पन्न होईल अशी कोणासही कल्पना नव्हती; परंतु टीचभर पोटासारखा उत्तम शिक्षक नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. सुदैवानें शेतकरी वर्गांत जागृति उत्पन्न होऊं लागली. करबंदीची सिद्धता होण्यास ईश्वराचें साह्य होतें ही गोष्ट अनेक दृष्टान्त देऊन नास्तिकाला-देखील पटवून देतां येईल असे प्रसंग या चळवळींत किती तरी आले आहेत. न जाणो, कदाचित् आपल्याला करबंदीपर्यंत मजल मारावी लागेल याची जाणीव चळवळीचे खरे पुढारी बाळकृष्ण विठ्ठल शिखरे यांना प्रथमपासूनच होती व त्या दृष्टीनेंच त्यांच्या हालचाली चाललेल्या होत्या. प्रजापरिषदेच्या शिष्टमंडळाला श्रीमंत सर बाळासाहेब यांनीं फेटाळून लाविलें तेव्हांपासून करबंदी करावी लागणार अशी मनाशीं खूणगांठ बांधूनच चळवळीचे पुढारी बोलूं व लिहूं लागले. मिरजेच्या रयतांमध्यें जागृति उत्पन्न होणार नाहीं या घमेंडींतच अधिकारीवर्ग व श्रीमंत आपले दिवस घालवीत होते. करबंदी करावी लागल्यास काय काय संकटें सोसावीं लागतील याचा पाढा वाचण्यास पुढाऱ्यांनीं गांवोगांव सुरुवात केली होती तरी 'संस्थान त्या थराला गोष्टी नेऊं देणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे किंवा आपल्याला संकटांत उडी घालण्याचा प्रसंग येऊं नये अशी आम्ही शक्य ती सर्व काळजी घेत आहों व खटपट करीत आहों आणि आमच्या प्रयत्नाला यश आलेंच नाहीं तर मात्र, मग आपण सर्व मिळून विचार करून पुढें काय तें ठरवूं' असेंच पुढारी लोकांना सांगत असत. मिरज संस्थानच्या रयतांवर करबंदीचा प्रसंग येऊं नये हाच विचार धरणें धरण्याच्या सत्याग्रहाच्या बुडाशीं होता. पण रयतांचे सर्व प्रयत्न थकल्यानंतर करबंदीशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें. करबंदी होऊं नये या बुद्धीनें पुढाऱ्यांनीं जे जे प्रयत्न केले त्यांपासून अधिकारी किंवा श्रीमंत यांनीं कांहींच बोध न घेतल्यामुळें पुढाऱ्यांचे ते सर्व प्रयत्न म्हणजे रयतांच्या करबंदीचा आधार व पूर्वतयारीच होऊन बसले. अर्ज करणें, श्रीमंतांना गांवोगांवच्या सर्व लोकांनीं भेटावयास जाणें, श्री० मोडक यांच्या रिपोर्टींतील चुका वर्तमानपत्रांत लेख लिहून उघड करणें, परिषद् भरविणें, परिषदेचें शिष्टमंडळ श्रीमंतांकडे पाठविणें, शिष्टमंडळांत बाहेरच्या व मोठमोठे नामांकित गृहस्थांचा मुद्दाम समावेश करणें, ता. ४।११।२८ रोजीं पहिला सत्याग्रह करणें, श्रीमंतांचें वचन मिळतांच घरोघर परत जाणें, श्रीमंतांनां कोणातरी अदूरदर्शी,

पोरकट मनुष्याच्या सांगण्यामुळें आपलें वचन मोडल्यानंतर पुन्हा सत्याग्रहास जमणें, सत्याग्रहांत सहा दिवस शांतपणें वर्तन राखणें, आपल्यावर बजावलेल्या नोटिसा दडपशाहीच्या व जुलुमाच्या असल्या तरी त्या निमूटपणें मानणें, या गोष्टी म्हणजे करबंदीकडे जाण्याची एक एक पायरीच होऊन बसली. लोक निराश होऊन अधिकाधिक चिडूं लागले व आपापसांत एकी करूं लागले. सत्याग्रह उठवून रयत आपल्या घरीं गेल्यानंतर, सत्याग्रहाचे पुढाऱ्यांपैकीं एक श्री० पुंडलीकजी यांनीं 'टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतींत करबंदीची चळवळ आपण करणार व ती यशस्वी होणार असल्याचें प्रथम जाहीर केलें. आपल्या मुलाखतींत ते म्हणतात कीं:—

"Mr. Pundlik finally assured his interviewer, that if the promised inquiry was not instituted, the rayats would not pay the taxes."

आणि तेव्हांपासून त्यांनीं त्या दृष्टीनें लोकांमध्यें वावरण्यास सुरवात केली. श्री० शिखरे वगैरे मंडळींनीं प्रथमपासून जें कार्य करून पाया घातला होता त्यावरच करबंदीची खरी उभारणी होऊं शकली यांत आम्हांस शंका वाटत नाहीं. करबंदीची तयारी करण्याच्या हेतूनें सत्याग्रहाचे इतर पुढारी जरी गांवोगांव हिंडले असले आणि लोकांच्या नजरेपुढें जरी प्रामुख्यानें आले असले तरी वडील माणसांच्या खांद्यावर बसून लहान मूल ज्याप्रमाणें त्यांच्याहीपेक्षां अधिक उंच दिसतें तशांतलाच हा प्रकार झाला आहे आणि ही गोष्ट सर्व लोक सारखीच कबूल करतात हा त्यांतील आनंद मानण्यासारखा विशेष आहे. असो. आतां करबंदीची तयारी करण्याकरितां रयतांना कोणते विचार सांगितले जात होते त्याचा थोडासा येथें उल्लेख करूं.

सत्याग्रह उठविल्यानंतर श्री० पुंडलीकजी हे प्रथम कवठेपिराण येथें गेले होते. तेथील आपल्या व्याख्यानांत ते म्हणालेः—

"आपल्या गांवानें पूर्वी चळवळी केलेल्या आहेत. आपलें गांव अडाणी नाहीं. सत्याग्रहांतही आपण फार चांगलें व जबाबदारीचें काम केलेलें आहे. साराबाढ कमी होणें किंवा न होणें हें आपल्या निश्चयावर अवलंबून आहे. स्वतःचें शीर धडापासून वेगळे झालें तरी तें वांकविणार नाहीं अशा निश्चयानें आपण लढायांची तयारी ठेविली पाहिजे. यांत लोकांना तेजस्वितेचें शिक्षण मिळत असतें.

मात्र शांतता हा या चळवळीचा आत्मा आहे. सत्याग्रही मनुष्यानें शांतता राखली पाहिजे. राग येणें मनुष्याला साहजिक आहे. आपल्यांतून राग नाहींसा करा असें माझें म्हणणें नाहीं. मात्र राग बाहेर पाडून निरुपयोगी बनवूं नका असें माझें सांगणें आहे. शांत व गंभीर व वागणुकीनें प्रतिपक्षी ताळ्यावर आणण्यास मदत होत असते. लोकांच्या संतोषावर राज्य अवलंबून असतें ही गोष्ट सारावाढीच्या चळवळीपासून हे संस्थानिक शिकले तर फार चांगले होईल. या सर्व गोष्टी आपल्या गांवच्या एकीवर व निश्चयावर होण्यासारख्या आहेत. आपण बेलभंडारा उचलून शपथा घेतल्या पाहिजेत. त्याशिवाय हीं कामे पार पडावयाचीं नाहींत. आज सर्व हिंदुस्थानचे डोळे आपल्या या चळवळीकडे लागलेले आहेत. बार्डोलीची रयत आपल्याकडे पाहात आहे. रयत ही चोहोंकडे एकच आहे. मग बार्डोलीनें कार्य पार पाडून दाखवावें व आपण मात्र मागें राहावें काय ! ही वेळ आतां लाभ अलाभ पाहात बसण्याची नाहीं.

"श्रीमंतांनीं आपल्या मुलाखतींत असत्याची कांस कशी धरली आहे हें आपण आतां पाहिलेंच आहे. सत्याग्रहाला ५०० लोकच जमले होते असे त्यांनीं सांगून टाकिलें आहे. इतक्या वृद्धपणीं खोटीं विधाने करण्याची पाळी श्रीमंतांना आली हें पाहून वाईट वाटते. आपल्या एकाच गांवच्या सत्याग्रहींची संख्या याच्या दुप्पट होती. आपण मात्र सत्याला सोडूं नका ! सत्यसंकल्पाचा दाता ईश्वर आहे. सदासर्वदा ईश्वर आपल्या सन्निधच उभा आहे. सर्वस्वाचा होम करण्यास तयार झालें म्हणजे देव आपल्यावर खूष झाल्याशिवाय कसा राहील ? आपण केलेली किमान मागणी केव्हांही सोडावयाची नाहीं. असा आपला निर्धार असूं द्या. पुढें होणारें नुकसान व येणाऱ्या आपत्ति उघड्या डोळ्यानें पाहून त्यांच्याशीं छातीठोकपणानें लढण्यास तयार झालें पाहिजे. आपल्या मुलाबाळांच्या पोटापाण्याची तरतूद करून ठेवावयाची असली तर ही सारावाढ रद्द करून घेतलीच पाहिजे. गांवामध्यें इतका समंजसपणा नोंदला पाहिजे कीं, सर्व गांवाच्या विरुद्ध जरी एकादा मनुष्य वागत असला तरी तो निर्भय व सुरक्षितपणें गांवांत वागूं व वावरूं शकला पाहिजे. दरबारच्या बाजूला आज सत्ता आहे तर आमच्या बाजूला सत्य आहे. दरबार आज लोभाविष्ट झालं असलें तर आमच्या हातांत त्यागवृत्ति किंवा असंगशास्त्र आहे." (ज्ञानप्रकाश, ता. ३०–११–२८.)

त्यानतर ता. १ डिसेंबर रोजीं श्री० पुंडलीकजी हे तानंगमध्यें गेले असतां तेथील आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं:—

" रयतेवर होत असलेला हा सारावाढीचा अन्याय दूर करण्याच्या पुण्यकार्यांकरितां आपण आपलें बलिदान करावें अशी बुद्धि आज प्रत्येकाच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली पाहिजे. सुशिक्षित म्हणविणाऱ्यांच्या अंतःकरणांत हा विषय उतरविणें थोडेंसें कठिण आहे. एकाच झपाट्यांत इतकी सारावाढ झाल्याचें उदाहरण सर्व देशांत कोठेंही मिळणार नाहीं.....पण रयत अज्ञान आहे या गोष्टीचा फायदा घेऊन हा अन्याय असाच चालू राखावयाचा, कोणासही वर डोकें करूं द्यावयाचें नाहीं असें सरकारचें धोरण दिसतें. या सारावाढीच्या जुवाखालीं मुंडी वांकवाल तर एकदां तें जूं कायमचें तुमच्या मानेवर बसेल याचा विचार करा. आपल्या मुलाबाळांचा दुवा घेण्याची ही वेळ आहे. सारावाढीच्या खाईंत पडून पुढें आपलीं मुलेंबाळें हेारपळणार आहेत ही गोष्ट दृष्टिआड करणें आपले कर्तव्य नव्हे. रयत नादान आहे असें एकदां सरकारला वाटलें तर 'काळ सोकावतो' हें विसरूं नका. आपल्या सर्वांच्या विचाराला जी गोष्ट पसंत पडेल तीच करा. यांत पुढेंमागें आपलें नुकसान झाल्यास कोणीं कोणाला दोष देण्याचें कारण नाहीं. जाणून बुजून उघड्या डोळ्यांनीं आपण या होमामध्यें आहुती देत आहों याची चांगली जाणीव असूं द्यावी. आपल्याला फसविण्याचे किंवा भुलविण्याचे अनेक उपाय प्रतिपक्षाकडून योजले जाण्याचा संभव आहे. त्या सर्वांतून आपण आपला मार्ग आक्रमून ध्येय गांठण्याची शिकस्त केली पाहिजे व शेवटीं यशाबद्दल ईश्वरावर हवाला टाकून आपलें कर्तव्य अव्याहत बजावीत राहिलें पाहिजे."

(ज्ञानप्रकाश, ता. ४।१२।२८.)

ता. ७।१२।२८ रोजीं श्री० पुंडलीकजी व बोधलेबुवा मिळून करोलीस गेले होते. तेथील भाषणांत श्री० पुंडलीकजी म्हणाले:—

" आपण ही सारावाढीविरुद्ध चालविलेली चळवळ आपल्या स्वतःच्या मतानें करीत आहां ही गोष्ट अधिकाऱ्यांना व श्रीमंतांना अद्यापि पटलेली नाहीं. मीं किंवा आमच्यासारखी इतर मंडळी आपल्याला कांहींतरी सांगतात व आपल्याला भलत्या मार्गाला लावितात असें त्यांना वाटत आहे. माझ्या मतें तसा ते बहाणा करीत आहेत. जर माझ्या सांगण्यानें आपण या चळवळींत भाग घेत असाल तर त्यांत आपल्याला यश येईल असें मला वाटत नाहीं. हा लढा आतां विकोपाला जात चालला आहे असें मला वाटतें. आपल्याला भोगावीं लागणारीं संकटें व सोसावें लागणारें नुकसान यांचा विचार करा व उघड्या डोळ्यानें त्या

चळवळींत आपल्या सर्वस्वाची होळी करून घेण्यास राजी व्हा.....आपल्या-मध्यें फूट पाडण्याचा प्रयत्न यापुढें होईल. आपल्याला भीति दाखविण्याचा प्रयत्न प्रतिपक्षाकडून केला जाईल. वाटेल त्या कंड्या आपल्या पुढाऱ्यांविषयीं उठविल्या जातील. आपल्या पुढाऱ्यांना तुरुंगांत डांबून ठेविलें जाईल. आपण या सर्वांना तोंड देण्यास तयार असलें पाहिजे.....शिकलेले लोक आपल्याकरितां स्वार्थत्याग करण्यास तयार होतील ही आशा बाळगूं नका. आपल्याच पैशांवर श्रीमंत झालेले सावकार आपल्या उपयोगीं पडतील असा विश्वास बाळगूं नका. आपल्याच पैशानें गबर झालेले व्यापारी आपल्याबरोबर मरावयास तयार होतील अशी कल्पना करूं नका. परंतु या सर्व लोकांच्या अंतःकरणांत आपल्याविषयीं व आपल्या या चळवळीविषयीं प्रेम व आदर आहे ही मात्र खूणगांठ बांधा. त्या सर्व लोकांविषयीं आपणही आपल्या मनांत प्रेम बाळगा. कोणाचाही द्वेष करूं नका. कोणालाही दुखवूं नका. शांतपणानें वागा व या संस्थानिकांच्या आणि अधिकाऱ्यांच्या दडपशाही-रूपी अग्नींत आपल्या सर्वस्वाचें वाटोळें करून घ्या म्हणजे आपल्या चळवळीला यश येईल. आपल्यामध्यें असलेल्या ईश्वरावर माझा पुरा विश्वास आणि श्रद्धा आहे.....मागील जुनीं भांडणें आपण विसरलीं पाहिजेत."

(ज्ञानप्रकाश, १४।१२।२८.)

शनिवार, ता. ८।१२।२८ रोजीं रात्रीं चळवळीचे पुढारी मालगांवास गेले होते. मालगांवांतील लोकांनीं दोन वर्षांपूर्वी आपल्यांतील एकी व दृढता, अधिकाऱ्यांच्या परिचयाची करून दिली होती. करबंदीच्या तयारींत हा गांव सर्वांत पुढें जाणार कीं कवठेपिराण आघाडी मारणार इकडे लोकांचें लक्ष लागलेलें होतें. त्या गांवांत व्याख्यानास ४००।५०० लोक जमलेले होते. त्यावेळीं चर्चेमध्यें श्री० पुंडलीकजी म्हणालेः—

"येऊं नये तो प्रसंग येणार असें दिसत आहे. मिरजेचे चीफसाहेब जें करणार नाहींत असें आपल्या सर्वांना वाटत होतें, तें आतां त्यांच्या हातून घडून येणार अशीं चिन्हें दिसत आहेत. संकटांशीं टक्कर देण्याकरितां आतां आपल्याला कंबर बांधली पाहिजे. आपल्यापुढें भयंकर संकटांचे व दुःखांचे डोंगर उभे आहेत. परंतु ते परिश्रमपूर्वक चढून पार गेल्याशिवाय आतां आपल्याला गत्यंतर नाहीं. आपली मागणी अगदीं साधी व न्याय्य आहे, आणि ती तशीच ठेवा.

वयाची आहे. शक्य तितका प्रयत्न करून तडजोड घडवून आणावयाचा प्रयत्न केला जात आहेच. आपलें अंतःकरण केव्हांही तडजोड करण्यास राजी ठेवा. समंजसपणा राखणें व हट्टास न पेटणें, या दोन गोष्टींतच आपला विजय आहे. आपली मागणी न्याय्य आहे असेंच कोणाही तिऱ्हाइतास वाटलें पाहिजे अशी काळजी घ्यावी.

विनय व शांतपणा केव्हांहीं व कोणत्याही उत्तरांत कायम ठेवा, एवढेंच माझें सांगणें आहे. ही राजकीय चळवळ नव्हे. हा आपल्या पोटापाण्याचा प्रश्न आहे. आणि त्या दृष्टीनेंच आपण त्याकडे पाहिले पाहिजे. यापेक्षां या झगड्यामध्यें अनावश्यक गोष्टींची भेसळ करण्यांत बिलकूल दूरदर्शीपणा नाहीं. हट्टाला दरबार पट्टं पहात आहे. पण यांत दरबारचे हात किती लांब आहेत त्याची जाणीव गरीब रयतेला झाली तर त्याबरोबरच दरबारचे कान किती लांब आहेत हें मात्र सर्व जगाला कळून येईल ! यावेळीं आपल्या दरबारला या कचाटींतून वचावून नेणें हेंही आपलेंच काम आहे. चौकशी न करितां आकारबंद जाहीर करणें म्हणजे **"आधीं फांशी मग चौकशी"** अशांतलाच हा प्रकार होईल. मिरज दरबार महाराष्ट्रांत गाजणार यांत आतां शंका नाहीं. अत्यंत शिस्तीनें, शांतपणानें व चिकाटीनें सर्व मिळून राहाल, तर अशा परिस्थितींतूनही आपला बचाव होईल. ईश्वरावर भरंवसा ठेवा, व येईल त्या सकटांना धीमेपणानें तोंड द्या एवढेंच मला सुचवावयाचें आहे." (ज्ञानप्रकाश, ता. १२।१२।२८.)

असो. सर्व खेड्यांतून अशा प्रकारें रयतेला माहिती करून देत चळवळीचे पुढारी सारखे फिरत होते. ता. २०।११।२८ रोजीं सत्याग्रह उठविल्यापासून तों ता. १६।१२।२८ पर्यंत म्हणजे सुमारें एक महिना जो प्रचार व मतसंघटना झाली त्यावेळीं लोकांना करबंदीची व त्यांतील संकटांची खरी कल्पना आली. आपल्यावर नोटिसा निघतील, जप्त्या होतील, आपल्या जमिनी व घरांतील सामानसुमान लिलांव होईल, आपल्यामध्ये फूट पाडिली जाईल, आपल्या जमिनी शेरींत सामील देखील केल्या जातील आणि इतकें करूनही शेवटीं आपल्याला खात्रीनें यश मिळेल असें निश्चित सांगतां येत नाहीं. इतक्या गोष्टी पुढाऱ्यांनीं रयतांना स्पष्ट सांगितल्या तरी रयत न डगमगतां पूर्ण धीर धरून राहिले, आपल्या मार्गावरून कोणीही एक तसूभरही मागें हटला नाहीं; किंबहुना सर्व गोष्टींविरुद्ध धीटपणानें टक्कर द्यावयाची असें रयतांनीं आपल्यांत विचार करून

ठरविलें होतें. प्रत्येक गांवांत रोज रात्रीं लोकांचीं जेवणें झाल्यानंतर ते एकत्रित बसून विचार करीत होते. हें सर्व सहन करण्याची शक्ति, एक शांततावृत्ति धारण करण्यामध्यें उत्पन्न होईल हा महत्त्वाचा मुद्दा त्यांना पटवून देण्याची खटपट सारखी चाललेली होती. प्रत्येक गांवांत व्याख्यानाच्या शेवटीं तास दोन तास या अहिंसेवर वादविवाद होत असे.

सरकारतर्फे पंच होणाऱ्यांना, लिलांव घेणाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना आपल्या गांवांत ते आल्यास थोडेंसें उग्र स्वरूप दाखवावयास काय हरकत आहे, असा कोणी सवाल चर्चेकरितां पुढें आणल्यास त्याला पुढाऱ्यांकडून मिळालेली उत्तरें लोक अत्यंत मन लावून ऐकत असत व सर्व बाजू समजून घेत असत. लोक शांतवृत्तीनें राहाण्याच्या वगैरे शपथा घेऊं लागले. 'शांतपणा लोक सोडतील तर चळवळ एकदम मरेल व पुढारी त्यामुळें चळवळ एकदम सोडून देतील आणि मग त्याकरितां त्यांना दोष देतां यावयाचा नाहीं'. ही गोष्ट पुढाऱ्यांनीं अनेकवेळां स्पष्टपणें लोकांपुढें मांडली होती व लोकांनींही ती समजून घेतली होती. पुढाऱ्यांनीं लोकांना हेंही समजावून दिलें होतें कीं, शांतता म्हणजे या ठिकाणीं कांहीं धार्मिक अहिंसेचा प्रश्न नाहीं; पण प्रजाधर्माचा प्रश्न आहे. अनत्याचार ही राजकीय चळवळीची व्याकरण-शुद्धि आहे. तिच्यावांचून चळवळ चालविणें अशक्य आहे.

रा० रा० बोधलेबुवा व रा० रा० स्वामी यांना सत्याग्रह कचेरींतून ढालगांव कार्यातीकडे लोकांमध्यें जागृति उत्पन्न करण्याकरितां पाठविलें होतें. तेथून आपलें कार्य आटोपून ते मिरजेस आले व कारभारीसाहेबांवरील बहिष्कार कवठेपिराणांत यशस्वी करण्याकरितां त्यांना लागलीच तिकडे जावें लागलें. कवठेपिराणमध्यें त्यांनीं सत्याग्रहाच्या पुढाऱ्यांच्या आज्ञेवरून अहिंसा व शांतता याविषयीं एक व्याख्यान दिलें होतें. चळवळीचा आधार किंवा भित्ते लोकांच्या शांत रहाण्यावर आहे, ही गोष्ट रयतांना कशी पटवून देण्यांत येत होती, हें त्यावरून कळून येण्यासारखें आहे. त्यावेळच्या कवठेपिरागच्या बातमीपत्रांत जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यांत म्हटलें आहे कीं:—

"या लढ्यानें आपल्याला विजय मिळावावयाचा असेल तर आपण शांतपणानें वागलें पाहिजे. शांतपणा हें वीराचें भूषण आहे. आपण आतां धीटपणानें व शांतपणानें मार-अपमान सहन कसा करावयाचा हें शिकलें पाहिजे. या चळ-

वळींचें मर्म किंवा रहस्य हेंच आहे. आपण रागाला यावें, कोणास तरी चोप द्यावा, कोणास तरी शिवीगाळ करावी अशी इच्छा अधिकाऱ्यांची असणार हें अगदीं उघड आहे. त्याशिवाय त्यांना ही आपली न्याय्य चळवळ बंद पाडतांच येणार नाहीं. तेव्हां आतां आपल्या ध्यानांत आलें असेल कीं, शांततेनें रहाणें हाच आपला पहिला विजय आहे. यापुढें दडपशाही सुरू झाल्यावर आमचें म्हणणें विद्रूप करून गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न प्रतिपक्षाकडून केला जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत. नवीन कारभारी आपला तोल संभाळूं शकणार नाहींत म्हणजे ते रयतेला विसरून सर्वस्वी सरकारचें धोरण–मग तें न्याय्य असो वा अन्याय्य असो–पुढें रेटीत नेण्याचा प्रयत्न करीत रहातील असें मला तरी वाटतें. माझा हा अंदाज चुकीचा ठरला तर मला त्यांत आनंदच आहे. सारावाढ अजिबात नष्ट होत असेल तर आम्ही आमचा पराजय कबूल करण्यास तयार आहों. आमच्या श्रीमंतांचा जो विजय तोच आमचा विजय असें मानणारे आम्ही आहों. तथापि वाढलेला सारा देण्याची आमची शक्ति–त्राण नाहीं व म्हणूनच इच्छा नाहीं. ही गोष्ट लपवून ठेवण्याची माझी इच्छा नाहीं व आपणही कोणी आपले विचार व गाऱ्हाणीं वेशीला टांगण्याचें टाळूं नका. येतील तीं संकटें आपण सर्व मिळून सोसूंया, एवढेंच मला सांगावयाचें आहे. यांत राजकारण नाहीं. जिवंत राहण्याकरितां आपण धडपडत आहों. यापेक्षां याचा दुसरा अर्थच होऊं शकत नाहीं."

(ज्ञानप्रकाश, ता. १५।१२।२८.)

ज्या ज्या गांवीं लोकांनीं शपथा घेतल्या होत्या त्याचे रिपोर्ट सत्याग्रह कचेरींत ताबडतोब पाठविले जात असत. शांत राहाण्याचा निश्चय व शपथ घेत असतांना त्यांत आणखीही एकदोन गोष्टींचा समावेश केला जात असे. कवठेपिराण येथें ता. ९।१२।२८ रोजीं सातआठशें लोकांनीं देवालयांत जमून जी शपथ घेतली त्यांत खालील गोष्टींचा समावेश झाला होता.—

"या सारावाढीच्या कामासाठीं शेतकरी वर्गापैकीं कोणीही कोणत्याही प्रकारचे लिलांवाचे अगर जप्तीचे कामीं पंच व्हावयाचें नाहीं व लिलांव मागावयाचे नाहींत.

"या कामीं शेतकरी वर्गापैकीं कोणाचें नुकसान जमिनीसंबंधीं होईल तर बाकीच्या सर्व लोकांनीं त्यांस तन–मन–धनानें मदत केली पाहिजे.

"रोजगारी व अगदीं थोडी जमीन (दोन बिघ्यांपेक्षां कमी) असलेल्या लोकांनीं शेरींचा लिलांव खेरीज करून कोणताही लिलांव मागूं नये व पंच होऊं नये."

"शेतकरी (दोन विघ्यांपेक्षां अधिक जमीन असलेल्या) लोकांनीं शेऱ्या जामिनीचाही लिलांव मागूं नये."

अशा प्रकारच्या शपथा खेड्यापाड्यांतून होऊं लागल्या. त्याचा रिपोर्ट कांहीं गांवच्या गांवकामगारांनीं मामलेदारांकडे पाठविला व कांहींचा पाठवावयाचा तसाच राहिल्याचें समजलें. ज्या गांवकामगारांनीं या चळवळींत लोकांना कधींच व कांहींही मदत केली नाहीं. अशांनासुद्धां वारंवार मिरजेस बोलावून घेऊन, अधिकारी त्यांच्यावर यथेच्छ तोंडसुख घेत असत. अशा रीतीनें 'साप-साप' म्हणून दोरीलाही धोपटण्याइतके, अधिकारी भांबावून गेले होते.

सारांश, लोकांना प्रथम सत्याग्रहास बोलावतांना, श्रीमंतांनीं आपलें वचन मोडल्यावर पुन्हा द्वितीय सत्याग्रहाकरितां रयतांना एकत्रित करतांना, सहा दिवस सत्याग्रहांत बसल्यामुळें, श्रीमंत तात्यासाहेबांच्या चौकशीच्या फार्सीला धुडकावून लावतांना, नवीन कारभाऱ्यांना पत्र पाठविण्याची संघटना करतांना, नवीन कारभाऱ्याच्या आगमनावर बहिष्कार घालतांना आणि अशाच इतर प्रसंगीं सत्याग्रहाच्या पुढाऱ्यांनीं गांवोंगांव जे दौरे काढिले, जीं व्याख्यानें दिलीं आणि जी वाटाघाटचर्चा केली त्यायोगें रयतांचीं मनें करवंदीस तयार झालीं होतीं. ते शपथा घेऊन किंवा प्रतिज्ञा करून आपापली तयारी करीत होते. त्यामुळें दरबार, अधिकारी किंवा श्रीमंत यांच्याविषयीं कोणाही रयताच्या मनांत नैतिक पाठिंबा मुळींच शिल्लक राहिला नाहीं. एवढेंच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांत श्रीमंतांविषयीं कोठेंच नैतिक पाठिंबा (Moral support) कोठूनही मिळण्यासारखी परिस्थिति राहिली नव्हती. बहुतेक वर्तमानपत्रकार श्रीमंतांच्या वर्तनाविषयीं नापसंती व्यक्त करीत होते. ज्यांच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणें किंवा निर्भीडपणाप्रमाणें भाषेच्या कडकपणांत तारतम्य राहात असे इतकेच. उदाहरणार्थ, ता. २२।११।२८ च्या अंकांत पुण्याचें 'स्वराज्य' म्हणतें कीं:—

"मिरजकरांना तशी सद्बुद्धि झालेली दिसत नाहीं. गेल्या पंधरवड्यांत मिरजेतील सारावाढीच्या चळवळीच्या ज्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांवरून तर श्रीमंतांचा झपाट्यानें अधःपात होत चालला असून मिरजेचे नरेश आपल्या रयतांना मिरजेची बार्डोली करण्यास भागच पाडणार असें दिसत आहे.....या वचनभंगाच्या वृत्तीनें श्रीमंतांच्या आजपर्यंतच्या दानतीला काळिमा फांसला आहे. असल्या वचनभंगाच्या वृत्तीनें आपण संस्थानच्या राज्यकारभारास नालायक

झालों आह, ही गोष्ट श्रीमंतांनीं सिद्ध केली आहे. जाहीर रीतीनें दिलेलें वचन मिरजेच्या वृद्ध श्रीमंतांना पाळतां येत नसेल तर त्यांनीं संस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें खालीं ठेवावीं हेंच योग्य होय. प्रथम जाहीर अभिवचन द्यावयाचें व त्यांतून सुटण्याकरितां इतर लटपटी करावयाच्या हा शुद्ध विश्वासघात होय.....श्रीमंतांना आपल्या संस्थानची राजधानी सुशोभित करावयाची असेल व तेथील लोकांना 'पाणी' मिळवून द्यावयाचें असेल तर संस्थानच्या गरीब रयतांना पिळून काढण्यास पाहिजे असें नाहीं. श्रीमंतांनीं आपली चैन कमी केली, जडजवाहीर विकून टाकलें, आजपर्यंत गरिबांपासून घेतलेला सर्व पैसा बाहेर काढला, चार चार मजली सुशोभित वाड्यांत राहण्याचें सोडून आपल्या संस्थानांतील सर्वसामान्य मनुष्याप्रमाणें अगदीं साध्या राहणीनें श्रीमंतांनीं राहण्याचें ठरविलें, तर आपल्या संस्थानची राजधानी त्यांना सुशोभित करतां येईल; इतकेंच नव्हे तर आपल्या संस्थांनांतील सर्व गरीब रयतांचीं अंतःकरणेंही त्यांना शिक्षणानें सुशोभित करतां येतील. आपल्या इतमामांत, आपल्या चैनींत, आपल्या विषयोपभोगांत यत्किंचित्ही कमी पडूं न देतां मिरजेच्या सुखसोयीचें निमित्त करून गरीब रयतेला पिळून काढण्याचें श्रीमंतांनीं ठरविलें असल्यास ही गोष्ट दुष्काळानें व उपासमारीनें गांजलेली रयत केव्हांही चालूं देणार नाहीं:... .....इतर देशांत असल्या या निष्ठुरपणाच्या व माणुसकीस लाजविणाऱ्या कृत्याचा परिणाम काय झाला असता ? क्षुधेनें गांजलेल्या आपल्या रयतेची दाद जो राजा घेत नाहीं त्याला प्रजेनें गादीवरून खालीं ओढून काढला नसता काय ? देशकाल परिस्थिति जाणून मिरजेच्या रयतांनीं शांततायुक्त सत्याग्रहाचा अवलंब केला हें त्यांस भूषणावह आहे." (स्वराज्य, ता. २२।११।२८.)

'मौज' पत्रानें तर "मिरजेच्या यजमानास हृदय आहे काय ?" असा सवालच केला आहे.

'संग्राम'नें लिहिलें आहे कीं, "मिरजेच्या चाललेल्या प्रकाराकडे दृष्टि दिली असतां 'ब्रिटिश पुरवले; पण व्यक्तिसत्ता संस्थानिक नकोत' असें वाटल्यास नवल नाहीं. ओळखीचा चोर ज्याप्रमाणें जीवें मारतो, त्याप्रमाणें नेहमीं दिसणारे नित्य परिचयांतले संस्थानिकच प्रजेला भारी जाचक होत असतात.....सैन्याबरोबर स्वतः चणेमुरमुरे खाऊन त्यांच्याशीं समरस होणारे पेशवाईंतील पटवर्धन वीर कोणीकडे आणि रयतेच्या दुःखाची काडीइतकीही पर्वा न करितां आराम भोगणारे

त्यांचे वंशज कोणीकडे !.....तेथल्या शेतकऱ्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं हा लढा अगदीं अखेरपर्यंत हट्टानें व प्रेमानें लढावा. हक्काच्या पायमल्लीशीं हट्ट व प्रेमळपणें प्रजेच्या सुखांत स्वतः समाधान मानणाराशीं प्रेम, हाच जगाचा न्याय आहे. बार्डोलींत जय मिळाला, मग मिरजेंत तो अशक्य आहे, ही गोष्ट आमच्या मनांत सुद्धां येत नाहीं. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान्' आहे, हें जाणून त्यांनीं कार्यप्रवृत्त व्हावें, कोणाचेंही ऐकून परावृत्त होऊं नये."

(संग्राम, ता. २४।११।२८)

मिरज सत्याग्रहावर लिहितांना पुण्याचा 'मराठा' लिहितोः—

"Strongly enough, the chiefsaheb broke his plighted word, arrived at some arrangements with the local pleaders on the question, behind the back of the agriculturists and threw overboard Mr. Pundlik, the popular champion !...It was a pathetic and heart-rendeirng scene which may have made gods weep to see the innocent-looking simple but loyal agriculturists, full of love & faith in the paternal generosity of their king lying prostrate before the palace and the chiefsaheb with a heart of stone refusing even to see them or their representatives !! .....It was their (rayats) victory and not of the chiefsaheb who had to use his plenary powers. The peasants have returned with grim determination to carry their struggle ahead by refusing to pay the increased assessment ! The future holds unseen developments. For the present, the chiefsaheb has covered himself with discredit and shame.

(Marahatta, 25-11-28.)

'समर्थ'नें म्हटलें आहे कीं:—

"पांच दिवस शांततेनें व घरचें अन्न खाऊन राहिलेल्या शेतकऱ्यांना शांतताभंगाच्या सबबीवर हाकलून काढतांना श्रीमंतांना कांहीं वाटावयास हवें होतें.

शांतताभंग होणार होता हें सिद्ध करण्याची जबाबदारी श्रीमंतांवर, त्यांच्या हांजी-खोरांवर व कायद्याचा सल्ला देणाऱ्या बड्या मुत्सद्द्यांवर आहे हें त्यांनीं खूप समजून असावें.....केवळ दडपशाहीच्या जोरावर वाटेल तें करूं ही घमेंड कांहीं काळ टिकली, तरी ती यापुढें टिकण्याचे दिवस फारसे राहिले नाहींत..... श्रीमंतांच्या अंतःकरणाला पाझर फुटावा अगर गणपतीनें फोडावा म्हणून पांच दिवस उन्हातान्हांत् सत्याग्रहही केला; पण हांजीखोरांच्या तोंडपुजेपणामुळें अंध बनून श्रीमंतांनीं हा त्यांच्या घरीं आलेला जनता-जनार्दन ओळखला नाहीं व त्याला धुडकावून लाविले ही अत्यंत तिरस्करणीय व खेदाची गोष्ट होय ! आम्हाला अद्यापि आशा आहे कीं, श्रीगजानन आपल्या या चुकलेल्या भक्तास अजून दृष्टान्त देईल व "माझ्या दगडाच्या मूर्तीचें दर्शन कशाला घेतोस ? जनतेच्या स्वरूपा-नें मी तुझ्यापुढें उभा राहिलों असतां तूं मला ओळखले नाहींस. चुकलेल्या भक्ता, नीट डोळे उघड, म्हणजे पसरलेलें मायाजाल नाहींसें होईल व जनता म्हणजे-च जनार्दन–गणपति-हें तुला कळेल !" असा उपदेश करील. काय होतें पहावें."

(समर्थ, ता. २६।११।२८.)

मिरजेच्या चळवळीविषयीं लिहितांना 'केसरी' लिहितो कीं:—

"अशा रीतीनें रयतेला श्रीमंतांनीं आपल्या वाड्याजवळून पिटाळून लावलें असलें तरी हा सुरू झालेला झगडा शेतकरी अखेरपर्यंत लढतील अशी अपेक्षा आहे. श्रीमंतांनीं मात्र गरीब रयतेचा दुवा घेण्याची सुवर्णसंधि दवडली एवढें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें." (ता. २७।११।२८.)

त्याचप्रमाणें ता. १।१२।२८ च्या 'संग्राम'च्या अंकांत 'संस्थानिक ही जातच आहे' या मथळ्याखालीं जो मजकूर लिहिला आहे तोही मननीय आहे.

मिरजेंत चाललेल्या या एकंदर प्रकारावर लिहितांना मुंबईचा 'नवाकाळ' म्हणतो कीं:—

"'मी रयतेचा व रयत माझी' असे उद्गार श्रीमंतांनीं कांहीं वेळां काढलेले आहेत. मिरज शहरांत आज कित्येक वर्षें चाललेली पाण्याची ओरड व श्रीमंतांचीं हिरवागेंतील पाण्याची चंगळ याची तुलना केली म्हणजे श्रीमंतांचे उद्गार कितपत अंतःकरणापासूनचे असावे याविषयीं संशय येणें साहजिक आहे ! या संशयाला सारवाढीच्या बाबतींत श्रीमंतांनीं जे नवें धोरण पत्करलें आहे, त्या धोरणानें बळ-

कटी आलेली आहे.....श्रीमंत बाळासाहेब यांनीं सारावाढीचीं जीं कारणें दिलीं आहेत, तीं फुसकीं कशीं आहेत, हें रयतेच्या प्रतिनिधींनीं जाहीररीत्या दाखवूनही दिलें आहे.....साठ वर्षांत आम्हीं सारावाढ केली नाहीं, यांत श्रीमंतांना फुशारकी मारण्यासारखें तें काय आहे ! अजीर्ण होईल इतका पोटावर जुलूम केल्यानंतर, अजीर्णाशी नाहींसा होईपर्यंत लंघन करणाऱ्यानें एकादशीच्या उपवासाचें श्रेय घेण्यांत काय अर्थ आहे !.....श्रीमंत कीर्तनकार बनून धर्माचाराचेंही विवेचन करतात. 'सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म' ह्या उक्तीचें विवेचन श्रीमंतांनीं आपल्या कीर्तनांत व वक्तृत्वांत अनेकवार केलें असेल. मग प्रत्यक्ष आचरणाचे प्रसंगीं श्रीमंतांनीं सत्याशीं प्रतारणा केल्यास ती भूषणावह कशी ठरेल !.....विशेषतः मुंबई टाईम्ससारख्या इंग्रजी आमदानींतील मंथरेची कुसंगति श्रीमंतांनीं केल्यास ती संगति त्यांना श्रेयस्कर कशी होईल ! कैकेयीला मंथरेच्या संगतीपासून कोणतें फळ मिळालें ! रामायण काळांतील मंथरेनें पतिपत्नींत वितुष्ट पाडून, मायलेंकराची ताटातूट करून व राजाचा घात करून रामराज्याला अपशकून केला. आधुनिक कालांतील मुंबई टाईम्ससारखी मंथरा संस्थानिक व प्रजाजन यांच्यांत वितुष्ट पाडून त्याच प्रकारचा घात करूं पहात आहे. मंथरेच्या कृपाप्रसादाची उमेदवारी करण्याऐवजीं देवधर्माच्या वातावरणांतील ह्या धर्माला आणि स्वतःच्या सदसद्बुद्धीला जर श्रीमंत कौल लावतील तर रयतेच्या व स्वतःच्या, उभयतांच्याही कल्याणाचा मार्ग त्यांना सांपडल्यावांचून राहाणार नाहीं." (ता. १–१२–२८.)

पुण्याच्या 'Servant of India'नें 'The situation at Miraj' या मथळ्याखालीं लिहिलेल्या स्फुटामध्यें खालीलप्रमाणें लिहिलें आहेः—

"Since writing last week on the situation in Miraj the chief has unburdened himself to a correspondent of the 'Times of India' who put himself to the trouble of interviewing him. It is clear from the interview that the chief does not properly value his own words. Referring to the happenings on November 4, he remarked that all that he said was that he would look into the papers, and if

necessary visit their villages and make an inquiry. Those who were attentive listeners to his words on the occassion have a distinct recollection that in his very brief statement, there was absolutely no reference to any "papers," but an unqualified promise to make personal inquiries on the spot in association with Mr. Pundlik, the accredited representative of the ryots. But there really need be no doubt as to what he promised or did not promise. The result of the negotiation which preceded his personal address to the assembled ryots on that day was, in order to leave no ground for misunderstanding on anybody's part committed to writing and read out to the ryots by Mr. Pundlik in the chief's presence, to which there was not even a whisper of contradiction on his part. These are hard facts which can not be explained away. Similarly, whether there were only 500 people belonging to one or two villages in front of his palace on that day or whether their number and that of the villages they represented was several times the number mentioned by him are matters the truth of which can be properly assessed by disinterested persons who had an opportunity of watching that day's happenings at close quarters. It is of course open to the chief to go back upon his promise so solemnly given, for he, who can give a promise, can also withdraw it. But to say that no promise was given, where as a matter of fact, one was positively given

and understood in that light, is, to say the least very far from straight forward. If in giving a joint interview on his own behalf and that of his heir-apparent the chief wished to receive added support to his statements about the incidents on November 4, the object can not be gained, for the heir-apparent was not an eye-witness being away from Miraj on that day. There is an attempt in the inter-view to put the ryots in the wrong box for their so-called failure to lead evidence before the heir apparent when he recently visited a couple of villages for the purpose of inquiring into the revised land assessment. We do not think they deserve any blame, for the inquiry which the chief's promise led them to expect was not of the kind which the heir apparent was asked to conduct, but one in which their accredited representative would be associated. That more money is needed for very desirable objects of public utility is a fact which the subjects of the state know to their cost, but the question is wheather all that must come from land. It is in order to determine the fair burden on land that his subjects are so earnestly demanding an inquiry in which they will have confidence. Thus it appears to us, is an eminently reasonable which the chief, if he is so slicitous about the welfare, contentment and happiness of his people as he is so often fond of making out, should have no difficulty in concednig." (29Nov.28)

बाहेरच्या कोणकोणत्या लोकांनीं श्रीमंतांचा कसा व कोणत्या शब्दांत निषेध केला आहे व मिरजेंत बार्डोली होणार असें सर्वांनाच कसें वाटूं लागलें होतें, हें वाचकांस कळावें या हेतूनें वरील उतारे मुद्दाम या ठिकाणीं दिले आहेत. जी स्थिति बाहेरची तीच घरचीही झाली होती. खेड्यांतून काय परिस्थिति झाली होती ती आतांपर्यंतच्या इतिहासावरून वाचकांना विदित झाली आहेच. खुद्द मिरज गांवानेंही, श्रीमंतांना आपला नैतिक पाठिंबा नाहीं, हें मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन व्यक्त केलें. सत्याग्रही लोकांना आर्थिक मदत करून लोकांनीं सरकारच्या धोरणाचा निषेध व्यक्त केला. शेवटच्या दिवशीं सत्याग्रही लोकांच्या मिरवणुकीवर मेवामिठाई व चुरमुरे वगैरे उधळून व्यापाऱ्यांनीं आपली रयतांशीं सहानुभूति जाहीर केली. व्यापाऱ्यांनीं आपल्या सह्यांनीं स्वयंस्फूर्तीनें एक पत्रक छापवून सत्याग्रही रयतांशीं आपण समदुःखी असल्याचें प्रदर्शित केलें. परंतु दुसऱ्या कांहीं व्यापाऱ्यांनीं निराळें पत्रक छापवून, श्री० केशवदास शेठजी यांनीं सत्याग्रही लोकांचा किंवा सत्याग्रहाचा कधींच निषेध केला नव्हता आणि 'सत्याग्रह हा रयतेचा चुकीचा मार्ग आहे असें आमचें केव्हांच म्हणणें नव्हतें' असें जाहीर करून सरकारचा पुन्हा एकदां भीतभीत एका अर्थी निषेधच केला. त्यांचें म्हणणें इतकेंच होतें कीं, रयतेनें इतके मार्ग किंवा प्रयत्न अंमलांत आणून पाहिले, तसें व्यापाऱ्यांच्या मार्फत एकदां श्रीमंतांकडे मध्यस्थी करावयास पाहिजे होती. त्या सरळमार्गीं, संभावित व सूज्ञ व्यापाऱ्यांना अधिकाऱ्यांनीं कधींच चकविलें असतें, यांत कोणत्याच रयतांना शंका नव्हती. शिवाय ज्यांच्याकडे मदत मागण्यास जावें, तो जर 'माझी एकदां मध्यस्थी श्रीमंतांकडे करवून पहावयाची होती आणि ज्या अर्थी तुम्ही ती न करतांच सत्याग्रह सुरू केला आहे, त्याअर्थी मी तुम्हांला मदत देत नाहीं; एवढेंच नव्हे, तर तुम्ही मागितल्याबद्दल तुमचा निषेध करितों' असें म्हणूं लागला तर त्याच्याइतका शाहणा तोच असें कबूल करून त्याला प्रथम नमस्कार करणेंच योग्य आहे. श्री० केशवदास शेठजीकरितां जें पत्रक छापवून निघालें होतें, त्याचा वास्तविक चळवळीवर बरा किंवा वाईट कोणताच परिणाम झाला नाहीं. पण तें पत्रक लोकांच्या डोळ्यांपुढें येऊन गेलें असल्यामुळें त्याचा आम्हीं येथें जातां जातां असा ओझरता उल्लेख केला आहे.

रयतांचे हाल व सत्याग्रह आणि भयंकर सारावाढ आणि या जोडीला दरबारचें विचित्र धोरण वगैरे गोष्टी पाहून किंवा श्रीमंतांची दुर्बुद्धि जाणूनच कीं काय

गांवांतील ब्राह्मणवृंदांनीं राजा व प्रजा या दोघांनाही आशीर्वाद देण्यास पुढें यावें हें त्यांचें कर्तव्यच आहे ब्रह्मवृंदांनीं आपल्या आशीर्वादाचें जें पत्रक सत्याग्रह कचेरींत आणून दिलें व ज्याचा उल्लेख वर्तमानपत्रांतून केला गेला होता, तें खालीलप्रमाणें आहे.

'राजा व प्रजा यांस ब्राह्मणांचा आशीर्वाद'

"रयत लोकांनीं आपल्यावरील सारावाढीचा अन्याय दूर करण्याकरितां जी खटपट चालविली आहे त्यास आम्हां ब्राह्मणांचा आशीर्वाद आहे. रयत हेच देशाचे आधारस्तंभ आहेत. ईश्वरानें त्यांना आयुरारोग्य द्यावें आणि आपल्या श्रीमंतांनाही आयुरारोग्य देऊन सद्बुद्धि द्यावी व राजा आणि प्रजा यांमध्यें पूर्वीप्रमाणें प्रेम रहावें अशी आम्हां ब्राह्मणांची त्या जगच्चालकापाशीं प्रार्थना आहे. रयतांकरितां व श्रीमंतांकरितां म्हणून आम्ही अनुष्ठान करण्याचें ठरविलें आहे."

याप्रमाणें ब्राह्मणांनीं गोड आशीर्वाद देऊन राजाला ईश्वरानें सद्बुद्धि द्यावी अशी जी त्या जगच्चालकापाशीं प्रार्थना केली आहे. त्याबद्दल रयतांना संतोष झाला. परंतु त्या पत्रकानें देखील राजाला सारावाढीच्या बाबतींत ब्राह्मणांचा नैतिक पाठिंबा नाहींसा झाला ही गोष्ट जगजाहीर झाली. रयतांचा पक्ष हा सत्पक्ष असल्यामुळें अशाप्रकारें चोहोंकडून त्यांच्याविषयीं सहानुभूति वाढूं लागली आणि दरबारचा पक्ष लंगडा पडूं लागला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सारावाढीच्या चळवळीच्या प्रारंभापासून आतांपर्यंत महाराष्ट्रांतील इंग्रजी किंवा मराठी कोणत्याही पत्रानें श्रीमंत सर बाळासाहेब यांच्या धोरणाला चांगले म्हटलेलें नाहीं किंवा त्यांची थोडी देखील तरफदारी किंवा मंडन केलें नाहीं, ही गोष्ट विशेष महत्त्वाची असून ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

चोहोंकडून दरबारचा नैतिक पाठिंबा ढासळणें व रयतांची करबंदीची सिद्धता जवळ जवळ पूर्ण होत येणें, याचा परिणाम दरबारवर काय झाला व तडजोड एकदम कशी झाली, त्या वृत्तान्ताचा आपण आतां विचार करूं.

अखेर रयतेचाच तात्त्विक जय

५६ उद्दशा परिस्थितींत संस्थानचा राज्यकारभार सुयंत्रित रीतीनें चालून संस्थानांत शांतता नांदणें अशक्य झालें आहे.”

बी. के. जोशी; जॉ. स्टे. कारभारी, मिरज.

चळवळीला अशाप्रकारें व्यवस्थित उग्र स्वरूप आल्यानंतर सरकारपक्ष तडजोडीच्या दृष्टीनें पाऊल उचलूं लागला. बार्डोलीचा समेट झाला त्यावेळीं कौन्सिलमध्यें गव्हर्नर यांनीं धमकीवजा जें भाषण केलें होतें त्यांतच तडजोडीचें मूळ पुरून ठेविलें होतें, ही गोष्ट जनतेच्या स्मरणांतून अद्यापि गेली नव्हती. या चळवळीला कोठें तरी बगल देऊन आपली अब्रू बचावल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें अधिकाऱ्यांच्या व श्रीमंतांच्या डोळ्यांला स्पष्ट दिसूं लागलें; म्हणून त्यांनीं एका ‘जाहीर पत्रका’नें त्या दिशेनें आपल्या हालचाली करण्यास सुरुवात केली. तें सरकारी पत्रक खालीलप्रमाणें आहेः—

जाहीर पत्रक

जॉइन्ट स्टेट कारभारी मिरज यांजकडून—

“संस्थान मजकुरी नवीन जाहले सारावाढीसंबंधीं मिरज तालुकेपैकीं कांहीं विशिष्ट गांवांतील लोकांनीं कांहीं लोकांच्या मदतीनें चळवळ चालविली आहे. जोंपर्यंत ही चळवळ प्रमाणाबाहेर गेली नव्हती तोंपर्यंत मिरज सरकारांनीं सदर चळवळीची उपेक्षा केली व लोक वस्तुस्थिति समजून घेऊन या चळवळीपासून परावृत्त होतील असें वाटलें होतें. परंतु कष्टानें असें म्हणावें लागतें कीं, वस्तुस्थिति समजून घेण्याची त्यांची इच्छा असल्याचें दिसत नाहीं व दिवसेंदिवस सदर चळवळीस ऊत येऊं लागला आहे. गेल्या महिन्यांत कांहीं गांवचे लोक सरकारांचे बंगल्याजवळ येऊन बसले असतां त्यांस समजावून परत जाणेस सांगितलें असतां, ते हट्टानें ऐकेनात; तेव्हां निरुपायानें सरकारांस क्रि. प्रो. कोड कलमें १४४ व १२७ प्रमाणें नोटिसा काढणें भाग झालें व ही गोष्ट सरकारांनीं मोठ्या नाखुषीनें केलेली आहे. त्यानंतर व त्यापूर्वीही रयतेचे पुढारी म्हणविणारे लोक गांवोगांव हिंडून,

संस्थानमजकुरीं सरकारची परवानगी घेऊन भाषणें करावींत, असा जाहिरनामा प्रसिद्ध जाहला असून तोही मोडून, लोकांस सरकाराविरुद्ध चिथावीत आहेत. व सरकारी अम्मलदारांविरुद्ध रयतेचीं मनें कलुषित केलीं जात आहेत व सदर चळवळे लोकांची मजल सरकारी सारा देऊं नका, असें सांगण्यापर्यंत जात आहे. अशा परिस्थितींत संस्थानचा राज्यकारभार सुयंत्रित रीतीनें चालून संस्थानांत शांतता नांदणे अशक्य जाहलें आहे व यामुळें सरकारास निरुपायानें व मोठ्या कष्टानें शांतता व सुव्यवस्था राखण्याकरितां कडक उपाय योजणें भाग झालें आहे. म्हणून या जाहीरपत्रकानें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, चळवळे लोकांनीं आपली चळवळ ताबडतोब थांबवावी व रयत लोकांनीं त्यांचा नाद सोडून योग्य रीतीनें सरकारमार्फत आपल्या तक्रारींचा निकाल करून घ्यावा, तसें न झाल्यास सरकारास अखेर कडक उपायांचा अवलंब करावा लागेल. हा प्रसंग येऊं नये म्हणून मुद्दाम या जाहीरपत्रकानें सर्व लोकांस आगाऊ कळविण्यांत येत आहे. कळावें, ता. ११ डिसेंबर सन १९२८ इ.

B. K. Joshi.
जॉइंट स्टेट कारभारी, मिरज.

दडपशाहीचें सरकारी जाहीरपत्रक बाहेर पडतांच महाराष्ट्रभर वर्तमानपत्रांतून संस्थानवर कडक टीका होऊं लागली. 'मिरज संस्थानांत दडपशाहीला प्रारंभ झाला. चळवळीचा जोर अधिकाऱ्यांना भासूं लागला आणि म्हणूनच कडक उपाय योजण्याची धमकी नवीन कारभाऱ्यांनीं दिली आहे' असें ज्ञानप्रकाशनें ता. १६ डिसेंबर २८ च्या अंकांत लिहिलें होतें. मिरजेच्या दडपशाहीविषयीं लिहितांना ता. १६।१२।२८ चा Mahratta 'Crisis in Miraj' या मथळ्याखालीं लिहितो कीं:—

"It is learnt further that it is decided to set the law in motion against Mr. Pundlik the selfless champion of the cause of the agriculturists and prosecute him under the sedition section of the Penal code of the state. Other representatives of agriculturists are to be dealt with under other sections. What is the offence of these sturdy

men !.....The poor agriculturists, helpless and down trodden as they are, may or may not be able to continue their agitation. They may be even crushed under the heels of autocracy. Mr. Puddlik and his colleages will willingly sacrifice themselves on the alter of duty towards the agriculturists. It is the might and brute force that succeeds in the world apparently. But there is the compelling force of destiny. Nemesis is sure to overtake the unjust. Its march may be slow, but it is sure. Its retributive justice is swift and sharp. We known further that History will record its verdict that the chiefsaheb and his advisers covered themselves with the shame of sheer injustice and cruel oppression on the people."

ता. १८ च्या 'ज्ञानप्रकाशां'त 'एका रयतेकडून' या नांवाखालीं एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यांत या सरकारी पत्रकावर फार मुद्देसूद टीका केलेली आहे. रयतेनें आतांपर्यंत अत्यंत सनदशीरपणें व शिस्तीनें निरनिराळे आठ प्रयत्न कसे करून पाहिले व आतां करबंदीशिवाय रयतेला दुसरा मार्ग कसा उरला नाहीं, हें त्यांत चांगलें विशद केलें आहे.

ता. १५।१२।२८ च्या 'संग्राम'मध्यें 'एक माजी प्रजाजन' यानें 'श्रीमंत बाळा-साहेबांशीं हितगुज' केलें आहे. तें खालीलप्रमाणें आहे:—

श्रीमंत बाळासाहेबांशीं हितगुज

[लेखक—एक माजी प्रजाजन.]

मिरज संस्थानांतील सारावाढीच्या विरुद्ध जी पद्धतशीर चळवळ तेथील रयतांनीं चालविली आहे, ती आतां सर्व महाराष्ट्रभर दुमदुमून राहिली आहे. म्हातारपणीं श्रीमंत बाळासाहेब यांच्या नांवाला काळोखी लागण्याचा प्रसंग आला आहे. सर्व दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानांमध्यें मिरज संस्थान हें आजपर्यंत बऱ्यापैकीं गणल जात होतें. आमच्या मनांत देखील त्यांच्याविषयीं अत्यंत आदर वसत आहे.

म्हणूनच श्रीमंत बाळासाहेब यांच्याशीं आज दोन हितगुजाच्या गोष्टी कराव्यात असें आमच्या मनानें घेतलें आहे. श्रीमंतांविषयींचा आदर व प्रेम आमच्या मनांत वसत असल्यामुळेंच आज आम्हीं ही लेखणी हातांत घेतली आहे. असो.

श्रीमंत बाळासाहेब या सारावाढीच्या बाबतींत श्री. मोडकसाहेब व आपले अधिकारी यांनीं किती घोडचुका केल्या आहेत याची आपल्याला कल्पना तरी आहे काय ? दहा दिवसांत पांच जाहीरनामे काढिले, हें आपल्याला बरें दिसतें काय ? बार्शी लाइट रेल्वे सुरू होण्यापूर्वीच त्याच्यापासून रयतेला मिळणाऱ्या फायद्याची बोंबाबोंब रिपोर्टांत केली आहे, हें अधिकाऱ्यांच्या डोळ्यांच्या खाचांना दिसलें नाहीं काय ? जमिनी खरेदी-विक्रीच्या कागदपत्रांचा सावळा गोंधळ केलेला समजण्या-इतकी अक्कल आपल्या संस्थानांत एकाही अधिकाऱ्याला नाहीं काय ? खंडावरून सारावाढ केव्हांही केली जाऊं नये, हें तत्त्व आज जगानें मान्य केलेलें असतांना आपल्या संस्थानांतील सारावाढ खंडावरून केली गेली आहे याला काय म्हणावें ? मिरज गांवची लोकसंख्या व मिरज तालुक्याची लोकसंख्या यांची तुलना करून वीस हजारांची एक्कावन हजार लोकसंख्या झाली, असें रिपोर्टांत लिहून, जी धूळ श्री० मोडक यांनीं आपल्या डोळ्यांत टाकिली आहे, ती अजून बाहेर निघाली नाहीं काय ? मोटस्थळ व पाटस्थळ वाटेल त्या ठिकाणीं दडपून दिलें आहे हा अन्याय राजानें दूर करावयाचा नाहीं तर कोणी करावयाचा ? जमिनीचें निव्वळ उत्पन्न पाहून त्या मानानें सारा वाढवावयाचा असतो; पण या बाबतींत रिपोर्टांत (पॅरा २०) एक अक्षर तरी लिहिलें आहे काय? आपलें रयतेवर फारच प्रेम असल्यामुळें सारा-वाढीची मुदत ३० वर्षांची वीस वर्षें केलीत होय ? रिपोर्टांत अवास्तव निर्गतीचे आंकडे दिलेले आहेत, ते एका अज्ञ माणसानें अंदाज करून, श्री० मोडक यांना माहिती पुरविली आहे. त्याला आधार दिलेले नाहींत. लागवडीस आणण्याजोग्या जमिनीचा एक तुकडासुद्धां आपल्या संस्थानांत शिल्लक नसतांना आणि रयत आपल्या जमिनी करून शिवाय दुसऱ्याची एखादी जमीन खंडानें मिळाली तर ती घेण्याच्या धडपडींत असतांना त्यांना निरुद्योगी व आळशी म्हणावयास अँडरसन् साहेब व मोडक तयार झाले म्हणून आपण त्याला मान तुकवावी काय ? नाहीं तर शेतकऱ्यांनीं काय, गणेश-कला-भुवन प्रत्येक शेतांत काढावयाचें असतें काय ? प्रत्येक गांव शेकडा ८० टके कर्जांत बुडालेलें आहे. आज रयतांच्या छातीवर सावकार आहेत व सावकारांच्या छातीवर आपण आहां. रयत मेल्यावर राजा

जिवंत असला तरी मेल्यासारखा आहे. आपण या सर्व गोष्टींकडे स्वतः लक्ष पुरवा. सल्लागारांच्या हातांत आपण आपली मुंडी दिली आणि त्यामुळें आपले हे असे घिंडवडे चाललेले आहेत. आपल्या अधिकाऱ्यांची कुवत व अक्कल आपण आपल्या मनाशीं जाणून आहां. त्यांच्या कचाट्यांतून रयतांना सोडवा व त्यांचा दुवा घ्या.

आपली रयत किती शहाणी आहे

या सारावाढीच्या अन्यायाचा प्रतिकार करून आपली दाद लावून घेण्याकरितां आपल्या रयतांनीं आतांपर्यंत केलेल्या चळवळीबद्दल त्यांचा गौरव करून त्यांना पोटांत घ्या. प्रथम त्यांनीं आपल्याकडे अर्ज केले त्याची दाद अद्याप देखील लागलेली नाहीं, गांवोगांवचे लोक आपल्याला स्वतंत्रपणें भेटले. त्यांना आपण वाटाण्याच्या अक्षता दिल्यात. लोकांनीं प्रजापरिषद् भरविली; पण त्या परिषदेच्या सल्ल्याला आपण धाब्यावर बसविलेंत. शिष्टमंडळ आपल्याला भेटण्याकरितां पाठविलें गेलें, त्यांना आपण दर्शन दिलें नाहीं, त्या मंडळींना भेटून कांहीं तरी तडजोड करावयाचा साधा मार्ग तरी आपल्या ध्यानांत आला नाहीं हें रयतांचें दुर्दैव. स्वतः आपले सर्व रयत आपल्याला भेटावयास आलेल्या वेळीं आपण त्यांच्यापैकीं एकाला आपणहून बोलाविलेंत व लढा आपसांत मिटविण्याचें घोरण दाखवितांच आपली रयत आली तशी परत निमुटपणें निघून गेली. आपल्या शब्दावर रयतांनीं विश्वास ठेविला; पण तें ता. ४।११।२८ चें आपलें वचन आपण मोडलें त्याच वेळीं आपला खरा अधःपात झाला. आपल्या राज्यांतून त्याच दिवशीं लक्ष्मी-सरस्वती उठून जाण्याच्या तयारीला लागल्या. ही गोष्ट लोकांना समजतांच लोक आपल्या दारांशीं पुन्हा येऊन धरणें धरून बसले. परंतु आपण सहा दिवसपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेंत व शेवटीं त्यांच्या डोक्यांत १२७ कलमाचा बडगा मारलात, याला काय म्हणावें ! 'मी बोललों होतों पण वचन दिलें नव्हतें' या आपल्या टाइम्समधील मुलाखतीला सर्व महाराष्ट्र हंसला. आम्हांला तें पाहून अत्यंत खेद व वाईट वाटलें. आपण आहां तोंपर्यंतच रयतांचा कांहीं संतोष संपादन झाला तर होणार आहे. आपल्या पश्चात्

गद्धे पंचविशीचें राज्य

आपल्या संस्थानांत नांदणार अशीं चिन्हें आजपासूनच दिसूं लागलीं आहेत. आपले युवराज स्वकपोलकल्पित चौकशीला गेले व लोकांनीं त्यांना

उघळून व धुडकावून लाविलें. आकारबंदीचा मेळ अद्यापि बसलेला नाहीं. त्यांत चुका तशाच राहिल्या आहेत. तरी गांवोगांव जाऊन आकारबंद सांगत सुटण्याची घिसाडघाई नवे कारभारीसाहेब करीत आहेत. पुढचा येतो तो मागच्याला शहाणा म्हणवितो. प्रत्येक गांवांत त्यांच्यावर लोक बहिष्कार घालीत आहेत याची लाज कोणासच नाहीं. या चळवळीच्या सुरवातीला उठाव केलेले वकील आज कारभारी होऊन चळवळीच्या पुढाऱ्यांना डांवून ठेवून अन्याय्य सारावाढ रयतेच्या डोक्यांत हाणूं पहात आहेत. राजाचा अधःपात झाला म्हणजे अधिकारी-देखील कसे घसरगुंडीला लागतात, त्याचें हें एक उदाहरण आहे. अशी या गद्धे-पंचविशीशाहीमध्यें

आधीं फांशी आणि मग चौकशी

हें तत्त्व नांदणार आहे, अशी भीति लोकांना वाटत आहे. राजकारण लोकांना किंवा लोक पुढाऱ्यांना दडपण्यांत नाहीं, तर त्यांचा संतोष राखून त्यांचा उपयोग संस्थानाकडे करून घेण्यांत आहे ही गोष्ट आपल्याला जशी पटूं शकेल, तशी ती एखाद्या अल्लड पोराला कळूं शकणार नाहीं. आपल्या संस्थानांत दडपशाहीला सुरवात होईल तर आपल्याविषयींचें आजपर्यंतचें लोकमत अजीबात नाहींसें होईल. रयत व आपण यांच्यामध्यें सलोख्याचा संबंध राहणें आजच्या अखिल हिंदुस्थानच्या राजकारणाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्यक आहे. आजूबाजूच्या संस्थानचीं उदाहरणें देऊन स्वतःची फसवप्पूक करून घेण्यांत अर्थ नाहीं. लगतच्या संस्थानांत प्लेग आला तर आपल्या संस्थानांत तो सुरू करण्याची खटपट आपण करणार काय ? रयतांच्या पोराबाळांकडे पहा. पैसा पुन्हा मिळेल; रयत पुन्हा मिळणार नाहीं.

आपल्या धर्मपत्नी आज हयात असत्या तर त्यांनीं यावेळीं आपल्याला योग्य सल्ला दिला असता असें आमची मनोदेवता आम्हांला सांगते. अँडरसन-साहेबांचा व मोडकांचा सल्ला आपण ऐकतां त्यापेक्षां आपल्या रयतांचें म्हणणें ऐका, त्यांत आपलें हित आहे. आपल्या चिरंजीवापेक्षां आपल्या रयतांचीं मुलें आपल्याला अधिक प्यारीं आहेत.

सुवर्णसंधि व्यर्थ दवडूं नका

हा सारावाढीच्या बाबतींत झालेला अन्याय मुळासकट दूर करा. आपल्या अधिकाऱ्यांनीं आपल्याला दगा दिला आहे. आपण ज्याच्यावर पूर्ण विश्वास

ठेविला त्यांनीं श्री० मोडकांना नीट व खरी माहिती पुरविलेली नाहीं. रयतांच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा त्यांनीं शक्य तितका प्रयत्न केलेला आहे. नाहींतर रिपोर्टींत इतक्या चुका राहिल्या कशा ? आपण त्यांना यावद्दल जाब विचारला त्या वेळीं ते जर रडून आपलें समाधान करूं शकत असतील तर तें रयतांचें दुर्दैव आहे.

दडपशाहीनें रयतांना चुरडण्यांत शौर्य नाहीं.

शौर्य व क्रौर्य यांतील फरक आपण जाणतां. तो फरक आपल्या कृतीनें लोकांना शिकवा. आपल्यावर आज फार मोठी जबाबदारी आहे. आपण एकटे देवापुढें वसा. तो आपल्याला योग्य ती सद्बुद्धि दिल्याशिवाय राहणार नाहीं. रयतांचा व त्यांच्या गरीब पोरावाळांचा तळतळाट व्यर्थ जात नसतो. सरळ व न्याय्य मार्गानें आपण या सारावाढीचा विचार कराल तर रयत व त्यांचे पुढारी आपल्या पायावर लोटांगण घालतील.

न्यायाचा कांटा रयतेच्या बाजूला झुकता ठेवा

पड पडलेल्या जमिनींवर कोठें सारा घेतला जात असेल तर तो वगळून टाकलाच पाहिजे, गॅरंटी तीस वर्षांची करण्यांत आज आपले कांहींच नुकसान नाहीं. मिरज तालुक्यांत आज किती तरी वर्षें पाणीच कमी आहे. मग पाटस्थळ कोठलें असेल बरें ! तें पाटस्थळ नसतांना आजपर्यंत लोकांनीं आकार भरला आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करा आणि हीं पाटस्थळें व त्याचा कृतघ्नपणाचा आकार काढून टाकण्यांतच खरा सरळपणा आहे असें आपल्याला वाटत नाहीं काय ? पोटस्थळाच्या बाबतींत पुन्हा पाहणी करण्याचें धोरण ठेवावें. लोक दरिद्री व कर्जबाजारी झाले आहेत. त्याकडे नजर देऊन लोकांना पुरी सवलत देण्याची कृपा दाखवा. ढालगांवच्या बाजूच्या जमिनी अत्यंत वाईट आहेत, असें श्री० मोडक यांनीं रिपोर्टींतच म्हटलें आहे. त्या भागावर अदमास पांच हजारांची वाढ झालेली आहे. पांच हजार रुपयांनीं कांहीं संस्थान मरत नाहीं. तेव्हां त्या भागावर मुळींच वाढ न कराल तर ते रयत जिवंत तरी राहातील. आणि इतक्या गोष्टी झाल्यावर रयत व आपण यांच्यामध्यें सलोख्यानें–फसवाफसवीनें नव्हे–जे योग्य तितके टक्के वाढवा असाच कोणी झालें तरी सल्ला आपल्याला दिला पाहिजे व देईल. रयतांना कसें दडपावें याच गोष्टीनें आपल्याला पछाडलें असेल तर रयतांचें दुर्दैव म्हणावयाचें. एका तरी हिंदू राजाची कीर्ति आम्ही गात राहूं असें जें आम्हांस वाटतें, ती

आमची आशा मात्र आपल्या हट्टीपणानें किंवा आपल्या सल्लागारांच्या मूर्खपणानें पार नाहींशी होणार, याचें आम्हांस वाईट वाटतें. मिरजेंत दुसरें कोल्हापूर संस्थान उत्पन्न होऊं नये अशी महाराष्ट्राची फार फार इच्छा आहे. या महाराष्ट्राच्या मागणी-ला आपण भीक घालणार किंवा नाहीं याकडे आज महाराष्ट्राचे डोळे लागून राहिले आहेत. ईश्वर करो व आपल्या मनामध्यें सद्बुद्धि उत्पन्न होवो."

सरकारी 'जाहीरपत्रक' लवकरच बाहेर पडणार आहे, ही गोष्ट सत्याग्रह कचेरीस आगाऊच कळलेली होती. म्हणून पुढाऱ्यांनीं सर्व गांवांतून एक स्वतंत्र दौरा काढून प्रत्येक गांवच्या पंचांना ता. १३।१२।२८ रोजीं मिरजेस हजर रहाण्यास सांगितलें होतें. करबंदीची सिद्धता करतांना प्रत्येक गांवानें आपापले पंच निवडून ठेवण्याचें काम करून ठेवलेलेंच होतें. कांहीं गांवांमध्यें स्वाभाविक-च लोकांचा विश्वास कांहीं विशिष्ट व्यक्तींवरच असतो आणि असे लोकही या चळवळींत आस्थेनें भाग घेत होते. ठरल्याप्रमाणें ता. १३।१२।२८ रोजीं डॉ० ना. वि. जोशी यांच्या दिवाणखान्यांत प्रत्येक गांवचे पंच येऊन दाखल झाले. त्या दिवशींची सभा श्री० पुंडलीकजी यांच्या अध्यक्षतेखालींच झाली होती. त्यावेळीं प्रास्ताविक भाषणांत ते म्हणालेः—

"नवीन कारभारीसाहेब श्री० बी. के. जोशी यांच्या सहीनें एक 'जाहीरपत्रक' सरकारनें छापविलें आहे. तें माझ्या हातांत आलें आहे, व तें मी आपल्याला वाचून दाखवितों. (तें जाहीरपत्रक वाचून दाखविलें) या पत्रकावरून दोन तीन गोष्टी आपण ध्यानांत घ्यावयाच्या आहेत. ज्याच्या सहीनें 'जाहीरपत्रक' सरकारनें प्रसिद्ध केलें आहे, त्याच्याकडे याचा दोष नाहीं. आपल्यापैकीं कोणीही कारभारीपदावर असते तरी त्याला असेंच वागणें भाग झालें असतें. एक सरकार-च्या मर्जीप्रमाणें वागलें तरी पाहिजे, नाहींतर नोकरी तरी सोडली पाहिजे. सरकारी जाहीरपत्रकाची भाषा अशीच असावयाची. आपल्या चळवळीनें राज्य-कारभार चालविणें अशक्य झालें आहे अशी कबुली त्या पत्रकांत सरकारनें दिली आहे आणि म्हणूनच त्यांनीं तडजोडीला आपला हात पुढें केला आहे. चळवळे लोकांनीं चळवळ बंद करावी असेंही त्या सरकारी पत्रकांत म्हटलेलें आहे. परंतु असल्या जाहीरपत्रकानें चळवळी बंद होत नसतात हें त्यांना आतां कळून येईल. हें उत्तर आपण आपल्या कृतीनें दिलें पाहिजे.

आपल्या चळवळीला आतां उग्र स्वरूप येत चाललें आहे. आजची सभा

अत्यंत महत्त्वाची आहे. मी आपल्या पुढें सर्व गोष्टी स्पष्टपणें मांडत आहे. त्याकडे लक्ष देऊन ऐका. आजपर्यंत आपण ऐकलेलीं व्याख्यानें वेगळीं व आजचा प्रसंग वेगळा आहे. सरकार हट्टाला पेटण्याचाही संभव दिसत आहे. आपण एकदां करबंदी जाहीर केल्यावर मग मागें पाऊल घेतां कामा नये. दूरवर विचार करून मला आतांच आपण निर्णय द्या. आपलीं घरेंदारें, जमिनी, गुरेंढोरें वगैरे घालविण्यास आपण तयार असाल तर हा लढा या पुढें रेटण्यांत हंशील आहे. आणि इतकें करूनही शेवटीं खात्रीनें यश येईल असें आज सांगतां येत नाहीं. आपल्या हातून हें कार्य रेटणार नाहीं असें आपल्याला वाटत असल्यास तें मोकळ्या मनानें उघड सांगा, म्हणजे या चळवळीला कोणती दिशा द्यावयाची तें मला निश्चित करण्यास बरें पडेल. नोटिसा निघणें, चौथाई दंड बसविणें, आपल्या इस्टेटींचा लिलांव करणें, जमिनी शेरींत कायमच्या सामील करून घेणें या सर्व गोष्टी येथें घडून येण्याचा संभव आहे. आपली सर्वांची कुवत जितकी असेल त्यापेक्षां अधिक कठीण परीक्षेला मी आपल्याला बसविणार नाहीं." (यानंतर प्रत्येक गांवच्या पंचांना स्वतंत्रपणें विचारण्यांत आलें व प्रत्येक गांवानें एक मतानें 'आपण लढा अखेरपर्यंत लढण्यास तयार आहों' असा स्पष्ट निर्णय दिला.)

" आपण हा निर्णय दिला आहे. मी त्याचा विचार करूनच उपयोग करीन. आपण लढा लढण्यास तयार आहां हो आनंदाची गोष्ट आहे. सरकारी पत्रकांत असें जाहीर केलें आहे कीं, रयतांच्या पंचांची भेट सरकार घेण्यास तयार आहे. तेव्हां पंच निवडून त्यांच्याकडे बोलणे करण्यास पाठविणें आपलें काम आहे. तडजोडीला सरकारनें हात पुढें केल्यानंतर आपण तो झिडकारणें व्यवहाराला उचित दिसत नाहीं; म्हणून पंच निवडून ते सरकारकडे पाठविणें आपलें कर्तव्य आहे. मात्र पंच निवडतांना एक गोष्ट ध्यानांत घ्या कीं, त्या पंचांनीं आपला गळा कापला तरी आपण तें निमूटपणें सहन केलें पाहिंजे. वकीलांना आपण निवडून पाठविलेलें नसल्यामुळें त्यांनीं ठरविलेली 'पहिल्यावर्षी चाळीस टक्के व पुढें ५६ टक्के' ही तडजोड आपण उधळून देऊं शकलों परंतु आपणच निवडलेल्या पंचांशीं वाटाघाट होऊन जर कांहीं तडजोड ठरली तर ती मात्र आपल्याला मानावी लागेल हें लक्षांत ठेवा. जितक्या गांवांचे पंच आज येथें जमलेले आहेत, त्यांना तरी निदान या पंचांची तडजोड अवश्य मानावी लागेल. म्हणून आपण आपल्या खात्रीचे पंच

निवडून द्यावेत. भिडेनें कोणासही निवडून देऊं नये. त्या पंचांशीं वाटाघाट करून सरकार कांहीं तडजोड घडवून आणील असा मला अद्याप विश्वास वाटत नाहीं; परंतु सुदैवानें तडजोड झालीच तर मला त्याचें वाईट वाटणार नाहीं."

एक रयत:—आपण आमच्या गांवामध्यें पुष्कळ वेळां आलेले आहांत. आपल्याला सर्व कांहीं माहिती आहे. आपणच आपल्या मर्जीप्रमाणें पंच निवडावेत. आम्ही त्यांना आमची संमति देतों.

श्री० पुंडलीकजी:—आपल्या मर्जीप्रमाणें पंच निवडले जातील तरच उत्तम होईल. भिडेनें किंवा दुसऱ्यावर विश्वास ठेवून हीं कामें करूं नका. मला विचाराल तर मी माझें मत आपल्याला सांगतों. पंच म्हणजे पांचच माणसें निवडलीं पाहिजेत असा कांहीं नियम नाहीं. माझ्यामतें दोनच माणसें निवडावींत. मी किंवा डॉ० जोशी यांच्याशीं वाटाघाट करण्यास सरकार तयार नाहीं. श्री० माधवराव देशपांडे व दत्तोपंत करमरकर हीं दोनच माणसें निवडावींत. असें मला वाटतें. वाटाघाट करावयास सुशिक्षित व हिशेब करणारीं माणसें असावींत, म्हणून मीं यांनाच निवडावें म्हणतों; पण निकाल सर्वस्वी आपल्या पसंतीवर ठेवतों.

कांहीं लोक म्हणाले कीं, " असें केल्यास वरोवर होणार नाहीं. पंच पांचच असावेत आणि ते खरे रयत असतील तर उत्तम होईल.

श्री. पुंडलीकजी:—माझी हरकत नाहीं. कोणासही पंच निवडा. मात्र ते तुमच्या सर्वांच्या खात्रीचे असावेत. पंचांनीं सरकारपाशीं जाऊन काय बोलावें हें आपण सर्व मिळून या ठिकाणीं ठरवूं या म्हणजे काम झालें.

(यानंतर वरीच वाटाघाट होऊन पांच पंच निवडले गेले. श्री० माधवराव देशपांडे यांना पंच होण्याची इच्छा नव्हती; परंतु सर्वांच्या आग्रहानें पंच होण्याचें शेवटीं त्यांनीं कबूल केलें.)

यानंतर तडजोडीच्या अटी काय असाव्यात याविषयीं वाटाघाट सुरू झाली. ही वाटाघाट सुमारें दोन तास चालली होती. अशा प्रकारें पंचांचें स्वातंत्र्य काढून घ्यावें किंवा नाहीं या मुद्द्यावर वरीच भवति न भवति झाली. शेवटीं, पंचांना कांहीं तरी बंधन घालावें, त्याच्या बाहेर त्यांनीं जाऊं नये असेंच ठरलें आणि अटीविषयींची चर्चा पुढें चालूं झाली. 'तडजोड' म्हणजे 'चौकशीरहित' ही गोष्ट प्रथम सर्वांना समजून सांगावी लागली. शेवटीं मोठ्या कष्टानें २५ टक्के वाढ कबूल करावी असें सर्वानुमतें ठरलें. पंचांनीं कांहीं झालें तरी यापेक्षां अधिक कबूल करावयाचें

नाहीं असें त्यांस निक्षून सांगण्यांत आलें. 'जाहीरपत्रकां'मध्ये सरकारनें तडजोडीला जो हात पुढें केला आहे त्याला अनुसरून आम्ही रयतांचे पंच तडजोडीकरितां सरकारची भेट आपल्यामार्फत घेऊं इच्छितों " असें पत्र पंचांच्या सहीनें रा० व० कारभारी जोशी यांजकडे पाठविण्याचें ठरले आणि त्या दिवशींच्या सभेचें काम संपविण्यांत आलें.

श्री. पुंडलीकजी शेवटीं अध्यक्ष या नात्यानें म्हणाले कीं:—

" आपापल्या गांवांत जाऊन आपण लोकांमध्यें एकी घडवून आणण्याच्या कामाला लागावें. या पंचांच्या मार्फत जर तडजोड झाली नाहीं, तर आपल्याला अनेक दिव्यांतून पार पडावयाचें आहे. आपल्या सर्वांच्या एकवटलेल्या सामर्थ्यावर मी पाऊल पुढें टाकणार आहें. मी एकटा कांहींच करूं शकणार नाहीं. चळवळ अयशस्वी होईल तर माझ्यापेक्षां आपलें सर्वांचें विशेषतः आर्थिक वगैरे नुकसान कितीतरी पटीनें अधिक होणार आहे. आपल्याला शक्य तितकें कमी नुकसान पोंचावें अशीच माझी दृष्टि असणार. आपापल्या गांवांतील सर्व बातमी मात्र मला वेळेवर पोंचली पाहिजे. रा० व० कारभारी अद्याप ज्या ज्या गांवांत तरम जाहीर करावयास जावयाचे आहेत, त्या त्या गांवांनीं त्यांच्यावर पूर्ण बहिष्कार घातला पाहिजे. त्यावेळीं गांव ओस पाडलें पाहिजे."

" बार्डोलीच्या लढ्यानें देशांतील सर्वच रयतांमध्यें एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न झाला आहे. आज आपण देखील असें म्हणतांच कीं नाहीं कीं, " बार्डोलीच्या रयतांनीं सत्याग्रह यशस्वी केला, मग आम्हीं कां करूं नये ? " रयतांची तसलीच चळवळ कोठें तरी हाणून पाडल्याशिवाय रयतांना दहशत बसणार नाहीं असें इंग्रज सरकारला वाटणें साहजिक आहे. बार्डोलीनंतर तशा प्रकारची चळवळ आपल्या मिरजेमध्येंच सुरू झालेली आहे. आपण जर या लढ्यांत हार खाल्ली, तर बार्डोलीनें शेतकऱ्यांमध्यें उत्पन्न केलेला आत्मविश्वास आपण घालवाल व देशाचें अत्यंत नुकसान होईल. संस्थानिक व त्यांची प्रजा यांच्यामध्यें वेबनाव उत्पन्न झाला तर तो इंग्रजांना पाहिजेच असतो. श्री० मोडक व त्यांची पार्टी आणि त्यांना माहिती पुरविणाऱ्या अधिकाऱ्यांपैकीं एक प्रमुख अधिकारी श्री० रामभाऊ पोतनीस यांच्या माथीं हा आपल्या संस्थानमध्यें बेवनाव उत्पन्न केल्याचें पाप आहे असें पुष्कळांना वाटतें व तें खरें आहे कीं नाहीं हें आपलें मनोमन साक्ष देतच आहे. सारावाढीच्या अन्यायाबरोबर तो वेबनावही आपल्याला नष्ट करावयाचा आहे.

आपले हितकर्ते कोण व हितशत्रू कोण, हें आज संस्थानाधिपतींना कळत नाहीं. असो. आपल्यावर आज फार मोठी जबाबदारी आहे. आपल्यावरील सारावाढीच्या अन्यायाचें निराकरण करतां करतां, देशांतील शेतकरी वर्गाचा आत्मविश्वास वाढविण्याचें पवित्र कामही आपल्याला करावयाचें आहे. एकदां पाऊल पुढें टाकलेलें मागें घेतां उपयोगी नाहीं.

तडजोड न होतां करवंदी करणेंच जर आपल्याला भाग पडेल तर 'सर्व गांवांनीं सारा भरला तरी आमचें गांव सारा भरणार नाहीं आणि आमच्या गांवांतील सर्व लोकांनीं सारा भरला तरी मी स्वतः भरणार नाहीं' अशा प्रकारच्या शपथा आपल्याला घ्याव्या लागतील. याचा नीट विचार करून मग कंबर बांधा. आतां आपल्याला कंबर बांधल्याशिवाय गत्यंतर नाहीं एवढें मात्र नीट लक्षांत ठेवा. आतां अधिकाऱ्यांना वांकावयास लावल्याशिवाय गत्यंतर नाहीं. जनताजनार्दनाची शक्ति अपार आहे, हें त्यांना एकदां समजलें म्हणजे तुम्हांला त्रास होणार नाहीं. मात्र तुम्हीदेखील आपलें शील सांभाळलें पाहिजे. आपल्यांतील एकी कायम ठेविली पाहिजे. आपलें बळ एकीमध्यें आहे.

" आतां यानंतर पुढें काय काम होणार आहे तें मी आपल्याला सांगून ठेवतों. आपण आतांच निवडून दिलेले पंच कारभारीसाहेबांना पत्र पाठवितील. त्यांच्याकडून उत्तर येऊन वेळ ठरली म्हणजे श्रीमंतांना भेटण्याकरितां हे पंच जातील. तेथें काय ठरेल तें आपल्याला नंतर कळविण्यांत येईल. तडजोडीची भाषा आपल्याकडून मोडूं द्यावयाची नाहीं, एवढे धोरण आपले पंच राखतील. अशा प्रकारच्या चळवळीमध्यें समंजसपणा नेहमीं आपल्या बाजूला राहील अशी काळजी घ्यावी लागत असते."

या सभेचें काम संपल्यानंतर दुसऱ्या दिवशीं खालीलप्रमाणें पत्र कारभारीसाहेबांकडे पाठविलें गेलें.

रा० ब० जॉइंट कारभारीसाहेब, संस्थान मिरज यांचे हुजूरासः—

कृ. सा. न. वि. वि.—

आम्ही खालीं नांवें दिलेले पांच रयत आपण काल प्रसिद्ध केलेल्या जाहीर. पत्रकास अनुसरून रयतेतर्फे आपल्याकडे येत आहों. आपल्यामार्फत श्रीमंत

सरकार यांची भेट घेऊन आमच्या तक्रारींची दाद लावून घेण्याची इच्छा आहे, तरी आम्हांस वेळ कळविण्याची कृपा करावी.

१ माधव रामचंद्र देशपांडे
२ बाबाण्णा सातलिंगाप्पा घुळी
३ कृष्णाप्पा रामचंद्र कानडे
४ बाबा बाळा पाटील
५ आत्माराम इंदूराम इंगवले.

कळावें, ही विनंति. आपला

(सही) माधव रामचंद्र देशपांडे.

पंचांना श्रीमंतांची भेट करविण्याच्या उद्देशानें बोलावून नेण्यांत आलें; परंतु पुढें अधिकाऱ्यांची बुद्धि काय झाली असेल कोण जाणे; त्यांना गांवांतील एका वाड्यांत वसवून श्रीमंतांकडे दोन अधिकारी गेले. रयत-पंच बिचारे सायंकाळीं सहापर्यंत वाट पहात बसले होते. शेवटीं सायंकाळपर्यंत हिराबागेत अधिकारी व श्रीमंत यांच्यामध्यें वाटाघाट होऊन खालीलप्रमाणे रयतांना श्रीमंतांचा निरोप तोंडीं आला.

श्रीमंतांचा विक्षिप्त निरोप

" आजपर्यंत आम्हीं चळवळीच्या पुढाऱ्यांशीं संबंध ठेविला ही आमची चूक झाली. आतां त्यांच्याशीं कधींही संबंध ठेवणार नाहीं असें प्रथम लिहून दिलें पाहिजे. तें आम्ही प्रसिद्ध करणार आणि नंतर 'सरकार, आहे तो वाढलेला सारा तसाच कायमदेखील ठेवतील' अशी बुद्धि मनांत ठेवून, मी सांगेन तसें वाग-ण्याच्या हेतूनें माझ्याकडे या; नंतर मला वाटेल ती सूट मी देईन." असा आपल्या 'माबाप सरकार'चा निरोप अधिकाऱ्यांनीं रयतांच्या पंचांना कळविला. वास्तविक या निरोपाचा खरा पिता कोण होता तें एक ईश्वरालाच माहीत ! हा निरोप ऐकून रयतांना एक प्रकारची मौज वाटली व दरबारची कींव आली; परंतु एकानें 'ताळ' सोडला म्हणून दुसऱ्यानेंही तसेंच करावें हें बरें नाहीं; असा, विचार करून सभ्यपणानें रयतांनीं त्याच अधिकाऱ्यांमार्फत श्रीमंतांना उलट निरोप पाठ-विला कीं, " आपला निरोप पोंचला. आम्ही विचार करून आपल्याला कळवितों." अशा प्रकारें सरकारनें 'जाहीरपत्रकां'त पसरलेला तडजोडीचा हात खरा नसून दिखाऊ आहे असें रयतांना वाटलें असल्यास नवल नाहीं.

याप्रमाणें तडजोड मोडल्यासारखें झालें व श्रीमंतांनीं त्याचा दोषही आपल्या माथीं घेतल्यासारखा झाला; म्हणून आतां खटले वगैरे रयतांवर व रयतांच्या पुढाऱ्यांवर भरले जातील आणि गांवांतील कोणीही वकील त्यांच्यातर्फे काम चालविण्यास तयार होणार नाहींत हें जाणून बाहेरचे एखादे चांगले वकील ठरविण्यास श्री० पुंडलीकजी हे पुण्यास गेले. त्या कामाकरितां त्यांना दोनतीन दिवस पुण्यास रहावें लागले.

शेवटीं दे० भ० ल. ब. भोपटकर यांनीं खटले चालविण्यास मिरजेस येण्याचें कबूल केलें. एवढेंच नव्हे तर चळवळीविषयीं आपली मनापासून सहानुभूति व्यक्त केली. इतक्या अवधींत पुण्याहून श्रीमंतांच्या परिचयाच्या एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें श्रीमंतांची एका पत्रानें किंवा मनुष्य पाठवून कानउघाडणी केली असें समजतें. त्यामुळें तडजोडीच्या बोलण्याला दरबारकडून रयतांच्या पंचांना पुन्हा पाचारण्याचें ठरविलें गेले असें म्हणतात. रयतांतर्फे श्री० पुंडलीकजींना पुण्यास जी तार पाठविण्यांत आली, तीवरून त्याची कांहींशी कल्पना येते. ती तार अशी:—

"Chiefsaheb unwilling to reduce forty. People must visit chief today to attempt reduction or accept for. Wire your instructions and percentage. Today's visit can't be postponed."

ही तार पुंडलीकजींना पाठविण्याच्या वेळीं रयतांच्या पंचांनीं ता. १३।१२।२८ च्या सभेंत झालेल्या वाटाघाटीला अनुसरून कांहीं अटी लिहून तयार केल्या होत्या; त्या अशा:—

१. शेंकडा तीस टक्के सरासरीनें वाढ करावी व बाकीची वाढ कायमची कमी करण्यांत यावी व त्याप्रमाणें आकारबंद प्रसिद्ध करण्यांत यावेत आणि याचा अंमल चालू सालापासून व्हावा.

२. याप्रमाणें तरम जाहीर झाल्यानंतर व्यक्तिशः व गांववार तक्रारी ऐकून त्यांचा निकाल झाल्यानंतर त्याप्रमाणें वसूल व्हावा.

३. चौकशीअंतीं ठरलेल्या तरमांपैकीं प्रथम दहा वर्षें वीस टक्के वाढ द्यावी व बाकी राहिलेली पुढें द्यावी.

४. पाटस्थळाचा आकार पाणी नसल्याकारणानें कमी करावा आणि पाणी

असलेल्या वर्षी जे इसम अर्ज करून पाणी मागतील त्यांचेवर त्या वर्षापुरता आकार बसवावा.

५. तानंग व बेलवाड हीं गांवे ग्रूप नं. २ मध्यें ठेवावींत. त्याचप्रमाणें शिरढोण नं. ३ च्या ग्रूपमध्यें असावयाचें, तें नं. २ मध्यें हल्लीं घातलें आहे; तरी त्यास नं. ३ मध्यें पूर्वीप्रमाणे ठेवावें.

तडजोडीचा प्रसंग जुळून आल्यास कोणत्या अटींवर ती घडवून आणावी याबद्दल श्री० पुंडलीकजी व श्री० दादाण्णा घुळी वगैरेनीं तारेनें व पत्रानें श्री० शिखरे यांचें मत विचारिलें होते. त्यांस शिखरे यांनीं खालीलप्रमाणें श्री० दादाण्णा यांना लिहिलेल्या ता. २।१२।२८ च्या पत्रांत उत्तर पाठविलें होतें.

" आपल्या पत्रांत, तडजोडीमध्यें निर्णयाला जर गोष्टी आल्या तर काय करावयाचें, कसें करावयाचें याबद्दल माझें मत आपण विचारलें आहे व तें आपल्या दृष्टीनें योग्यच आहे. वास्तविक मी तेथें यावेळीं अंगावर जबाबदारी घेऊन काम करण्यास हजर नसतांना येथे बसून फक्त पत्रानें या गोष्टी कळविणें हें माझ्या मनाला मी बेजबाबदारीचें कृत्य करीत आहें असें वाटतें. तथापि न कळविल्यानें आपल्याला कांहीं निराळेंच वाटून गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे, म्हणून माझें मत मी स्पष्टपणें आपल्याला कळवीत आहे यावेळीं आपल्याला ही एक सबब पुढे करून निश्चित मत देण्यास दिनावधि करणें सोईचें झालें आहे व ती हीच कीं, 'शिखरे यांना कळवून त्यांचें मत आणवितों व नंतर निश्चित सांगतों'. यामुळें आपल्यालाही विचारास वेळ मिळेल. नेहमीं तडजोडीस बसतांना उभयपक्षीं अशी एक पद्धत असते कीं, आपल्याला खरोखर जें पदरांत पाडून घ्यावयाचें असतें, त्याच्यापेक्षां अधिक गोष्टी प्रथम पुढें मांडाव्या लागतात. नंतर आपण कांहीं सोडावयाच्या व दुसऱ्या पक्षाने कांहीं सोडावयाच्या व अखेर तडजोड व्हावयाची. या व्यवहारांतल्या न्यायानें मी तडजोडीकरितां आपण प्रारंभीं खालील अटी पुढें मांडाव्यात असें सुचवितों. तडजोडीस कबूल होणारांनीं आपण कांहींच सोडणार नाहीं असें म्हणून भागत नाहीं व तें व्यवहार्यही नाहीं.

१. सव्हेंचें काम बरोबर न झाल्यानें आम्हांला तक्रारी कळविण्यास निदान कायद्याप्रमाणें जी पुरेशी मुदत मिळावयाची ती मिळाली नाहीं. आकारबंद यापुढें प्रसिद्ध होऊन आमच्या व्यक्तिशः तक्रारी कळविण्यासही मुदत कांहींच राहिली नाहीं. याकरितां या सालीं वाढीचा विचारच करण्यांत येऊं नये.

२. ग्रूप्स् पूर्वीच्या सव्हेंचेंच कायम ठेवण्यांत यावेत.

३. हल्लीं मिरज तालुक्याची जी ५६ टक्के वाढ जाहीर केली आहे ती फक्त जास्तींत जास्त पंचवीस टक्के कायम करावी.

४. ही वाढ कायद्याला धरून हप्त्याप्रमाणें (इगतपुरी कन्सेशन) वसूल करावी.

५. सर्व ठिकाणचें पाटस्थळ अजीबात नाहींसें करावें.

६. मालगांवला मोटस्थळचा आकार पूर्वीचाच फार तर कायम असावा. वाढ मुळींच घेण्यांत येऊं नये.

७. कायद्याप्रमाणें ३० वर्षांची ग्यारंटी द्यावी.

८. ज्या ज्या गांवीं समजून अगर न समजतां सव्हें पार्टीकडून मोजणी, मोटस्थळ वगैरे बाबतींत अन्याय झाला असेल, त्याची दाद लावण्याकरितां एक अधिकारी व एक रयतेचा प्रतिनिधि या दोघांची कमिटी नेमण्यांत यावी.

९. जी तडजोड ठरेल त्याप्रमाणें एक अधिकारयुक्त जाहीरनामा तडजोड ठरल्या दिवसापासून चार दिवसांत चोहोंकडे प्रसिद्ध झाला पाहिजे.

मी आज तिकडे नाहीं, यामुळें एखादा मुद्दा चुकून राहिला असल्यास आपण सर्वांनीं तो घालावा व याप्रमाणें अटी पुढे मांडाव्यात. यापुढें या तडजोडीच्या शेषांत वेळ फार मोडणें ठीक नाहीं हें विसरून चालणार नाहीं.

वरीलपैकीं देवघेव म्हणून पहिला मुद्दा व चौथा मुद्दा सोडण्याचा प्रसंग आल्यास सोडण्यास हरकत नाहीं. बाकीचे मुद्दे सोडून चालणार नाहीं. आतांपर्यंत रयतांना या बाबतींत किती त्रास व नुकसान पोंचलें आहे याचा विचार करतां पहिल्या मुद्द्यावर जोर दिला पाहिजे; परंतु सरकार तडजोड करण्यास तयार झालें म्हणून तो अगदीं अखेरीस सोडून द्यावयाचा. हप्त्याची बाब सरकार रयतेच्या हिताच्या कांहीं सुधारणा करणार म्हणून सोडून द्यावयाची.

वरील तडजोडीच्या अटींत १० दहावी अट खालीलप्रमाणें घालावी.

१०. सारावाढीचें सर्व उत्पन्न रयतेच्या कल्याणाकरितांच खर्च केलें जाईल असें जाहीरनाम्यांत आश्वासन दिलें पाहिजे.

हीही अट आज तडजोडीच्या वेळीं सोडून देण्यास हरकत नाहीं. कारण आज नाहीं उद्यां त्यांना कांहीं सुधारणा कराव्याच लागणार आहेत व आपल्यामधील आजची जागृति व संघटणा कायम टिकेल तर आपण आपल्या रयतेच्या कल्याणा-

च्या योग्य त्या सुधारणा सरकारला करावयास लावूं. आपण त्याबद्दल यावेळीं आग्रह धरण्याचें कारण नाहीं.

याप्रमाणें मीं माझें मत स्पष्ट शब्दांत कळविलें आहे आपणां सर्वांस पसंत पडल्यास ठीक आहे. याचा स्फोट होऊन त्या अधिकाऱ्यांच्या कानावर आगाऊ जाऊं नयेत इतकी सर्वांनीं दक्षता जरूर घ्यावी. यावेळीं फार हुषारीनें व सावधपणानें वागलें पाहिजे. आपण सर्व मंडळी आतां तयार झालां आहां. अधिक लिहिण्याचें कारण नाहीं."

असो. इकडे पुण्यास श्री० पुंडलीकजी यांना रयतांची तार पोंचतांच सर्व परिस्थितीची त्यांना कल्पना आली. 'रयतांचे पंच तसाच प्रसंग आल्यास ता. १३।१२।२८ च्या सभेंतील निर्णयाप्रमाणें वागतील व त्यापेक्षां विशेष कांहीं निराळी परिस्थिति उत्पन्न झालेली असल्यास आपण प्रत्यक्ष रयतांना भेटेपर्यंत सर्वच काम ते कांहींही करून तहकूब ठेवतील' असें जाणून श्री० पुंडलीकजी यांनीं पुण्याहून जी रयतांना तार दिली ती खालीलप्रमाणें होती:—

"Call all village leaders Miraj tomorrow noon. myself coming."

या तारेंतील आशय रयतांच्या पंचांनीं बरोबर जाणला व त्यांनीं सोमवारीं श्रीमंतांना भेटण्याचें टाळलें.

येथें एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे कीं, श्री० बाबूराव जोशी कारभारी झाल्यांपासून चळवळ पूर्णपणें यशस्वी व्हावी अशा अंतःकरणपूर्ण सहानुभूतीनें तिच्याकडे पाहाणारे व चळवळींतील पुढाऱ्यांचे स्नेही यांच्यामध्यें, ते श्री० जोशी यांचेही स्नेहीच असल्यानें, बाबूरावांच्या कारकीर्दीची सुरुवात चांगल्या प्रकारें व्हावी व त्यांची इज्जत कमी होऊं नये ही दृष्टि उत्पन्न झाली ! यामुळें चळवळीची यशस्विता व बाबूरावांच्या कारकीर्दीची यशस्विता असे दोन भाग अशा स्नेही मंडळींच्या अंतःकरणांत पडले, यामुळें 'चळवळ संपूर्ण यशस्वी व्हावी' हा निर्दिध्यास अर्थात् कमी झाला व त्याप्रमाणें ते श्री० बाबूरावांच्याकरितां खटपट करूं लागले व हा खटपटीचा भाग रयतांच्या पदरांत पुरें व्यावहारिक यश न पडण्यास थोड्या अंशीं कारणीभूत झाला असा पुढें फार बोभाटा झाला !! असो. श्रीमंतांना सोमवारीं भेटण्याचें जरी पंचांनीं टाळले तरी वरील अटी (ता. १३।१२।२८ च्या सभेंत ठरलेल्या) श्रीमंतांकडे पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं असें ठरून त्या

अटींचा मसुदा श्रीमंतांकडे पाठविण्याकरितां तयार झाला. मसुदा तयार करतांना पहिल्या अटीची भाषा थोडी बदलावी असें ठरून "शेंकडा तीस टक्के सरासरीनें वाढ करावी" असें लिहिण्याच्या ऐवजीं "२६·४ टक्के वाढ कमी करावी" असें लिहून आपण सुटीच्या भाषेंत बोलावें असं मुक्रर झालें. दप्तरीं असलेल्या मूळच्या मसुद्यांत अगदीं सरळ 'शेंकडा तीस टक्के सरासरीनें वाढ करावी व बाकीची वाढ कायमची कमी करण्यांत यावी' असें शब्द आहेत. परंतु ते शब्द चळवळीशीं समरस झालेल्या एका वकिलांनींच खोडून, तेथें "२६·४ वाढ कायमची कमी करावी" असे शब्द स्वहस्तानें घातले आहेत. सर्वांचेच दुर्दैव असें कीं, त्यावेळीं तो 'शेकडा' शब्द गाळण्याचें चुकून राहिलें. 'ध'चा 'मा' सारखाच येथें प्रकार झाला; परंतु तो केवळ नजरचुकीनें झाल्यानें त्याबद्दल कोणालाच दोष देतां येत नाहीं व यामुळे झालेल्या नुकसानीचें पाप कोणाही एका व्यक्तीच्या माथीं बसणार नाहीं हें खास. श्रीमंतांकडे तसा तो कागद गेल्यावर त्यांना आयतेंच बरें झालें ! पण प्रतिपक्षाचा सरळपणा जेथें आपल्या नजरेला येईल तेथे तो प्रांजलबुद्धीनें कबूलही पण केला पाहिजे. सत्याग्रही मनुष्याचा तो धर्मच आहे. श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या नजरेला ही लेखकाची चूक आणतांच त्यांना ती पटली असें म्हणतात. आणि त्यांनीं ती तशी अट रयतांकडून लिहून आली आहे या केवळ सबबीवर रयतांकडून ती मान्य करविण्याचा हट्ट धरला नाहीं असें म्हणतात. याप्रमाणें हें प्रकरण येथेंच संपलें.

श्री० पुंडलीकजी सकाळीं १०–३० च्या गाडीनें ता. १७।१२।२८ रोजीं मिरजेस येऊन पोंचले. त्यांच्या तारेप्रमाणे गांवोगांवचे रयत मिरजेस डॉ० जोशी यांच्या दिवाणखान्यांत वाट पहात एकत्रित बसले होते. श्री० पुंडलीकजी यांनीं एकंदर परिस्थिति समजून घेतली. "रयत व रयतांचे पुढारी एक पैदेखील सारावाढ होऊं नये म्हणतात. रयत तडजोडीला जातील म्हणून त्यांचे चळवळे पुढारी त्यांना श्रीमंतांना किंवा अधिकाऱ्यांना भेटूं देत नाहींत. आपल्या स्वतःच्याच मध्यस्थीनें हें प्रकरण संपलें पाहिजे असा अहंकारी आग्रह चळवळीच्या पुढाऱ्यांनीं धरल्यामुळे हें प्रकरण इतकें वाढलें आहे. तडजोड करून रयतांना संतुष्ट केलें तरी पुन्हा चौकशीचा आग्रह धरण्यास त्यांना उपदेश करण्यांत येईल." अशा प्रकारच्या बाजारगप्पा गांवांत पसरल्या आहेत व पुण्याहून एका पुढाऱ्याकडून आलेल्या मनुष्यालाही अशा प्रकारचें सांगून त्यांचें मन कलुषित करण्यांत आलें

आहे अशी परिस्थिति श्री० पुंडलीकजींच्या नजरेस आली. असल्याच कांहीं तरी काल्पनिक सबबींवर अधिकारी तडजोड मोडून त्याचा दोष रयतांवर लादण्यांत येईल हें जाणून श्री० पुंडलीकजींनीं एक जाहीरपत्रक आपल्या सहीनें काढलें. तें त्यांनीं प्रथम, जमलेल्या लोकांना समजून सांगितलें. त्याचा परिणाम काय होईल हेंही लोकांच्या प्रथम निदर्शनास आणिलें; एवढेंच नव्हे, तर त्या पत्रकांत रयतांनीं कांहीं बदल सुचविला त्याचाही त्यांत समावेश करून नंतर तें पत्रक छापवून आणविलें व ताबडतोब रयतांमध्यें वांटण्यांत आले. असो. इतक्यांत श्रीमंतांकडून रयतांच्या पंचांना हिराबागेत बोलावणें आलें. श्री० पुंडलीकजींनीं काढलेलें पत्रक खालीलप्रमाणें आहे:—

व्यर्थ गैरसमज नको !

मिरज संस्थानांतील सारावाढ आतां अखिल महाराष्ट्राच्या परिचयाची झालेली आहे. हल्लीं श्रीमंत सरकार मिरज संस्थानचे अधिपति यांनीं असें आश्वासन दिल्याचे समजतें कीं, फक्त रयतेपैकीं रयतेचे प्रतिनिधि म्हणून चार प्रमुख लोक आपल्याकडे आल्यास त्यांची भेट घेऊन सामोपचारानें सारावाढीच्या प्रकरणांत योग्य तो न्याय आपण करूं व रयतेचें कांहींतरी समाधान होईल अशींच तडजोड निघेल. मी व माझे सहकारी या चळवळींत पडलों त्याचा हेतु झाला तरी रयतेला न्याय मिळावा व त्यांचें समाधान व्हावें इतकाच होता. आणि तीं गोष्ट माझ्या अलिप्त राहाण्यानें अधिक शीघ्र साध्य होणार असेल तर मी तसें करण्यास केव्हांही तयार आहेंच. म्हणून ही तडजोड होईल या आशेनें मी या चळवळी-पासून तूर्त अलिप्त राहून पाहात आहें.

माझ्या मताविषयीं निष्कारण गैरसमज पसरविण्यांत येत आहे असें माझ्या निदर्शनास आले असल्यामुळे मी आज या ठिकाणीं माझें स्पष्ट मत पुन्हा एकवार जाहीर करीत आहें. आतांपर्यंत रयतांनीं अत्यंत शांतपणें चालविलेली चळवळ कोणासही समाधानकारकच वाटेल. श्रीमंतांच्या आश्वासनाप्रमाणें फेरचौकशीचा आग्रह रयतांनीं हरएक प्रसंगीं व्यक्त केला आहे. तो व्यक्त करितांना रयतांची जूट व समजूतदारपणा कसाला लागला असून त्यांत त्यांना चांगलेंच यश आलें आहे. तथापि तडजोडीनें हें प्रकरण मिटत असेल तर कोणीही फेरचौकशीबद्दल आग्रह धरूं नये असें माझें मत आहे. त्याचप्रमाणे तडजोड करितांना आपल्यावर कांहींच सारावाढ होऊं नये असें कोणीही व केव्हांही म्हणूं नये. रयतांची

हलाखीची स्थिति, पोटाची दैना, कर्जबाजारीपणा, शेतीमधील नुकसान आणि दुष्काळ या गोष्टी मी विसरूं शकत नाहीं. त्या दृष्टीनें पाहातां सारावाढीला अनुकूल मी कसें बोलूं ? तथापि कांहींच्च सारावाढ होऊं नये असा दावा, रयत बंधूनो, आपला चालणार नाहीं, तितकें आपलें सुदैव नाहीं व सामर्थ्यही नाहीं.

मग सारावाढ किती असावी एवढाच प्रश्न आहे. खुद्द श्रीमंतांशीं वाटाघाट करून रयतांनीं कांहींही तडजोड कबूल केली तरी त्याला माझी हरकत नाहीं. आजपर्यंत श्रीमंतांनीं सारा वाढविला नाहीं, इतर कोणतेही कर बसविले नाहींत, आणि आतां संस्थानांत श्रीमंत सुधारणा करूं इच्छितात. या गोष्टी ध्यानांत घेऊन रयतांनीं आपल्या कुवतीपेक्षां दोन टक्के अधिक सारा आपल्याला वाढवून घेतला तर त्यांत मला वाईट वाटणार नाहीं. आणि याच्या उलट दुष्काळांत सुद्धां रयतांनीं सारा भरण्यास कधींही नकार दर्शविला नाहीं. इतरांपेक्षां कित्येक ठिकाणीं आपण अधिक जबर सारा भरत आहों याबद्दल तोंडांतून ब्र काढलें नाहीं, कित्येकांनीं कर्ज काढून खंड व सारा भरलेला आहे. या व इतर गोष्टी जमेस धरून श्रीमंतांनीं रयतावर कृपाळु होऊन सारावाढ शक्य तितकी कमी केली तर त्यांच्याविषयींचा माझा अभिमान शतपटीनें वृद्धिंगत होईल. बिलकुल सारा वाढवूं नये असें मीं केव्हांही म्हटलें नाहीं. व म्हणूंही शकत नाहीं. रयतांनीं स्वतंत्रपणें श्रीमंतांकडे जावें व आपली दाद लावून घ्यावी. माझ्या मध्यस्थीशिवाय हें काम उभयपक्षीं तडजोडींत निघेल तर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. पण तशी तडजोड न होईल तर, आणि न्याय्य व योग्य सारावाढ कबूल करण्यास रयत सिद्ध असल्यामुळें मी केव्हांही रयतेच्या सेवेस पूर्ववत् सादर आहें, एवढेंच आश्वासन या लेखानें देऊन ठेवीत आहें.

आपला

पुंडलीक कातगडे.

सायंकाळीं सहाच्या सुमारास रयतांचे पंच हिराबागेकडे जाण्याकरितां निघाले. त्यावेळीं त्यांतील एक पंच कोठें गेले त्यांचा पत्ताच लागेना म्हणून त्यांच्या जागीं शिरढोणचे श्री० ज्ञानोबा जयराम पाटील यांना सर्वानुमतें निवडलें व पंच म्हणून त्यांची रवानगी झाली. इतक्यांत डॉ० जोशी यांच्या घरांत बसलेल्या सर्वच रयतांना हिराबागेंत बोलावण्यांत आलें; परंतु त्यांतील जे कोणी पांच लोक आपल्याला अनुकूल होतील त्यांच्याच सह्या घेऊन त्यांनाच पंच म्हणून समजून वाटेल ती तडजोड करून ती रयतांच्या माथीं मारण्याची कारवाई होणें अगदींच

अशक्य आहे असें नाहीं; असें रयतांना व इतरांना वाटल्यामुळें पांच पंचांशिवाय कोणासही हिराबागेंत पाठविण्यांत आलें नाहीं. लोकनियुक्त पंचांनीं तेथें गेल्यानंतर काय कामगिरी केली हें वाचकांना नीट कळण्याकरितां, त्या पंचांनीं सत्याग्रह कचेरींत जी 'स्टेटमेंट' दिली आहे तीच जशीच्या तशी या ठिकाणीं देतों. पंचांचा लेख खालीलप्रमाणें आहेः—

"श्रीमंत सरकारकडून आम्हां पंचमंडळींना पुन्हा मंगळवारीं निमंत्रण आल्यानंतर आम्हीं पांच पंच श्री० पुंडलीकजींचा निरोप घेऊन हिराबागेकडे जाण्याकरितां निघालों. जाण्याच्यापूर्वी सर्व मंडळीसमक्ष श्री० पुंडलीकजी यांनीं 'तीस टक्केपर्यंत वाढ कबूल करा व श्रीमंत चाळीसाचाच आग्रह धरून बसले तर, पहिलीं दहा वर्षें वीस टक्के व पुढें दहा वर्षें चाळीस टक्के असें कबूल करावयास हरकत नाहीं. आणि एवढ्यावरही जर तडजोड होत नसेल तर तडजोडीचें बोलणें न मोडतां परत निघून या. नंतर सर्व मिळून पुन्हा विचार करून पुढें काय उत्तर द्यावयाचें तें देऊं' असा निरोप आम्हां पंचांना दिला. नंतर आम्ही श्री० रामभाऊ जोशी यांच्या घरीं गेलों. कारण श्रीमंतांकडून तेथेंच मोटार यावयाची होती. त्या ठिकाणीं आम्ही अर्धा तासपर्यंत बसलों. नंतर श्री० दप्तरदार हे मोटार घेऊन आले व पंचांकरितां मोटार आणण्याकरितां पुन्हा परत गेले. जातांना त्यांनीं सांगितलें कीं, 'आपली जी कांहीं रयत मंडळी असतील त्या सर्वांना आपल्याबरोबर घेऊन चला, कारण आज सर्वांचें भोजन तेथेंच होईल' म्हणून आम्ही श्री० बाबा बाळा पाटील यांना रयतांना बोलावण्याकरितां पाठविलें; परंतु कोणीही रयतांनीं श्रीमंतांकडे जाण्याचें कबूल केलें नाहीं. केवळ पंचांनींच जावें असें ठरलें. त्याप्रमाणें भाड्याच्या मोटारींतून आम्हांला श्री० दप्तरदार यांनीं हिराबागेत नेलें. आमच्या मोटारीबरोबर श्री० दप्तरदार हे दुसऱ्या मोटारींत होते. हिराबागेंत आम्ही सायंकाळीं ७–३० वाजतां पोंचलों. प्रथम आम्ही श्रीमंत तात्यासाहेब महाराज यांच्या बंगल्यांत गेलों. श्री० दप्तरदार यांनीं आम्हीं पंच मंडळींना तेथेंच बसावयास सांगितलें व आपण श्रीमंत तात्यासाहेबांना बोलावून आणण्यास ते गेले. आम्ही बसलों होतों त्याच ठिकाणीं रा० ब० कारभारी जोशी हेही होते. सुमारें अर्ध्या तासांत श्री० दप्तरदार हे श्रीमंत तात्यासाहेबांना तेथें घेऊन आले. तोंपर्यंत आम्ही पंचमंडळी व सारभारी हे या सारावाढीची वाटाघाट करीतच बसलों होतों. वाटाघाटींत अनक गोष्टींबरोबर रा० ब० कारभारीसाहेबांना आम्ही

श्रीमंतांच्या ४० टक्क्यांच्या आश्वासनाची खरी माहिती विचारली. त्यावेळीं "सरकारांनीं ४० टक्के आमच्याजवळ कायमचे कबूल केले नव्हते. पहिल्या वर्षीं ४० टक्के व पुढें ५६ टक्के किंवा फार तर पांच सहा टक्के सोडूं असें कबूल केलें होतें." असा खुलासा श्री० कारभारीसाहेबांनीं आम्हां पंच मंडळींना कळविला. तानंग, बोलवाड व शिरढोण या गांवांचे गट बदलून त्यांना खालच्या गटांत घातलें पाहिजे असें आम्हीं कारभारीसाहेबांजवळ बोललों होतों. अन्याय लोकांवर किती व कसा झाला आहे व तो सर्व अन्याय दूर करण्यास काय काय करावें लागेल वगैरे सर्व गोष्टी आम्ही बोलत बसलों होतों; इतक्यांत श्रीमंत तात्यासाहेब व दप्तरदार मोटारींतून आले. आम्ही सर्व पंच, रा० ब० कारभारीसाहेब व श्रीमंत तात्यासाहेब इतकींच मंडळी त्या ठिकाणीं होतों, 'आम्हांवर अन्याय झाला असून आपण थोरल्या श्रीमंतांना सांगून हा आपल्याच प्रजेवरील अन्याय दूर करा' असें आम्हीं सर्वांनीं त्यांना विनविलें. त्यांनीं नंतर सर्व पंचांचीं नांवें वगैरे विचारून घेतलीं. नंतर श्रीमंत सरकार यांच्याकडे आम्ही आपापल्या मोटारींतूनच गेलों. "श्रीमंत पांचव्या मजल्यावरून खालीं येऊं देत, कां आपणच वर येतां?" असा प्रश्न आम्हा पंच मंडळींना विचारण्यांत आला. आम्हींच वर जाण्याचें कबूल करून आम्ही वर गेलों.

आमच्यापैकीं एका पंचानें श्री० बेडेकर (आजचे सिटी मॅजिस्ट्रेट व माजी मामलेदार–यांनाच रामभाऊ पोतनीस म्हणतात.) हे तडजोडीच्या वेळीं हजर असतां उपयोगी नाहींत अशी आग्रहाची इच्छा प्रदर्शित केली होती, म्हणून त्यांना या वाटाघाटींत स्थान नव्हतें. असो. आम्ही पांच पंच, श्रीमंत तात्यासाहेब व कारभारीसाहेब वर चौथ्या मजल्यावर येईपर्यंत आम्ही दरवाजांत उभे होतों. ते आल्यानंतर आम्ही सर्व त्यांना नमस्कार करून त्यांच्यापाशीं बसलों. "या सारावाढीच्या बाबतींत अत्यंत अन्याय झाला असून, आम्ही आणखी कांहीं दिवस जगावें असें आपल्याला वाटत असल्यास, आपण आम्हांवर दया करून हा अन्याय दूर केला पाहिजे." असें आम्हीं त्यांना परोपरीनें विनवून सांगितलें. प्रथम श्रीमंत सरकार यांनीं श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांना बोलावयास सांगितलें त्यावेळीं श्रीमंत तात्यासाहेब यांनीं "वाढीपैकीं शेंकडा २५ टक्के सोडावयाचे." असें सांगितलें. आम्हां पंचांना त्याचा अर्थ कळला नाहीं म्हणून आम्हीं पुन्हा विचारलें. त्यावेळीं 'वाढीपैकीं बारा आणे आम्ही घ्यावयाचे व चार आणे सूट

द्यावयाची' असा खुलासा तात्यासाहेबांनीं केला व श्रीमंत सरकार यांनीं मोठ्यानें 'मला कबूल' असें आपल्या तोंडानें सांगितलें. 'तुम्हाला कबूल असल्यास पहा, असें त्यांनीं बजाविलें. "यापेक्षां अधिक सूट देतां येत नाहीं, तर निदान आम्हीं जगावें म्हणून प्रथम दहा वर्षें वीस टक्के व नंतर बाकीचे घ्या" अशी मागणी आमच्यापैकीं श्री० माधवराव देशपांडे यांनीं श्रीमंत सरकारकडे केली. त्यासही त्यांनीं 'बरें' असें उत्तर दिलें. 'तानंग–बोलवाड–शिरढोण या तीन गांवांवर तर भयंकर अन्याय झाला आहे; तेव्हां त्या गांवांना त्याच्या पूर्वीच्या खालच्या गटांत घालावे' अशीही सूचना श्रीमंतांपुढें केली होती; त्यालाही रुकारार्थी होकार मिळाला होता. "ती सर्व माहिती श्रीमंत तात्यासाहेब, पहातील. त्यांच्यापाशीं जाऊन काय तें ठरवून घ्या" असें श्रीमंत सरकार यांनीं सांगितलें व आपण स्वतः निघून गेले. नंतर श्रीमंत तात्यासाहेब, कारभारी व आम्ही पंच माडीवरून खालीं आलों. नंतर श्रीमंत तात्यासाहेब आपल्या मोटारीच्या बाजूला गेले व श्री० बाबाण्णा घुळी यांना त्यांनीं बोलावून घेतलें. आतांपर्यंत आम्ही पंच कारभारी किंवा श्रीमंत सरकार व युवराज यांच्यामध्यें जी वाटाघाट झाली होती किंवा अटींचा उल्लेख झाला होता किंवा सूट काय द्यावयाची ठरली होती, याचपैकीं प्रत्यक्ष कागदावर एक अक्षरही अद्यापपर्यंत आजच्या वाटाघाटींत आलेलें नव्हतें.

श्री० बाबाण्णा व युवराज श्रीमंत तात्यासाहेब हे एका बाजूस बोलत बसले होते व कारभारीसाहेब आमच्या भोजनाच्या तयारीला लागले होते. 'प्रथम हें सारावाढीचें जेवण संपून जाऊं द्या व मग तें जेवण पाहातां येईल' असें आम्हीं चार पंचांनीं सांगितलें. नंतर कारभारीसाहेबदेखील, तात्यासाहेब–बाबाण्णांच्या बाजूला गेले. दहा पंधरा मिनिटांनीं श्री० बाबाण्णा आमच्याकडे आले. श्रीमंत तात्यासाहेब व श्री० बाबाण्णा घुळी यांची स्वतंत्र वाटाघाट सुमारें पाऊणतास चालली होती.

श्रीमंत तात्यासाहेब व कारभारीसाहेब यांनीं अटींचा मसुदा तयार करून आम्हां पंचांना तो सांगण्यास कारभारीसाहेब आले. "दहा वर्षेंपर्यंत वीस टक्क्यांची आमची मागणी असतांना आपण ३५ टक्के काय केलेत व तेही एक वर्षापुरते!" "तानंग, बोलवाड व शिरढोण यांतील गांवांवरील अन्यायाचा विचार होऊन त्यांचा तरी विचार करीत नाहीं काय!" असे प्रश्न विचारण्यांत आले. परंतु 'तें कांहींच होणार नाहीं' असें आम्हांला सांगण्यांत आलें. "आमच्यांतील

सुटीपैकीं अर्धाआणा काढून तानंग–बोलवाड–शिरढोण यांची सूट अधिक करा " असेंही आम्हीं शेवटीं सांगून पाहिलें; परंतु त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. 'आम्हांला चार आणे सूट दिली आहे त्याप्रमाणें या तीन गांवांना आठ आणे–निदान सहा आणे तरी सूट सोडा' अशी मागणी आम्हीं करून पाहिली; परंतु तीही मान्य झाली नाहीं. शेवटीं 'सरकार अद्यापपर्यंत उपवासी आहेत, तेव्हां होय कीं नाहीं तें सांगा' असें बोलून कारभारीसाहेब परत श्रीमंत तात्यासाहेबांकडे गेले. नंतर आम्ही सर्व पंच मिळून विचार करीत बसलों. ज्या अटी कारभारीसाहेबांनीं लिहून आणिल्या होत्या, त्यांत कमी अधिक कांहींही होणार नाहीं असें आम्हांस कळविलें होतें. त्या अटी कबूल आहेत किंवा नाहींत याचा निकाल आमच्यापासून घेण्याचीच घाई सारखी चाललेली होती. श्री० बाबाण्णांनीं या अटी इतर पंचांना समजावून सांगण्याचें काम चालविलें होतें वैयक्तिक तक्रारी ऐकून घेतल्यानंतर आणखी कांहीं कमी होईल म्हणून या अटी मान्य करूं या, अशी समजूत इतर पंचांची घालण्याचा अट्टाहास श्री० बाबाण्णांनीं चालविला होता. शेवटीं आम्हीं सर्व पंचांनीं त्या अटींना नाइलाजानें मान्यता दिली.

वैयक्तिक तक्रारी करण्याचे कामीं आपण सर्वांना मदत करूं व त्यांत आपल्या-वरील अन्याय दूर होईल अशा अपेक्षेनें आम्ही सर्व पंचांनीं तडजोडीच्या अटीं-वर सह्या केल्या. त्यानंतर त्याच्याच खालीं श्रीमंतांचा हुकूम कारभारीसाहेबांना झाला व त्यावर त्यांची सही झाली. व नंतर तो कागद पुन्हा आम्हांस वाचून दाखविला.

त्या कागदाची नक्कल घरीं काढवून देऊं असें कारभारी साहेबांनीं आम्हांला सांगितलें व प्रथम सर्वांना भोजनास बोलाविलें. त्यावेळीं श्री० दप्तरदार यांनीं विचारलें कीं, " आतां श्री० रामभाऊ पोतनीस आले आहेत. ते तुमच्याबरोबर जेवणास आले तर चालतील काय ? नको असल्यास तें रहित करूं." परंतु आम्हीं उत्तर दिलें कीं, " आतां आमचें काम झालें आहे. आतां कोणीही आले तरी आमची हरकत नाहीं. ते येऊन जेऊन जाईनात, त्यांत आमचें काय जातें ! आमची मुळींच हरकत नाहीं." इतक्यांत सरकारनीं सर्व पंचांना वर चौथ्या मजल्यावर बोलाविलें. इतकी रात्र होईपर्यंत सर्व मंडळी उपवासीच होती. सर्व मंडळींचें मिळून भोजन झालें व शेवटीं सर्व श्रीमंतांचा निरोप घेऊन मोटारींनें

गांवांत श्री० कारभारीसाहेबांच्या घरीं गेले व तडजोडीच्या कोल्हापुरच्या नेकला घेतल्यानंतर डॉ० जोशी यांच्या घरीं येऊन सर्वांना झालेली हकीगत सांगितली.

सह्या—

माधव रामचंद्र देशपांडे —कवठेमहांकाळ
बाबा बाळा पाटील —ढालगांव
कृष्णा रामचंद्र कानडे —तासगांव
बाबाण्णा सातलिंगप्पा घुळी—मालगांव
ज्ञानदेव जयराम पाटील —शिरढोण

लागलीच पहांटे अधिकाऱ्यांनीं जाहीरनामा लिहिला व छापखान्याकडे पाठविला. जी भाषा मूळ कागदामध्यें मुळींच नाहीं किंवा लोकांना दोष देण्याच्या ज्या भानगडींत श्रीमंत पडले नाहींत, त्यामुळें कदाचित् जनता श्रीमतांची स्तुति करील किंवा लोक त्यांना चांगले म्हणतील, या भीतीनेंच कीं काय, अधिकाऱ्यांनीं जाहीरनाम्याची भाषा चळवळीच्या पुढाऱ्यांना लागेल अशी घालून आपल्या शीलाची रयतांना प्रचीति आणून दिली. 'पुढाऱ्यांशीं आम्ही बोलावयास तयार नाहीं, रयतांचे पंच आमच्याकडे येतील तरच आम्ही बोलूं असें म्हणावयाचें व पुढाऱ्यांच्या संमतीनेंच रयत त्यांना स्वतंत्रपणें भेटावयास गेल्यावर जाहीरनाम्यामध्यें लोकांना लागेल अशी भाषा वापरणें' यांतील विसंगतता किंवा मनाचा कोतेपणा लोकांना कळल्याशिवाय कसा राहील ! परंतु या जाहीरनाम्याचा परिणाम एवढाच झाला कीं, महाराष्ट्रांतील कोणत्याही पत्रानें श्रीमंतांचें तडजोडीबद्दल अभिनंदन तर केलें नाहींच; पण जाहीरनाम्यांतील भाषेबद्दल टीका मात्र केली, तो जाहीरनामा असा आहेः—

जाहीरनामा

स्टेट कारभारी, मिरज यांजकडूनः—

"तमाम लोकांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, दिवसेंदिवस महर्गतेचें मान अधिकाधिक वाढत जात असून संस्थानच्या खर्चाच्या गरजाही वाढत आहेत. यामुळें संस्थानचें उत्पन्न वाढविल्याखेरीज मार्ग राहिला नाहीं. संस्थानच्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं मुख्य बाब काळीचा वसूल ही असून या संस्थानांत मूळ सर्व्हे होऊनही साठ वर्षें झालेलीं आहेत. यामुळें रिव्हिजन सर्व्हे करून संस्थानचें

उत्पन्न वाढविणें कोणत्याही रीतीनें गैर नसल्यानें ब्रिटिश सरकाराकडून सर्व्हे पार्टी मागवून घेऊन या संस्थानामधील रिव्हिजन सर्व्हे करण्यांत आली.

" सदरप्रमाणें रिव्हिजन सर्व्हे करण्यांत येऊन त्याजबद्दलचे जाहीरनामे इकडून प्रसिद्ध करण्यांत आल्यानंतर कांहीं गांवच्या रयत लोकांकडून तक्रारीअर्ज आले त्यांत सर्व्हेचा रिपोर्ट चुकीचा, वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा अतएव बेकायदेशीर आहे व त्याजवर अवलंबून केलेली सारावाढ बेसुमार असून कायदेशीरही नाहीं वगैरे गोष्टी नमूद आहेत. हे अर्ज जरी निरनिराळ्या गांवचे आहेत तरी ते एकाच मजकुराचे छापील आहेत. संस्थान मजकुरीं गेल्या साठ वर्षांत सारावाढ करण्यात आली नव्हती ही गोष्ट डोळ्याआड करून खालसा मुलुखांत दर तीस वर्षांनीं रिव्हिजन सर्वे होत असते व त्यास अनुसरून वाढीच्या टक्क्याबाबत जे तिकडील नियम आहेत ते या संस्थानास लागू समजून झालेली वाढ बेसुमार आहे असे म्हणणे केव्हांही न्याय्य व बरोबर होणार नाहीं.

संस्थानमजकुरीं विद्यमान असलेली परिस्थिति व संस्थानच्या गरजा व संस्थानिक व संस्थानी प्रजा यांमधील आपलेपणाचा भाव यांची योग्य ती जाणीव मनांत नसल्यानें कांहीं लोकांनीं अजाण रयतेची भलतीच समजूत करून दिली व त्याचा अखेर परिणाम असा झाला कीं, श्रीमंत सरकार यांच्या राहत्या बंगल्यानजीक रयतेनें बसून आपणां स्वतांस त्रास करून घेतला व त्यामुळें श्रीमंतासही साहजिकच त्रास झाला. तथापि श्रीमंतांनीं आपले मनाचा समतोलपणा कोणत्याही परिस्थितींत मुळींच ढळूं न देतां शांतवृत्तीनेंच रयतांस त्या लोकांचा नाद सोडून देऊन दाद मागण्यास आल्यास आपण विचार करण्यास केव्हांही तयार आहों असें वेळोवेळीं सांगितलें. परंतु त्यावेळीं ती गोष्ट रयतेस पटली नाहीं, परंतु अलीकडे वसुलाचे दिवस जसजसे जवळ येत चालले तसतसे चळवळे लोकांनीं घालून दिलेल्या मार्गानें गेल्यास कांहीं फलनिष्पत्ति होईल असें दिसेना व लोकांसही कांहीं मार्ग सुचेनासा झाला, व अखेर रयतेस श्रीमंताशिवाय दुसरा कोणी वाली न राहिल्यामुळें ते श्रीमंत सरकार व श्रीमंत तात्यासाहेबांचे हुजुरास गेले व त्यांनीं आपली चूक कबूल केली. श्रीमंतांनींही रयतेकडून जरी चुका जाहल्या असल्या तरी त्या बिलकूल मनांत न आणतां रयतेला त्यांच्या चुकीबद्दल माफी करून त्यांचें म्हणणें साग्रपणें ऐकून घेतलें. त्या म्हणण्याबद्दल विचार केला व दया दाखवून, उभयतांमध्यें एकवाक्यता होऊन खालीलप्रमाणें श्रीमंतांनीं करण्याचें ठरविलें.

१ ओरिजिनल सर्व्हेचे आकारापेक्षां रिव्हिजन सर्व्हेमध्यें जी वाढ झाली आहे. त्या वाढीपैकीं शेंकडा २५ प्रमाणें माफ करून बाकी वाढ ओरिजिनल/ आकारा-सह वसूल करावी.

२ चालू सन १३३८ फसली एकसाल रिव्हिजन सर्व्हेमध्यें झालेल्या वाढीपैकीं ३५ टक्के रक्कम वसूल करावी. सन १३३९ फसली सालापासून कलम १ यांत ठरल्याप्रमाणें सर्व आकार साल दरसाल मुदतीअखेर वसूल करावा.

३ पाटस्थळ व मोटस्थळ वगैरेसारख्या ज्या वैयक्तिक तक्रारी असतील त्या-बद्दलचा विचार अलाहिदा करण्यांत येईल. सदरहू विचार होईपर्यंत तक्रारी असले-ल्या लोकांपुरताच रिव्हिजन सर्व्हेमध्यें वाढलेला सारा तहकूब ठेवण्यांत येईल. या-प्रमाणें ठरलें आहे. त्यास अनुसरून आकारबंद वगैरे कागदां दुरुस्ती करून वसुलाची तजवीज करण्यांत येईल.

" हा जाहीरनामा श्रीमंत सरकार मिरज व श्रीमंत तात्यासाहेब महाराज यांचे आज्ञेवरून प्रसिद्ध होत आहे. तारीख १९ डिसेंबर १९२८ इसवी."

(Sd.) B. K. Joshi

जॉइंट स्टेट कारभारी.

या जाहीरनाम्यावर टीका करतांना सातारचा समर्थ म्हणतो कीं:—

" जाहीरनाम्यांतील महर्गतेची सबब वाचून तर आम्हांस हंसूंच आलें. ! काल कसा विचित्र आला आहे पहा ! महर्गता गरीब रयतेला बाधेनाशी झाली असून ती संस्थानिकांना बाधूं लागली आहे. तिकडे विलायतेंत पतियाळाचे महाराज, संस्थानिक 'दरिद्री नारायण' असतात असा टाहो फोडूं लागले आहेत; तर इकडे 'नारायण, नारायण' म्हणणारे संस्थानिक दारिद्र्याच्या सबबी सांगत आहेत."

(समर्थ, ता. २४।१२।२८.)

"..... आतां सरकारी हुकुमांत सारावाढ कमी करण्याचीच चळवळ कर-णाऱ्या लोकांस दोष दिला आहे. पण आजवर कोणत्या सरकारनें कोणत्या चळ-वळीच्या पुढाऱ्यांना कधीं भलें म्हटलें होतें ! किंबहुना चळवळ्या लोकांनीं सर-कारला व सरकारनें चळवळ्या लोकांना काय म्हणावें हें नेहमीं ठरलेलें असतें. "

(केसरी, ता. २५।१२।२८.)

" आतां जी तडजोड झाली ती विचार केला असतां योग्य झाली असें मात्र

कोणी विचारी मनुष्य म्हणणार नाहीं. परंतु या बाबतींत रयतेनेंच शहाणपणाचा मार्ग स्वीकारला असेच म्हणावें लागते. संस्थानिकांविरुद्ध वरिष्ठ सरकारच्या अधिकाऱ्यांकडे तोंड वेंगाडत जाण्यापेक्षां संस्थानिकांचा थोडा आग्रह ऐकणें बरें, असेंच त्यांनीं या बाबतींत केलें ही खरोखर अभिनंदनीय गोष्ट आहे."

(संस्थानी स्वराज्य, ता. २८।१२।२८.)

" रयतांच्या पुढाऱ्यांच्या आग्रहानें रा० पोतनीस माजी मामलेदार यांना, रयतांच्या वाटाघाटीचे वेळीं हजर ठेविलें नाहीं ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. श्रीमंतांनीं हेच धोरण कायम ठेवून सारावाढीचे बाबतींत ज्या लोकांच्या थोड्याशा तक्रारी आहेत त्या मिटाविण्याची अवश्य खटपट करावी अशी विनंति आहे."

(संस्थानी स्वराज्य, ता. ११।१।२९.)

" रयत बोलून चालून अडाणी. त्यांच्याशीं हमरा-तुमरी करणारा शहाणाच लोकदृष्ट्या अपराधी ठरतो हें व्यवहाराचें तत्त्व आहे. सभ्यांची तडजोड जरी रयतांना सर्वस्वी मान्य नाहीं तरी शिस्तीसाठीं त्यांनीं पंचांचा निकाल मान्य करून आपल्या मनाचा मोठेपणा व्यक्त केला. यानंतरहि व्यक्तिशः चौकशी व्हावयाचीच आहे. त्यावेळीं रयत मंडळी आपापल्या तक्रारी मांडतील व सरकार पूर्वग्रह दूषित न होतां त्यांच्या तक्रारी ऐकून घेऊन योग्य तो न्याय देतील अशी आम्हांस खात्री वाटते."

(संग्राम, ता. १९।१।२९.)

"It is not necessary also to refer to the paragraph in the notification, which casts aspersions on the leaders of the movement, because these aspersions are born of malice and crude passion for wordy revenge and further because they are founded on misrepresentations and falsehoods."

(Mahratta 23-12-28.)

"..... This move on his part is very welcome either as a sign of decreased stubborn niess in him or as the effect of popular agitation. His announcement seems to be vague on one point and it would be advisable to make it perfectly clear: that would

save future trouble. The amount to be collected during the current year is reported to be 35 percent of the increased assessment. But does "increased assessment mean assessment increased by the settlement officers or by the Chief in the final instance? In other words does it mean 35 percent of the reduced assessment or of the original one? Probably the chief means the former but the notification does not clearly express the idea. While thus far the annoucemcnt is satisfactory, there are portions in it to which exception must be taken. In a deprecatory tone, it refers to certain "agitators" who had no idea of "the special mutual interests of the ruler of an Indian state and his people" and who caused "a grave misunderstanding" among the ryots. Here the broad suggestions made are that persons from outside Miraj were responsible for recent happenings and that they, as well as the local leaders who were associated with them, intended to create misunderstanding between the chief and ryots affected. Nothing of course is further from truth. There were no outside people connected with the movement. And the local leaders, far from desirving to create misunderstanding, were actuated by the best of motives. Indeed, in openly advocating the cause of the ryots, they consciously exposed themselves to the displeasure or even the wrath, of their Chief. Nobody does so for the mere love of it." (Servant of India. 27-12-28.)

असो. वरील उताऱ्यांवरून या तडजोडीबद्दल व सरकारी जाहीरनाम्यांतील खोडसाळपणाबद्दल लोकमत कसें झालें होतें याची कल्पना वाचकांना होण्यासारखी आहे.

रयतांच्या पंचांनीं मात्र त्या जाहीरनाम्याकडे किंवा त्यांतील खोडसाळपणाकडे न पाहतां मिळेल तेवढें पदरांत पाडून घेऊन रयतांकरितां पुन्हा झगडण्यास पुढें सुरुवात केली व त्यांतही त्यांना अंशतः यश आलें. पंचांनीं रयतेतर्फे अर्ज करून अधिकाऱ्यांकडे खालील गोष्टींची मागणी केली.

[१] तरम प्रसिद्ध झाल्यापासून व्यक्तिशः तक्रारीअर्ज मांडण्यास एक महिन्याची मुदत देण्यांत यावी. [२] तक्रारींची चौकशी प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणावर जाऊन व्हावी. ही पाहाणी करतांना तक्रारअर्ज करणारास हजर राहाण्यास सूचना देऊन त्याच्या समक्ष तपासणी करावी व त्याचें म्हणणें लेखी समजून घेण्यांत यावें. [३] सर्व व्यक्तिशः तक्रारी अर्जास स्टँपडयूटी घेऊं नये. [४] वकीलामार्फत तक्रारी मांडण्यास हक्क म्हणून परवानगी असावी व वकीलपत्रास स्टँपडयूटी घेण्यांत येऊं नये. [५] रयतांच्या तक्रारी ऐकून घेण्यास एक कमिटी नेमावी व त्यांत रा० ब० जोशी व श्री० भास्करराव मराठे वकील हे दोघे असावेत. [६] त्यांच्या निकालावर श्रीमंत सरकारकडे अपील करण्याची परवानगी देण्यांत यावी; वगैरे या मागण्यांपैकीं कांहीं थोड्या रयतांना देण्यांत आल्या.

[१] पंधरा दिवसांची मुदत तक्रारी मांडण्यास देण्यांत आली. [२] तक्रारदारांच्या प्रत्यक्ष स्थळाला जाऊन तक्रारींचा विचार करावयाचें ठरलें [३] तक्रारअर्जाला स्टँपडयूटी लागावयाची नाहीं. [४] वकीलामार्फत खुशाल तक्रारी मांडाव्यात.

कमिटी नेमण्याची मागणी मान्य करण्यांत आली नाहीं. अपील करण्यास कायद्याप्रमाणें असेल ती परवानगी आहेच.

अशा आशयाच्या रा० ब० कारभाऱ्यांच्या हुकुमामुळें पंचांनीं आणखी एकदोन गोष्टी रयतांच्या हातीं आणून दिल्या इतकेंच.

ता. २५।१२।२८ च्या 'केसरी'मध्यें तडजोडीनंतर मिरजेंतील सत्याग्रहाची फलश्रुति या सदराखालीं श्री० पुंडलीकजींनीं उभयतां श्रीमंतांचे व रयतांचे आभार मानले आहेत.

या ठिकाणीं या सारावाढीच्या चळवळीच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत ज्या

ज्या सद्गृहस्थांनीं अनेक प्रकारची मदत केली आहे त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार प्रदर्शित करणें हें एक कर्तव्यच आहे. कित्येकांना त्यांचा नामनिर्देश करणें पसंत पडणार नाहीं व कित्येकांना पसंत पडलें तरी तो आजच्या स्थितींत करणें त्यांना पुढें कदाचित् बाधक होण्याचा संभव असल्यानें आम्ही तो करण्याचें टाळतों याबद्दल आम्हाला सर्वांनींच क्षमा करावी. ज्यांनीं केवळ रयतांचे कल्याणाकरितां अखेरपर्यंत चिंता वाहिली, वेळोवेळीं सल्ला दिला, प्रत्यक्ष शरीरकष्ट सोसले व द्रव्यसाह्यही केलें अशा थोर गृहस्थांविषयीं आम्हींच काय, मिरज संस्थानांतील सर्व रयत कृतज्ञ आहे. परमेश्वर त्यांचें सदैव कल्याण करो अशी त्याच्या चरणीं सर्व रयतांची प्रार्थना आहे असें आम्ही खात्रीनें येथें नमूद करूं शकतों.

ज्यांनीं 'घरभेदेपणाचें अगर 'अस्तनींतील निखाऱ्याचें' काम केलें आहे त्यांच्याबद्दलच्या रयतांच्या क्षणिक मनोवृत्ति व्यक्त करतां येत असल्या तरी तसें करणें हें धर्म, नीति व व्यवहार यांस सोडून होणार असल्यामुळें आम्ही तें काम करीत नाहीं.

असो. या प्रकरणाच्या शेवटीं एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करून हे प्रकरण संपवितों.

तडजोड होईपर्यंत या सत्याग्रहाबद्दल किंवा सारावाढीच्या चळवळीविषयीं महात्मा गांधींना सत्याग्रह कचेरीकडून कांहींच हकीगत कळविली गेली नव्हती. परंतु तडजोड झाल्यानंतर इत्थंभूत सर्व हकीगतीचें एक पत्र सविस्तर लिहून महात्मा गांधींकडे पाठविलें होतें. हें पत्र त्यांनीं आपल्या 'नवजीवन' पत्रांत प्रसिद्ध केलें होतें व तें खालीलप्रमाणें होतें:—

पूज्य बापूजी की सेवा में

मेरा अनेकशः प्रणाम।

" मैं आज यहाँ पर मिरज के सत्याग्रह की कुल हकीकत आपके पास निवेदन कर रहाहूँ। पूज्य श्री० गंगाधररावजी से मुझे खत आया था।

" मिरज संस्थान में गत साठ वर्षों में जमीन महसूल नहीं बढाया था। और संस्थान में कुछ सुधारभी नहीं किये गये थे। चीफ साहब का खानगी खर्चा बढ जाने के कारण, चीफ साहब ने सुधार के बहाने से जमीन महसूल बढाया। चीफ साहब ने कईबार लोगों को वचन दिया था कि 'मैं मेरी जिन्दगी में जमीन महसूल नहीं बढाऊंगा। किन्तु अपने इस वचन पर वे कायम नहीं रहसके। श्री० मोडक सुप-

रिंटेन्डन्ट लँ. रे., सी. डी. पूना की मदद से इस संस्थान का रिव्हिजन सेटलमेंट रिपोर्ट चीफ साहब ने तैय्यार करवाया। जिससे तालुके में ५६·४ टक्के और कई गांवों पर ७८ टक्के तक महसूल बढाया दियाथा।

इस रिपोर्ट के विरुद्ध में, पहले पहल श्रीयुत बालकृष्ण विट्ठल शिखरे साहब ने अंगुली उठायी। रिपोर्ट पर बडी अच्छी तरहसे आपने अखबारों में परीक्षण किया जिससे संस्थान के किसानों में नवजीवन पैदा होनेलगा। करीबर २, अठारहसो १८०० अर्ज लोगोंने दरबारके पास भेजेथे। किन्तु दरबारनें उनपर ध्यानतक नहीं दिया। तब, श्री० शिखरे साहबने 'मिरज संस्थान प्रजापरिषद' बुलायी और जमीन-महसूलके बारे में एक प्रस्ताव पास करवाया जिससे (लोकनियुक्त और सरकारनियुक्त) मिश्र सदस्यों की एक कमिटी इसकी जांचके लिये मांगीथी। किन्तु दरबारनें इसपर भी ध्यान नहीं दिया। इसलिये एक शिष्टमण्डल (डेप्युटेशन) परिषद की तरफ से चीफ साहबके यहां भेजनेका निश्चय नेताओं ने किया। उसमें श्री० बाबुराव गोखले संपादक 'मराठा', श्री० वझे संपादक 'सर्व्हंट ऑफ इंडिया', श्री० वामनराव पटवर्धन संपादक 'संस्थानी स्वराज्य' आदिलोगथे। चीफ साहबने डेप्युटेशन की मुलाकात नहींली।

उसी दिन शामको नेताओंने निश्चय किया कि अब सत्याग्रह करनेका मौका आ गया है। और ता. ४।११।२८ के रोज में, सत्रह गांवोंके किसान करीब तीन चार हजार इकट्ठे करके चीफ साहबके दरवाजेपर सत्याग्रह करनेके लिये हम लेगये थे। दो पहर बारा बजनेके करीब में, सत्याग्रह शुरू होगया। लोगोंको वहाँ से हटाने की कोशिश अधिकारी लोगोंने की थी किन्तु उसका असर किसानोंपर कुछभी नहीं हो सका। शामको चार बजे चीफ साहबने मुझे अपनेपास बुलाया लेकिन मैंने उनके यहाँ जानेके लिये इन्कार किया। जवाब में मैंने कहाथा कि "मैं आज इन किसानो का नेता नहीं हूं। बल्कि लोगों को शांत रखनें के लिये मैं यहां पर आया हूं। इस लिये भीतर आपके पास मैं नहीं आ सकता।" लेकिन चीफ साहबने फिर मुझे हि भीतर बुलाया, तब हरएक गांव का एक दो प्रतिनिधि मेरे साथ लेकर मैं भीतर उनके पास जा पहूँचा। लोग क्या चहाते हैं सो मैंने उनको ठीक २ बताया और चीफ साहब ने कमिटी की नियुक्ति करने का स्वीकार किया। खुद् चीफ साहब और मैं (पुंडलीक) दोनों की कमिटी नियुक्त हुई और हरएक गांव में जा कर पूरा जाँच किये बिना जमीन महसूल (Indi-

vidual assessment) जाहीर भी नहीं किया जाएगा ऐसा मुकर हुआ; इतनाहि नही बल्कि बाहर किसानो में आ कर चीफ साहब ने अपने मुँह से लोगों को वैसे कहाभी था। इसके बाद लोगों की अपने २ घर जानेके लिये मैं ने कहा और लोग वहाँ से चले भी गये। इस सभ्यता के लिये हमने चीफ साहब का अभिनंदन भी किया था। (पत्रक नं. १ देखिए।)

अब कमिटी के काम को शुरू करने के हेतूसे मैं जब चीफ साहब के पास फिर गया, तब एक दिन उन्होंने मुझे कह सुनाया की 'अब कमिटीका कुछ काम नहीं हैं। गावके कुछ बकीलोंसें मैंने बातचीत की है।' यह बात सुनकर मुझे बडा अचरज और दुःख हुआ। मुझे यों लगा कीं मैंने लोगोंको घर लौटाया है। और मेरा फर्ज है की फिर उनको चीफसाहबके द्वारपर बुला लाना चाहीए और फिर सत्याग्रह सुरू करना पडेगा। इसलिये ता. १५।११।२८ रोज में तीन चार हजार लोग फिर इकट्ठे हुए और फिर सत्याग्रह शुरू हो चुका। ता. १४।११।२८ को रात में सरकार की तरफसे कोई २ लोग मोटार लेकर देहातों में घूमकर कहा करतेथे कि 'सत्याग्रहके लिये पुंडलीक और शिखरेके कहने पर जाना नहीं चाहीए, लेकिन तो भी करीब २ चार हजार लोग इकट्ठे हुए। उस समय मैनें एक पफ्लेट छपवाकर बाँट दिया और चीफ साहबने अपना वचनभंग किस प्रकार किया, लोगों को समझा दिया। (पत्रक नं. २ देखिए।)

सत्याग्रह शुरू होगया। श्री० शिखरे, मैं और मेरे साथी लोग किसानों को शांत रखने के लिये काम करते थे लोगो के प्रतिनिधि, नेता ओं, मेहमान, टाइम्स ऑफ इंडिया के बातमीदार इनमें से किसी कोभी चीफ साहब ने पहले दिन मुलाकात नही दी। मैंने एक खत उन पर भेजा था सो बिना देख के जैसे कि तैसे लोट भेज देने को चीफ साहबने आनाकानी नहीं की। लोगों को वहां से हटाने की बहुत कुछ कोशिश चीफ साहबनें की थी किन्तु असर नहीं हो सका। छ दिनो तक सत्याग्रह वडी शांतता के साथ चला था। तीसरे दिन, गांव के कुछ व्यापारियो को सत्याग्रही किसानों में भेज के सत्याग्रहका निषेध कराने की चेष्टा अधिकारियोंने की; उन व्यापारियों को किसानों की तरफसे मैंने जबाब दिया। और व्यापारियों के दस्तखतों से एक पत्रक निकलवाकर उसमें सत्याग्रह के लिये सहानुभूति दिखलागे की चेष्टा कई एक सभ्य व्यापारियोंने कर के अधिकारियों को पूरा जबाब दिया। (पत्रक नं. ३ देखिए।)

सत्याग्रह के चौथे दिन में नौं नेताओंपर १४४ कलम के अनुसार नोटिस लगानेका अभियोग अधिकारियों ने किया, उसेभी सत्याग्रही किसानों ने आनंद के साथ मान लिया। उन नों भाइयों को सत्याग्रही कँपही में एक तरफ हमने बिठलाया। सत्याग्रह के पांचवे दिन में, १२७ कलम के अनुसार सत्याग्रह कँप एकदम उठाने की नोटीस सब भाइयोंपर लगायी, लोगों ने उसे भी मान लिया। क्यों कि कायदेभंग नहीं करने का निश्चय सत्याग्रही किसानों ने किया था। चीफ साहब के मकान से थोडे दूरीपर ($\frac{1}{2}$ फर्लांग) में लोगों को ले चला और वहाँ सत्याग्रहियों का डेरा दिया। और छो दिन में, सबेरे एक खत सब किसानों की तरफ से चीफ साहब को भेजा (पत्रक नं. ४ देखिए।) जिसका मतलब यह था कि " आज छदिनों तक हम चार हजार किसान ठंढी और धूपमें पडे रहे तो भी आपको कुछ दया की आर्द्रता नहीं आयी, ठीक। हम इतना हि कह कर यहाँ से चलते हैं कि बढाहुंआ जमीन–महसूल हम नहीं दे सकेंगे "। याने कर-बन्दी का निश्चय कर के अपने २ घर लोग चले गये।

इसके बाद उसी दिन जांच का कुछ फार्स करने के हेतूसे यंग चीफ और अधिकारी लोग देहातों में घूमने लगे। यहबात मुझे जब मालूम होगयी तब मैंने इस जांच के नाटक को बहिष्कृत किया। हरएक किसान ने यंग चीफ के हाथ में एक दो कागज दिया जिसपर लिखा था कि 'भाई, हम यह जाँच कमिटी नहीं मानते हैं; जांच के लिये अपने पिताजी और पुंडलीकजी को हि आना चाहीए। (पत्रक नं. ५ देखिए।) इसका असर यह हुआ कि यंग चीफ ने इस झण्झट में पडना छोड दिया।

इसके बाद दरबारमे हमारे परिषदके एक नेताको अपनी तरफ इन्डयूस करा के उसे आपना दिवान बनाया। इस बातको जानतेहि मैंने एक खत उनके नाम से लिख कर हजारो किसानों के दस्तखतों से वह खत नये दिवानपर भेज दिया। उस खतमें लिखा था कि 'भाई, हमको बडा आनंद है कि आप दिवान के गद्दीपर नियुक्त हो गये; लेकिन अब बताओ कि इस अन्याय्य जमीन महसूल के बाबतमें आप क्याकर दिखाओगे। चीफ साहबने तो पूरा वचनभंग किया है। शिक्षा का असर आपके दिलपर जोहु आहै सो अब दुनियाको दिखाओ। (पत्रक नं. ६ देखिए।)

इसके बाद दरबारने एक जाहीर पत्रक छपवाकर लोगों को दबाने की चेष्टा

की और दूसरी तरफ कांप्रोमाइझ के लिये आपना हात बढाया। वे इतनाही कह रहे थे कि आन्दोलन मचानेवाले श्री० पुंडलीक–शिखरे आदि लोगों को छोडकर किसान मेरे पास आएगेतो मैं सुलह कर लूंगा। इसके जबाब में मैंने किसानों में से किसानो को पुंछकर पांच पंच नियुक्त किये और दरबार को समझाया कि 'यदि दरबार सुलह चाहेगा, तो किसानभी दो पग आगे बढने के लिये तैयार है।' दरबार मेरे साथ बातचीत करने के लिये तैय्यार नहीं था; यह जान कर मैंने एक पत्रक जाहीर किया, जिसका मतलब यो है कि 'यदि दरबार और किसानों में सुलह होनेवाला हो, और यदि दरबार मेरे साथ बातचीत करनेको सिद्ध नहीं है। तो मै थोडी देरतक दूर रहनेके लिये राजी हूं। किन्तु यदि दोनों में सुलह नहीं होगा तो किसानो कीं तरफ से लडने के लिये मैं पूर्ववत् किसानों के आगे खडा हूं'। (पत्रक नं. ७ देखिए।)

इस वख्त दरबारने हम नेताओंपर अभियोग चलाने के तैय्यारी पूरी कर रखी थी। ता. १९।१२।२८ या के रोज दरबारने हमने चुने हुए पांच प्रतिनिधियों को हि बुलाया और सुलह करने कीं कोशिश की। प्रतिनिधियों ने कहा "यदि दरबार हमारे नेताओं की नही चाहता, तो हमभी दरबार के अधिकारी लोगोंको बीचमे नहीं चाहते है।" उनका कहा दरबारनें मान लिया। खुद चीफ साहब, यंगचीफ और हमारे पांच प्रतिनिधि इनमें रातमें बारा एक बजेतक बातचीत खुले दिल से हो कर दोनों में सुलह हो चुका। इस सुलह से किसानो को यों फायदा हुआ है।:—

१ बढहुए जमीन महसूल में २५ टक्के कायम के लिये कम हो गये।

२ बचहुए महसूल में से ३५ टके इस साल और बाकी आगोके साल में वसूल किया जाएगा।

३ जमीन महसूल के कुल बाबतो मे जिन लोगोंपर अन्याय हुआ हो उन्होने दरबार में अर्ज पेश करना चालीए। जो लोग अर्ज पेश करेंगे उनका बढा हुआ महसूल इस साल तहकूब रखा जाएगा।

४ जो लोग अर्ज पेश करेंगे उनके अर्जका विचार उनके खास ठिकानेपर जाकर किया जाएगा, और अर्ज को स्टँपडयूटी नहीं लगेगी।

५ यह सत्याग्रहको आंदोलन यदि सिर्फ मिरज तालुकेका था, तोभी जो कुछ फायदा मिरज तालुकेको मिलेगा, सो दूसरे दो तालुकों (मोडनिंब और लक्ष्मेश्वर) काभी मिलना चाहीए।

अपने प्रतिनिधी और श्रीमन चीफसाहब दोनोंने मिलकर जो तय किया है उसे माननेके लिये मैंने एक पत्रक जाहीर किया है । (पत्रक नं. ८ देखिए) और व्यक्तिशः अन्यायोंके अर्ज किस तरह किये जांय और कितने प्रकारके अन्याय हुए हैं यह किसानोंको समझानेके वास्ते मैंने एक अन्यायोंकी सूची छपवाकर बांट दी है । (पत्रक नं. ९ देखिए ।)

इसके अनुसार अन्यायको बतानेवाले अर्ज दरबारमें पेश किये जा रहे हैं । आज कल वही काम चल रहाहै । इन अर्जोंका विचार अर्जदारोंके खास ठिकानों पर जाकर होनेका काम अब आस्त २ होनेवाला है ।

६ छ दिन सत्याग्रह चलाथा तब लोग दिन भरमें एक दफे भात बनवाकर खाया करतेथे । लोगोंने स्वच्छता खूब अच्छी तरहसे कायम रखी थी । सत्याग्रहके दिनोंकी रोजकी डायरी मैंने रखी है ।

यह खत बहुत हि लंबाचौडा हुआ है । इस लिये मैं आपकी क्षमा चहाता हूं ।

आपका विनीत

पुंडलीक.

महात्माजींनीं तें पत्र आपल्या 'नवजीवन'मध्यें प्रसिद्ध करतांना आपला त्यावर अभिप्रायही प्रसिद्ध केला आहे. या सत्याग्रहास त्यांनीं 'सुंदर सत्याग्रह' असें नांव दिलें आहे. 'सुंदर सत्याग्रह' याच मथळ्याखालीं आपल्या नवजीवन पत्रांत ते म्हणतात कीं:—

"मिरजेमध्यें थोड्या दिवसांपूर्वी 'सत्याग्रह' झाला होता त्याविषयीं कांहीं हकीगत वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झालेली होती; परंतु वर्तमानपत्रांमध्यें येणारी हकीगत अपुरी आणि कित्येक वेळां चूक देखील असूं शकते. म्हणून त्याकडे मीं कांहीं विशेष लक्ष दिलें नाहीं. परंतु त्या कामांत भाई पुंडलिकचें नांव मीं पाहिलें. भाई पुंडलिक आश्रमांत राहिलेले असल्यामुळें आणि श्री० गंगाधरराव देशपांडे यांचे अनुयायी असल्यामुळें त्यांना मी चांगल्या रीतीनें ओळखतों. म्हणून मी त्यांच्यापासून मिरज सत्याग्रहाविषयींची सर्व हकीगत मागविली. ती माहिती मननीय असल्यामुळें त्यांच्या पत्रांतील मुख्य भाग येथें उद्धृत करितों. मूळ पत्र हिंदी भाषेंत आहे."

नंतर तें पत्र देऊन त्याविषयीं महात्मा गांधी लिहितात कीं, "हा छोटासा सत्याग्रह सुंदर रीतीनें आटोपला असें मानण्यास हरकत नाहीं. यामध्यें तीन गोष्टी

ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट ही आहे कीं, पुढाऱ्यांचें काम मुख्यत्वेंकरून शांतता पालन करण्याचें होतें, कारण हा तर सत्याग्रहाचा पाया आहे. दुसरी गोष्ट ही आहे कीं, पुढाऱ्यांनीं स्वतःविषयींच्या दुरभिमानाला बळी पडून लोकांना व्यर्थ लढत ठेवण्याची चूक केली नाहीं. आणि रयतांमधील रीतसर निवडलेल्या पंचांना तडजोड करण्याकरितां जाऊं दिलें. याचा अर्थ असा आहे कीं, सत्याग्रही पुढारी अभिमानरहित असला पाहिजे. तिसरी गोष्ट ही आहे कीं, सत्याग्रही नायक मोठा विद्वान्, वकील किंवा बॅरिस्टर असलाच पाहिजे अशी मुळांत आवश्यकता असतच नाहीं. पुढाऱ्यामध्यें सत्य, शांति, दृढता, हिंमत, साधेपणा वगैरे गुण मात्र असले पाहिजेत. या सत्याग्रहाचा खरा नायक पुंडलिक होते. ते मोठेसे विद्वान् आहेत असें म्हणतां येणार नाहीं. त्यांचें इंग्रजीचें ज्ञान विशेष आहे असें नाहीं. पण सत्याग्रही पुढाऱ्यामध्यें जे आवश्यक गुण असावेत असें मी मानतों ते सर्व पुंडलिकानें या सत्याग्रहांत व्यक्त करून दाखविले आहेत.

"पण हें काम अद्यापि संपलें आहे असें म्हणतांच येणार नाहीं. अद्यापि शिल्लक असलेलें काम आजपर्यंत झालेल्या कामाइतकेंच महत्त्वाचें आहे. या चळवळीनें रयतांमध्यें जी लोकजागृति झाली आहे तिचा उपयोग त्यांची परिस्थिति किंवा दशा, त्यांची शक्ति, त्यांचें शील किंवा संस्कृति यांची त्यांना योग्य जाणीव करवून देण्यामध्यें केला पाहिजे. म्हणजेच झालेला फायदा त्यांना टिकवितां येईल आणि त्याचा प्रचारही त्याबरोबर फुलांच्या सुगंधाप्रमाणें आसपास चोहोंकडे दुमदुमून जाईल.

मोहनदास करमचंद गांधी.

प्रकरण बारावें

आपल्या पंचांनीं केलेल्या तडजोडीस जागण्याची रयतांची धडपड

कशी कां होईना, तडजोड झाल्यानंतर व दिलजमाई झाल्यानंतर आतां पुढील सर्व काम सलोख्यानें चालवावें अशा बुद्धीनें श्री० पुंडलीकजींनीं तडजोड लोकांना समजावून सांगण्याकरितां गांवोगांव हिंडण्याची परवानगी अधिकाऱ्यांकडून मिळण्याची खटपट केली. तजजोडीविषयीं लोकांची समजूत घालण्याव्यतिरिक्त दुसऱ्या गोष्टी शेतकऱ्यांना न सांगण्याबद्दल ते लेखी आश्वासन अधिकाऱ्यांना देण्यास तयार असतांही त्यांना परवानगी दिली नाहीं ! वास्तविक पाहतां पंचांनीं, रयतांनीं घालून दिलेल्या मर्यादेबाहेर तडजोड केल्यानें, सर्व गांवचे रयत असंतुष्ट झाले होते. अशा स्थितींत चळवळीच्या पुढाऱ्यांनीं पंचांना वगळून तडजोडीस अमान्यता दर्शविली असती व रयतांना पुढें चळवळ चालू ठेवण्यास संमति दिली असती तर तडजोडीची व दरबारच्या कारवाईची इज्जत कितपत टिकली असती याबद्दल संशय वाटतो. रयतांना आपली बाजू न्यायाची आहे, सत्याची आहे व आपण एकजुटीनें या लढ्याचा शेवट लावण्याचा निर्धार केला तर तो आपल्याला पाहिजे तसा खास-हालअपेष्टा सोसून कां होईना-लावून घेऊं असा विश्वास वाटण्याइतकी जागृति त्यांच्या मध्यें उत्पन्न झाली होती. परंतु या त्यांच्या विश्वासाला जबाबदारीचें, शिस्तीचें व विवेकाचें वळण लावण्याची अखेरची जबाबदारी पुढाऱ्यावर होती. सारावाढीची चळवळ प्रारंभापासून अखेरपर्यंत चालवितांना रयतांमध्यें शांतताभंग, शिस्तीचा भंग अगर अत्याचाराची वृत्ति उत्पन्न होणार नाहीं ही खबरदारी घेण्यास जे मानसिक कष्ट व शारीरिक कष्टही सोसावे लागले, तसेच पुढेंही ते सोसून, सर्व गांवच्या रयतांना पंचांनीं केलेली तडजोड मान्य करावयास लावणें यांतच पुढाऱ्यांची खरी कसोटी होती. मिरज दरबारनें वास्तविक यावेळीं निमूटपणें श्री० पुंडलीकजींना परवानगी द्यावयास पाहिजे होती; परंतु मुत्सद्देगिरी व मिरज दरबार यांमध्यें छत्तीसाच्या आंकड्याचें साहचर्य फार असल्यानें अधिकाऱ्यांना परवानगी

देण्याची बुद्धि सुचली नाहीं ! परंतु हा आंकडा रयतांच्या पुढाऱ्यांजवळ घटकाभर सुद्धां राहून चालणार नाहीं व तसा तो नव्हता याचा पुरावा म्हणजे श्री० पुंडलीकजींनीं युक्तिप्रयुक्तीनें अधिकाऱ्यांच्या परवानगीची फिकीर न करतां खेडेगांवांतून दौरा काढून तडजोड स्वीकारण्याची रयतांच्या मनाची तयारी केली हाच होय.

या वेळीं श्री० पुंडलीकजींनीं, आपण पुन्हा व्याख्यानें देत फिरूं लागलों तर कांहीं अधिकारी पुन्हा भलतें कांहींतरी सांगून श्रीमंतांचे कान फुंकतील अशी शंका येऊन, आपलें एक ठराविक व्याख्यान तयार केलें व तें लिहून छापवून काढलें. सरकारी परवानगीशिवाय, किंबहुना एका दृष्टीनें गर्भित मनाई असतांना आपण आतां गांवोगांव फिरणार असल्याची जाणीव श्री० पुंडलीकजी यांना पूर्ण होती. तो गुन्हा करूनच फिरावयाचें व त्या दृष्टीनें सावधपणा ठेवावयाचा असें ठरवूनच ते बाहेर पडले. अधिकाऱ्यांनीं परवानगी दिली नाहीं म्हणून श्री० पुंडलीकजींनीं मात्र आपल्या धोरणांत यत्किंचितही बदल केला नाहीं. आपण काढलेलें छापील पत्रक लोकांमध्यें वांटावयाचें व त्याच्या स्पष्टीकरणार्थ सभेंत चार शब्द बोलावयाचे असा क्रम त्यांचा चालला होता. त्यांनीं जाहीर केलेलें पत्रक पुढीलप्रमाणें होतें:—

मिरजेंतील सारावाढीच्या प्रकरणांतील तडजोड

रयतांच्या पंचांनीं स्वतंत्रपणे श्रीमंत सरकार मिरज यांची भेट घेऊन जी तडजोड ता. १९-१२-२८ रोजीं मान्य केली आहे, त्याविषयीं अनेक तऱ्हेचे प्रश्न, शंका किंवा कुशंका मला विचारण्याकरितां निरनिराळ्या गांवांतील लोक माझ्याकडे येत आहेत, व या तडजोडीचा अर्थ समजून सांगण्यास रयत मला आपल्या गांवांकडे बोलावीत आहेत. म्हणून मी माझें म्हणणें पुन्हा एकवार जाहीर करितों व मी खेडयांतून फिरेन त्या वेळीं लोकांना याच गोष्टी समजावून सांगणार आहें.

तडजोडीची परिस्थिति

रयत बंधूंनो ! अन्याय्य व भारी सारावाढीविरुद्ध आपण एकजुटीनें व पद्धतशीर चळवळ केलीत त्याबद्दल अखिल महाराष्ट्रानें आपला गौरवच केला आहे. आपण श्रीमंतांच्या वचनाच्या आधारानें चौकशीचा आग्रह धरून आपली चळवळ चालविली होती. आपसातींत तडजोड होणें किंवा रीतसर चौकशी होणें या दोनच

गोष्टी या चळवळींत होण्यासारख्या होत्या. सरकार तडजोडीला हात पुढें करील त्या वेळीं चौकशीचा आग्रह आपण सोडण्यास फारशी हरकत नसते. आपल्या चळवळीचा नेट पाहून सरकारनें ता. ११-१२-१८ रोजीं एक जाहीर 'पत्रक' प्रसिद्ध केलें व त्यांत तडजोडीला आपला हात पुढें केला. 'पत्रक' सरकारी रीत्या निघत आहे हें लक्षांत घेतां त्याची भाषा अशाच डौलाची व बहाण्याची असावयाची हें उघडच आहे. केवळ रयतांपैकींच पांच पंच सरकारास तडजोडीची वाटाघाट घडवून आणण्यास पाहिजे होते. या त्यांच्या मागणींतील अर्थ लोकपक्षाला समजला नव्हता असें नाहीं; परंतु सरकारास केवळ रयतांच्या पंचांशीं बोलावयाचें असेल तर त्यांना तशी संधि देणें व्यवहाराच्या दृष्टीनें उचित होतें, म्हणून सर्व गांवांतील पुढाऱ्यांना एकत्र जमवून त्यांच्यांतून पांच पंच निवडून त्यांना सरकारकडे पाठविण्याची व्यवस्था रयतांच्या पुढाऱ्यांनीं केली व तेच पंच श्रीमंतांकडे गेले आणि तडजोडीच्या कागदावर त्यांच्याच सह्या झालेल्या आहेत.

तडजोडीचें स्वरूप व पंचांची कामगिरी

लोकपक्षाच्या मागणीला व कुवतीला योग्य अशीच तडजोड व्हावी असें घडवून आणण्याची खटपट रयतांच्या पंचांनीं केलेली आहे. या तडजोडीला जबाबदार किंवा या यशाला खरे भागीदार कोण असतील, तर ते हे लोकनियुक्त पंचच आहेत. त्यांच्या कामगिरीबद्दल आपण सर्वांनीं कृतज्ञताबुद्धीनें त्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे रयतांचा समंजसपणा व धोरण त्यांनीं शेवटपर्यंत उत्तम प्रकारें राखलें आहे यांत शंका नाहीं. आपल्या पंचांनीं तडजोड करण्यांत कांहीं चूक केली आहे असें आपल्याला वाटत असल्यास त्याबद्दलचा दोष आपण पंचांना न देतां मला द्या; मी तो दोष माझ्या माथ्यावर घेण्यास आनंदानें तयार आहें. रयत व सरकार यांमधील सारावाढीबाबतचा लढा शेवटीं तडजोडीनें मिटला म्हणून 'तडजोडीचें महत्त्व' या दृष्टीनें वृत्तपत्रकारांनीं या तडजोडीचा उल्लेख केला आहे. मग ही तडजोड कशीही असो ! मीही या ठिकाणीं—

माझें तडजोडीविषयींचें मत

नमूद करून ठेवितों. चळवळीचा जो व्याप वाढविलेला होता त्या दृष्टीनें तडजोडीनें बरेंच यश लोकांच्या पदरांत पाडिले आहे. तथापि यापेक्षां अधिक सूट नवीन सारावाढींत मिळावयास पाहिजे होती, यांत शंका नाहीं. रयतांनीं निवडून पाठ-

विलेले पंच तडजोडीवर सह्या करून आलेले असल्यामुळें मी त्याला सम्मति देतों व रयतांनींही दिली पाहिजे असें माझें मत आहे. पंचांनीं त्या तडजोडीवर सह्या केल्या त्या कोणत्या परिस्थितींत केल्या याविषयीं तर्कवितर्क करून आतां कोणीही तडजोडीच्या मार्गे जाण्याचा अदूरदर्शीपणा करूं नये. उदारतेमुळें कधींही कोणाचें आत्यंतिक नुकसान होत नसतें. शिवाय सत्य, प्रामाणिकपणा, आपल्या वचनाला जागणें, समंजसपणा राखणें आणि बलावलाचा विचार ध्यानांत घेऊन वागणें या गोष्टी म्हणजे एका अर्थीं गरीब व दरिद्री रयताचे मिराशीचे हक्क आहेत. या गोष्टींना रयतांमधून अर्धचंद्र मिळेल तर या जगांत त्या गुणांनीं कोणाजवळ रहावें हा मोठाच बिकट प्रश्न होऊन बसेल. रयत नाइलाजानें ही तडजोड मान्य करितील, व हा भारी साराही आपला जीव गहाण टाकून भरतील; परंतु त्याचा अर्थ रयत संतुष्ट झाली असा मात्र कोणीही समजत नाहीं. मनांत असलेला असंतोष जरी आज अकार्यक्षम व सुप्त असला तरी तो ज्या ज्या वेळीं रयतांच्या सहकारितेची व सहानुभूतीची वेळ येईल त्या वेळीं व्यक्त झाल्याशिवाय कसा राहील ? रयतांचा संतोष संपादन करून दरबारची व संस्थानची योग्यता वाढविण्याची संधि मिरज दरबारनें या चळवळींत अनेक वेळां व्यर्थ दवडलेली आहे असें मलाही आपल्या-प्रमाणें वाटतें. या सारावाढीच्या चळवळीमुळें संस्थानांत उत्पन्न झालेली जागृति कायम ठेवून किंवा वाढवून त्याचा उपयोग करून घेण्याची बुद्धि अधिकारी वर्ग-मध्यें आज नसली, तरी यापुढें रयतांच्या नेटानें ती उत्पन्न होईल अशी मला आशा आहे.

रयतांना आग्रहाची व कळकळीची विनंति

या सारावाढीच्या बाबतींत मी एवढेंच सांगू शकतों कीं, ही आपल्या पंचांनीं स्वतंत्रपणे केलेली तडजोड आज आपण कशीही मान्य करा, व त्याप्रमाणें आपल्या व्यक्तिशः तक्रारी योग्य मार्गानें सरकारपुढें निर्भीडपणानें मांडा. तक्रारी मांडतांना त्यांत अतिशयोक्ति किंवा असत्य कालविलें जाणार नाहीं याची काळजी घ्या आणि नेटानें व रीतसर मार्गानें आपली दाद लावून घेतल्यावांचून राहूं नका. इतकें करूनही आपल्यावर झालेला अन्याय कायम राहील तर आपला त्याबद्दलचा असंतोष प्रसंग सांपडेल त्या वेळीं व्यक्त करण्यास कचरूं नका. आपल्यांतील जूट कायम ठेवा. आपापसांत तंटे माजवून व्यर्थ कोर्टाची भर करण्याचें शक्य तितकें टाळा आणि आपल्या हक्कांना सावधपणें जपा. आपल्यामध्यें उत्पन्न झालेली

जागृति या त्रिविध मार्गानें आपण कायम ठेवाल तर यापुढें आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचें निराकरण करण्यास आपल्याला दुसऱ्या कोणावरही अवलंबून रहावें लागणार नाहीं.

आपला नम्र

पुंडलीक कातगडे.

हीं पत्रकें घेऊन प्रत्येक गांवीं गेल्यानंतर त्यांना असें आढळून आलें कीं, रयतांमध्यें तडजोड करणाऱ्या पंचांविषयीं बरेच गैरसमज पसरविलेले आहेत. तेव्हां त्या पंचांविषयींचे गैरसमज नष्ट करणें हेंही त्यांचें एक काम होऊन बसलें. तें काम व तडजोडीनंतरच्या पुढील कामाची उठावणी करण्याचें द्विविध काम श्री० पुंडलीकजींनीं कोणत्याप्रकारें केलें हें त्या त्या गांवांतील त्यांच्या व्याख्यानांचे रिपोर्ट पाहिले असतां वाचकांच्या ध्यानांत येईल. म्हणून ती सर्व हकीगत येथें त्यांच्याच शब्दांत देत आहें ती अशी :—

आपण निवडून दिलेल्या पंचांनीं तडजोडीवर सह्या केलेल्या आहेत त्या अर्थी आपण ती तडजोड मान्य केली पाहिजे. आपला जो चौकशीचा आग्रह होता तोही आपल्याला थोडासा कां होईना साधतां आला आहे. व्यक्तिशः तक्रारी मांडण्याकडे आपलें सर्वांचें लक्ष या वेळीं लागलें पाहिजे. आपापसांत वाद करीत बसून व्यक्तिशः तक्रारी करण्याची वेळ मात्र व्यर्थ दवडून बसाल. व्यक्तिशः तक्रारी ऐकून घेऊन आपल्याला सरकारकडून न्याय मिळणार नाहीं असें जरी आपल्याला वाटत असलें तरी तक्रारीच न मांडणें हा त्याला उपाय नव्हे हें विसरूं नका. आपल्या गांवचा वर्षाला जवळ जवळ अडीच हजार रुपयांचा फायदा या तडजोड करून येणाऱ्या पंचांनीं केलेला आहे. म्हणजे या सारावाढीनें आपल्या गांवांतून सरकारच्या तिजोरींत वीस वर्षांत पंचेचाळीस हजार रुपये जाणार होते ते या पंचांनीं आपल्या गांवांतच ठेवून घेतले आहेत. पंचांविषयीं गैरसमज करून घेऊं नका. यापेक्षां कोणीही दुसरे पंच गेले असते तरी हेंच करून आले असते. सरकारनें जाहीरनाम्यांत ज्या अवांतर गोष्टी लिहिल्या आहेत त्यांच्याकडे आपण दुर्लक्ष केलें पाहिजे. जें सरकार एक पैदेखील कमी करणार नाहीं असें म्हणत होतें त्यांनीं रुपयांतील चार आणे कमी केले हा रयतांचा जय नव्हे काय ? जें सरकार कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यास तयार नव्हतें तें व्यक्तिशः सर्वांच्या तक्रारी ऐकून घेण्यास सिद्ध झालें हा रयतांचा विजय नव्हे काय ? जें

सरकार रयतांना भेटावयास तयार नव्हतें, तें तडजोडीकरितां रयतांनां घेलाव-ण्यास मोटार पाठवितें याचा अर्थ आतां सुस्काऱ्या रयतेचें सामर्थ्य जाणवूं लागलें असाच नव्हे काय ? या सर्व गोष्टींचा नीट विचार करा; म्हणजे पंचांनीं केलेली कामगिरी आपल्या ध्यानांत येईल. पंचांमध्यें एक ब्राह्मण असला तरी चार पंच ब्राह्मणेतर होते ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. या चळवळींत कोण-त्याही प्रकारची झीज न सोसणाऱ्या मोडनिंब व लक्ष्मेश्वर तालुक्यांतील लोकांना देखील आपल्या इतकाच फायदा या पंचांनीं करून दिलेला आहे. असो. यापेक्षां अधिक सूट रयतांना मिळावयास पाहिजे होती यांत शंका नाहीं. परंतु कोण-त्याही चळवळींत एकाच पक्षाला सर्वस्वी यश मिळतें असें नाहीं. आपण सर्वांनीं आतां व्यक्तिशः तक्रारी मांडण्याची तयारी करण्यास लागावें असें माझें आपल्याला सांगणें आहे. आपल्या तक्रारी मांडण्यास आपल्याला जी मदत लागेल ती आप-ल्याला मिरजेंतून मिळण्यासारखी आहे. (ज्ञानप्रकाश, ता. ९।१।२९.)

मला खेडयांमधून हिंडून जाहीर व्याख्यानें देण्यास अधिकारी परवानगी देतील अशा समजुतीनें मीं इतके दिवस खेडयांतून हिंडण्याचें लांबणीवर टाकिलें. परंतु गांवांतून हिंडून जाहीर व्याख्यानें करण्यास अधिकाऱ्यांनीं मला परवानगी दिली नाहीं. परंतु आपल्याला एकवार भेटून आपल्याला तडजोड समजून देणें हें माझें कर्तव्य आहे, असें मला वाटत असल्यामुळें मी आज आपल्या गांवीं आलों आहें. तडजोड झाली ही फार चांगली झाली असें मलाही वाटत नाहीं. तथापि आपल्या सामर्थ्याचा विचार केला तर आपल्या पदरांत पुष्कळच यश आलें आहे असें मला वाटतें. मी लोकांच्या प्रतिनिधींच्या संमतीशिवाय एकही पाऊल पुढें टाकिलेलें नाहीं किंवा मागेंही घेतलेलें नाहीं. पंचांच्या कामगिरीबद्दल आपण गैरसमज करून घेऊन पंचांना दोष देऊं नका. ही सारावाढीची चळवळ म्हणजे कांहीं शेवटची चळवळ नव्हे. असे अनेक प्रकारचे प्रसंग यापुढें आपल्यावर येतील व आपल्याला पुन्हा चळवळी कराव्या लागतील. आज आपण आपल्या पंचांना शिव्या द्याल किंवा दोष लावाल तर यापुढें आपला पंच होण्यास कोणीही कधींही कबूल होणार नाहीं. तडजोड शक्य तितकी चांगली करण्याबद्दल पंचांनीं आपली शिकस्त केलेली आहे. आपल्यावर प्रथमच भयंकर अन्याय झालेला होता त्यामुळें तडजोडीप्रमाणें सूट मिळूनसुद्धां आपल्या गांवावरील अन्याय कायम राहिला आहे. मला ही गोष्ट दिसत नाहीं असें नाहीं. त्याबद्दल आपल्या गांवानें पुन्हा दाद मागण्याचा प्रयत्न करून

पहाण्यास हरकत नाहीं. पण त्या मागण्याला आतां चळवळीचें स्वरूप देऊं नये असें मला वाटतें. दोष दिल्याशिवाय तुम्हांला रहावतच नसलें तर पंचांना दोष न देतां मला द्या. " श्रेयाचे धनी पंच व दोषाचा वांटेकरी मी " अशी वांटणी केल्यास ती मला मान्य आहे. मिळेल तेवढें खिशांत टाकून बाकीच्याकरितां झगडत राहणें ही राजा व प्रजा यांच्या भांडणांतील नीति आहे. झालेली तडजोड फेंकून द्याल तर फसाल व आपले नुकसान करून घ्याल. [तानंगमधील व्याख्यान.]

(ज्ञानप्रकाश, ११।१।२९.)

इतर गांवें किती पल्ल्यापर्यंत टिकतील याचा पूर्णपणें अंदाज बांधूनच श्री० बाबाण्णांनीं आपल्या मालगांवाविषयीं मत दिलें आहे. घरांत बसून फुकट बढाई मिरविण्याची चूक मालगांवच्या लोकांनीं केलेली नाहीं. त्याचप्रमाणें पुढाऱ्यांला खोटाच भरंवसा देऊन त्यांनीं फसविलेंही नाहीं. यश पंचांनीं मिळविले असें लोक म्हणतात याचा अर्थ केवळ एकट्या पंचांचें हें कार्य आहे असा नव्हे. आपण सर्व लोकांनीं पंचांचें म्हणणें ऐकलें म्हणूनच त्यांच्या हातून हें काम होऊं शकलें. शिपाई लोक लढून एखादा किल्ला घेतात. परंतु नांव मात्र सेनापतीचें जाहीर होतें, तशीच गोष्ट आहे. ही चळवळ झाली नसती तर एक पै देखील कमी होण्याचा सभव नव्हता ही गोष्ट विसरूं नका. पंचांविषयीं गैरसमज करून घेऊन त्यांना पुढील काम करण्याचे बाबतींत नाउमेद करूं नका. यापुढें अनेक प्रकारच्या चळवळी तुम्हांला कराव्या लागतील व त्या प्रत्येक वेळीं पंचांची जरुरी लागेल. सर्व गांवांचे पुढाऱ्यांनीं मिळून हे पंच निवडून दिल्यानंतर व त्यांच्याच सह्या तडजोडीवर झाल्यानतर ती तडजोड आतां जें गांव मानणार नाहीं त्या गांवाला कोण शहाणें म्हणेल बरें ! केवळ जाहीरनाम्याच्या भाषेवर रागावून तडजोड फेकून देणें बरें नाहीं. सरकारी जाहीरनामा लिहिण्याची ती एक विशिष्ट पद्धतच असते. आपण हरलों असें सरकार कधीं कबूल करील काय ? 'माफी मागावयास' येणाऱ्या लोकांकरितां कधीं कोणी मोटार पाठवितात काय ? 'चूक कबूल' करणाऱ्या लोकांकरितां रात्रीं बारा वाजेपर्यंत जेवण न करितां रहावें लागतें काय ! माझा सांगण्याचा उद्देश इतकाच आहे कीं, या जाहीरनाम्याच्या भाषेकडे दुर्लक्ष करा. त्याची पुरी उपेक्षा करणें हेंच त्याचें खरें खंडन आहे. वकीलांनीं ४० टक्के केले होते ते एक वर्षापुरते हें समजून घेतलें म्हणजे पंचांनीं आपला फायदा अधिक कसा केला हें आपल्याला कळून येईल. [मालगांवचें व्याख्यान.]

(ज्ञानप्रकाश, १२।१।२९.)

(तडजोडीच्या अटीचा पहिला मसुदा करतांना पंचांकडून झालेला हस्तदोष श्री० पुंडलीकजींनीं ढवळी येथील आपल्या व्याख्यानांत स्पष्ट करून त्यावर टीका केली होती. तो विषय पूर्वीच्या प्रकरणांतून आला असल्यामुळें या ठिकाणीं त्याची द्विरुक्ति केली नाहीं.)

शिरढोणच्या रयतांना तडजोड समजावून देतांना श्री० पुडलीकजी म्हणालेः—

ही एवढी चळवळ आपण आपल्या हिंमतीवर केलीत याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. मी म्हणतों याला भरपूर पुरावा आहे. श्री० शिखरे यांनी या अन्याय्य सारावाढीच्या विरुद्ध प्रथम हात उगारला किंवा त्यांनींच अनेक लेख लिहून श्री० मोडक यांच्या रिपोर्टावर अत्यंत मुद्देसूद अशी टीका केली व त्या रिपोर्टाच्या चिंधड्या उडवून दिल्या, किंवा ही चळवळ त्यांनींच रंगारूपाला आणिली तरी त्यांना आपल्या नौकरीवर जावयाचें आहे ही गोष्ट आपण सर्व जाणत होतां. त्यांनीं ती गोष्ट आपल्यापासून मुळींच लपवून ठेविली नाहीं. कवठे-पिराणमधील त्यांच्या एका भाषणांत ती गोष्ट श्री० शिखरे यांनीं स्पष्टपणें सांगितलेली आहे. त्याचा रिपोर्ट त्या वेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्धहि झाला आहे. श्री० शिखरे यांना चळवळ ऐनरंगांत आल्यावर नोकरीला जावें लागणार आहे. ही गोष्ट त्यांच्याच तोंडून जाहीर रीतीनें आपल्याला कळली होती आणि म्हणून शेवटीं चळवळ तुमच्याच स्वतःच्या हिंमतीवर चालवावयाची आहे, हें तुम्हांला माहीत असतांना या चळवळींत तुम्हीं पाऊल पुढें टाकिलेंत, याचा मला अत्यत अभिमान वाटतो. व म्हणून मी आपलें अभिनंदन करितों. राजसत्तेच्या हातून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ति तुम्हां रयत लोकांमध्यें उत्पन्न झाली पाहिजे व त्यांतच तुमचा खरा उत्कर्ष आहे. असेंच कोण.सही वाटत असलें पाहिजे. ही चळवळ तुमच्याच हातून करविण्यांत आमच्या अनेक हेतूंपैकीं हाही एक हेतु होता. त्या दृष्टीनें या चळवळींत आपल्याला किती तरी यश मिळालें आहे यांत शंका नाहीं. प्रत्येक गांवच्या पंचांनीं—हे पंच सुमारें ६०—७० होते—मिळून ता. १३।१२।२८ रोजीं डॉ० जोशी यांच्या घरीं सभा भरवून तडजोडीस जाण्याकरितां आपल्यांतीलच पांच पंच निवडले. त्यांची निवड करितांना त्या खेड्यांतील पुढाऱ्यांना जें शिक्षण मिळाले त्याची योग्यता फार मोठी आहे. त्या खेड्यापाड्यांतील जमलेल्या सर्व पुढाऱ्यांमध्यें फक्त दोन शेतकरी ब्राह्मण होते, बाकी सर्व ब्राह्मणेतर होते ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणें तडजोडीस

जाणाऱ्या पांच पंचांमध्यें चार पंच ब्राह्मणेतर होते. एक पंच जे ब्राह्मण होते त्यांनाही ब्राह्मणेतरांच्याच आग्रहावरून त्या पंचांमध्यें निवडलें होतें. वास्तविक तो ब्राह्मणही त्या पंचांतून तडजोडीस जाण्याला फारसा राजी नव्हता. शेवटीं मी ज्या अटीवर तडजोड करावयास या सर्व पंचांना बजावलें होतें त्यांपेक्षां अधिकाला कबुली देऊन जरी हे पंच आलेले असले तरी त्यांना सांभाळून घेणें माझें व आपलें काम आहे, या ब्राह्मणेतर पंचांनीं आजपर्यंत अशीं राजकारणाचीं कामें फारशीं केलेलीं नाहींत. अशीं कामें करीत करीतच हीं माणसें तयार होतील. माझी अशी खात्री आहे कीं, हे ब्राह्मणेतर पंचच आणखी कांहीं दिवसांनीं आपले पुढारी होतील. राजकारणांत दोनच पक्ष किंवा दोनच जाती आहेत. एक राजपक्ष व दुसरा लोकपक्ष. ही दृष्टि मात्र आपण चळूं देऊं नका. या चळवळींतील सर्व कामें आपल्या हातून, आपल्याला विचारून, आपल्याला पटल्यानंतर झालेलीं आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. शेवटीं तडजोड ही आपल्याच हातून झाली हेंही उत्तम झालें. आपले पंच जर या अटींवर सह्या करून आले नसते तर ही तडजोड मीं कधींच मान्य केली नसती. कारण या चळवळीनें, सरकारनें कांहीं विशेषशी सूट दिलेली नाहीं.

आपण, श्री० शिखरे, डॉ० जोशी, श्री० बाबण्णा व मी यांच्या खटपटीचा गौरवपूर्वक उल्लेख करितां, परंतु वास्तविक खरी चिकाटी आपल्या रयत बंधूंची आहे. आपल्या आत्मसमर्पणावरच ही सर्व इमारत उभी रहावयाची असते ना ? आपल्या हक्कांची पायमल्ली ज्या ज्या ठिकाणीं होत असेल किंवा सरकारच्या अन्याया-विरुद्ध आपण जेथें जेथें झेंडा उभाराल, त्या त्या ठिकाणीं आपल्या मदतीला आम्ही सर्व केव्हांही येऊं; परंतु राजसत्तेच्याविरुद्ध लढून त्यांच्याकडून लोक-कल्याणाचीं कायें घडवून आणणें या एकाच गोष्टीकडे आपली दृष्टि किंवा लक्ष लागलें पाहिजे. आपल्यामध्यें झालेली जागृति शेवटीं परिणामीं राजालादेखील हितकारीच होईल असें मला वाटतें. आणि आपल्यालाही तसेंच वाटत असलें पाहिजे. कोणाही व्यक्तीचा किंवा अधिकाऱ्याचा व्यक्तिशः द्वेष करण्याची बुद्धि आपल्यामध्यें शिर-ल्यास मात्र आपण या चळवळींत मिळविलेलें सर्व नैतिक यश किंवा आत्मिकबळ गमावून बसाल. आतां व्यक्तिशः आपापल्या तक्रारी मांडण्याच्या कामांत आपली विधायक कामगिरी करण्याची खरी कुवत व्यक्त होणार आहे. हजारों व्यक्तिशः तक्रारीचे अर्ज सरकारच्या हातीं दिले पाहिजेत. आपल्याकडून शक्य तितके कमी

अर्ज व्हावेत अशा हेतूनें राजसत्ता युक्त्याप्रयुक्त्या योजणार हें उघडच आहे. परंतु आपण त्यांना पुरून उरलें पाहिजे. अशा झगडयांतच प्रजा शहाणी व धीट होगार आहे. तुम्ही तुमच्या गांवच्या पंचांना ज्या वृत्तीनें वागवाल किंवा त्यांच्याशीं वागाल त्यावर तुमच्या गांवांत सार्वजनिक जीवनाचे पंच निर्माण होणें अवलंबून आहे. मिळालें तें आपल्या चळवळीनें मिळालें, असें नीट समजावून घेऊन लोकांमध्यें चळवळीवरील श्रद्धा वाढविण्याचें राष्ट्रकार्य करण्याची बुद्धि ईश्वरानें आपल्याला द्यावी अशी माझी प्रार्थना आहे. कारण ही कांहीं शेवटची चळवळ नव्हे, असे अनेक प्रसंग आपल्यावर यापुढें येण्याचा संभव आहे. संस्थानिकांना काय किंवा राजसत्तेला काय पैशाची हांव सुटली व चैन किंवा खाजगी खर्च अवास्तव वाढला तर काय परिणाम होतात हें इतिहास रोज दाखवीत आहे. आपण त्यापासून शहाणें झालें पाहिजे. या चळवळीचा जोर जसा आपल्यावरच अवलंबून होता, त्याचप्रमाणें या तडजोडीला खरे जबाबदार किंवा या यशाला खरे भागीदार आपण रयत लोक आहांत. पुढारी हे केवळ निमित्तमात्र आहेत असें म्हणण्यांत मला कांहींच अतिशयोक्ति वाटत नाहीं. (ज्ञानप्रकाश, ता. २६।१।२९.)

"आज रयतांच्या पंचांनीं जी तडजोड मान्य केली आहे त्यापासून रयतांना खालील गोष्टी मिळाल्या आहेत:—

[१] वाढीपैकीं शेंकडा २५ टक्के कामयची सूट मिळावयाची.

[२] उरलेल्यापैकीं ३५ टक्के वाढ यंदां वसूल करावयाची.

[३] त्याशिवाय व्यक्तिशः तक्रारींचा विचार अलाहिदा होऊन या वाढीपैकीं पुन्हा कमी व्हावयाचें आहे.

[४] जे रयत व्यक्तिशः तक्रारी मांडतील त्यांचा वाढलेला सारा यंदां तहकूब ठेवावयाचा आहे.

[५] तक्रारीअर्जांना स्टँपडयूटी लावावयाची नाहीं.

[६] तक्रारी अर्जांचा निकाल त्या त्या ठिकाणीं प्रत्यक्ष जागेवर जाऊन व्हावयाचा असून तक्रारदारांना त्या वेळीं हजर ठेवून त्यांचें म्हणणें लेखी नमूद करून घ्यावयाचें आहे.

[७] आपल्या तक्रारी वाटल्यास वकिलामार्फत मांडविण्यास हरकत नाहीं. त्या सारावाढीच्या कामापुरते लिहिणावळ व वकीलखर्च रयतांना मुळींच पडणार नाहीं अशी व्यवस्था पुढाऱ्यांनीं केली आहे.

[८] या सारावाढीच्या विरुद्ध केलेली सत्याग्रहाची चळवळ केवळ मिरज तालुक्यापुरतीच असतांही, मिळेल ती सूट व सवलत मोडनिंब व लक्ष्मेश्वर तालुक्यांना देखील मिळावयाची आहे.'' (ज्ञानप्रकाश, ता. २७।१।२९.)

असो. अशाप्रकारें चळवळीच्या पुढाऱ्यांनीं तडजोड मान्य करून त्याप्रमाणें व्यक्तिशः तक्रारी खऱ्या आणि प्रामाणिकपणानें मांडण्याकरितां लोकमत तयार करण्याचें काम केलें. या संधींत नवीन दोन प्रश्न तडजोडीच्या अटींच्या अर्थासंबंधानें उपस्थित झाले.

१ 'वाढीपैकीं ३५ टक्के' याचा अर्थ काय समजावयाचा ?

२ आणि रिव्हिजन झाली तर पहिल्या सालीं वाढ वसूल करितां येते किंवा नाहीं?

[१] वास्तविक 'वाढीपैकीं ३५ टक्के' याचा अर्थ 'जी वाढ झाली असेल त्यापैकीं शंभराला ३५.' असाच होतो. 'Times of India' पत्रानेंसुद्धां या अटीचे भाषांतर '35 percent of the increased assessment' असेंच केलें होतें. शिवाय नवीन तरमाचा हिशेब करणारे अधिकारी श्री० भोगले मास्तर यांनींही जाहीरनाम्यांतील भाषा संदिग्ध आहे असें कबूल केलें होतें. आणि महत्त्वाचा गोष्ट अशी आहे कीं, प्रजा, पंच व सरकार यांमध्यें करारासंबंधानें शंका रहात असली तर त्याचा फायदा प्रजेलाच मिळाला पाहिजे असा न्याय आहे. कारण, कायदेशास्त्रापेक्षां श्रेष्ट असें धर्मशास्त्र (equity) म्हणतें कीं, दोन पक्षांमध्ये समेट झाला असतां समेटाच्या कलमाचा अर्थ दुर्बलपक्षाला अनुकूल असाच केला पाहिजे. पण या संस्थानांत इतका खोल विचार करणार कोण ! राजाच्या हातीं सर्वांत अधिक म्हणजे एक 'दंड' असतो म्हणून त्यांस 'सबल' व प्रजेच्या हातीं तो नसतो म्हणून ती 'दुर्बल' असें म्हणत असतात. अनाठायीं, अमर्यादित व अवेळीं त्या दंडाचा उपयोग करण्याची राजाला बुद्धि होऊं लागली म्हणजे खुशाल समजावें कीं, तो राजा दुर्बल बनूं लागला व त्याच वेळीं प्रजा सबल बनण्यास सुरुवात झाली. आपल्या वचनाचा व शब्दाचा सरळ अर्थ न करितां मन मानेल तसा अर्थ करून प्रजेला सतावण्याची बुद्धि केवळ त्या 'दंडा'वर होत असते व हाच खरा दुर्बलतेचा पुरावा आहे. आणि या दृष्टीनें पाहतां दरबारनें ज्या रीतीनें या तडजोडींतील कांहीं कलमांची अंमलबजावणी केली ती न्यायाच्या दृष्टीनें नसली तरी कायद्याच्या दृष्टीनें तरी बरोबर असावी कीं काय अशी शंका येते. व न्याय आणि कायदा यांमधील तफावत स्पष्ट दृग्गोचर होऊं लागते !

'बापासि बाप न म्हणे, ऐशासी काय होय आजोबा' असें मोरोपंतांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. अशा वृत्तीच्या माणसाजवळ वरील गुणांची अपेक्षा करणें कितपत सयुक्तिक ठरणार ? पंचांनीं सह्या केल्या त्या वेळीं त्यांच्या मनांत काय भाव होता याचा विचार घेऊन रयतांनीं या मुद्द्यावर झगडण्याचें रहित केले, व आपल्या मनाचा मोठेपणा व्यक्त केला.

[२] दुसरा मुद्दा पहिल्या वर्षी वाढ घेतां येते कीं नाहीं, याविषयींचा होता. पंचांनीं सही केलेल्या अटींत पहिल्या वर्षी वाढ घ्यावयाचें असें कबूल केल्यानंतर वास्तविक तो प्रश्नच मिटला आहे. त्या अटीवर पंचांच्या सह्या घेतांना दरबारनें कायदा जाणून थोडासा विचार करावयास पाहिजे होता.

असो. नवीन कारभारी नवीन तरम जाहीर करण्यास पुन्हा गांवोगांव जाऊं लागले. तडजोडीनंतर सर्वांचीच दिलजमाई झाली व आतां सर्वांनींच सलोख्यानें वागावयाचें हें व्यक्त करण्याकरितां ठिकठिकाणीं रयतांनीं या नवीन कारभाऱ्यांना पानसुपारी करण्यासही कमी केलें नाहीं. कवठेपिराणच्या लोकांनीं पानसुपारीला त्यांना निमंत्रण दिलेलें त्यांनीं नाकारलें व बाकीच्या ठिकाणीं तें स्वीकारलें असें समजतें. तरम जाहीर झाल्यावर गांवकामगारांकडून माहिती मिळवून घेऊन व्यक्तिशः तक्रारींचे अर्ज करण्याच्या कामाला रयत लोक लागले. तडजोड पचविल्याशिवाय हें पुढील काम जोरानें होणें शक्यच नव्हतें आणि या कामाला मनापासून लागल्याशिवाय भागण्यासारखें नव्हतें. गांवकामगारांकडून माहिती कशी घ्यावी हें रयतांना कळण्यासारखें नसल्यामुळें त्यांना आपापली माहिती लिहून घेण्याकरितां सत्याग्रह कचेरीकडून एक 'रयतांचें माहिती पत्रक' छापवून दिलें.

[१] खातेदाराचें नांव. [२] रि. स. नंबर. [३] पोट नंबर. [४] खुष्की. [५] बागाईत. [६] रि. स. नंबर. [७] रि. स. पोट नंबर. [८] रि. स. खुष्की. [९] रि. स. बागाईत. [१०] पूर्वीचा एकरीं दर. [११] खुष्की-पूर्वीच्या दरानें एकूण आकार. [१२] बागाईत पूर्वीच्या दरानें एकूण आकार. [१३] रि. स. प्रमाणें एकरी दर. [१४] रि. स. प्रमाणें खुष्की एकूण आकार. [१५] रि. स. प्रमाणें बागाईत-एकूण आकार. [१६] एकूण वाढ. [१७] वाढीचा $\frac{५}{८}$. [१८] वसूल होणेची रक्कम.

इतके रकाने त्यांत होते. त्याचप्रमाणें तक्रारीअर्जाचा नमुना रयतांकरितां छापविला होता तो खालीलप्रमाणें :—

मेहेरबान रावबहादुर जॉ. स्टेटकारभारी व कलेक्टर संस्थान मिरज यांसीः—

अर्जदार ——— राहणार ———

याचा रिव्हिजन सर्व्हेबाबत तक्रारी अर्ज असा आहे कीं:—

माझी जमीन एकर गुंठे मौजे येथें असून, तिचा रि. स. नं. आहे व खात्यास नांव हिस्सेदाराचें असून पोटनांव आहे. या जमिनीबाबत झालेल्या रि. सर्व्हेतील माझ्या तक्रारी आहेत, त्या खालीं लिहिल्याप्रमाणें :—

१. हल्लीं वैयक्तिक तक्रारीसंबंधानें अर्ज करण्यास कमींत कमी एक महिन्याची मुदत देण्यांत यावी असा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत यावा. तरम जाहीर झाल्यानंतरच आपल्या जमिनीची माहिती आम्हांस मिळणारी असून त्या दिवसा पासूनच मुदत मोजण्यांत यावी.

२. सदर जमिनीची प्रत मूळ सर्व्हेमध्यें कमीची आहे. ती प्रत बदलून जमीन वरच्या प्रतींत रि. स.मध्यें घालण्यासारखी जमिनीची परिस्थिति नसतां, तशी प्रत ठरविण्यांत अन्याय झाला आहे. तरी मूळ सर्व्हेप्रमाणें जमिनीची प्रत ठरविण्यांत येऊन आकार ठरवावा.

३. आमचा हा गांव मूळ सर्व्हेमधील गटांतून काढून वरच्या गटांत सामील केला आहे ही गोष्ट अन्यायाची झाली आहे. हें सदर गांवची स्थिति पाहिली असतां सहज दिसून येणार आहे. आमच्या गांवचा गट बदलल्या-मुळें सदर जमिनीची प्रत ही चढ लागली आहे; तरी मूळ सर्व्हेप्रमाणें सदर जमिनीची प्रत कायम करून त्याप्रमाणें आकार बसविण्यांत यावा.

४. रि. सर्व्हेमध्यें सदर जमिनीपैकीं एकर गुंठे इतकी जमीन पाटस्थळ नसतां ती तशी ठराविण्यांत चूक झाली आहे. म्हणून इतक्यापुरता पाट-स्थळाचा आकार कमी करावा.

(अ) माझ्या जमिनीस पाटस्थळ मुळींच नाहीं. सबब पाटस्थळाचा आकार आजिबात कमी करण्यांत यावा.

(आ) सदर जमिनींत चालू सालीं पाण्याचा पाट सुरू आहे, तो कायम नस-ल्यानें पाटस्थळाचा आकार बसूं नये. परंतु पाटाचें पाणी विकत देण्याचें असल्यास

त्या बाबतींत ज्या ज्या वेळीं पाटाचें पाणी घेण्यांत येईल, त्या त्या वेळीं अलाहिदा करार सरकारशीं करण्यास मी तयार आहें.

५ (अ) सदर जमिनींत
(अ) विहीर नाहीं
(आ) विहीर असून ती वर्षें पडक आहे व तींत पाणी नाहीं.
(इ) असलेल्या विहिरींतील पाण्यानें एकर गुंठे इतकी जमीन भिजते. म्हणून
(अ) सदर जमिनीवर बसलेला बागाइताचा आकार चूक आहे. तो सर्व कमी करावा.
(आ) एकर गुंठे तितक्या पुरताच बागाईताचा आकार बसवावा व बाकी बागाईत आकार कमी करण्यांत यावा.
(ब) कमाल बागाईत आकार एकरीं रु. आ. हा ठरवला असतां एकरीं रु. आ. इतका आकार बसवतां येत नाहीं. तरी चढ आकार कमी करावा.

६. मूळ सर्व्हे झाल्यानंतर व हल्लींच्या रि. सर्व्हेप्रमाणें आकार बसण्यापूर्वी सदर जमिनींत मी स्वतः विहीर काढवून जमिनीची सुधारणा केली असल्यानें बागाईताचा व इतर सुधारणेचा आकार लँड रे. कोड कलम प्रमाणें चालू सर्व्हेमध्यें बसवितां येत नाहीं. तरी तो कमी करावा.

७. कमालजिराईत दर एकरीं रु. आ. हा रि. स.मध्यें ठरविला गेला असतां सदर जमिनीवर एकरीं रु. आ. प्रमाणें आकार बसवतां येत नाहीं. म्हणून हा चढ आकार कमी करण्यांत यावा.

८. सदर जमिनीचें उत्पन्न इतकें आहे व हल्लीं सारा इतका आहे. इतका सारा बसणें न्याय्य व कायदेशीर नाहीं; तरी तो कमी करावा.

९. माझ्या जमिनीच्या लगतच्या नंबरच्या जमिनीस एकरीं आकार रु. आ. आहे व त्या लगतच्या माझ्या जमिनीस एकरी आकार रु. आ. इतका बसविला आहे. तरी तो कमी केला जावा.

१०. सदरहू जमीन सर्व्हे नं.चा आकार मूळचे तरमाचे वेळीं रक्कम रु. आ. इतका होता. रिव्हिजन सर्व्हेमध्यें त्याची वाढ बेसुमार झाली आहे, म्हणजे रु. आ. आकार हल्लीं बसला आहे. आजूबाजूच्या जमिनीच्या आकाराच्या दृष्टीनें ही वाढ गैर झाली आहे असें दिसून येणार आहे.

या नंबरापुरती इतकी वाढ होण्यास मुळींच योग्य कारण नाहीं. सबब याबद्दलची चवकशी होऊन योग्य ती वाढ करण्यांत यावी.

११. सदर नंबराच्या जमिनीचें क्षेत्र मूळच्या मोजणींत जें लागलें आहे त्यापेक्षां हल्लीं कमी दर्शविलेली आहे तें बरोबर नाहीं. मोजणींत चूक झाली आहे. पूर्वीचें टिप्पण बुकाशीं व हल्लींच्या मोजणीशीं ताडून पाहून मोजणी पुन्हा करून हद्दी व त्यासाठीं जरूर तर आजूबाजूचे नंबराचीही मोजणी करून ह्या नंबराच्या क्षेत्राचा ठासपणा नक्की करण्यांत यावा.

१२. सदरहू नंबरांत फाळणी करण्यांत चूक झाली आहे व त्यामुळें अर्जदाराच्या ताव्यांतील जमीन अदमासें एकर गुंठे कमी दर्शवून दुसरा हिस्सेदार याचे ताव्यांत जास्त जमिन दर्शविली आहे, तितकी त्याची जमीन नाहीं; सबब याजबद्दल सर्व हिस्सेदारांचें म्हणणें समजून घेऊन वहिवाट कशी होती त्याबद्दलही चवकशी करून पूर्ववत् हिस्सेप्रमाणें फाळणी व्हावी व नकाशांत तशी दुरुस्ती करण्याबद्दल हुकूम व्हावा.

१३. सदरहू नंबराच्या जमिनीशीं कांहीं संबंध नसतां श्री० यांचें नांव वहिवाटदार, खातेदार किंवा मालक अशा अर्थानें आकारबंदींत नमूद केलें आहे; परंतु तसें करण्यास योग्य अधिकाऱ्याचा हुकूम नाहीं. मोजणीदारास अशाप्रकारें मागील लोकांचीं नांवें कमी करून योग्य इसमाचें किंवा वहिवाट-दाराचें नांव दाखल करण्याबद्दल हुकूम व्हावा.

१४. जमीन इनाम असतां ती रयतावा दाखल करण्यांत आली आहे. हें गैर झालें आहे. ती इनाम सदरांत घालण्यांत यावी.

१५. इनाम जमिनींत वाढावा दाखविणेत आलेला आहे. ही चूक झाली आहे. तसेंच वाढावा हा नीरस जमिनींत काढण्याचा असतां, तसें न करितां सरस जमिनींत काढण्यांत आला आहे; यामुळें नुकसान झालें आहे. ती दुरुस्ती होणें जरूर आहे.

याप्रमाणें छापवून दिलेल्या फार्मवर गांवकामगारांकडून माहिती मिळवून घेऊन, वरील अर्जाप्रमाणें अर्थात् त्यापैकीं ज्याच्या ज्या तक्रारी असतील त्यानें तेवढ्याच आपल्या हातानें लिहून किंवा लिहवून आपला तक्रारी-अर्ज करावयाचा असें ठरलेलें होतें व त्याप्रमाणें काम चाललेलेंही होतें. बोलवाड व तानंग या गांवच्या रयतांना गांवकरांकडून माहिती मिळाली. मालगांव व पाटगांव या गांवांतील कांहीं

लोकांना माहिती मिळाली. परंतु बोलवाड व तानंग या गांवांतील लोकांनीं आपले तक्रारी अर्ज कारभारीसाहेबांकडे सादर केल्यानंतर त्यांना कळून आलें असलें पाहिजे कीं, या सारावाढींत किती भयंकर व सर्वांवरच अन्याय झाला आहे ! ! आणि हा इतका अन्याय दूर करीत बसल्यास, सारावाढ दरबारच्या हातीं काय लागणार आहे ? अशी शंका येऊनच कीं काय, अधिकाऱ्यांनीं किंवा दरबारनें म्हणा, आपलें धोरण बदललें आणि त्यामुळें पुन्हा झगडावें लागणार असें रयतांना वाटूं लागलें. आणि पुन्हा रयत व अधिकारी यांच्या लहानमोठ्या चकमकी होऊं लागल्या. यांत मनाचा मोठेपणा कोणीं दाखविला, प्रामाणिकपणा कोणीं दाखविला, आपल्या शब्दाला जागण्याचा गुण कोणीं व्यक्त केला, सरळपणा व समंजसपणा कोणाच्या बाजूला होता; या सर्व गोष्टी ठरविण्याचें काम आम्ही वाचकांतरच सोंपवितों. आणि फक्त घडली ती सर्व हकीगत आम्ही पुढील प्रकरणांत संगतवार देत आहों ती लक्षपूर्वक वाचण्यास वाचकांना शिफारस करतों.

प्रकरण तेरावें

प्रजेसमोर अधिकारी फिके पडले

चळवळीनें खेड्यापाड्यांतून झालेल्या जागृतीकडे पाहण्याला व ती समजून घेण्याला, पहाणाऱ्याच्या अंतःकरणांत एक प्रकारचा आपलेपणा असावा लागतो असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. मिरज-सारावाढीविरुद्ध मिरज तालुक्यांतील रयतांमध्यें जी खळबळ किंवा चळवळ झाली होती, त्या जागृतीचे परिणाम आज अशाच आत्मीय भावनेनें समजून घेतले पाहिजेत. परंतु मिरजेंतील अधिकाऱ्यांमध्यें ती दृष्टि असावी तितकी नाहीं असेंच म्हणावें लागत आहे. सारावाढ भयंकर व अन्याय्य झालेली असल्यामुळें कोणाही रयतास ती अत्यंत असह्य वाटत होती; परंतु सुरुवातीला केवळ अर्जावर सह्या करण्यासही रयत धजत नव्हते. कांहीं लोकांनीं मोठें धाडस करून सह्या केल्या म्हणजे इतरांना वाटत असें कीं, "त्यांच्या सह्यांनीं काय परिणाम होतो तो पाहूं व मगच आपण सह्या करूं." खेडयांतील रयतांमध्यें एकादा हुशार प्राणी असलाच तर तो मोठ्या धूर्तपणाचा आव आणून लोकांना सल्ला देत असे कीं, "जेवढ्यांनीं सह्या केल्या आहेत, तेवढ्यांना जें मिळेल तें तुलाही आपोआप मिळेलच. तूं स्वस्थ बैस." या वेडगळ समजुतीमधून रयतांना वर काढणें अत्यंत परिश्रमाचें काम आहे. सारावाढीच्या विरुद्ध चळवळीला हात घालणाऱ्यांना प्रथम प्रथम या आपत्तीशीं टक्कर द्यावी लागली आहे. या चळवळीमध्यें लोकांनीं अधिकाऱ्यांशीं अनेक प्रकारच्या चकमकी प्रत्यक्ष अनुभविल्या असल्यामुळें, लोकांमध्यें आतां इतकी जागृति उत्पन्न झाली आहे कीं, आपल्यावरील अन्याय दूर करून घेण्यास ते आपल्या बुद्धीप्रमाणें उपाययोजना करून पहात आहेत. वास्तविक आपल्या रयतांमधील ही जागृति पाहून अधिकाऱ्यांना व श्रीमंतांनादेखील आनंद झाला पाहिजे. पण इतकें सौभाग्य या संस्थानचें असतें तर झाला हा सर्वच प्रकार कसा झाला असता !

रयतांना आपापले व्यक्तिशः तक्रारी-अर्ज मांडविण्यास शिकवितांनाही चळवळीच्या पुढाऱ्यांना बरीच उरस्फोड करून द्यावी लागली. 'अधिकारी लोक तुमच्या अर्जांचा मुळींच विचार करणार नसले, तरी तुम्ही अर्ज त्यांच्याकडे पाठ-

घेण्यास मात्र आळस करतां उपयोगीं नाहीं हा एक विचार रयताच्या मनीं उत्पन्न होण्यास फारसा विलंब लागत नाहीं. जर अधिकारी आमच्या अर्जांचा विचार करणार नाहींत, तर उगाच व्यर्थ अर्ज लिहिण्याचा व त्यांच्याकडे पाठविण्याचा त्रास कशाला घ्यावा ? हें रयतांचें तर्कज्ञान शाळेंत शिकण्यांत बुद्धीला जी तालीम मिळते तिची किंमत कांहीं विशेष आहे. " चार हजार लोकांच्या जमावाची लाज धरली नाहीं किंवा पूर्वी आमच्या सर्वांच्या सहीचा अर्ज केला होता त्याला विचारलें नाहीं आणि आतां माझ्या गरीबाच्या एकट्याच्या अर्जाला सरकार भीक घालणार होय ? उगाच व्यक्तिशः अर्ज करून तरी काय करावयाचें आहे ? हा, रयतांकडून येणाऱ्या आक्षेपांतील अत्यंत महत्त्वाचा आक्षेप आहे. याला उत्तर देऊन अशा विचाराच्या जमावाला व्यक्तिशः तक्रारींचें महत्त्व पटवून देणें म्हणजे एक प्रकारची शिक्षा वाटण्याइतकें कठिण काम होतें. रयतांच्या उक्त दोन्ही आक्षेपांचें निरसन प्रयासानें कां होईना, होऊं शकेल; परंतु 'अर्जानें आमची दाद काय लागणार ?' हा विचार रयतांच्या डोक्यांत शिरला कीं कामच भागलें ! परंतु या सर्व दिव्यांतून रयत व रयतेचे पुढारी पार पडून रयतांचें लक्ष व्यक्तिशः तक्रारी मांडण्याकडे एकदांचें लागलें ही गोष्ट गेल्या प्रकरणांत आम्हीं उल्लेखिलेली आहेच.

परंतु इतक्या अवधींत आंतून कांहीं चक्रें उलटींच फिरत होतीं. दरबारचें किंवा अधिकाऱ्यांचें धोरण एकदम बदललें व व्यक्तिशः अर्ज शक्य तितके कमी कसे होतील व झालेल्या अर्जांना वाटाण्याच्या अक्षता कशा देतां येतील याचा विचार होऊन तसा अंमलही झाला

१. गांवकामगारांना तरमाची माहिती रयतांना न देण्याविषयीं कानमंत्र झाले असले पाहिजेत अशी शंका येण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली ! गांवकामगार लोकांना माहिती देईनातसे झाले. कांहीं गांवकामगारांनीं माहिती देण्याचें साफ नाकारलें व कांहींनीं फक्त टोलवाटोलवी करण्यास सुरवात केली.

२. छापील फॉर्मवर माहिती लिहून घेण्याला रयत आल्यास आम्ही त्यावर माहिती देणार नाहीं. रयतांना तो छापील फॉर्मच कशाला पाहिजे ? साध्या कागदावर आपली माहिती उतरून घ्यावी. आम्ही काय त्यांना नको म्हणतों काय ? अशा सबबीवर कित्येक ठिकाणीं रयतांशीं तक्रार उत्पन्न केली गेली. एवढेंच नव्हे तर तो फॉर्म कोणीं आणला ? कोठें छापला ? काय खर्च आला ? येथें किती फॉर्म आणले ? अशाप्रकारें त्या फॉर्मची वारसा चौकशी सुरू करून मामलेदारांनीं कांहीं

लोकांचे जबाब लिहून घेण्यास व त्याखालीं त्यांची सही घेण्यास सुरुवात केली. हेतु इतकाच कीं, त्या फॉर्मांना रयतांनीं बुजावें.

३. फॉर्म आणिलाच तर गांवकामगार रयतांची माहिती लिहून देण्याला स्वतः कायद्यानें बांधलेला नाहीं. वाटल्यास आकारबंद रयतांपुढें ठेवून त्यांनीं पाहून आपली माहिती लिहून घ्यावी, आमची त्यांना कांहीं हरकत नाहीं. रयतांना लिहून देत बसून रयतांची संख्या काय थोडी ? अंदाजी ४८००० रयत सबध संस्थानांत; गांवकामगारांनीं आपलें काम केव्हां करावें ?

४. रयतांना लिहितां येत नसल्यानें त्यांनीं लिहिणारा कोणी आणिल्यास, एकाच माणसाला सर्वांची माहिती कशाला पाहिजे ? ज्यानें त्यानें आपापला लिहिणारा आणला पाहिजे ! आम्ही एकाच माणसाला सर्वांची माहिती उतरून घेऊं देत नाहीं.

५. तरमाच्या बाबतींत तक्रारी करावयाच्या असल्यामुळें आमच्या आकारबंदांतील सर्व माहिती रयतांना काय करावयाची ? आम्ही सर्व माहिती त्यांना देत नाहीं आणि तशी सर्व माहिती पाहिजेच असल्यास त्यांनीं अर्ज करून खर्च द्यावा, म्हणजे आम्ही त्यांना, नंतर सर्व लिहून सहीशिक्क्याचा कागद देऊं.

६. ज्यांची तक्रार असेल त्यांनाच आम्ही माहिती देऊं. ज्यांची तक्रार नाहीं त्यांनासुद्धां माहिती देत बसण्यास आम्हांला उद्योग नाहीं काय ! 'माहिती कळल्याशिवाय तक्रार आहे किंवा नाहीं हें रयतांना कळणार कसें ?' या प्रश्नाला उत्तर– 'स्वतः कारभारीसाहेबांनीं चावडींत तरम वाचला त्या वेळीं आपापली तक्रार आहे किंवा नाहीं, तुम्हांला कळूं नये काय ?' असें नमुनेदार उत्तर मिळत असे.

७. आधीं फाड्याचे पैसे घेऊन मग माहिती देऊं; तोंपर्यंत माहिती मिळणार नाहीं. जुने नंबर, जुना आकार, जुने एकर–गुंठे, जुने बागाईतजिराईत ज्यांचें त्यांस माहित नाहीं काय ! आमच्या आकारबंदांत ती व्यवस्थित एका ठिकाणीं असून आम्ही सहज तें देऊं शकत असलों, तरी तुम्हाला काय म्हणून द्यावें !

८. 'पाटस्थळ व मोटस्थळ वगैरे' असें जरी जाहीरनाम्यांत असलें, तरी पाटस्थळ व मोटस्थळ या दोनच बाबतींतील तक्रारी ऐकल्या जातील. 'वगैरे' शब्द त्यांत असला म्हणून काय झालें ! त्या 'वगैरे'चा अर्थ 'पाटस्थळ-मोटस्थळ' इतकाच आहे. याच्यापेक्षां अधिक अर्थ आम्ही जाणत नाहीं.

९. अर्जदार अर्ज देण्यास अधिकाऱ्याकडे गेल्यावर त्याला अर्ज कोणीं लिहिला,

अर्जांत काय लिहिलें आहे, वगैरेविषयीं अर्जदारांची 'उलट-सुलट तपासणी' करून ते अधिकारी आपला पूर्वजन्म किंवा पूर्वाश्रम वकिलांचा होता याची जाणीव अर्जदारांना करून देत असत अशींही उदाहरणें झालीं आहेत. जणुं काय वकिलांनीं लिहिलेली कैफियत प्रत्येक पक्षकाराला पाठच असते आणि ती पक्षकाराला नीट सांगतां न आल्यास त्याचा खटला न्यायाधिशांनीं वकिलांच्या तोंडावर फेंकून देण्यास मुळींच हरकत नाहीं.

या सर्व व अशाच प्रकारच्या अनेक सबबी ऐकावयास मिळत असत. कारण खेड्यांतील परिस्थिति गांवकामगारांना चांगली माहीत असते व त्यांना आपली नौकरी सांभाळावयाची असल्यामुळें अधिकाऱ्यांच्या हुकुमाचे ते ताबेदार असतात व अधिकाऱ्यांचे गुप्त कानमंत्र ते बाहेर सांगूं शकत नाहींत. गांवकामगारांना माहीत असतें कीं, आपल्याविरुद्ध या बाबतींत कोणींही तक्रार केली तर त्यांत आपलें नुकसान नसून उलट अधिकाऱ्यांची आपल्यावर विशेष मर्जी होण्याचा संभव अधिक. रयतांना फॉर्मवर माहिती दिली नाहीं तर तसले फॉर्म प्रत्येक रयत आंखून आणणें शक्य नाहीं. आणि फॉर्माशिवाय लिहून नेलेल्या माहितीवर बाहेरच्या अनभिज्ञ लेखकाला तक्रारी अर्ज लिहिण्यास बराच त्रास पडेल; रयतांना लिहितां येत नाहीं. प्रत्येक मनुष्य स्वतंत्रपणें आपल्यापुरता वेगळा लेखक पैदा करूं शकत नाहीं. आकारबंदांतील सर्व माहिती दिली नाहीं म्हणजे झालें. तरम आकार सांगण्याच्या आधींच तुझी तक्रार आहे किंवा नाहीं असें विचारून, तक्रारी असतील तेवढ्यांनाच माहिती द्यावी किंवा देतों म्हणावें, माहिती सांगण्याच्या पूर्वीच फाळा मागावा, पाटस्थळ व मोटस्थळाशिवाय माहिती देण्याचें कारण नाहीं असा अर्थ जाहीरनाम्यांतून काढावा; वगैरे अनेकविध ज्ञानाच्या आधारावर वरील सर्व सबबींची उभारणी झाली होती यांत शंका नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे यांत एक सूत्र होतें कीं, व्यक्तिशः तक्रारी कमी याव्यात.

पण अधिकाऱ्यांच्या या कित्येक ठिकाणीं गुप्त तर कित्येक ठिकाणीं उघड विरोधानें रयतांमध्यें व्यक्तिशः तक्रारी अर्ज मांडण्याकडे अधिकच हुरूप आला. त्यामुळें तडजोड करणाऱ्या पंचांकडे जाऊन ते (रयत) त्यांना स्वच्छ सवाल विचारूं लागले कीं, 'तुम्ही तडजोड करून आलांत; ती शिस्त म्हणून आम्हीं मानली व त्याप्रमाणें व्यक्तिशः तक्रारीअर्ज करावयास तयार आहों; परंतु आम्हाला गांवकामगारांकडून माहितीच मिळत नाहीं याची वाट काय ? आम्हाला माहिती मिळवून द्या'.

अशाप्रकारें रयतांचा लकडा तडजोड करणाऱ्या पंचांच्या मार्गें सारखा लागल्यावर त्यांनीं खालीलप्रमाणें अर्ज नवीन कारभाऱ्यांच्याकडे पाठविला तो असाः—

मेहेरबान रा० ब० जॉ. स्टेट कारभारी व कलेक्टर, संस्थान मिरज यांच्या हुजूरासः—

आम्ही खालीं सह्या करणारे पंच यांचा अर्ज असा आहे कीं, तानंग, कवठे-पिराण, ढवळी गांवीं आपण तरम जाहीर करून गेल्यानंतर वास्तविक गांवकरां-कडून आम्हांस सर्व माहिती मिळावयास पाहिजे होती; परंतु ती त्यांच्या-कडून आम्हांस मिळत नाहीं ! अर्ज करण्यास आपण मुदतही फार थोडी ठेविलेली असून, आम्हांस माहिती न मिळाल्यामुळें तीही फुकट जात आहे. अशा प्रकारें प्रत्येक कामांत आम्हांस आडकाठी होत गेल्यास आम्ही गरीब रयत हैराण होऊं. मदतीपैकीं आजपर्यंतचे दिवस अशा प्रकारें व्यर्थ गेले आहेत; ही गोष्ट ध्यानांत घेऊन आम्हाला पाहिजे असलेली माहिती गांवकरांकडून मिळावी असा हुकूम कृपाळू होऊन ताबडतोब व्हावा अशी नम्र विनंति आहे. जाहीर व्हावें. ता. २९।१।२९

रयतपंच

माधव रामचंद्र देशपांडे (कवठेपिराण)

बाबा बाळा पाटील (ढवळी)

कृष्णा रामा कानडे (तानंग)

पंचांच्या या वरील अर्जास रा० ब० कारभारी यांनीं जें उत्तर दिलें आहे तें खालीलप्रमाणें आहेः—

उत्तर

" जाहिरनाम्यांत नमूद असल्याप्रमाणें वैयक्तिक तक्रार ज्या कोणाची असेल व ज्या कोणास तशी तक्रार करण्याची असेल, तो गांवकामगाराकडे जाऊन माहिती मिळवून त्याजबद्दल तजवीज करील. त्याजबद्दल अर्जदार (वरील पंच) यांनीं कांहीं तजवीज करण्याची नाहीं व त्यांच्याशीं अर्जदार यांचा कांहीं संबंध नाहीं. सबब अर्जदार यांच्या अर्जाचा कांहीं विचार होत नाहीं अशी अर्जदारास समज द्यावी.

सही—B. K. Joshi.

अशी रीतीनें अधिकाऱ्यांनीं तडजोड करणाऱ्या पंचांना उधळून लावलें ! तड-जोडीच्या वेळीं या पंचांची त्यांना गरज होती किंवा जाहीरनाम्याच्या अजींतील अटीचा अर्थ लावण्यास त्यांना या पंचांची आवश्यकता होती; परंतु आतां या पंचांना धुडकावण्यास त्यांनीं कां लाजावें ? खरेंच आहे; पैलतीराला गेल्यावर नावाडी मरेनाका ? रोग बरा झाल्यावर वैद्याची काय किंमत ? राजा वचनभंग करूं लागला, आपल्या हातीं केवळ पूर्वजांच्या पुण्याईनें आयत्या लाभलेल्या सत्तेचा प्रजेला सतावण्याच्या बाबतींत मन मानेल तसा व तेव्हां दुरुपयोग करूं लागला म्हणून, कालपर्यंत लोकपक्षाचें धुरीणत्व पत्करून आज कारभारीपदावर चढलेल्या व चढविलेल्या श्री० बाबूराव जोशी यांच्यासारख्या सभ्य गृहस्थास राजाच्या अशा गुणांचें अनुकरण करण्याची बुद्धि व्हावी यापरता त्यांचा स्वतःचा मानसिक अधःपात तो आणखी काय व्हावयाचा ?

या ठिकाणीं लोकशिक्षणाच्या हेतूनें आम्ही एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख मुद्दाम करीत आहों. रयतेच्या पंचांना अनेक तऱ्हेनें व अनेकांमार्फत तडजोडीस कबूल होण्याचे जे प्रयत्न, विशेषतः श्री० पुंडलीकजी पुण्यास गेल्यावेळीं त्यांच्या गैरहजेरींत झाले, त्यांचा त्या वेळीं अंशतः परिणाम पंचांवर झाल्यावांचून राहिला नाहीं हें कबूल करणें जरूर आहे !! रयतांनीं घालून दिलेल्या अटींबाहेर, पंचांनीं जी तडजोड मान्य केली त्याचें कारण त्यांच्यांतील धमक, विश्वास थोडा कमी होत चालला होता हेंच होय !! अशा मोठ्या चळवळीच्या वातावरणांत, चळवळींत सामील असणाऱ्यांच्या ज्या मनोवृत्ति असतात, त्या, ती चळवळ संपल्यानंतर टिकून राहणें फार कठिण असतें. अर्थात् ढिलाई, कुचराई इ० दुर्गुणांचा पगडा बसण्यास सुरुवात होते ! त्यांतच पंचांनीं ठरावाबाहेर तडजोड केल्यानें व ती स्वीकारण्याविषयीं पुढाऱ्यांनीं केलेल्या आग्रहामुळें परस्परांविषयीं मतभेद उत्पन्न झाले ! त्यांतच अधिकाऱ्यांनीं तडजोडींत ठरलेल्या अटी पाळण्याचें नीतिधैर्य न दाखविल्यानें एवढ्या प्रयासानें झालेल्या संघटनेची विघटना झाली ! यामुळेंच व्यक्तिशः तक्रारी करण्याकरितां रयतांना जरूर असलेली माहिती मिळून देण्याची अधिकाऱ्यांनीं केलेली कारवाई रयतांनीं सहन केली; गांवकामगारांनीं दिलेला त्रास व केलेला अपमान रयत गिळून बसले; तडजोड करणाऱ्या पंचांना व पंचांच्या अर्जांना अधिकाऱ्यांनीं धुडकावून लाविलें तरी त्यांनीं किंवा कोणीही रयतांनीं त्याविरुद्ध फारशी खळबळ केली नाहीं; किंवा पुढें तानंगच्या रयतांना

पोलिसांच्या मदतीनें हैराण करून अधिकाऱ्यांनीं तडजोड, कायदा, सामान्य सौजन्य व सभ्याचारही बाजूला सारून वाढीसहित सारा वसूल केला ! पण रयत आपल्या डोक्यावर कांतडें ओढून थंड बसले !!! या सर्व गोष्टीमध्यें रयतांचा सर्वस्वी मनाचा मोठेपणा आहे असा दावा आम्ही करूं इच्छीत नाहीं. एका बाजूला अडाणी व दारिद्र्यानें गांजलेली रयत, त्यांत विघटनेचें वातावरण कुटिल राजनीतिनिपुण प्रतिपक्षाच्या डावांमुळें फैलावल्यामुळेंच वरील प्रकारचे ताजे अन्याय रयत सहन करूं झकली ! अशा प्रकारची रयतांची स्थिति अधिकाऱ्यांना स्पष्ट दिसूं लागल्यामुळेंच ते फार शेफारले व धीट बनले. रयतांनीं किंवा रयतांच्या पंचांनीं किंवा पुढाऱ्यांनीं अधिकाऱ्यांची जी अरेरावी सहन करून घेतली, त्याच्या बुडाशीं वरील प्रकारचें वातावरण कारण आहे हें येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

अशा प्रकारची स्थिति रयतांच्या सुदैवानें आली नसती तर दरबारच्या व रयतांच्या कुस्तीचा अखेर निकाल काय झाला असता हें खुलासा न करतांही समजण्यासारखें असल्यानें, आम्ही त्यांत जागा न अडवितां चळवळीच्या पुढील इतिहासाकडे वळतों.

यापुढें पंचांनीं आपला अर्ज व त्यांना मिळालेलें उत्तर श्रीमंत युवराज तात्यासाहेबांच्याकडे पाठविलें व त्यांच्याकडे पुन्हा दाद मागितली. पंचांना कारभारी यांच्या उत्तरावरून 'घर फिरलें आहे' असें दिसून आले होतें व आतां 'वासे खचित फिरणार' इतकी त्यांना दृष्टि आलेली होती. परंतु दाद मागण्याला कधीं आळस करूं नये असें म्हणतात; त्याला अनुसरून त्यांनीं श्रीमंत युवराजांकडे आणखी एक अर्ज टाकला. एकानें भलतें उत्तर द्यावें, त्यावर वरिष्ठाकडे पुन्हा अर्ज व्हावा; त्यानें उत्तरच देण्यास विलंब लावावा आणि विलंबानें दिलेल्या उत्तरांत पहिल्याचीच तरफदारी निराळ्या भाषेंत, जरूर तर पहिल्यालाच विचारून करावी, अशा कार्यक्रमांत अधिकाऱ्यांनीं व्यक्तिशः तक्रारी-अर्ज करण्याची मुदत संपविण्याचा धूर्तपणा आरंभिला होता अशी रयत-पंचांची खात्री होऊन चुकली होती. तथापि इतक्या दऱ्याखोऱ्यांतूनही व्यक्तिशः तक्रारींचे अर्ज पांचसहाशें झाले होते. या बाबतींत रयतांच्या चिकाटीचें अभिनंदनच केलें पाहिजे.

अशाप्रकारें व्यक्तिशः तक्रारींची नाकेबंदी झाली. वसुलीचे दिवस जवळजवळ येत चालले. बहुतेक खेड्यांनीं नाइलाजानें व निराशेनें फाळ्याचा पहिला हप्ता

भरला. बोलवाड, शिरढोण आणि तानंग या तीन गांवांनीं मात्र पुन्हा थोडी धडपड सुरू केली. कारण या गांवांवर अनुक्रमें '७७, ७२ व ७८' अशी भयंकर वाढ झालेली होती. तडजोडीप्रमाणें कमी होऊन तरी कितीसें कमी होणार आहे ! या तीन गांवांनीं आपापला प्रश्न कसा सोडविला, तो आतां आपण पाहूं.

१ बोलवाड—तडजोडीनें बोलवाड गांवचा अन्याय फारसा दूर झालेला नसतांही आपल्या पंचांनीं केलेली तडजोड मान्य केली; व्यक्तिशः तक्रारी करण्यामध्यें पहिला नंबर पटकावला; एकही खोटी तक्रार केली नाहीं आणि शेवटीं वाढलेल्या फाळ्यासहित एका हप्त्याचा सर्व फाळा अवघ्या चार तासांत वाटेल तें करून भरला आणि नंतर गांवांतील लोक भोजनास उठले. या गांवानें ह्या वाढीसहित फाळा कसा भरला याची हकीगत थोडी चित्तवेधक आहे. धाक, कायद्याची भीति, गोडीगुलाबीचें बोलणें, समजुतदारपणाचा आव, पुढील आपत्तीचें भेसूर चित्र, तसा प्रत्यक्ष अंमल करण्याची अधिकाऱ्यांची तयारी वगैरे सर्व प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्या अधिकाऱ्यांनीं योजून पाहिल्या व जवळजवळ एक रात्र यामध्यें जागून खर्ची घातली, तरी लोकांची समजूत पटली नाहीं व लोकांनीं आपलें म्हणणें सोडलें नाहीं. सर्व उपाय आतां संपले व हरले असें स्पष्ट झाल्यानंतर अधिकाऱ्यांनीं लपंडाव बंद केले आणि नंतर 'तुमच्यावरील अन्याय दूर करण्याचें मी आश्वासन देतों' असें रा० मामलेदार यांनीं सांगितल्यामुळें रयतांना आपापसांत सलोखा उत्पन्न करण्याच्या थोर बुद्धीनें वाढीसहित सारा चार तासांत भरला. याप्रमाणें चार तासांत सर्व फाळा चावडींत एकजुटीनें दाखल केल्याचें उदाहरण, आजपर्यंत पूर्वी कधींही संस्थानांतील कोणत्याही गांवीं झालेलें नव्हतें असें वृद्ध लोक सांगतात. सत्याग्रहानें रयत किती धीट, निश्चयी, धोरणी आणि समजूतदार बनत चालली आहे याचें हें एक उदाहरण आहे. खऱ्या, शास्त्रशुद्ध व शिस्तीच्या चळवळीनें प्रजेमध्यें सामर्थ्य उत्पन्न झालें आणि त्याबरोबरच घरंदाजपणाही नांदूं लागला आहे. असें कोणासही कळून येणार आहे. चळवळीनें प्रजा आडदांड न होतां समजूतदार होते हेंच बोलवाडनें सिद्ध केलें आहे.

परंतु या गांवावरील अन्याय जाहीरनाम्यांतील अटीप्रमाणें दरबारनें व पुढें स्वतःच्या पुण्याईवर आश्वासन दिलेल्या मामलेदारांनींही कांहींच दूर केला नाहीं.

२ शिरढोण:—या गांवांतील लोकांना गांवकऱ्यांनीं माहिती देण्याचें नाकारलें किंवा टाळाटाळी केली ! गांवकऱ्यांविरुद्ध तक्रार करून किंवा माहिती मिळविण्या-

विषयीं खटपट केल्यास त्यांत अधिकाऱ्यांच्या किती सबबी आहेत याची कल्पना या गांवांतील रयतांना आलेली होती. बोलवाडचें उदाहरण त्यांनीं ऐकलेलें होतें. तेव्हां खुद्द मामलेदार आपल्या गांवीं आल्यावर बोलवाडप्रमाणेंच त्यांनींही आपल्याला आश्वासन दिल्यास आपणही या हप्त्याचा सर्व फाळा एकजुटीनें भरावा, असा विचार करून अधिकाऱ्यांच्या आगमनाची वाट पहात लोक बसले होते; पण गांवकामगारांस धीर कसा निघावा ! त्यांनीं एकदोन लोकांना कांहीं तरी क्षुल्लक आरोपांवरून चावडींत आणून बसविलें व फाळा देण्याचें कबूल केल्यानंतर किंवा दिल्यानंतर सोडून दिलें अशी बातमी होती. पुढें एकदांचे मामलेदार आले व त्यांनीं या गांवावरील अन्याय दूर करण्याची खटपट मनापासून करतों असें सांगितल्यावर सर्व रयतांनीं एकमतानें फाळा भरला आहे.

२ ढवळी:—या गांवांत पाण्यानें ज्या जमिनी खरडून जातात व दोन दोन वेळां पेरणी केली तरी शेतकऱ्यांच्या हाताला पीक क्वचितच लागतें, अशा जमिनींवर भर आकार वाढविला आहे. या गांवांतील लोकांनाही व्यक्तिशः तक्रारी अर्ज करण्यास अधिकाऱ्यांनीं माहिती मिळूं दिली नाहीं ! माहिती न मिळाल्यामुळें व्यक्तिशः अर्ज झाले नाहींत. अर्थात् यांच्यावरील अन्याय तसाच कायम झाला आहे. या गांवांतील लोकांनीं सुमारें ३५–४० सह्या केलेला अर्जही लिहून पाठविण्यास तयार केला होता. परंतु गांवचे दोन पुढारी एक दिवशीं रात्रीं मामलेदारांना त्यांच्या घरीं जाऊन भेटल्यामुळें व तेथें ढवळी गांवावरील अन्याय दूर केला जाईल असें मामलेदारांनीं आश्वासन दिल्यानें सदर अर्ज पाठविण्यांत आला नाहीं. मामलेदार आपल्या आश्वासनास जागतील अशा समजुतीनें ढवळी गांवच्या रयतांनींही आपला फाळा भरून टाकला.

४ तानंग:—या गांवच्या लोकांनीं व्यक्तिशः तक्रारींचे अर्ज बहुतेकांनीं केले होते. मुद्दाम खोटा अर्ज एकानें देखील केला नव्हता. अधिकाऱ्यांनीं यांच्या अर्जांचा विचार न करतांच सारावसुलीचें काम सुरू केलें. अर्थात् लोकांनीं वाढलेला फाळा देण्याचें नाकारलें. मामलेदारांचा मुक्कामच यांच्या गांवावर तीन दिवस होता. लोकांनीं एकजुटीनें फाळा नाकारला. आठदहा दिवसांच्या खटपटीनें अधिकाऱ्यांना फारसें यश आलें नाहीं. लोकांची एकजूट फुटेना. तेव्हां या गांवांत पोलिसांचा उपयोग केला गेला; लोकांना धाकदपटशा दिला. गरीब बिचाऱ्या कांहीं महारांना लोकांना दहशत बसावी म्हणून बेदम मारण्यांत आलें ! गांवांत

ठेवलेले पोलिस रयतांना सारा भरल्याशिवाय पाणी आणण्यास, बाहेर पडण्यास मनाई करीत असल्याचा बोभाटा झाला ! अखेर इतक्या गांजवणुकीनंतर लोकांनीं फाळा भरला. या गांवच्या लोकांनीं आपल्यावरील या जुलुमाची सर्व हकीगत लिहून १००।१५० सह्यांचा एक अर्ज कोल्हापुरास पोलिटिकल एजंटकडे पाठविला. पोलिटिकल एजंट यांनीं तो अर्ज खालीं खुलाशाकरितां पाठविला. मामलेदारांनीं अर्जावर सह्या करणाऱ्या कांहीं रयतांचे जबाब घेतले; परंतु पुढें त्याचा निकाल पोलिटिकल एजंट यांजकडून अद्याप आला नाहीं. काम कोठें पडलें देव जाणें ! असो. अधिकाऱ्यांच्या अशा कृत्यावर वर्तमानपत्रांतून कडक टीका आल्या आहेत. या बाबतींत एका रयताच्या तोंडचेच उद्गार वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत ते येथें उद्धृत करितों. रयतांचें म्हणणें:—"काय विचारतां राव ! एका गोष्टींत सांगावयाचें म्हणजे मांडवाला आग लागली आणि सर्व मांडव जळाला ! कांहीं महारांनीं मार खाल्ला ! लोक घरांत आंतून कुलुपें लावून बसूं लागले. तीसचाळीस पोलीस आमच्या गांवावर आले होते. मडकीं, भांडीं, रांजण, कोयते गहाण टाकून लोकांनीं फाळा भरला. शिव्या तरी इतक्या कांहीं खाल्ल्या कीं कांहीं विचारूं नका. मामलेदारसाहेबांचा मुक्काम आमच्या गांवांतच होता. एक देवाशिवाय आमचें या जगांत कोणी नाहीं". (संस्थानी स्वराज्य, ता. १-३-२९) अशाप्रकारें वसूल केला गेला एवढेंच नव्हे तर 'टाईम्स ऑफ इंडिया' मध्यें एक तारही खालीलप्रमाणें प्रसिद्ध झाली–मग ती कोणाच्याही प्रेरणेनें असो अगर नसो.

"The revenue officers of the Miraj State have succeeded in collecting nearly the whole of the increased assessment without any untoward difficulty or opposition. The villages of the Bolwad, Tanang & Shirdhon were rather heavily taxed and several complaints from various individuals there, had been submitted to the authorities.

When, however, the time for the payment of the revenue came, the enhanced assessment was paid by them within the short space of four hours without any difficulty." (22–2–29.)

ही तार वाचून तर वाचकांना आश्चर्यच वाटेल ! या तारेंत किती गोष्टी कबूल केल्या तें पाहा ! बोलवाड, तानंग, शिरढोण या गांवांवर सारावाढ विशेष झालेली आहे ही गोष्ट कबूल केलेली आहे; त्या गांवांतील लोकांनीं व्यक्तिशः तक्रारींचे आपापले अर्ज अधिकाऱ्याकडे पाठविले आहेत ही गोष्टही या तारेंत मान्य केली आहे. तडजोडीच्या जाहिरनाम्याप्रमाणें व्यक्तिशः तक्रारी करणारांचा वाढलेला सारा तहकूब ठेवावयाचा असतांना तो अधिकाऱ्यांनीं वसूल केला आहे ही गोष्टही आतां या तारेनंतर लपून राहूं शकत नाहीं. लोकांनीं हा सारा चार तासांत कां व कसा भरला असेल याची कल्पना करण्याचें आम्ही वाचकांवरच सोंपवितों. मनुष्य विवेकभ्रष्ट झाला म्हणजे त्याचा शतमुखांनीं विनिपात कसा होतो हें अधिकाऱ्यांच्या या वर्तनावरून कोणासहीं सहज कळून येण्यासारखें आहे. 'संग्राम' ता. २३।२।२९ व 'संस्थानी स्वराज्य' ता. १।३।२९ या पत्रांमधून या 'टाईम्स'-च्या तारेवर टीका प्रसिद्ध झाली आहे. 'संग्राम'नें यावर टीका करतांना जे उद्गार काढिले आहेत ते मननीय आहेत.

"वचनें मोडून, जाहिरनामा घाव्यावर बसवून आणि गांवांतील लोकांवर पोलीसपार्टीच्या साहाय्यानें एक प्रकारचा हल्ला करून पुन्हा 'आमच्याविषयीं आपलेपणा राखा, इंग्रजांसारखे आम्हांस मानूं नका' असें जर अधिकारी म्हणत असतील तर त्यांची धन्य आहे, एवढेंच नव्हे त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. अधिकाऱ्यांनों, रयतांना सांभाळा, कसायासारखें मन निष्ठुर करूं नका. आपल्या पोराबाळांप्रमाणेंच रयतांचीं पोरेंबाळें आहेत. एवढी एक साधी गोष्ट लक्षांत बाळगाल तर ईश्वर तुमचें कल्याण करील. श्रीमंतांचें नांव व अब्रू कायम राहील असें वर्तन ठेवा. आज श्रीमंतांचें नांव तुमच्या हातांत आहे. वर्तमानपत्रांत बातम्या पाठवितांना यापेक्षां थोडा अधिक विचार करीत चला, एवढेंच रयतांचें आपल्याला सांगणें आहे."

असो. तडजोडीच्या जाहिरनाम्यांतील अटीशिवाय जबाबदार अधिकाऱ्यांनीं सारावसुलीच्या वेळीं व अगोदर, आणखी कांहीं आश्वासनें खाजगी रीतीनें दिलीं होतीं. त्यांपैकींच चळवळीच्या ऐनभरांत सत्याग्रहांतील रयतांवर दरबारच्या प्रेरणेनें जे खटले भरण्यांत आले होते ते सर्व काढून घ्यावयाचे; परंतु रयतांनीं आपसांतील असे दोन खटले मिटवून टाकले. राहिलेला एक, दरबारनें पुढें चालूं केला. या अधिकाऱ्यांच्या दानतीकडे पाहून काय म्हणावें ! या असल्या वर्तनानें

रयतांच्या हातीं अधिकाऱ्यांनीं व दरबारनें रयतांना वाटेल तेव्हां पुन्हा पूर्व-स्वरूपांत चळवळ करण्याचा एकप्रकारें हक्कच देऊन ठेवला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ता. ७ आक्टोबर सन १९२९ च्या मुंबईस नवीनच सुरू झालेल्या 'प्रताप' पत्राच्या अंकांत **'सारावाढ तहकूब करा'** या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेला लेख आम्ही याखालीं मुद्दाम देत आहों. सदर लेखांतील मुद्द्यांकडे श्रीमंत सर बाळासाहेब व त्यांचे अधिकारी यांनीं जरूर लक्ष पोंचवावें अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

सारावाढ तहकूब करा

[लिहून आलेला मजकूर]

मिरज संस्थानांतील सारावाढ हिंदुस्थानभर सर्वांना महशूर झालेली आहे. मिरजेंतील शेतकऱ्यांनीं सत्याग्रह करून आपल्या मनाची तळमळ व्यक्त केली आहे; एवढेंच नव्हे तर तडजोडीच्या वेळीं आपल्या मनाचा मोठेपणा सिद्ध केला आहे. राजापासून अधिकारी किंवा कारकुनापर्यंत कोणीही कितीही वेळां वचनें मोडून शेतकऱ्यांशीं प्रतारणा केली असली, तरी त्या गोष्टी उकरून काढून जखम चिघळविण्याची आमची इच्छा नाहीं. झालेला सर्व प्रकार अखिल महाराष्ट्र पूर्णपणें जाणत आहेच. " ब्रिटिश सरकारच्या सर्व्हे खात्यांतील अधिकाऱ्यांकडूनच आम्हीं सारावाढ करविलेली आहे व ते अधिकारी म्हणजे मोठे निष्णात असतात. वास्तविक माझ्या रयतेवर जबर कर लादण्याचा माझा केव्हांही मानस नव्हता व नाहीं." असें श्रीमंत सरकार बाळासाहेब यांनीं चळवळीच्या वेळीं सांगितलें होतें हें सर्वांना माहीत आहेच. परंतु बार्डोली तालुक्यांतील ब्रूम्फील्ड–मॅक्स्वेल कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर व मुंबई सरकारनें लँड रेव्हिन्यूच्या रिव्हिजनच्या बाबतींतील आपलें धोरण जाहीर केल्यामुळें ब्रिटिश अधिकाऱ्यांचे कसे धिंडवडे उडाले आहेत व त्यांची अक्कल कशी चव्हाट्यावर आलेली आहे, याकडे श्रीमंत बाळासाहेब यांनीं लक्ष पुरवावें अशी आमची त्यांना आदरपूर्वक विनंति आहे. " कर्तबगार अधिकारी " म्हणून सर्टिफिकेट देणाऱ्या श्री० मोडकांना व त्यांचे वडील अथवा वरिष्ठ अँडरसनसाहेब यांना जर ब्रूम्फील्ड–मॅक्स्वेल कमिटीनें एका अर्थीं मूर्खांत काढलें तर त्यांच्याकडून सर्टिफिकेट मिळविणारे कर्तबगार अधिकारी महामूर्ख ठरतात हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं स्वीकार-

लेली रिव्हिजनची पद्धति जनतेनें व सरकारनेंही चुकीची, त्याज्य आणि अन्याय-मूलक आहे असें ठरविल्यानंतर, त्यांच्या हातून त्याच चुकीच्या पद्धतीनें आपल्या संस्थानांत करविलेली सारावाढ कायम ठेवणें श्रीमंतांच्या प्रजावात्सल्याच्या धोरणाला अत्यंत विसंगत आहे.

मुंबईसरकारनें शेतकऱ्यांवरील अन्याय कळून येतांच माघार घेण्याचें धैर्य किंवा दूरदर्शीपणा दाखविला आहे. त्यांत त्यांची अब्रू गेली असें त्यांना वाटत नाहीं. मग आपल्याच हाडामांसाच्या राजानें आपल्या रयतेपुढें न्यायबुद्धीनें माघार घेण्यास कां कचरावें हेंच आम्हांस समजत नाहीं. लँड लीग अथवा शेतकरी संघ स्थापन होऊन चळवळ भरीव व व्यापक पायावर उभारली जाणार हें पाहून, अशा वेळीं मुंबईसरकारनें माघार घेऊन वास्तविक आपली बाजू संभाळून घेण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थानिकांनीं यापासून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. संस्थानी मुलुखांत खालसा मुलुखाहून पुष्कळ ठिकाणीं एकरीं दर अधिक असतात. संस्थानी मुलुखांत तहकुबी व सूट यांचे नियम क्वचितच पाळले जातात आणि सारावाढ झाली म्हणजे ती खालसा मुलुखापेक्षां संस्थानी मुलुखांत कितीतरी पटीनें अधिक केली जाते; या सर्व गोष्टींचा विचार करून ब्रिटिश सरकारापेक्षां संस्थानाधिपतींनीं आपल्या रयतेला अधिक आपलेपणानें वागविलें पाहिजे. ब्रिटिश सरकारामार्फत संस्थानाधिपतींना ताळ्यावर आणण्याचा प्रसंग रयतेवर आणवूं देणें ही गोष्ट कोणत्याही दृष्टीनें स्पृहणीय नाहीं. ब्रिटिश इंडियापेक्षां संस्थानांत अधिक अन्याय होत रहाणें ब्रिटिश सरकारच्या दृष्टीनें कितीही इष्ट असलें, तरी हल्लींच्या देशांतील हिंदी राजकीय आकांक्षेच्या दृष्टीनें तें अत्यंत विघातक असतें ही गोष्ट संस्थानाधिपतींना केव्हां कळणार !

सारावाढीस मूठमाती द्या

मि० श्रॉफ यांनीं आपल्या पत्रांत म्हटल्याप्रमाणें प्रत्येक ठिकाणीं 'बार्डोली'-सारखी चळवळ होणें शक्य नसलें, तरी त्याचा अर्थ असा नव्हे कीं, इतर ठिकाणीं तितका अन्याय झालाच नाहीं. मुंबईसरकारनेंही असाच विचार करून महाराष्ट्राच्या तालुक्यांतील सारावाढ तूर्त तहकूब केली आहे. सर्वच संस्थानांमधून मिरजे-सारखा 'सत्याग्रह' होणें शक्य वाटत नसलें तरी दूरवर दृष्टि देऊन इतर संस्थानिकांनींही नीट विचार करून सारावाढीला मूठमाती द्यावी. किंबहुना 'सत्याग्रह' किंवा बार्डोली शक्य असो किंवा नसो, हा सारावाढीचा प्रश्न न्यायदेवतेला कौल लावून

आणि शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति लक्षांत घेऊन सोडाविला गेला पाहिजे यांत शंका नाहीं. आपला राजेपणा व्यक्त करण्यास जबरदस्तीच्या सारावाढीपेक्षां इतर अनेक मार्ग मिळूं शकतील; नाहीं असें नाहीं. मुंबई सरकारलासुद्धां खालसा मुलुखांत कां व कसें पाऊल मागें घ्यावें लागलें याचा नीट विचार करून संस्थानाधिपतींनीं आपल्या राज्यकारभारांत वरिष्ठ सरकारास हात घालूं देण्याचा प्रसंग आपल्यावर ओढवून घेऊं नये. कारण म्हातारी मेल्याचें दुःख नाहीं; पण काळ सोकावतो ! एकदां कां ब्रिटिश ढवळाढवळीचा काळ सोकावला तर तो पुढें आवरतां आवरतां संस्थानाधिपति टेंकीस येतील.

वरिष्ठ सरकारची ढवळाढवळ

मिरज संस्थानचें प्रकरण आज एका अर्थी त्या थराला येऊन पोहोंचलें आहे. वरिष्ठ सरकारच्या मनांत आल्यास मिरज संस्थानच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्यास त्यांना पुरेशी जागा मिळेल अशी परिस्थिति मिरजेंत संस्थानाधिपतींच्या अनास्थेमुळें उत्पन्न झाली आहे असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. आतां आपल्या इभ्रतीच्या फायद्याची योग्य संधी आल्याशिवाय ब्रिटिश सरकार संस्थानच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालण्याच्या भरीस व्यर्थ पडणार नाहीं हें खरें; पण ही कांहीं मिरज संस्थानची बहादुरी खास नव्हे. मिरजेंतील रयतेच्या पंचांनीं श्रीमंतद्वयाशीं वाटाघाट करून संस्थानाधिपतींच्याच आर्थिक फायद्याची तडजोड श्रीमंतांच्या व अधिकाऱ्यांच्या भलेपणावर पुन्हा एकवार विश्वास ठेवून कबूल केली. पण त्या तडजोडींतील अटीही मोडण्यास दरबारनें मागें पुढें पाहिलेलें नाहीं. कबूल केलेल्या अटी मोडणें व दिलेलीं वचनें धाब्यावर बसविणें यालाच जर राजकारण म्हणावयाचा सपाटा संस्थानांत चालू राहील, तर संस्थानांतील अंतर्व्यवस्थेंत वरिष्ठ सरकारास आपण होऊन पाचारण करण्यासारखें नाहीं काय ? स्वतःच्या अदूरदर्शीपणानें म्हणा किंवा सल्लागारांच्या बेअकलीपणामुळें म्हणा, तोल सारावाढीच्या बाबींत घसरलेला आहे यांत आतां कोणासच शंका नाहीं. रयत लोक आज सुसंघटित प्रयत्न करूं शकोत किंवा न शकोत, तो प्रश्न अगदीं भिन्न आहे. शीर हातांत घेऊन लढल्याशिवाय अन्यायाची दादच लागावयाची नाहीं हा कांहीं चांगला लौकिक म्हणतां यावयाचा नाहीं. गेलेला तोल सांभाळण्याची ही सोन्यासारखी संधि आलेली आहे. ही संधि दरबारनें फुकट दवडूं नये असें आमचें आग्रहाचें सांगणें आहे. सल्लागारांना देखील संस्थानची इभ्रत वाढविण्याचें कार्य

करून दाखविण्याची ही वेळ आहे. आपली कमकुवत झांकून, न्यायबुद्धीचा टेंभा मिरवून आपलें राज्य तितकेंच अधिक दृढ करण्याच्या बाबतींत इंग्रज नोकरशाही अत्यंत प्रवीण आहे; परंतु संस्थानांत खालसापेक्षां अधिक अन्याय चालू ठेवून आपलींच देशी संस्थानें त्यांना अप्रत्यक्षतः मदत करीत असतात. अशा प्रकारची इंग्रज नोकरशाहीला मदत करून देशाचा शाप घ्यावयाचा नसेल, तर मिरज दरबारनें आपलीं शेंडी सल्लागारांच्या हातून सोडवून घेऊन सारावाढीच्या बाबतींतील आपले धोरण पूर्णपणें सुधारलें पाहिजे असें आम्हांस वाटतें.

यंदां शेतकऱ्यांचीं पहिलीं पिकें आजिबात आलेलीं नाहींत, पर्जन्यराजानें शेतकऱ्यांकडे डोळे वटारून पाहिले आहेत. त्यामुळें शेतकरी काळजींत आहेत. तेव्हां निःपक्षपाती, अनुभवी आणि हुषार अधिकाऱ्यांकडून रयतांच्या व्यक्तिशः तक्रारी नीट समजावून घेऊन त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यास मिरज दरबारनें ताबडतोब सुरुवात केली पाहिजे. ज्या अँडरसनसाहेबांच्या शहाणपणावर व पद्धतीवर विश्वास ठेवून श्रीमंतांनीं मिरजेंतील सारावाढ योग्य आहे असें बोलण्याचें धाडस केलें होतें, त्या खंडावरून वाढत्या सारापद्धतीचें ब्रूम्फील्ड–मॅक्स्वेल कमिटीनें समूळ खंडनच केलेलें असल्यामुळें, आतां मिरज संस्थानांतील सारावाढ निराधार ठरली आहे. तेव्हां आपल्या संस्थानांतील सारावाढ, आम्ही वर म्हटल्याप्रमाणें, दरबारनें एकदम तहकूब करावी हेंच कोणत्याही दृष्टीनें योग्य होईल. असा हा उपक्रम करून मिरज दरबारनें आपला गेलेला तोल पुन्हा सांवरावा व इंग्रजांपेक्षां आपण रयतेला अधिक जवळचे आहों ही गोष्ट सिद्ध करून द्यावी अशी आमची आग्रहाची व आदरपूर्वक सूचना आहे. संस्थानाधिपतींना सद्बुद्धि देणारा व रयतेचें सारावाढीपासून रक्षण करणारा ईश्वर समर्थ आहे.

प्रकरण चौदावें

पूर्णाहुति

अशा रीतीनें महाराष्ट्रांतील एक लहानसा पण अपूर्व संग पूर्ण झाला. रयतेला किती टक्के सूट मिळाली हाच त्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. त्या बाबतींतील विजय संशयास्पदच म्हणतां येईल. झालेल्या तडजोडीमुळें गरीबांच्या तोंडीं यापुढें दोन घांसांच्या ऐवजीं चार घांस पडतील असें म्हणणें शक्य नाहीं. निर्दय राजसत्तेनें शेवटपर्यंत स्वतःचें जितकें साधतां येईल तितकें साधून घेतलेंच. पण पूर्वी रयतेच्या स्वप्नींही नव्हतें असें फळ–अमृतफळ–रयतेच्या पदरीं पडलें आहे. रयत धीट झाली, रयतेमध्यें आत्मविश्वास उत्पन्न झाला; आपापसांतील तंटे मोडल्यानें, भ्याडपणा सोडल्यानें आणि दीर्घोद्योग केल्यानें लोकांमध्यें प्रचंड तेज कसें प्राप्त होतें याचा स्वाद रयतेला चाखावयास मिळाला आहे. प्रजेला अज्ञान ठेवणें शक्य आहे; पण सज्ञान झालेल्या प्रजेला मारून मुटकून किंवा कोणत्याही प्रकारें अज्ञान करूं म्हटलें तर तें मात्र शक्य नाहीं.

ईश्वराच्या कृपेनें चालू चळवळींत रयतेला चळवळीच्या दोन्ही बाजू पहावयास मिळाल्या. आपण इतके निकरानें लढलों म्हणून आपलें नाक वांचलें, आपली प्रतिष्ठा वाढली आणि आत्मसाक्षात्कार झाला. पण सरतेशेवटीं लोभी आणि निर्दय सरकारच्या हातून सूट अशी बेताचीच मिळाली ! आणि व्यक्तिगत तक्रारींची कांहींच दाद लागली नाहीं. या सर्व परिस्थितीला रयत विसरून जाईल असें जर कोणाला वाटत असेल तर तें चुकीचें आहे. भाकरीच्या दरएक कोरड्या घांसाबरोबर गरीब रयत उगाळतच रहाणार कीं, या जगांत एकोपा असला, निर्धार असला, मरणाची तयारी असली तरच जगणें शक्य आहे. राजसत्ता तोंडानें किती ही 'नारायण' 'नारायण' म्हणत असली तरी तिच्या पोटांत 'नारायण' नसून हिरण्यकश्यपूच असतो. अठ्ठेचाळीस–पन्नास हजार लेंकरांच्या तोंडचा घांस कमी करून स्वतःच्या महालांत दिवे पाजळणारे राजेसाहेबांना रयत हृदयापासून 'माबाप सरकार' कशी म्हणूं शकेल ? अजून पूर्वजांची पुण्याई आहे; अज्ञान भासणाऱ्या रयतेमध्यें घरंदाजपणा, कृतज्ञता आणि प्रजाधर्म वसत आहे. रयतेला भांडणाचा अत्यंत तिटकारा असतो. अन्याय पुरवला पण झगडत बसणें नको ही रयतेची

नेहमींची वृत्ति. पण जिवावर उदार होऊन, लढल्यावांचून, एक पैची देखील सूट तुम्हांस मिळावयाची नाहीं असेंच जर राजसत्ता पदोपदीं प्रत्यक्ष कृतीनें प्रजेला शिकवूं लागली तर जुनी वृत्ति कोठवर टिकणार ? सरकारच्या लष्करी सामर्थ्यांशीं टक्कर देण्यास स्वतःचें शारीरिक सामर्थ्य एकत्रित करण्याची प्रजेची तयारी नाहीं हें खरें; पण सरकारचें सामर्थ्य फोल करण्यास असें शारीरिक सामर्थ्य एकत्रित करण्याची आवश्यकताही नाहीं एवढें रयतेला समजलें म्हणजे जगांतील कोणती सत्ता रयतेला दाबून ठेवूं शकेल ? सरकार प्रजाक्षोभालाच ओळखतें. प्रजेच्या अर्जविनंत्यांना किंवा वचनपालनाच्या थोरपणाला ओळखत नाहीं अशी प्रजेची एकदां खात्री झाली म्हणजे सरकार कोणत्या नियमानें राज्य करील ?

मिरजसारावाढीच्या प्रकरणाचा शेवट रयतेनें गोड करून घेतला ही गोष्ट खरी आहे. रयतेला उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा तिन्ही काळीं कष्ट करून पोट भरण्याची संवय आहे; त्यामुळें कोणकोण स्वतःला पिळत असतें याचा हिशेब तयार ठेवीत नसते. पण ऊंसाचा रस पिळणाऱ्या घाण्याचाच अवतार जर राजसत्तेनें धारण केला तर रयत तें किती दिवस सहन करील ? उपासमारीसारखा गुरु नाहीं आणि निराशेसारखा पुढारी नाहीं. आज सरकार अदूर दृष्टीनें शीलसंपन्न प्रजासेवकांची हेटाळणी करील, त्यांची प्रतिष्ठा तोडून टाकण्याचे अधर्म्य प्रयत्न करील; पण लहान मुलांनाही आईचे डोळे ओळखतां येतात. सरकारच्या या युक्त्या किती दिवस चालणार ?

पण जर कां रयतेचा जबाबदार पुढाऱ्यांवरील विश्वास उडून गेला तर राजसत्तेचा एक मित्रवर्ग मात्र नाहींसा होईल. आज प्रजासेवकांना सरकारच्या शिव्या खाऊन सरकारचें मित्रकार्य करावें लागतें. प्रजेचा विश्वास आणि राजसत्तेची कदर या दोन गोष्टींवरच त्यांची उपयोगिता अवलंबून असते.

राजसत्ता जितकी लहान तितकी तिची भूक अधिक आणि युक्त्याप्रयुक्त्या करण्याच्या बाबतींत विधि निषेध कमी ! अशा स्थितींत प्रजाकारण चालविणें सोपें नाहीं. साम्राज्याविरुद्ध लढणें जितकें कठिण आहे त्यापेक्षां बारीक सारीक राजांच्याविरुद्ध लढणें अधिक कठिण आहे. अशा टक्करींत प्रजा एकवेळ तरबेज झाली म्हणजे राजसत्तेला विचारच करावा लागेल.


आणि इतकें संकट हे राजे लोक कोणच्या लाभासाठीं ओढवून घेतात ? ऐषआरामाच्या परदेशी वस्तू आणावयाच्या, पोकळ अभिमानाच्या आणि प्रतिष्ठेच्या

कल्पनेनें भारून जाऊन उधळपट्टी करावयाची आणि स्वतःच्या महालाप्रमाणें स्वतःची राजधानीदेखील शृंगारण्यांत गरीब रयतेच्या खोल गेलेल्या पोटावर पाय द्यावयाचा, एवढ्यासाठीं ! मोठा पराक्रम गाजवावयाचा असेल आणि त्यासाठीं रयतेपासून सक्तीनें पैसे घेतले तर गोष्ट निराळी !

पण ही परिस्थिति आतां फार दिवस टिकावयाची नाहीं. राजसत्तेला शिक्षणापासून कांहीं धडा मिळाला नसेल म्हणून काय झालें; सुशिक्षित प्रजा ही स्थिति चिरकाल कधींही सहन करणार नाहीं आणि प्रजेचें खरें शिक्षण हें तात्या पंतोजीच्या शाळेंत होत नसून, ऊन–तहान–दुष्काळ–सारावाढ–कोर्टें–तुरुंग–विश्वासघात, फसवाफसवी–निर्दयता–कठोरता यासारख्या कठोर शाळेंतच होत असतें.

पण हृदय म्हणतें, मनुष्यजातीनें वरील कठोर अभ्यासक्रम समजुतदारपणानें सौम्य करणें यांतच माणुसकी आहे. चारित्र्यसंवर्धनानें जें तेज उत्पन्न होतं तें शुभंकर असतें. तें एका बाजूनें प्रजेमध्यें सामर्थ्य उत्पन्न करतें आणि दुसऱ्या बाजूनें राजसत्तेमध्यें अत्यंत सावकाश का होईना, धर्मबुद्धि उत्पन्न करते. मिरजेच्या सारावाढीविरुद्ध झालेल्या चळवळीचा पाया, सत्य, शांतता आणि निर्भयता या चारित्र्यसंवर्धनावर रचला गेलेला असल्यामुळेंच तिचा हा अल्पसा इतिहास लिहून काढून महाराष्ट्रीय जनतेपुढें तो सादर केला आहे. या इतिहासाचें कथानक लहान असलें, त्यांतील कार्यकर्ती मंडळी ज्ञानानें, अर्थानें, अधिकारानें पासंगापुरतींही नसलीं, तथापि याची फलश्रुति मोठी आहे. देशांतील परिस्थिति पाहतां असले प्रसंग यापुढें वारंवार येणार; त्यावेळीं या इतिहासाचा थोडातरी उपयोग होवो, अशी त्या जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करून आणि इतिहासाचें मर्म जाणणाऱ्या श्रीव्यासाच्या भारतसावित्रीचें स्मरण करून येथें हा इतिहास पुरा करितों.

॥ न जातु कामान्न न भयन्न लोभाद् ॥
॥ धर्मम् त्यजेद् जीवितस्यापि हेतोः ॥



अभिप्राय

१

बार्डोलीस मोठा सत्याग्रह चालू असतां, तशाच प्रकारचा छोटेखानी सत्याग्रह मिरज संस्थानांत चालू होता, त्याची ही समग्र हकीगत पुस्तकरूपानें वाचावयास मिळालेली पाहून फार आनंद वाटला. सत्याग्रह काय तो खालसा मुलुखांतच होऊं शकतो, देशी राज्यांत सत्याग्रह करणें अशक्य नसलें तरी दुरापास्त आहे, असें म्हणणाऱ्या लोकांनीं हा इतिहास जरूर वाचावा. सत्याग्रहाचें शस्त्र बरींच वर्षेंपर्यंत गंजून जाण्याचा संभव नसल्यानें दरएक सत्याग्रहाची सांगोपांग हकीगत बारीक सारीक तपशिलांसह लोकांसमोर असणें आवश्यक आहे. यामुळें महादेव देसायांच्या बार्डोलीच्या इतिहासाप्रमाणें मिरज संस्थानांतील रयतेच्या सत्याग्रहाचें हें वर्णन अभिनंदनीय ठरतें.

मुंबई,
ता. २९।१०।२९. } **जमनालाल बजाज**

२

'मिरज संस्थानांतील सारावाढ आणि रयतांचा सत्याग्रह' हें पुस्तक मी समग्र वाचून पाहिलें, व तें मला फारच आवडलें. रा० पुंडलीक, शिखरे व इतर पुढारी यांनीं मिरज संस्थानांतील सारावाढीविरुद्ध जी चळवळ केली व शेवटीं यश संपा-दिलें, त्याबद्दलची इत्थंभूत माहिती या पुस्तकांत देण्यांत आलेली आहे. एखाद्या तक्रारीविरुद्ध सत्याग्रह करणें झाल्यास त्याची पूर्ण तयारी कशी करावी, सत्याग्रह केव्हां पुकारावा व यशस्वी होण्यास तो कोणत्या तत्त्वांवर चालवावा, हा बोधही या पुस्तकावरून मिळण्यासारखा आहे. पुस्तक संग्राह्य झालें आहे.

पुणें,
ता. ३१।१०।२९. } **ल. ब. भोपटकर**

शुद्धिपत्रक

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३	२७	३	१

"I have glanced through the little book relating to the dispute about revenue in the Miraj state of which you were good enough to send me a copy. In the present state of my health, I have had neither the energy, nor inclination to read the book from end to end. But from portions I have read therefrom it appears that in conducting the campaign of resistance its promoters steadily kept in view two essential principles viz. good will and non violence, which have been held to be the Sine-qua-non of such movements. I am sorry that your efforts did not succeed in getting redress to the extent you desired, but that was perhaps due to the circumstances and the environment in which you and your clleagues had to work."


Kirtikar Cottage.
Lonavla.
20-11-29.

M. R. Jayakar.

७३	१६	कालेलर	कालेलकर
७६	७	मुद्द्यांच्या	मुत्सद्यांच्या
७९	२४	झाल	झाले ?

पृष्ट	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९४	२	भटेति	भेटींत
९६	२	समरीवालें	समरी पॉवरवाले
१००	२२	दान	दोन
१०३	४	लाभावी !	लागावी !
१०५	२४	हसूं	लोक हसूं
१११	११	सहस्त्र	सशस्त्र
११२	२२	मोडावयाचा	मोडावयाचा नाहीं
११५	११	दादासाहेब	नवाकाळ सहसंपादक श्री० नाना
११६	१२	त्ति	वृत्ति
१२३	८	चौंकशावर	चौकशीवर
१३०	१४	म्हणतांच	म्हणतात
१३०	१६	नाहीं.	म्हणून नव्हे, तर
१३४	८	माहिती	माहीत
१३७	७	ज़ीव	जीवा
१३७	९	जाणा	जाण
१३८	३	दाखतां	राखतां
१३८	७	पांतिंताः	पातितः
१३९	मथळ	पातिता	पातितः
१४१	”	पातिताः	पातितः
१४३	”	”	”
१४५	”	पातिता	”
१४७	३	करण्यांचा	करण्याची
१४७	२८	दडपशाह	दडपशाही
१५०	८	झाल्यानें	झाल्यानें आणि
१५०	१७	बजूला	बाजूला
१५४	४	गंभीर व	गंभीर
१५५	८	वाकवाल तर एकदां	एकदां वाकवाल तर
१५८	२९	मार–अपमान	मान–अपमान

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६१	१	आह	आहों,
१६८	१९	आतांपर्यंत	अंतापर्यंत
१७१	२८	गणल	गणलें
१७५	२०	पोटस्थळाच्या	पाटस्थळाच्या
१७८	९	निवडला	निवडली
१७८	१३	करणारी	कळणारी
१८९	२९	अनक	अनेक
१९२	२९	सर्व	सर्व लोक
१९६	२६	stubborn ress	stubbornness
२००	६	करीबर	करीत्र
२०१	२९	दिखलागे	दिखलाने
२०२	३	नों	नौं
२०२	८	छो	छठे
२०२	२७	जोहु आहै	जो हुआ है
२०३	१५	की	को
२०३	२०	बढ़ हुए	बढ़ेहुए
२०३	२१	बचहुए	बचेहुए
२०३	३०	काभी	को भी
२०४	८	आस्त	आस्ते
२२६	१२	मदतीपैकीं	मुदतीपैकीं
२३९	१७	रयतांना	रयतांनीं
२२५	२३	तोल	दरबारचा तोल
२३६	९	आहेत	आहे
२३८	१२	तयार	रयत तयार



REFBK-0003840